म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३३६१



जवाहरलाल नेहरू
विचारधारा

अनुवाद – वि. वि. भुस्कुटे


REFBK-0026050

संदर्भ निबंध -

३३६१


२६५०

रा.वि.प.



''जवाहरलाल नेहरु विचार धारा''

– व्हॉईस ऑफ जवाहरलाल नेहरु –
या पुस्तकाचा अनुवाद


REFBK-0026050

अनुवाद – विट्ठल विनायक भुस्कुटे

इंग्रजी पुस्तकाचे संपादन – सी. आर. नेरुरकर

● अनुवाद :
वि. वि. भुस्कुटे
विनायक निवास
पांडुरंगवाडी, डोंबिवली (पू.)

● **'व्हॉइस ऑफ जवाहरलाल नेहरु'**
या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद

● **इंग्रजी पुस्तकाचे संपादक**
सी. आर. नेरुरकर

● किंमत : ३० रुपये

● **प्रकाशक :**
नृसिंह प्रकाशन
नरसिंह खानोलकर
५, मातृपितृ गुरुकृपा,
कोपरगांव, डोंबिवली (प.)
जि. ठाणे.

● **मुद्रक :**
रमेश विष्णु दाते,
लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस,
दाते सदन, रामनगर,
डोंबिवली (पूर्व).

● **१० ऑक्टोबर, १९८९**

अनुवादकाचे चार शब्द

१४ नोव्हेंबर १९८९! जवाहरलाल नेहरु यांचा १०० वा वाढदिवस! साऱ्या भारतात या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्यात येईल. आधुनिक भारताचे शिल्पकार जवाहरलाल नेहरु यांचा जन्मशताब्दीचा सोहळा सारी भारतीय जनता मोठ्या अभिमानाने आनंदाने साजरा करील. भव्य सभा, संमेलने आणि मेळावे आयोजित करण्यात येतील, रोषणाई करण्यात येईल.

महान नेत्यांच्या आणि महान संस्थांच्या कार्य कर्तृत्वाची आणि विचारांची देशाला, जनतेला आठवण करुन देणे हा या महोत्सवांचा मूळ हेतू आहे पण तो पुरेशा प्रमाणात साध्य होतो का? हा प्रश्न आहे.

वाढदिवसांचे आणि शताब्दींचे महोत्सव साजरे होतात पण उत्सव मूर्तींचे विचार आणि कार्य कर्तृत्वाचा जेवढा प्रचार आणि प्रसार व्हावयास हवा तेवढा होत नाही. केवळ समारंभ आणि सोहळे साजरे होतात आणि काही वेळा तर या समारंभाना आणि उत्सवांना अनिष्ट, विकृत स्वरुपही प्राप्त होते.

महान नेत्यांचे, विचारांचे, समाज सुधारकांचे वाढदिवस, शताब्दी उत्सव सोहळे साजरे करावेत आणि त्यांचे विचार आणि आचार विसरावेत असा सोपा विचार करुन आज आपण आपली जबाबदारी झटकून टाकत आहोत असे वाटते.

जवाहरलाल नेहरु केवळ विचारवंत नव्हते तर भारताचे एक अत्यंत प्रभावी आणि असाधारण लोकप्रिय असे राष्ट्रीय नेते होते. स्वतंत्र्य भारताचे ते पहिले पंतप्रधान होते आणि त्यामुळे त्यांनी आपल्या विचारानुसार भारताच्या राष्ट्रीय जीवनाला दिशा देण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना या बाबतीत बऱ्याच प्रमाणात यशही आले आहे. योजनाबध्द आर्थिक विकास, उद्योगधंद्याच्या सार्वजनिक विभागाची निर्मिती, मुलभूत उद्योगधंद्यांचा विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञानाला प्राधान्य आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांततेचे, असंलग्नेतचे धोरण आणि वंशवादाला आणि साम्राज्यवादाला विरोध ही सर्वसाधारण समाजवादी दिशा त्यांनी भारतीय राष्ट्रीय जीवनाला दिली आहे. पण जवाहरलाल नेहरु केवळ राजकीय पुढारी नव्हते तर ते एक थोर विचारवंत, संवेदनाशील लेखक होते, वक्ते होते. त्यांची भाषणे म्हणजे अभ्यास मंडळेच होती. या भाषणांद्वारे आणि लिखाणाद्वारे त्यांनी ज्या भारतीय जनतेवर त्यांचे मनोमन प्रेम होते त्या जनतेला अत्यंत तळमळीने शिकविण्याचा प्रयत्न केला आहे, उद्‌बोधन केले आहे.

जवाहरलाल नेहरु आता आपल्यात नाहीत पण त्यांनी भावी पिढ्यांसाठी आपल्या विचारांचा प्रचंड खजिना ठेवला आहे. आपल्या देशात असे एक असामान्य नररत्न होऊन गेले हे एक आपले खरोखरच सद्‌भाग्य आहे. त्यांच्या विचारांच्या खजिन्यातील काही विचार रत्ने मराठी वाचकांना उपलब्ध करुन द्यावीत आणि आपल्या अल्पस्वल्प कुवतीनुसार त्या महापुरुषाच्या शताब्दी समारंभात आपण सहभागी व्हावे या एकाच हेतूने आम्ही हे पुस्तक प्रसिध्द करीत आहोत.

जवाहरलाल नेहरु यांच्या विचारांचा नव्या पिढीला परिचय करुन देण्याच्या हेतूनेच महाराष्ट्र प्रगती मंडळ या संस्थेने अनेक वर्षापूर्वी 'व्हॉईस ऑफ जवाहरलाल नेहरु' या नावाचे एक इंग्रजी पुस्तक प्रसिध्द केले होते. श्री. सी. आर. नेरुरकर यांनी या पुस्तकाचे संपादन केले होते. आम्ही त्यांचे आभारी आहोत. आमचे परममित्र कॉ. बाबुराव रणदिवे यांनी या अनुवादाची मुळप्रत वाचून बऱ्याच सुधारणा केल्या याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

आमचे मित्र श्री. रमेश दाते यांच्या सहकार्याखेरीज तर हे पुस्तक प्रकाशात आलेच नसते.

✦

मूळ इंग्रजी पुस्तकाची प्रस्तावना

प्रस्तावनेदाखल – चार शब्द

आमच्या गतकाळातील राष्ट्रीय नेत्यांनी ज्या ध्येयांचा सातत्याने पाठपुरावा केला आणि ज्या ध्येयांसाठी आपले जीवन वेंचले त्या ध्येयांचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या व त्यांची परंपरा पुढे चालविण्याच्या प्रमुख उद्देशाने 'महाराष्ट्र प्रगती मंडळाची' स्थापना करण्यात आली. जवाहरलाल नेहरु यांनी निरनिराळ्या प्रसंगी केलेल्या भाषणांचा हा छोटेखानी संग्रह प्रसिध्द करतांना त्या मंडळाला सार्थ अभिमान वाटत आहे. त्यांची ही सारी भाषणे देशभक्ती, उदात्त ध्येयवाद आणि निखळ तळमळीने ओतप्रोत भरलेली आहेत. महाराष्ट्र राज्याचे तरुण आणि तडफदार पर्यटन मंत्री मा. मधुसुदन वैराळे यांच्या हस्ते या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येत आहे. या प्रसंगी आधुनिक भारतीय नेत्यांमधील एका अत्यंत लोकप्रिय नेत्याच्या विचार रत्नांचा हा संग्रह सादर करण्यामुळे आमच्या तरुण पिढीमध्ये दिसून येणारी मरगळ दूर होण्यास साहाय्य होईल असा आम्हांला विश्वास वाटतो.

चीनचे सर्वश्रेष्ठ कम्युनिस्ट नेते माओ त्से तुंग यांच्या तथाकथित क्रान्तिकारक सूत्रांचा संग्रह असलेल्या 'रेड बुक' या पुस्तकाचा बोलबाला आहे. पण आपल्यापाशी आधुनिक काळातील चिरतारुण्याचे आणि सर्वसंग परित्यागाचे प्रतिक असलेल्या एका महान नेत्याचे मुलभूत आणि मौल्यवान विचार आहेत. आपल्या विस्तीर्ण सीमारेषांपलिकडून पसरविण्यांत येणाऱ्या जालीम विषावरील समयोचित तोडगा या विचारांच्या रुपाने आमच्याकडे आहे.


आमच्या क्रियाशील आणि विचारी युवकांमध्ये या पुस्तिकेचा मोठ्या प्रमाणांत प्रसार करुन आपण एक ऐतिहासिक कामगिरी पार पाडीत आहोत, अशी महाराष्ट्र प्रगती मंडळाची धारणा आहे. आम्हाला एवढा आंनद होणे कितपत योग्य वा अयोग्य आहे हे इतरांनी ठरवावयाचे आहे.

✦

अनुक्रमणिका

१) अंतरिम अथवा हंगामी सरकार	१
२) स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक	३
३) नियतीशी भेट	६
४) नियतीने नियुक्त केलेला दिवस	८
५) भारताचा प्रथम क्रमांकाचा सेवक	१०
६) प्रकाश विझला!	१३
७) वैभव अंतरले : सूर्यास्त झाला	१५
८) गांधीजींची अखेरची यात्रा	१८
९) गांधीजींचे खरे स्मारक	२१
१०) फाळणीच्या यातना	२४
११) राजकारण आणि धर्म	२६
१२) आपल्यापुढील कार्य	२६
१३) आपल्या पिढीला कठोर परिश्रमांची सजा	३१
१४) अधिक उत्पादन ही प्राथमिक आवश्यकता	३४
१५) औद्योगिक शांतता ही प्राथमिक गरज	३६
१६) भारताच्या पहिल्या जहाजाचा सागर प्रवेश	३९
१७) व्यापारी जमातीला उद्देशून	४१
१८) कश्मिर संस्थानचे विलीनीकरण	४४
१९) भारताचा जागतिक घडामोडीत प्रवेश	४९
२०) राष्ट्र गटांपासून असंलग्नता	५२
२१) परदेशातील प्रचार	५५
२२) पूर्व आणि पश्चिमेचा संगम	५७
२३) ऐतिहासिक निर्णय	६०
२४) आशियाला पुनश्च स्वत्त्व प्राप्त झाले	६२
२५) संयुक्त राष्ट्रांना उद्देशून	६६
२६) विश्व विद्यालयाची कार्ये	६९
२७) मौंटबॅटनना उद्देशून	७२
२८) सरोजिनी नायडू	७५
२९) सार्वत्रिक निवडणुका	७८
३०) मधला मार्ग	८०
३१) पाया रचण्याचे कार्य	८३

३२) जनतेने निर्णय घ्यावा ८७
३३) एक शोधयात्रा ९२
३४) मैत्रीपूर्ण सहकार्य ९५
३५) नवचैतन्यशाली यात्रा ९७
३६) शांततेची प्रवृत्ती ९९
३७) संस्कृती म्हणजे काय? १०२
३८) वैज्ञानिक वृत्ती १०५
३९) उदात्त आदर्शाचे प्रतीक युनेस्को १०८
४०) वस्तुसंग्रहालयाचा उद्देश ११०
४१) आधुनिक जीवन विचाराला प्रोत्साहन देत नाही ११३
४२) बुद्धाचा संदेश ११७
४३) विनम्र सत्यशोधक ११८
४४) अरिष्टांचे युग १२१
४५) विश्वविद्यालयाचे कार्य आणि भूमिका १२४
४६) गतीशील जीवन १२९
४७) स्वातंत्र्य आणि स्वैराचार १३३
४८) इंग्रजी भाषेचे स्थान १३७
४९) शासकीय नोकरांना उद्देशून १४०
५०) छत्तीस कोटी समस्या १४४
५१) संपूर्ण स्वातंत्र्य : आमचा जन्म सिध्द हक्क १४७
जवाहरलाल नेहरू यांची अंतिम इच्छा १५४



"हे जग जरी आपसांतील जीवघेणी स्पर्धा, विरोध आणि अंतर्गत संघर्षाने त्रस्त झालेले असले तरी ते एक जागतिक राष्ट्रकुल उभारण्याकडे वाटचाल करीत आहे."

१. अंतरिम अथवा हंगामी सरकार

दिल्ली आकाशवाणीवरील भाषण, ७ सप्टेंबर, १९४६.

मी, आज तुमच्याशी उच्चस्तरीय धोरणाविषयी अथवा भावी काळातील आमच्या कार्यक्रमांविषयी बोलणार नाही, त्याला अद्याप वेळ आहे. पण तुम्ही आमच्याविषयी जे प्रेम आणि आपुलकी व्यक्त केलीत त्याबद्दल आपले आभार मानणार आहे. आम्हाला जनतेची आपुलकी आणि सहकार्य केव्हाही हवेच आहे. पण आपल्यापुढील खडतर काळांत आम्हाला त्याची अधिक गरज आहे. एका मित्राने मला संदेश धाडला आहे कीं, 'हे देशाच्या सर्वश्रेष्ठ नाविका, तुला सर्व वादळांतून राष्ट्रनौका पार पाडण्याचे सामर्थ्य प्राप्त होवो. –'शुभास्ते पंथान: सन्तू'. संदेश मोठा उत्साहवर्धक आहे. पण भावी काळांत अनेक वादळे येणार आहेत आणि आजची राष्ट्रनौका जुनी आणि खिळखिळी झालेली आहे, तसेच तिची गती मंद झालेली आहे आणि म्हणून ती या जलदगतीने बदलणाऱ्या काळाला अनुरुप नाही. ती मोडून टाकून आता नवी नौका बांधली पाहिजे. पण नौका जरी कितीही जुनी असली आणि नाविक जरी दुर्बल असला तरी लक्षावधी लोकांचे हात आणि मने जर त्याला साहाय्य करण्यास सिध्द असतील तर आपण कोणत्याही तुफानाला तोंड देऊ शकतो आणि आत्मविश्वासाने भविष्यकाळाला सामोरे जाऊ शकतो.

तो भविष्यकाळ आज आकार घेत आहे आणि ही आमची पुरातन आणि प्रिय मातृभूमि मोठ्या यातनामय आणि कष्टप्रद मार्गाने स्वत:चे स्थान शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. तिला पुन्हा यौवनावस्था प्राप्त झाली आहे. तिच्या डोळ्यांत साहसाची चमक तरळत आहे. तिला पुन्हा एकदा आत्मविश्वास वाटू लागला आहे आणि स्वत:च्या कर्तृत्वाविषयी विश्वास वाटू लागला आहे. दिर्घकाळ ती संकुचित बंधनाने जखडलेली होती आणि कुढत राहिली होती. आता ती विशाल विश्वाकडे मोकळे पणाने पहात आहे. जगातील इतर राष्ट्रांकडे मैत्रीचा हात पुढे करीत आहे, जग जरी संघर्षमय असले आणि त्यात युध्दाचे विचार घोंघावत असले तरीसुध्दा!

परस्परांविरुध्द उभ्या ठाकलेल्या राष्ट्रगटांच्या सत्तास्पर्धेपासून होता होईल तोपर्यंत दूर राहण्याचा आमचा विचार आहे. या सत्तागटांमुळेच भूतकाळांत जागतिक युध्दे झाली आणि भावी काळांत यामुळेच मोठ्या प्रमाणावर अरिष्टे कोसळण्याची शक्यता आहे. शांतता आणि स्वातंत्र्य अविभाज्य आहेत असा आमचा विश्वास आहे.

कोठेही एके ठिकाणी स्वातंत्र्य नाकारण्यात आले तर इतर ठिकाणीही स्वातंत्र्याला धोका निर्माण होईल, युध्दे आणि संघर्ष निर्माण होतील. परतंत्र आणि वासाहतिक देशांच्या लोकांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे आणि सर्व वंशांच्या लोकांना समान संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत, या बाबतीतील तंत्रांच्या आणि व्यवहाराच्या बाबतीत आम्हाला विशेष आस्था आहे. आम्ही इतरांवर वर्चस्व गाजवू इच्छित नाही आणि आम्ही इतरांहून कोणत्याही प्रकारच्या जादा अधिकाराची अपेक्षा करीत नाही. पण आमचे लोक जेथे जातील तेथे त्यांना समानतेची आणि सन्मानपूर्वक वागणूक मिळाली पाहिजे असा आम्ही दावा करतो आणि आम्ही कोणत्याही प्रकारचा पंक्तीभेद मान्य करणार नाही.

जगांत आज कितीही स्पर्धा, विद्वेष आणि संघर्ष असले तरी ते अपरिहार्यपणे निकट सहकार्याकडे आणि जागतिक राष्ट्रकुल निर्माण करण्याकडे वाटचाल करीत आहे. ज्या जगात स्वतंत्र असे आशियावासी आहेत अशा प्रकारच्या एकत्म जगासाठी स्वतंत्र भारत झटणार आहे. आणि आशियातील लोक आम्हांला इतरांच्या मानाने निकटचे व जवळचे आहेत. भारत भौगोलिक दृष्ट्या अशा ठिकाणी आहे की तो पश्चिम, दक्षिण आणि आग्नेय आशियाचा केंद्रबिंदू बनला आहे. भूतकाळांत या देशांत भारताच्या संस्कृतीचा प्रसार झाला होता आणि ते अनेक प्रकारे आमच्या देशांत आले आहेत. त्या संबंधांचे आता पुनरुज्जीवन होत आहे. भविष्यकाळांत एका बाजूला आग्नेय आशियातील देश आणि दुसऱ्या बाजूला अफगाणिस्तान, इराण आणि अरब जगातील देश आणि भारत यांच्यामध्ये निकटचे संबंध वाढत जाणार आहेत. आपण या स्वतंत्र देशांमधील वाढत्या सहकार्यासाठी स्वत:ला वाहून घेतले पाहिजे. भारताने इंडोनेशियाच्या स्वातंत्र्य लढ्याचा अत्यंत आस्थेने मागोवा घेतला आहे आणि आम्ही त्यांना सदिच्छा व्यक्त करीत आहोत.

आमचा शेजारी चीन, एक पुरातन परंपरा असलेला सामर्थ्यशाली देश. त्याच्याशी आमचे युगानुयुगाचे स्नेहसंबंध आहेत. तो स्नेह सदैव कायम राहील आणि वाढत जाईल. चीनच्या सध्याच्या अडचणी दूर होतील आणि एक अखंड लोकशाहीवादी चीन निर्माण होईल व तो जागतिक शांततेला आणि प्रगतीला मोठ्या प्रमाणात हातभार लावील अशी आम्हांला मनापासून आशा वाटते.

✦

"आमच्या इतिहासातील एका युगाचा अंत होत आहे आणि आम्ही बहुदा लौकरच एका नव्या युगात पदार्पण करणार आहोत."

२. स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक

घटना परिषदेतील भाषण, १३ डिसेंबर, १९४६.

महोदय, मी येथे उभा असतांना माझ्यावर सर्व प्रकारचे ओझे येऊन पडले आहे असे मला वाटते. आपण एका युगाच्या अंताशी उभे आहोत आणि आपण शक्यतो लवकरच नव्या युगात पदार्पण करणार आहोत. माझे मन भारताच्या ५००० वर्षांच्या महान् भूतकाळात रेंगाळत आहे. त्या इतिहासाच्या, म्हणजे जवळ जवळ मानव समाजाच्या इतिहासाच्या उष:कालापासून आजपर्यंतच्या इतिहासात माझे मन रेंगाळत आहे. तो सारा भूतकाळ माझ्या मनांत गर्दी करतो, मला उल्हासित करतो आणि तितकेच त्याचे काही प्रमाणांत दडपणही वाटते. मी त्या भूतकाळाच्या तोलामोलाचा आहे काय? मी जेव्हा भारताच्या भविष्यकाळाचा, उज्ज्वल भविष्य काळाचा विचार करतो तेव्हा गौरवशाली भूतकाळ आणि त्याहूनही अधिक उज्ज्वल भविष्यकाळाच्या असलेल्या दरम्यान असलेल्या वर्तमानकाळाच्या समशेरीच्या धारेवर उभे असतांना माझे हातपाय थोडे लटपटतात आणि भविष्यकाळांत करावयाच्या कठीण कार्याच्या कल्पनेने मनावरचे दडपण वाढते. भारताच्या इतिहासातील एका अपूर्व अशा क्षणी आपण येथे एकत्र आलो आहोत. मला असे निश्चितपणे वाटते की, जुन्यापासून नव्याकडे संक्रमण करण्याच्या या क्षणांमध्ये, एक प्रकारची जादू आहे. रात्रीच्या गर्भातून जेव्हा दिवस उजाडतो अन दिवस जरी पावसाळी असला तरी तो दिवसच असतो. मळभ दूर झाले की सुर्यदर्शन होणार अशी खात्री असते, त्या क्षणांत ज्या प्रकारची जादू असते तशीच ही जादू आहे. मला या सर्व गोष्टींमुळे या सभागृहापुढे भाषण करणे आणि माझे विचार मांडणे जरा अवघड झाले आहे. मला हजारों वर्षांच्या या परंपरेमध्ये होऊन गेलेल्या महान विभूतींची, भारताच्या स्वातंत्र्यासाठी जे झटले त्या थोर विभूतींचीही मला या क्षणी आठवण होत आहे. आता आपण नव्या युगाचे स्वागत करण्यासाठी प्रयत्न करताना, परिश्रम करतांना या सरत्या युगाच्या किनाऱ्यावर उभे आहोत. सभागृहाला या क्षणाचे गांभीर्य जाणवत असावे याबद्दल मला खात्री वाटते. जो ठराव मांडण्याचे सद्‌भाग्य मला लाभले आहे त्या ठरावाबाबत हे सभागृह तितक्याच गंभीरपणे विचार विनिमय करील असे मला वाटते. पण आपण भारतात राजेशाही स्थापन करु इच्छित नाही हे उघड आहे, ती येथे नाही. भारताला जर स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र व्हायचे असेल तर आपण कोणतीही परकीय राजेशाही स्विकारणार नाही आणि स्थानिक

राजेशाह्यांपैकी कोणाच्यातरी वारसाचा आपण शोध घेणार नाही. भारत प्रजासत्ताक होणे हे यामुळेच अपरिहार्य आहे. आता येथे काही मित्रांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, तुम्ही या ठिकाणी 'लोकशाही' हा शब्द कां टाकला नाही?' मी त्यांना सांगितले की, लोकशाहीवादी नसलेले प्रजासत्ताक असू शकते पण आपल्या समग्र भूतकाळावरून आपण लोकशाहीवादी संस्थाचाच पुरस्कार करीत आलो आहोत ही वस्तूस्थिती आहे. लोकशाही आणि निर्भेळ लोकशाही हेच आमचे उद्दीष्ट आहे. या लोकशाहीचे स्वरुप आणि प्रकार कोणता असेल ही गोष्ट अगदी निराळी. विद्यमान जगातील लोकशाही राष्ट्रांनी, युरोपातील अनेक आणि इतरत्र लोकशाहीवादी राष्ट्रांनी जगाच्या विकासाला मोठाच हातभार लावलेला आहे. पण या लोकशाहीवादी राष्ट्रांना जर संपूर्णपणे लोकशाहीवादी राहावयाचे असेल तर त्यांना आपले स्वरुप बदलावे लागेल किंवा काय अशी आम्हाला शंका आहे. आपण एखाद्या विशिष्ट लोकशाहीवादी कार्यप्रणालीचे अथवा तथाकथित लोकशाहीवादी देशांच्या संस्थांचे केवळ अनुकरण करणार नाही अशी मला आशा वाटते. आपण त्यामध्ये सुधारणा करु, पण काहीही झाले तरी, आम्ही शासनाच्या कोणत्याही पध्दतीची येथे स्थापना केली तरी या आपल्या जनतेच्या स्वभावधर्माला अनुरुप असे तिचे स्वरुप असले पाहिजे आणि त्यांना ती मानवली पाहिजे. आपण लोकशाहीवादी आहोत, या लोकशाहीला परिपूर्ण असे कोणते स्वरुप द्यायचे हे या सभागृहाने ठरवावे अशी माझी अपेक्षा आहे. मी समाजवादाचा पुरस्कर्ता आहे आणि भारतही समाजवादाचाच पुरस्कार करील अशी मला आशा वाटते. भारताने समाजवादी शासनाच्या रचनेकडे वाटचाल करावी अशी माझी अपेक्षा आहे. साऱ्या जगालाच त्या मार्गाने जावे लागेल अशी माझी खात्री आहे. पुन्हा या समाजवादाचे स्वरुप कोणते असावे ही गोष्टही तुमच्याच विचाराधीन आहे.

महोदय, आपण भारताची राज्यघटना तयार करण्यास निघालो आहोत आणि आपण भारतात जे करु त्याचा बाकीच्या जगावर मोठाच प्रभाव पडणार आहे. एक नवे स्वतंत्र राष्ट्र जगाच्या प्रांगणात प्रवेश करीत आहे आणि भारताचा विस्तीर्ण भूभाग आणि त्याची प्रचंड लोकसंख्या एवढेच या प्रभावाचे कारण नाही तर त्याच्यापाशी प्रचंड सामुग्री आहे आणि त्या साधन सामुग्रीचा वापर करण्याची क्षमता त्याच्यापाशी आहे यामुळेच तो जागतिक घडमोडींमध्ये अल्पावधीत महत्वाची आणि मौलिक स्वरुपाची भर घालू शकतो. आजच आपण स्वतंत्र होण्याच्या मार्गावर असतांना भारत जागतिक घडमोडीमध्ये महत्वाची भूमिका पार पाडीत आहे. यासाठीच आमच्या राज्य घटनेच्या कर्त्यांनी नेहमीच आपले हे आंतरराष्ट्रीय महत्व ध्यानांत ठेवले पाहिजे.

आपल्यापैकी बहुतेक जणांनी गेली अनेक वर्षे, एका पिढीहून अधिक काळ भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला आहे. आपण अग्निदिव्यातून पार पडलो आहोत आपल्याला त्याची संवय आहे आणि प्रसंग पडला तर आम्ही पुन्हा

अग्निदिव्यातून पार पडण्यास तयार आहोत, असे असतांनाही या सर्व कालावधीत आम्ही केवळ संघर्षाचा आणि विनाशाचा नव्हे तर संधी मिळेल तेव्हा उभारणीचा आणि निर्मितीचा विचार केला आहे. आता जेव्हा स्वतंत्र भारतात विधायक कार्य करण्याचा काळ, ज्या काळाची वाट आम्ही आनंदाने पहात होतो तो आला आहे. अशा क्षणी अनेक नविन अडचणी आमच्या वाटेत उभ्या करण्यांत येत आहेत. या वरुन असे दिसून येते की या सर्वांमागे कोणतीही शक्ती असो, जे लोक चांगले कर्तबगार, हुशार, अत्यंत बुध्दिमान आहेत त्यांच्यामध्ये, उच्च पदस्थांमध्ये कल्पनाशक्तीद्वारे येणारे जे धाडस हवे त्याची कमतरता आहे असे दिसून येते कारण ज्या लोकांबरोबर तुम्हाला व्यवहार करायचा आहे त्यांना तुम्ही कल्पनाशक्तीद्वारे समजून घेतले पाहिजे, बौध्दिक सामर्थ्याद्वारे समजून घेतले पाहिजे. भारताच्या समस्या समजून घेण्याच्या बाबतीत कल्पना शक्तीचा अभाव हा एक आमचा दुर्दैवी वारसा आहे. लोक बऱ्याच वेळा आम्हांला सल्ला देतात, सल्ला देण्याचा आव आणतात. त्यांना भारताच्या जडण घडणीची जाणीव नसते. आमच्या भारताला कोणाचाही सल्ला नको आणि आमच्यावर कोणीही सल्ला लादण्याचा प्रयत्न करु नये. मैत्री, सहकार्य, आणि सदिच्छा हाच भारतावर प्रभाव पाडण्याचा एकमेव मार्ग आहे.

✦



''मध्य रात्रीच्या ठोक्याला, जेव्हा जग निद्रीस्त असेल, तेव्हा भारताला जीवनाची आणि स्वातंत्र्याची जाग येईल.''

३. नियतीशी भेट

घटना परिषदेतील भाषण, १४ ऑगस्ट १९४७.

अनेक वर्षापूर्वी आम्ही नियतीशी वायदा केला होता, आणि आम्ही आमच्या आणाभाका पूर्णपणे नव्हे पण बऱ्याच प्रमाणात पूर्ण करणार आहोत. मध्यरात्रीच्या ठोक्याला जेव्हा जग निद्रीस्त असेल तेव्हा भारताला जीवनाची आणि स्वातंत्र्याची जाग येणार आहे. एक क्षण असा येतो, जो इतिहासात क्वचितच येत असतो, जेव्हा आपण जुन्यातून नव्यात पदार्पण करतो, जेव्हा एक युग सरते आणि दीर्घकाळ दबलेल्या राष्ट्राच्या अस्मितेला कंठ फुटतो, अशा या गंभीर क्षणी आपण भारताच्या आणि त्याच्या जनतेच्या सेवेला आणि मानव समाजाच्या उदात्त उदिष्टाला स्वत:ला वाहून घेण्याची शपथ घेणे इष्टच ठरते. इतिहासाच्या या उष:काली भारताने आपली कधीही न संपणारी जिज्ञासेची यात्रा सुरु केली आणि अनेक यशापयशांनी भरलेली, वैभवशाली प्रयत्नांनी परिपूर्ण असलेली या यात्रेतील अनेक चाकोरी बाहेरील शतके त्याने ओलांडली आहेत. सद्भाग्याच्या आणि दुर्भाग्याच्या सर्व कालखंडात भारताची आपल्या जिज्ञासेवरील दृष्टी कधी ढळली नाही अथवा त्याला सामर्थ्य देणाऱ्या त्याच्या उद्दिष्टांचाही त्याला कधी विसर पडला नाही. आज आपल्या दुर्भाग्याचा कालखंड संपत आहे, भारताला पुन्हा एकदा स्वत्त्वाची प्रचिती येत आहे. आज आपण जो विजय साजरा करीत आहोत ते केवळ एक पाऊल आहे, भविष्य काळातील अधिक उज्ज्वल यश संपादन करण्याच्या संधीचे महाद्वार आपणापुढे खुले होत आहे. या संधीचा लाभ घेण्याइतपत आपण शूर आणि बुध्दिमान आहोत काय? भविष्यकाळाचे हे आव्हान आपण स्वीकारणार काय?

स्वातंत्र्य आणि सत्तेबरोबरच जबाबदाऱ्या येतात. या घटना परिषदेवर सार्वभौम भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या सार्वभौम सभागृहावर ही जबाबदारी पडलेली आहे. स्वातंत्र्याचा जन्म होण्यापूर्वीच्या वेदना आपण सोसत आहोत, आणि या दु:खामुळे आपली मने भारावलेली आहेत. त्यापैकी कांही दु:खे आजही आपण सोसत आहोत. ते काहीही असले तरी भूतकाळ सरला आहे आणि सध्या भविष्यकाळ आपल्याला आवाहन करीत आहे.

तो भविष्यकाळ विसावण्याचा अथवा आराम करण्याचा नाही. तर आपण ज्या आणाभाका अनेक वेळा घेतल्या आणि आजही आपण जी शपथ घेणार आहोत त्या

पूर्ण करण्यासाठी अविरत झटत राहण्याचा हा काळ आहे. भारताची सेवा म्हणजे लक्षावधी दुःखी भारतीय लोकांची सेवा होय. दारिद्र्य आणि अज्ञान, रोगराई आणि संधीच्या बाबतीतील विषमतेचा अंत करणे हा त्याचा अर्थ आहे. प्रत्येक डोळ्यातील अश्रू पुसला पाहिजे ही आपल्या विद्यमान काळातील सर्वश्रेष्ठ मानवाची आकांक्षा आहे. हे कार्य कदाचित आपल्या कर्तृत्त्वापलिकडचे असेल पण जनतेच्या डोळ्यांत जोपर्यंत अश्रू आहेत तोपर्यंत आपले कार्य संपणार नाही. म्हणून आपल्याला काम केले पाहिजे, श्रम केले पाहिजेत. आपली स्वप्ने वास्तवात उतरविण्यासाठी कठोर परिश्रम केले पाहिजेत. आपली ही स्वप्ने भारताबाबतची आहेत तशीच ती जगाबाबतची, सर्व राष्ट्रांबाबतची आणि लोकांबाबतचीही आहेत, कारण आज हे सर्व परस्परांशी इतके निगडित झालेले आहेत की, आपण या सर्वांपासून अलग राहू शकू अशी कोणीही कल्पना करू नये. शांतता अविभाज्य आहे असे म्हणतात, स्वातंत्र्याचे आणि आता समृध्दीचेही तसेच आहे. ज्या एका जगाचे तोडून अलग अलग तुकडे करता येणार नाहीत तशीच एका जगात आपत्तीही अविभाज्यच ठरली आहे. आम्ही ज्या भारतीय जनतेचे प्रतिनिधी आहोत त्या जनतेला आम्ही या महत्कार्यात मोठ्या श्रध्देने आणि आत्मविश्वासाने आम्हाला साथ द्या असे आंवाहन करतो. क्षुद्र आणि विघातक टीका करण्याची, दुष्टावा साधण्याची अथवा दोषारोप करण्याची ही वेळ नाही. भारताची सर्व बालके जेथे गुण्यागोविंदाने राहतील असा भारताचा भव्य प्रासाद आपल्याला बांधावयाचा आहे.

✦



"एक नवा तारा उदयास येत आहे. पूर्वेकडील स्वातंत्र्याचा तारा, एक आशा पल्लवित होत आहे. या ताऱ्याचा कधीही अस्त न होवो.

४. नियतीने नियुक्त केलेला दिवस

वृत्तपत्र सृष्टीला संदेश, १५ ऑगस्ट १९४७.

नियुक्त दिवस उजाडला, नियतीने नियुक्त केलेला दिवस उजाडला आणि दिर्घ काळच्या निद्रावस्थेनंतर आणि संघर्षानंतर जागृत, जोशपूर्ण, स्वतंत्र आणि विमुक्त भारत आज जगापुढे उभा ठाकत आहे. भूतकाळ काही प्रमाणांत अद्यापही आम्हांला चिकटलेला आहे. आम्ही अनेकवेळा घेतलेल्या शपथा पूर्ण करण्यासाठी आम्हांला खूप कांही करावयाचे आहे. आम्ही वळण घेतले आहे आणि आमच्यापुढे नव्या इतिहासाची सुरुवात होत आहे, जो इतिहास आम्ही जगणार आहोत, घडविणार आहोत आणि इतरजण त्याच्याविषयी लिहिणार आहेत.

भारतातील आम्हा लोकांसाठी, सर्व आशियासाठी आणि जगासाठी ही एक भाग्यपूर्ण घटिका आहे. एक नवा तारा, पूर्वेकडील स्वातंत्र्याचा तारा उदयास येत आहे. एक नवी आशा पल्लवित होत आहे, दिर्घकाळ पाहिलेले एक स्वप्न वास्तवात उतरत आहे. या ताऱ्याचा कधीही अस्त न होवो आणि या आशेचा कधीही भंग न होवो.

आमच्या भोवती मेघांचा गराडा पडला आहे आणि आमचे बरेच लोक दु:खी कष्टी झालेले आहेत आणि बिकट समस्या उद्‌भवल्या आहेत. पण तरीही आम्ही आनंदोत्सव साजरा करीत आहोत. आम्हांला या स्वातंत्र्यातही आनंद आहे. पण स्वातंत्र्याबरोबरच जबाबदाऱ्या येतात, ओझे येते आणि आपल्याला स्वतंत्र आणि शिस्तबध्द वृत्तीने या सर्वांशी मुकाबला करावा लागतो.

या दिवशी प्रथमत: या स्वातंत्र्याच्या शिल्पकारांविषयी, भारताचा पुरातन आत्मा साकार करुन आमच्या भोवती पसरलेला अंध:कार नष्ट करणारी स्वातंत्र्याची ज्योत ज्याने हाती घेतली त्या राष्ट्रपित्या विषयी आमच्या मनांत विचार येतात. आम्ही अनेक वेळा त्यांचे सच्चे अनुयायी होण्यास अपात्र ठरलो आहोत आणि त्यांच्या आदेशांपासून बऱ्याच वेळा दूरवर भरकटत गेलो आहोत. पण केवळ आम्हांलाच नव्हे तर यापुढील अनेक पिढ्यांना त्यांच्या आदेशांचे स्मरण होत राहील. भारताच्या या थोर सुपुत्राच्या, त्यांची श्रध्दा आणि शक्ती, धैर्य आणि मानवतावाद यांच्या उदात्ततेचा ठसा भारतीयांच्या अंत:करणावर टिकून राहिल. केवढेही मोठे वादळ आणि वावटळ आली तरी स्वातंत्र्याची ही मशाल आम्ही विझू देणार नाही.

ज्या अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आणि स्वयंसेवकांनी स्तुतीची अथवा पारितोषिकांची अपेक्षा न करता आमच्या भारताची सेवा केली त्यांच्याविषयी आज आमच्या मनांत विचार येत आहे.

राजकीय सीमारेषेमुळे ज्या बंधू भगिनींची आमच्या पासून फारकत झाली आणि दुर्दैवाने जे या स्वातंत्र्योत्सवात सहभागी होऊ शकत नाहीत त्यांच्याही विषयी आज आमच्या मनांत विचार येतात. काहीही झाले तरी ते आमचेच आहेत आणि आमचेच राहतील, आम्ही त्यांचे सुख-दु:खातील वाटेकरी आहोत.

भविष्यकाळ आम्हांला आवाहन करीत आहे. आम्ही कोणत्या दिशेने जाणार आणि काय करणार? सर्वसामान्य माणसाला, भारतीय शेतकरी आणि कामगारांना स्वातंत्र्य आणि संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने, दारिद्र्य, अज्ञान आणि रोगराई यांच्याविरूध्द लढण्याच्या आणि ते नष्ट करण्याच्या दिशेने आम्ही प्रयत्न करणार आहोत. समृध्द आणि प्रगतीशील लोकशाही राष्ट्र निर्माण करणे, आणि प्रत्येक स्त्री – पुरुषाला न्याय आणि परिपूर्ण जीवन प्राप्त करुन देणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संस्था निर्माण करणे ही आमच्या प्रयत्नांची दिशा राहील.

आम्हाला कठोर परिश्रम करावे लागणार आहेत. आम्ही आमची प्रतिज्ञा जोपर्यंत पूर्ण करीत नाही, नियतीच्या इच्छेप्रमाणे जोपर्यंत आम्ही भारतीय जनतेचे जीवन घडवित नाही, तोपर्यंत आमच्यापैकी कोणालाही विश्रांती घेता येणार नाही. धिटाईने आगेकूच करण्याच्या तयारीत असलेल्या एका थोर देशाचे आपण नागरिक आहोत आणि या महत्पदाला साजेल असेच आपण वागले पाहिजे. आपण सर्वजण जरी कोणत्याही धर्माचे असलो तरी समान हक्क आणि अधिकार आणि जबाबदाऱ्या असलेले भारताचे नागरिक आहोत. आपण जातीयवादाला अथवा संकुचित प्रवृत्तींना प्रोत्साहन देता कामा नये. कारण ज्या राष्ट्राचे नागरिक विचाराने आणि आचाराने संकुचित आहेत ते राष्ट्र कदापि महान होऊ शकत नाही.

जगातील राष्ट्रांना आणि लोकांना आम्ही अभिवादन करतो आणि शांतता, स्वातंत्र्य आणि लोकशाही भक्कम करण्यासाठी त्यांच्याशी सहकार्य करण्याचे अभिवचन देतो. आमच्या भारताला, आमचे अलोट प्रेम असलेल्या मातृभूमीला, प्राचीन, अजरामर आणि सदैव नुतन भूमीला आम्ही विनम्र प्रणाम करतो आणि तिच्या सेवेला नव्याने वाहून घेतो.

✦

"जीवनातील महत्तम उद्दिष्टये साध्य करणे हे जर आपले ध्येय असेल, जर आपला शांततेचा आणि स्वातंत्र्याचा पुरातन संदेश जगाला देणाऱ्या भारताचे स्वप्न आपण पहात असू तर आपण स्वत: आपल्या अंगी मोठेपणा आणला पाहिजे. भारतमातेला शोभतील असे सुपुत्र बनले पाहिजे."

५. भारताचा प्रथम क्रमांकाचा सेवक

दिल्ली आकाशवाणीवरील भाषण, १५ ऑगस्ट १९४७.

देशबांधव हो, भारताची आणि भारतीय स्वातंत्र्याची अनेक वर्षे सेवा करण्याचे माझे स्वप्न प्रत्यक्षात आले आहे. आज भारतीय जनतेच्या सेवेसाठी आणि कल्याणासाठी वचनबध्द असलेला पहिल्या क्रमांकाचा सेवक या नात्याने मी प्रथमच आपल्यापुढे भाषण करीत आहे. मी येथे आहे कारण तुमची तशी इच्छा आहे. जोपर्यंत तुम्ही मला हे पद भूषविण्याचा सन्मान देण्याइतपत माझ्यावर विश्वास व्यक्त कराल तोपर्यंतच मी या पदावर राहणार आहे.

आज आपण स्वतंत्र आणि सार्वभौम आहोत आणि आपण भूतकाळाचे ओझे झुगारुन दिले आहे. आपण जगाकडे निखळ आणि मैत्रीच्या नजरेने आणि भविष्यकाळाकडे श्रध्देच्या व आत्मविश्वासाच्या दृष्टीने पाहात आहोत.

परकीय वर्चस्वाचे ओझे आपण झुगारून दिले आहे, पण स्वातंत्र्याबरोबरच काही जबाबदाऱ्या आणि ओझी खांद्यावर घ्यावी लागतात. स्वयंशिस्तबध्द आणि स्वातंत्र्य टिकवून ठेवण्याचा आणि ते वाढविण्याचा निर्धार असलेल्या स्वतंत्र जनतेच्या भावनेने या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत.

आपण खूप काही साध्य केले व बरेच काही साध्य करावयाचे आहे. चला तर आपण निर्धाराने आणि आपल्या थोर नेत्याने आपल्याला शिकविलेल्या तत्वांशी एकनिष्ठ राहून हे नवे कार्य हाती घेऊ या! सुदैवाने या महान कार्यात आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी आणि स्फुर्ती देण्यासाठी, नेतृत्व करण्यासाठी गांधीजीही आपल्यात आहेत. आपली उद्दिष्टये आणि साध्ये व ती साकार करण्याची साधने आणि पध्दती यांच्याच कधीच फारकत असता कामा नये, हे त्यांनी आपल्याला फार पूर्वी शिकविले आहे. उदात्त उद्दिष्टये तितक्याच उदात्त साधनांनी साध्य केली पाहिजेत. जीवनातील महत्तम उद्दिष्टये साध्य करणे हे जर आपले ध्येय असेल, आपला शांततेचा आणि स्वातंत्र्याचा पुरातन संदेश इतरांना देणारे महान राष्ट्र म्हणजे भारत हे जर आपले स्वप्न असेल तर आपण स्वत: आपल्या अंगी मोठेपणा आणला पाहिजे आणि भारतमातेला शोभतील असे सुपुत्र बनले पाहिजे. पूर्वेतील स्वातंत्र्याच्या या जन्माकडे

साऱ्या जगाचे आज लक्ष लागले आहे आणि ते दिग्मूढ होऊन या घटनेचा अर्थ शोधत आहे.

आपल्याला विद्रूप करणारे, कमीपणा आणणारे आणि स्वातंत्र्याच्या उद्दिष्टांना हानी पोचविणारे सर्व अंतर्गत संघर्ष आणि हिंसाचार बंद करणे हे आपले पहिले आणि ताबडतोबीचे कार्य आहे. या संघर्षामुळे, बहुजन समाजाच्या ज्या प्रचंड आर्थिक समस्यांकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे त्यांचा विचार करण्याच्या कार्यात अडथळे निर्माण होतात.

आपले दिर्घकालीन पारतंत्र्य आणि जागतिक युध्द व त्या युध्दाचे परिणाम यामुळे साचून राहिलेल्या अनेक मुलभूत समस्यांचा वारसा आपल्याला मिळाला आहे. आपल्या जनतेला आज अन्न वस्त्रांची आणि अनेक जीवनावश्यक वस्तूंची चणचणच भासत आहे. आपण चलनवाढ आणि भाववाढ यांच्या भोवऱ्यांत सापडलो आहोत. आपण या समस्या अचानक सोडवू शकत नाही पण त्या सोडविण्याच्या बाबतीत दिरंगाईही करु शकत नाही. म्हणून आपण बहुजन समाजावरील ओझे कमी होईल आणि त्यांचे जीवनमान उंचावत जाईल अशाप्रकारे चातुर्याने नियोजन केले पाहिजे. आम्ही कुणाचेही वाईट करु इच्छित नाही पण दीर्घकाळ दु:ख दारिद्र्य, हालअपेष्टा सहन करणाऱ्या बहुजन समाजाच्या हितसंबंधांना आम्ही प्राधान्य देतो आणि त्यांच्या आड ज्या कोणाचे प्रस्थापित हितसंबंध येतील त्यांनी माघार घेतली पाहिजे हे सर्वांनी स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे. आपण आपली जमिन भोगवट्याची जुनाट पध्दत ताबडतोब बदलली पाहिजे आणि मोठ्या व समतोल प्रमाणावर औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन दिले पाहिजे. देशाची संपत्ति वाढविण्यासाठी आणि त्या मार्गाने राष्ट्रीय नफ्याचे समान वाटप करण्यासाठी औद्योगिकीकरणाची अत्यंत गरज आहे.

आज उत्पादनाला अग्रक्रम प्राप्त झाला आहे. उत्पादनात खंड पाडणे अथवा ते कमी करण्याचा प्रयत्न राष्ट्राला आणि विशेषत: श्रमिक जनतेला हानीकारक आहे. पण केवळ उत्पादन करणे पुरेसे नाही कारण त्यामुळे काही मूठभर लोकांच्या हाती संपत्तीचे केंद्रीकरण होते. हे केंद्रीकरण प्रगतीच्या आड येते आणि विद्यमान काळाच्या संदर्भात त्यामुळे अस्थैर्य आणि संघर्ष निर्माण होतो. म्हणून कोणतीही समस्या सोडवायची असेल तर योग्य आणि न्याय्य वितरण करणे आवश्यक आहे. सध्या भारत सरकारने नद्यांच्या प्रवाहावर नियंत्रण करुन, धरणे बांधून, जलसंचय निर्माण करुन, पाटबंधारे काढून, वीजनिर्मिती करुन नद्यांच्या खोऱ्यांच्या विकासाच्या अनेक भव्य योजना हाती घेतल्या आहेत. या योजनांमुळे सर्वांगीण विकास होणार आहे. या योजना म्हणजे सर्व नियोजनाचा पाया आहे आणि भारतातील बहुजन समाजाला त्यांचा लाभ मिळावा म्हणून आम्ही त्या लवकरात लवकर पूर्ण करणार आहोत.

या सर्व कार्यासाठी शांततामय परिस्थितीची आणि सर्व संबधितांच्या

सहकार्याची आणि कठोर व साहसपूर्ण परिश्रमांची गरज आहे. म्हणून आपण ही महान व मोलाची कामगिरी पार पाडण्यास सिध्द होऊ या आणि आपापसातील कुरबुरी व संघर्ष विसरु या. सहकार्याच्या वृत्तीने कार्य करण्याची ही वेळ आहे. काम करण्याची वेळ असते आणि खेळण्याचीही वेळ असते. आज भांडण्याला आणि वाजवीपेक्षा अधिक खेळण्याला आपल्यापाशी वेळ नाही, तसे आपण केले तर ती देशाशी आणि जनतेशी प्रतारण केल्यासारखे होईल. आज आपण परस्परांशी सहकार्य केले पाहिजे आणि एकत्र येऊन काम केले पाहिजे, अत्यंत सद्भावपूर्वक काम केले पाहिजे.

✦



''ज्या प्रकाशाने गेली अनेक वर्षे आपला देश उजळला होता तो या देशात हजारो वर्षे उजळीत राहील.''

६. प्रकाश विझला

राष्ट्राला उद्देशून आकाशवाणीवर केलेले भाषाण, ३० जानेवारी, १९४८

मित्रहो,

आपल्या जीवनातील प्रकाश विझला आणि सर्वदूर अंध:कार पसरला! तुम्हाला काय सांगावे आणि कसे सांगावे ते मला कळत नाही. आपण ज्यांना 'बापू' म्हणत होतो तो आपला आवडता नेता, 'राष्ट्रपिता' आता आपल्यात नाही. कदाचित माझे हे म्हणणे चुकीचे असेल, पण गेली अनेक वर्षे आपण जसे त्यांना पाहात होतो तसे त्यांना आपण पाहू शकणार नाही. आम्ही त्यांच्याकडे सल्ल्यासाठी धाव घेऊ शकणार नाही, त्यांचे चार शब्द ऐकू शकणार नाही आणि हाच भयानक आघात आहे. केवळ माझ्यावर नव्हे तर या देशातील लक्षावधी लोकांवर हा आघात झाला आहे आणि माझ्या वा इतर कुणाच्या उपदेशाने या आघाताची तीव्रता कमी होणार नाही.

प्रकाश विझला असे मी म्हणतो पण हेही चुकीचे आहे, कारण या देशात जो प्रकाश झळाळत होता तो यापुढेही अनेक वर्षे, हजारो वर्षे झळाळत राहील. तो प्रकाश या देशात दिसत राहील आणि जगालाही तो दिसेल आणि लक्षावधी लोकांच्या अंत:करणाला तो दिलासा देईल. कारण तो प्रकाश निकटच्या वर्तमान काळातील काहीतरी व्यक्त करीत नव्हता, ते जीवनाचे, चिरंतन सत्याचे, योग्य मार्गाची आठवण करुन देणारे सत्याचे प्रतीक होते. या देशाला स्वातंत्र्याकडे नेणारा, चुकांपासून आम्हाला परावृत्त करणारा तो प्रकाश होता.

जेव्हा त्यांना खूप काही करण्याजोगे होते तेव्हाच हे घडले आहे. बापू अनावश्यक होते किंवा त्यांनी त्यांचे कार्य पूर्ण केले होते असा विचार आमच्या मनांत कधीच येणार नाही. पण विशेषत: आता आमच्यापुढे एवढ्या अडचणी आहेत, अशा वेळी त्यांनी आमच्याबरोबर नसणे हा असह्य असा भयानक आघात आहे.

एका माथेफिरुने त्यांच्या जीवनाचा अंत केला. ज्याने हे कृत्य केले त्याला मी केवळ माथेफिरू म्हणालो, पण गेली अनेक वर्षे आणि महिने या देशात भरपूर विषाची पेरणी करण्यात येत होती आणि त्या विषाचा लोकांच्या मनावर परिणाम होत होता. आपण या विषाचा मुकाबला केला पाहिजे, आपण हे विष समूळ नष्ट केले पाहिजे. आपल्यावर येऊ पाहणाऱ्या सर्व संकटांचा आपण मुकाबला केला पाहिजे, वेडेपणाने अथवा वाईटपणाने नव्हे तर आपल्या आवडत्या नेत्याने शिकविलेल्या मार्गाने प्रतिकार

केला पाहिजे.

आपल्यापैकी कोणीही आपल्याला राग आला म्हणून कोणत्याही प्रकारची गैरवर्तणूक करता कामा नये ही पहिली गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे. आपण समर्थ आणि खंबीर माणसाप्रमाणे वागले पाहिजे. आपल्यावर गुदरणाऱ्या सर्व संकटांचा मुकाबला करण्याचा निर्धार असलेल्या आपल्या थोर शिक्षकाच्या आणि नेत्याच्या आदेशांचे पालन करण्याचा निर्धार केलेल्या लोकांप्रमाणे वागले पाहिजे. त्यांचा आत्मा आपल्यावर नजर ठेवून आहे, आपल्याकडे पाहात आहे असे मला वाटते. त्यांचा आत्मा नाराज होईल असे कोणतेही क्षुद्र कृत्य आपण करता कामा नये अथवा हिंसाचार करता कामा नये हे आपण लक्षांत ठेवले पाहिजे.

म्हणून आपण कोणतेही क्षुद्र कृत्य करता कामा नंये, पण आपण दुर्बल राहावे असा याचा अर्थ नाही उलट आपण आपल्या वाटेत येणाऱ्या संकटांचा मुकाबला खंबीरपणे आणि एकजूटीने केला पाहिजे. या भयंकर आपत्तीला तोंड देण्यासाठी आपण एकत्र राहिले पाहिजे आणि आपल्या सर्व किरकोळ अडचणी आणि संघर्ष मिटविले पाहिजेत. भयानक आपत्ती ही जीवनातील सर्व महत्तम गोष्टींची आठवण करुन देणारी आणि आपण ज्यांचा बराच विचार करता त्या किरकोळ बाबींचे विस्मरण करावयास लावणारी बाब आहे. बापूंनी आपल्या मृत्यूद्वारे जीवनातील महत्तम गोष्टींची, जीवंत सत्याची आठवण करुन दिली आहे आणि आपण त्याची आठवण ठेवली तर ते भारताच्या हिताचे आहे.

लक्षावधी लोकांना महात्माजींचे अन्त्यदर्शन घेता यावे म्हणून त्यांच्या शरीरावर रासायनिक प्रक्रिया करुन ते जतन करुन ठेवावे अशी काही मित्रांनी सूचना केली होती. पण असे काही करु नये अशी अनेकवेळा त्यांनी व्यक्त केलेली इच्छा होती. अशा प्रकारचे काही होऊ नये, आपल्या शरीरावर रासायनिक प्रक्रिया करण्यास आपला तीव्र विरोध आहे असे त्यांनी सांगितले होते म्हणून आम्ही इतरांची जरी काही निराळी इच्छा असली तरी या बाबतीत त्यांचे इच्छेनुसार वागण्याचे ठरविले आहे म्हणून लोकांनी अंत्य संस्कारांच्या ठरलेल्या वेळी म्हणजे शनिवारी दुपारी ४ वाजता नदीवर अथवा समुद्रकाठावर जमा व्हावे आणि प्रार्थना करावी आणि सत्यासाठी, ज्या उद्दिष्टांसाठी आपल्या थोर देशबांधवाने आपले जीवन समर्पित केले आणि मृत्यू स्वीकारला त्यासाठी आपले जीवन समर्पित करण्याची प्रतिज्ञा करावी. ही सर्वांत सुयोग्य प्रार्थना ठरणार आहे. त्यांच्यासाठी आणि त्यांच्या स्मृती प्रीत्यर्थ ही सर्वोत्तम प्रार्थना आहे. भारताच्या आणि आपल्या स्वत:च्या दृष्टीनेही सर्वोत्तम व सर्वोत्कृष्ठ प्रार्थना आहे.

✦

"बापू लक्षावधी लोकांच्या अंत:करणात वास करीत आहेत आणि चिरंतन काल जिवंत राहणार आहेत."

७. 'वैभव अंतरले – सूर्यास्त झाला'

घटना परिषदेत केलेले भाषण, २ फेब्रूवारी, १९४८

महोदय, आपण जे विचार व्यक्त केलेत त्यांच्याशी मी सहमती व्यक्त करु इच्छितो. दिवंगत थोर व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण करणे, त्यांच्याविषयी स्तुतीचे आणि सांत्वनाचे चार शब्द बोलणे ही या सभागृहाची परंपरा आहे. या प्रसंगी मी स्वत: किंवा कोणीही जास्त काही बोलणे योग्य ठरेल किंवा नाही याबद्दल माझी मलाच खात्री वाटत नाही कारण या देशापाशी असलेल्या अति मौल्यवान खजिन्याचे संरक्षण करण्याच्या बाबतीत आम्हाला अपयश आले याबद्दल मला एक व्यक्ती आणि भारत सरकारचा प्रमुख या दोन्ही नात्याने शरम वाटते. गेल्या काही महिन्यांत अनेक निरपराध स्त्री पुरुषांना आणि बालकांना आम्ही संरक्षण देऊ शकलो नाही हे आमचे अपयश आहे. हे ओझे आणि हे कर्तव्य आमच्या अथवा कोणत्याही सरकारच्या मानाने झेपण्याजोगे नव्हते असेही कदाचित असू शकेल. पण हे अपयश आहे हे निश्चित व हे उदात्त व्यक्तिमत्व, ज्यांच्यावर आमचे अलोट प्रेम होते आणि ज्यांच्याविषयी आमच्या मनात आदर होता ते लूप्त झाले आहे कारण त्यांना आम्ही पुरेसे संरक्षण देऊ शकलो नाही ही आम्हा सर्वांना लज्जास्पद अशी बाब आहे. एका भारतीयाने त्यांच्यावर हात उचलावा याची एक भारतीय या नात्याने मला लाज वाटते. एका हिंदू व्यक्तीने हे कृत्य करावे आणि तेही या जमातीतील एका सर्वश्रेष्ठ भारतीयांविरुध्द, सर्वश्रेष्ठ हिंदूविरुध्द करावे ही गोष्ट मला हिंदू या नात्याने अत्यंत लज्जास्पद वाटते.

आम्ही एका वैभवाला अंतरलो आहोत आणि आमंच्या जीवनाला ऊब देणारा आणि प्रकाश देणारा सूर्य आज अस्तास गेला आहे आणि आम्ही अंध:कारात थंडीने कुडकुडत आहोत. कारण सरते शेवटी आम्ही जे वैभव गेली अनेक वर्षे भोगले त्या दैवी प्रकाश असलेल्या व्यक्तीने आमच्यातही बदल घडवून आणले आहेत आणि आम्ही जे काही आहोत ते गेली अनेक वर्षे त्यांनी आम्हाला जसे घडवले तसे आहोत आणि त्या दैवी ज्योतीपासून, आम्ही आम्हाला मजबूत करणारे आणि त्यांनी आखून दिलेल्या मार्गाने कार्य करण्याची शक्ती देणारे स्फुलिंग आम्हीही घेतले आहे म्हणून आम्ही त्यांची स्तूती केली तर ते शब्द हिणकस ठरतील. आम्ही जर त्यांची स्तूती केली तर काही प्रमाणात आम्ही आमचीच स्तूती केल्यासारखे होणार आहे. थोर व नामवंत व्यक्तींचे ब्रॉन्झ धातूचे आणि संगमरवरी पुतळे उभारण्यात येतात पण दैवी ज्योत

असलेल्या या थोर व्यक्तीने आपल्या जीवनावधीत लक्षावधी लोकांच्या अंत:करणात स्थान मिळविले आहे. त्यामुळे आम्ही अंशभाराने का होईना ज्या तत्वांनी त्यांना घडविले होते त्या तत्वांचे बनलो आहोत. याप्रकारे त्यांनी सर्व पिडीतांच्या झोपडयांत आणि घरकुलांत प्रवेश केला होता. लक्षावधी लोकांच्या अंत:करणात ते राहात आहेत आणि चिरंतन काल ते जिवंत राहणार आहेत.

आपण ज्या कालखंडात आज गेलो आहोत, त्या कालखंडाचे दीर्घ कालानंतर इतिहास मूल्यमापन करणार आहे, तो यशाचे आणि अपयशाचे मूल्यमापन करील. काय घडले आणि काय घडले नाही हे समजून घ्यावयाचे व त्याचे योग्य मूल्यमापन करावयाचे म्हटले तर आपण या कालखंडाच्या अत्यंत निकट आहोत. एक वैभव होते आणि आता ते नाही एवढेच आम्हांला कळते. या क्षणी अंध:कार पडला आहे एवढे आम्हाला कळते पण तो तितकासा निबीड नाही, कारण आम्ही जेव्हा आमच्या अंतकरणात डोकावतो तेव्हा तेथे त्यांनी चेतविलेली ज्योत दिसून येते आणि जर या जित्याजागत्या जिवंत ज्योती अस्तित्वात असतील तर या देशात अंध:कार होणार नाही आणि आपण आपल्या प्रयत्नाने त्यांचे स्मरण करुन व त्यांच्या मार्गाने जाऊन हा देश पुन्हा प्रकाशमय करु शकू. आपण जरी लहान असलो तरी त्यांनी आपल्या अंत:करणात चेतविलेल्या ज्योतीच्या साहाय्याने हा देश पुन्हा प्रकाशमान करु या.

हा देवमाणूस जिवंत असतांना जेवढा थोर होता, तो त्यांच्या मृत्यूने अधिकच थोर झाला आणि त्याने जीवनभर ज्या उदात्त ध्येय सिध्दीसाठी कार्य केले तेवढेच आपल्या मृत्युव्दारेही केले आहे याबद्दल मला तिळमात्र संशय नाही. आम्ही त्यांच्यासाठी शोक करीत आहोत व नेहमीच करीत राहू कारण आम्ही माणसे आहोत आणि आमच्या प्रिय सद्गुरुचा आम्हाला विसर पडू शकत नाही, पण आम्ही शोकाकूल होणे त्यांना आवडणार नाही हे मला ठाऊक आहे. जेव्हा त्यांच्या अत्यंत निकटच्या आणि प्रिय व्यक्तीचे निधन झाले तेव्हा त्यांच्या डोळयांत अश्रु तरळले नाहीत. आपण स्वीकारलेल्या उदात्त ध्येयासाठी कार्य करण्याचा खंबीर निर्धार त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता म्हणून आपण जर केवळ शोकाकूल झालो तर ते आपल्याला फटकारतील. त्यांना श्रध्दांजली वाहण्याचा तो हिणकस प्रकार आहे. योग्य प्रकारे वागण्याचा आणि जे महान कार्य त्यांनी हाती घेतले होते आणि जे त्यांनी मोठ्या प्रमाणात पार पाडले त्या कार्यास वाहून घेण्याचा निर्धार करणे आणि प्रतिज्ञा करणे हा त्यांना श्रध्दांजली वाहण्याचा एकमेव मार्ग आहे. आपण काम केले पाहिजे आणि अशाप्रकारे आपण काही प्रमाणात का होईना त्यांना साजेसे अनुयायी आहोत असे सिध्द केले पाहिजे. बापू गेले आणि साऱ्या भारतभर पोरकेपणाची, अनाथ झाल्याची भावना पसरली. आपण सर्वांना ही भावना जाणवत आहे आणि या भावनेवर आपण केव्हा मात करु हे मला ठाऊक नाही. पण या भावनेबरोबरच या महान व्यक्तीबरोबर राहण्याची संधी

आपल्याला लाभली या साभिमान कृतज्ञेच्या भावनेचीही जोड लाभली आहे. विद्यमान युगानंतरच्या अनेक युगांत, अनेक शतकांत आणि कदाचित हजार वर्षांनंतरही, हा देवमाणूस पृथ्वीवर ह्यात होता तेव्हाच्या आपल्या पिढीविषयी लोक विचार करणार आहेत. आम्ही बापूंच्या मानाने जरी कितीही लहान असलो तरी आम्ही त्यांनी दाखविलेल्या मार्गाचे अनुसरण केले. त्यांची पावले ज्या वाटेवर पडली होती त्या वाटेने चालत गेलो असा ते आमच्या पिढीविषयी विचार करतील. आपण त्यांना, त्यांच्या अनुयायांना शोभेल असेच वर्तन करु या.

✦



''बापूंच्या जीवनात आणि मृत्यूतही आपल्या देशाला आगामी अनेक युगांना उजळून टाकेल असा प्रकाश होता. मग आपण त्यांच्याबद्दल शोक कशासाठी करावा? उलट आपण आपल्या बद्दलच शोक केला पाहिजे.''

८. 'गांधीजींची अखेरची यात्रा'

अलाहाबाद येथे गंगा यमुनेच्या संगमामध्ये महात्माजींचे अस्थि विसर्जन करण्यात आले तेव्हा लक्षावधी लोकांच्या समुदायापुढे केलेले भाषण, १२ फेब्रूवारी १९४८.

बापूंचा अखेरचा प्रवास संपला. अखेरच्या यात्रेची सांगता झाली. गेली पन्नास वर्षे महात्मा गांधी हिमालयापासून वायव्य सरहद्दीपर्यंत आणि ईशान्य सरहद्दीवरील ब्रह्मपूत्रा नदीपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत आपल्या विशाल देशात प्रवास करीत होते. त्यांनी केवळ मौजमजेखातर हौशी प्रवासी म्हणून नव्हे तर भारतीय जनतेची सेवा करण्यासाठी, तिची ओळख करुन घेण्यासाठी या देशाच्या कानाकोपऱ्यांत प्रवास केला. कदाचित इतिहासातील दुसऱ्या कोणत्याही भारतीयाने भारतात एवढा प्रवास केला नसेल किंवा सामान्य लोकांचा एवढा दाट परिचय करुन घेऊन त्यांची इतकी विपुल सेवा केली नसेल. आता त्यांचा या जगातील प्रवास संपला आहे. आपल्याला मात्र आणखी काही काळ राहावयाचे आहे. अनेक लोक दु:खाने भारावलेले आहेत आणि ते स्वाभाविकच आहे. आपण दु:ख कशासाठी करावे? आपण त्यांच्यासाठी दु:ख करतो की इतर काही कारणासाठी दु:ख करतो? त्यांनी त्यांच्या जीवनांत आणि मृत्यूतही, आपला देश युगानयुगे न्हाऊन निघेल असा प्रकाश दिला आहे. मग आपण दु:ख कशासाठी करावे? आपण खरे तर आपल्यासाठी, आपल्या दौर्बल्यासाठी, आपल्या अंत:करणातील दुष्ट भावनांसाठी, आपल्यातील फुटीरपणा आणि संघर्ष यांच्या विषयी दु:ख केले पाहिजे. महात्माजींनी हे सर्व नष्ट करण्यासाठी प्राण दिले हे ध्यानांत ठेवा. त्यांनी गेल्या काही महिन्यांत याच उद्दीष्टांसाठी आपली प्रचंड कार्यशक्ती आणि सेवावृत्ती केंन्द्रीत केली होती हे लक्षांत ठेवा. आपण त्यांना जो मान देतो तो केवळ त्यांच्या नावाला मान देतो की ते ज्या तत्वांसाठी उभे ठाकले, त्यांचे संदेश आणि शिकवण विशेषत: त्यांनी ज्या तत्वासाठी प्राणार्पण केले त्याला आपण मान देतो?

इथे या गंगेच्या किनाऱ्यावर उभे राहून आपण आपल्या अंत:करणाचा शोध घेऊ या आणि स्वत:ला प्रश्न विचारू या. आपण गांधीजींनी दाखविलेल्या मार्गाचे कितपत अनुकरण केले आहे आणि इतरांशी आपण शांततेने आणि सहकार्याने राहण्याचा कितपत प्रयत्न केला आहे? आपण आता जरी योग्य मार्गाने चाललो तरी त्यात आपले हित आहे. देशाचे हित आहे.

आपला आधारस्तंभच आता नाहीसा झाला, पण आपण असे कां म्हणावे? आज येथे हजर असलेल्या आणि येथे हजर नसलेल्या लक्षावधी स्त्री-पुरुषाच्या हृदयात त्यांची प्रतिमा कोरली गेली आहे. आपल्याला त्यांचे विस्मरण होणार नाही. आपल्या भावी पिढ्या त्यांना पाहू शकणार नाहीत किंवा त्यांची वाणी ऐकू शकणार नाहीत. त्या पिढ्यांच्या हृदयातही त्यांची प्रतिमा कोरली जाईल कारण ही प्रतिमा आता भारताच्या इतिहासाचे आणि परंपरेचे एक अंग बनले आहे. तीस चाळीस वर्षापूर्वी भारतात गांधीयुगाची सुरुवात झाली. आज त्या युगाचा अंत झाला. असे म्हणणेही चुकीचे आहे कारण ते युग संपलेले नाही. कदाचित आजपासून त्या युगाची काहीशा वेगळ्या प्रकारे सुरुवात झाली आहे. आतापावतो आम्ही त्यांच्या सल्ल्यासाठी आणि पाठींब्यासाठी त्यांच्यावर विसंबून होतो, आता यापुढे आम्हाला आमच्या पायावर उभे राहावे लागणार आहे, स्वावलंबी व्हावे लागणार आहे. त्यांच्या स्मृतीपासून आम्हाला स्फूर्ती मिळत राहो आणि त्यांच्या शिकवणुकीमुळे आमचा मार्ग उजळून निघो. त्यांनी दिलेल्या संदेशाची सदैव आठवण करु या. त्यांचा संदेश होता, 'तुमच्या अंत:करणातील भीतीचे आणि दुष्टाव्याचे समूळ उच्चाटन करा, हिंसाचाराचा आणि अंतर्गत कलहाचा अंत करा, आपला देश स्वतंत्र ठेवा.'

गांधीजी आठवड्यातून एक दिवस मौन पाळीत असत. आता त्यांची वाणी कायमची बंद झाली आणि आता कायमची शांतता पसरली आहे. तरीही त्यांचा आवाज आमच्या कानात आणि अंत:करणात घुमत राहील. आमच्या देशातच नव्हे तर भारताच्या सीमारेषेपलिकडेही अनेक युगे त्यांचा आवाज घुमत राहील. कारण तो आवाज सत्याचा आहे आणि सत्याचा आवाज काही काळ जरी दडपता आला तरी तो कायमचा बंद करता येत नाही. त्यांच्या दृष्टीने हिंसा म्हणजे सत्याला विरोध, म्हणून त्यांनी आपल्याला केवळ मनगटाच्या नव्हे तर मनाच्या आणि अंत:करणाच्या हिंसेविरुध्दही शिकवण दिली आहे. आपण जर या अंतर्गत हिंसाचाराचा त्याग केला नाही आणि इतरांच्या बाबतीत जर आपल्या मनात कमालीची सहिष्णुता आणि स्नेहभाव नसेल तर राष्ट्र म्हणून आपण टिकू शकणार नाही. हिंसेचा मार्ग विनाशकारी आहे आणि जेथे हिंसाचार आहे तेथे स्वातंत्र्याचे अस्तित्वही क्वचितच असते. आपण जर आपसांत हिंसाचार आणि संघर्ष करीत राहिलो तर आपल्या स्वराज्याविषयीच्या आणि स्वातंत्र्याविषयीच्या वल्गना निरर्थक आहेत.

लोकशाहीसाठी शिस्त, सहिष्णुता आणि परस्परांविषयी आदरभाव यांची आवश्यकता आहे. आपल्या स्वातंत्र्यासाठी इतरांच्या स्वातंत्र्याची कदर करणे आवश्यक असते. लोकशाहीमध्ये आपसांत विचार विनिमय करुन मने वळवून बदल करण्यात येतात, हिंसेच्या साधनाने नव्हे. एखाद्या सरकारला जर लोकांचा पाठिंबा नसेल तर त्याच्या जागी लोकांचा पाठिंबा असलेले सरकार येईल. काही छोट्या गटांना आपण

लोकांचा पुरेसा पाठिंबा मिळवू शकणार नाही हे ठाऊक असते, असे लोक हिंसेच्या मार्गाने आपण आपले उद्दिष्ट साध्य करु शकू असा मुर्खपणाचा विचार करतात.हे मुर्खपणाचे आहे कारण बहुसंख्यांकांवर जबरदस्ती करु पाहणाऱ्या अल्पसंख्यकांच्या हिंसाचाराची प्रतिक्रिया म्हणून बहुसंख्यकांना त्यांच्या विरुध्द हिंसाचार करण्याची चिथावणी मिळते.

आपल्या या देशाच्या वातावरणात काही उच्चपदस्थ व्यक्तींसमवेत अनेक व्यक्तींनी जहरी विष फैलावल्यामुळे ही शोकांतिका घडून आली. हे जहर निपटून काढणे हे सरकारचे आणि लोकांचेही कर्तव्य आहे. आपल्याला मोठी जबरदस्त किंमत देऊन हा धडा शिकावा लागला आहे. आता गांधीजींच्या मृत्यूनंतर या सर्वश्रेष्ठ व्यक्तीने ज्या कार्यासाठी आपले जीवन वेचले ते पार पाडण्याची प्रतिज्ञा जो करणार नाही असा कोण आहे का?

अनेक देशातील लोक हिंसाचार, फसवेगिरी, विश्वासघात आणि दुष्ट मार्गाने ज्या तऱ्हेचे यश मिळविण्याचा प्रयत्न करतात, त्या मार्गापासून त्यांनी आम्हाला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्या तऱ्हेचे यश स्थायी स्वरुपाचे नसते. चिरंतन स्वरुपाच्या यशाचा पाया सत्याच्या खडकांवर घालण्यात येतो. गांधीजींनी एक नव्या प्रकारची मुत्सद्देगिरी आपल्याला शिकविली आहे. राजकारणात सत्य, क्षमा आणि अहिंसा परिणामकारक ठरु शकते हे त्यांनी दाखवून दिले आहे. प्रत्येक भारतीयाला एक व्यक्ति आणि नागरिक या नात्याने त्यांच्या राजकीय निष्ठा अथवा धर्मपंथ विचारात न घेता मानाने वागविण्याची आणि त्यांच्याशी सहकार्य करण्याची त्यांनी आम्हाला शिकवण दिली. आपण सर्वजण भारतमातेची लेकरे आहोत आणि आपल्याला येथेच रहावयाचे आहे. आपण कष्टाने मिळविलेल्या स्वातंत्र्याचे समान वाटेकरी आहोत. यापुढे स्वतंत्र भारतात निर्माण होणाऱ्या संपत्तीवर आपल्या सर्व लोकांचा समान अधिकार असेल. सर्वांना समान संधी उपलब्ध होतील. या उद्दिष्टांसाठी एकदिलाने आपण झटले पाहिजे. असे केले तरच महात्मा गांधीच्या जयजयकाराच्या घोषणा देण्यास आपण पात्र ठरू.

✦

''त्यांनी आपल्याला कसे जगावे व कसे मरावे हे दाखवून दिले आहे. त्यांनी दाखविलेल्या मार्गावरुन आदरभावाने वाटचाल करणे हेच त्यांचे खरे स्मारक ठरेल.''

९. 'गांधीजींचे खरे स्मारक'

दिल्ली आकाशवाणीवरील भाषण, १४ फेब्रुवारी, १९४८

भारताला लज्जेने मान खाली घालावयास लावील अशा दुर्घटनेची भारताला आणि जगाला वार्ता कळली, या गोष्टीला आता दोन आठवडे होऊन गेले. हे दोन आठवडे दु:खाचे आणि आत्मसंशोधनाचे होते. या काळात प्रबळ आणि सूप्त भावनांचा आणि लक्षावधी लोकांच्या डोळ्यातून झरणाऱ्या अश्रूंचा पूर वाहून गेला. या अश्रूंनी आमचा क्षुद्रपणा वाहून नेला असेल काय? ज्या थोर नेत्याविषयी आम्ही दु:ख व्यक्त केले त्याचे आम्ही सत्पात्र अनुयायी झालो आहोत काय? या दोन आठवड्यात जगाच्या कानाकोपऱ्यातून थोरामोठ्यां पासून सर्वसामान्य व्यक्तींपर्यंत, सर्वांनी त्यांना श्रध्दांजली वाहिली. जे कोणी त्यांना आपला मित्र, सहकारी आणि कैवारी मानत होते त्या सर्वांनी या थोर नेत्याला श्रध्दांजली वाहिली आहे.

अशा प्रकारच्या सर्व भावनांचा उद्रेक, जसा हळूहळू ओसरत जातो तसाच हा भावनांचा पूरही ओसरुन जाईल. पण आपल्यापैकी कोणीही जसा पूर्वी होता, तसा पुन्हा होऊ शकणार नाही कारण गांधीजींनी आमच्या जीवनाच्या आणि मनाच्या अंतरंगात प्रवेश केला होता.

ब्रॉंझ धातूचे अथवा संगमरवरी पुतळे अथवा स्तंभ उभारुन त्यांचे स्मारक उभारण्याविषयी लोक बोलत आहेत आणि त्यामार्गे त्यांना हिणविण्याचा आणि त्यांच्या विचारांना हरताळ फासण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपण त्यांना आवडेल अशी कोणत्या प्रकारची श्रध्दांजली वाहू शकतो? त्यांनी आपल्याला कसे जगावे आणि कसे मरावे हे दाखवून दिले आहे. आपण जर त्यापासून काही शिकलो नसू तर आपण त्यांच्यासाठी कोणत्याच प्रकारचे स्मारक उभे करु नये हे अधिक चांगले. त्यांनी आपल्याला दाखविलेल्या मार्गावरुन निष्ठेने पुढे जाणे आणि जिवंत असतांना आणि मरतांनाही आपले कर्तव्य पार पाडणे हेच त्यांचे योग्य स्मारक आहे.

लोकांच्या मनावर आणि अंत:करणावर बापूंचा जबरदस्त पगडा होता, तो कशामुळे? त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्वाच्या अनेकविध पैलूंचे मुल्यमापन करावयाचे म्हटले तर अनेक युगांचा कालावधी जाणे आवश्यक आहे, पण सत्याविषयी त्यांच्या मनांत पराकोटीची आत्मियता होती. दुष्ट मार्गाने चांगल्या उद्दीष्टाप्रत जाता येणार नाही आणि ध्येयप्राप्तीसाठी दुष्ट मार्गाचा जर वापर केला तर ध्येय सुध्दा विकृत स्वरुप

धारण करते असे ते सतत सांगत असत, ते सत्यावरील निष्ठेमुळेच. या सत्यनिष्ठेमुळे ते आपल्या चुका जाहिरपणे कबूल करीत असत. त्यांनी केलेल्या काही चुकांना तर ते हिमालयाएवढी चूक असे म्हणत असत. या सत्याच्या आग्रहाखातर त्यांना जेव्हा आणि जेथे दुष्ट प्रवृत्ती व खोटेपणा आढळून आला तेथे त्यांनी परिणामांची क्षिती न बाळगता लढा केला. सत्यावरील निष्ठेमुळेच गरीबांची आणि दलितांची सेवा करणे ही त्यांच्या जीवनातील सर्वात मोठी आवडीची गोष्ट बनली. जेथे विषमता, भेदाभेद आणि दडपशाही आहे तेथे अन्याय, दुष्टावा आणि असत्य आहे, अशी त्यांची भावना होती. त्यामुळेच ते सामाजिक आणि राजकीय अन्यायाला बळी पडलेल्या सर्व लोकांचे आवडते नेते बनले आणि माणूसकीचे थोर प्रतिनिधी बनले. त्यांच्या या सत्याच्या पाठपुराव्यामुळे ते जेथे गेले त्या जागांना मंदिराचे पावित्र्य प्राप्त झाले आणि ज्या भूमीवर ते चालले ती भूमी पुनित झाली.

बापुंचे नश्वर शरीर आपल्याला सोडून गेले आणि आपण त्यांना पुन्हा पाहू शकणार नाही. त्यांची मृदू वाणी कधीच ऐकू शकणार नाही अथवा सल्ल्यासाठी आपण त्यांच्याकडे धाव घेऊ शकणार नाही, पण त्यांच्या अविनाशी स्मृती आणि त्यांचा अमर संदेश आपल्यापाशी राहिला आहे. आपण त्यांचा मान कसा राखणार आणि त्यांचे अनुकरण कसे करणार?

बापूंनी भारताची एकजूट घडवून आणली. त्यांनी इतरांच्या बाबतीत सहिष्णु राहून मित्र आणि सहकारी म्हणून त्यांचा स्वीकार करा असे आम्हांला शिकविले आहे. आपल्या क्षुद्र स्वार्थाचा त्याग करा पूर्वग्रहाचा त्याग करा आणि इतरांमधील चांगले गुण पहा अशी त्यांची शिकवण होती. त्यांच्या अखेरच्या काही महिन्यातील कार्याने आणि त्यांच्या मृत्यूने या थोर मानवाच्या सहिष्णुतेचे आणि प्रामाणिकपणाचे उदाहरण आमच्यापुढे ठेवले आहे.

भारत हे येथे राहणाऱ्या सर्वधर्मीय लोकांचे सामायिक घर आहे. आपल्या या थोर परंपरेचे ते समान वाटेकरी आहेत व त्यांना समान अधिकार आहेत आणि त्यांच्यावर समान जबाबदाऱ्या आहेत हे आपण ध्यानांत ठेवले पाहिजे. त्यांच्या मृत्यूपूर्वी काही दिवस आम्ही त्यांच्या समक्ष ही प्रतिज्ञा केली होती. आपण त्या प्रतिज्ञेचे पालन केले पाहिजे. आपले राष्ट्र एकसंध आहे आणि सर्व महान राष्ट्रे अशीच असावी लागतात. आपल्या दृष्टीकोनातील कोणत्याही प्रकारच्या संकुचितपणामुळे, या महान् राष्ट्राच्या सीमा संकुचित करण्याच्या कोणत्याही प्रयत्नांमुळे त्यांनी आपल्याला अखेरच्या क्षणी दिलेल्या शिकवणूकीचा विश्वासघात होईल. यामुळे आपल्यावर निश्चितच आपत्ती कोसळेल आणि ज्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी श्रम केले आणि जे त्यांनी बऱ्याच प्रमाणात हस्तगत करुन दिले ते स्वातंत्र्य आपल्याला गमवावे लागेल.

म्हणून आपण आपल्या सार्वजनिक जीवनात सहिष्णुता व सहकार्याची भावना

ठेवली पाहिजे, ज्या सर्व शक्तींना भारत हे एक महान आणि पुरोगामी राष्ट्र म्हणून उभे करावयाचे आहे त्या सर्वांनी एकत्र आले पाहिजे असे मी आग्रहाने आवाहन करतो. जातीयवादाच्या आणि संकुचित प्रांतवादाच्या विषाविरुध्द आपण सर्वतोपरीने प्रयत्न केले पाहिजेत. औद्योगिक कलह संपवून सर्व संबंधितांनी भारताची उभारणी करण्याच्या सामायिक कार्यात सहभागी व्हावे अशी माझी आग्रहाची विनंती आहे. या महान कार्याला मी स्वत:ला वाहून घेत आहे आणि गांधीजींनी जी स्वप्ने पाहिली ती काही प्रमाणात तरी वास्तवात उतरविण्याचे काम आमच्या पिढीकडून पार पडेल असा मला विश्वास वाटतो. आपण अशाप्रकारे त्यांच्या स्मृतींचा गौरव करु या आणि त्यांना शोभेल असे स्मारक उभारु या.

✦



"भारत सरकार सर्व भारतीयांना समानतेची वागणूक देईल आणि त्याना इतरांच्या बरोबरीने सर्व हक्क देण्याची तरतुद करील."

१०. 'फाळणीच्या यातना'

दिल्ली आकाशवाणीवरील भाषण, १९ ऑगस्ट, १९४७

१५-१६ ऑगस्ट रोजी भारताने स्वातंत्र्यप्राप्ती निमित्त आंनदोत्सव साजरा केला. केवळ भारतातच नव्हे तर जगात जेथे जेथे भारतीय आहेत तेथे हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मला परदेशातून अभिनंदनाचे हजारो संदेश आले. मोठ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी, नामवंत व्यक्तींनी आणि जगाच्या कोनाकोपऱ्यातील भारतीयांनी हे संदेश पाठविले. स्वतंत्र देशांच्या समुदायात भारताचे स्वागत करणाऱ्या इतर राष्ट्रांच्या नेत्यांच्या संदेशामुळे मला अत्यंत आनंद झाला. पण परदेशातील भारतीयांनी पाठविलेल्या हृदयस्पर्शी संदेशामुळे तर मला त्याहूनही अधिक आनंद झाला. मातृभूमीपासून दूर असलेल्या या भारतीयांना भारताच्या स्वातंत्र्याविषयी आमच्याहूनही अधिक आस लागली होती आणि ही स्वातंत्र्यप्राप्ती म्हणजे त्यांच्या आयुष्यातील एक महान घटना ठरली आहे. नवस्वतंत्र भारताने परदेशातील तिच्या सुपुत्रांची सदैव आठवण ठेवली पाहिजे आणि त्यांना होईल तेवढे साहाय्य केले पाहिजे. परदेशातील हे भारतीय मोठ्या अभिमानाने आणि आपुलकीने मातृभूमीकडे पाहात आहेत.

जवळ जवळ सर्व भारताने स्वातंत्र प्राप्तीचा आनंदोत्सव साजरा केला. पण दुदैवी पंच नद्यांच्या प्रदेशाला या उत्सवात सहभागी होता आले नाही. पूर्व आणि पश्चिम पंजाबवर आपत्ती कोसळली आहे आणि दु:खाचा पूर लोटला आहे. तेथे अनेक ठिकाणी खून, जाळपोळ व लुटालूट झाली आणि निर्वासितांचे लोंढे एकीकडून दुसरीकडे वाहत आहेत.

या वर्षाच्या मार्च महिन्यापासून पंजाबमध्ये अशा प्रकारच्या भयानक घटना घडत होत्या. या घटना एकामागोमाग एक अशा घडत गेल्या आणि एका घटनेची प्रतिक्रिया दुसरीकडे होत गेली. मी ही सर्व कथा सांगत बसणार नाही अथवा कुणाला दोषही देणार नाही. पंजाबच्या अनेक भागांमध्ये भरपूर खून पडले, जाळपोळ झाली आणि सर्व प्रकारचे गुन्हे घडले. या महिन्यांत त्या सुंदर आणि समृध्द पंजाबने असह्य यातना सहन केल्या. ती लांबलचक कहाणी कथन करुन काही साध्य होणार नाही. १५ ऑगस्ट पासून आपण नव्या जीवनाला प्रारंभ करीत आहोत.

अमृतसर आणि लाहोर या दोन्ही ठिकाणी घडलेल्या भयानक हकीकती आम्ही ऐकल्या. हजारो हिंदू, मुसलमान आणि शिख निर्वासित पाहिले. ही परिस्थिती आपण

कठोरपणे हाताळली पाहिजे आणि भूतकाळाविषयीचे निरर्थक वादविवाद आता संपवावेत. या परिस्थितीत काहीही किंमत द्यावी लागली तरी गुन्हेगारीचा मात्र ताबडतोब अंत केलाच पाहिजे. या सर्व बाबींविषयी आमचे सर्वांचे एकमत झाले. हे जर केले नाही तर देशाचा विनाश आणि अराजक हाच आपल्यापुढील पर्याय आहे. देशातील समाजविरोधी प्रवृत्ती सर्व प्रकारच्या अधिकारांची पायमल्ली करीत आहेत आणि नासधूस करीत आहेत. या प्रवृत्तीच्या लोकांना, मग ते कोणत्याही जमातीचे असले तरी दडपून जर टाकले नाही तर देशातील कोणालाही स्वातंत्र्य उपभोगता येणार नाही, एवढेच नव्हे तर सुरक्षिततादेखील लाभणार नाही म्हणून आम्ही त्या ठिकाणी असलेल्या सर्व लोकांनी, दोन्ही केंद्र सरकाराच्या अथवा दोन्ही प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींनी अथवा विविध जमातींच्या नेत्यांनी खूनाखूनीचे आणि जाळपोळीचे सत्र बंद करण्यासाठी सर्वतोपरीने प्रयत्न करण्याचा निर्धार केला आहे.

आम्ही या परिस्थितीचा परिणामकारक रीतीने मुकाबला करु आणि लवकरच पंजाबमध्ये सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होईल अशी मला आशा आहे. पण त्यासाठी सर्व संबंधितांनी सरकारी अधिकाऱ्यांनी आणि इतरांनीही आटोकाट प्रयत्न करण्याची आणि सदैव दक्ष राहण्याची गरज आहे. शांतता आणि सुरक्षिततेची पुर्नस्थापना करण्याच्या या कार्यात आपल्या देशाविषयी आस्था असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने सहाय्य केले पाहिजे.

दुर्दैवाने यापूर्वीच्या काळात आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर जातीय दंगली झाल्या. भविष्यकाळात आम्ही तसे होऊ देणार नाही. भारत सरकारच्या पुरते बोलावयाचे तर आम्ही जातीय दंगल अत्यंत कठोरपणे मोडून काढणार आहोत. भारत सरकार सर्व भारतीयांना समानतेने वागविल आणि त्यांना सर्व हक्क देण्याचा प्रयत्न करील.

आम्ही जरी हे सारे केले असले तरी अखेर शेवटी जनतेकडून आम्हाला जे सहकार्य मिळेल त्यावरच सारे काही अवलंबून आहे. हे सहकार्य आम्हाला मिळेल अशी खात्री असून त्यामुळेच आम्ही नेटाने कार्य करीत आहोत आणि ही पंजाबची समस्या आम्ही निश्चित सोडवू असे विश्वासाने जाहिर करीत आहोत. या भयानक दंगली होतच राहिल्या तर तेथे आणि भारतात इतरत्रही आम्ही कोणतीच प्रगती करु शकत नाही. म्हणून मी सर्व संबंधित लोकांना या आव्हानाला खंबीरपणे आणि धैर्याने सामोरे जाण्याचे आणि स्वतंत्र भारत बिकट परिस्थितीतून कशाप्रकारे मार्ग काढतो हे दाखवून देण्याचे आवाहन करीत आहे.

✦

''जातीयवादी राजकारणात परिणति होणारे राजकारण आणि धर्माचे संमिश्रण हे अत्यंत भयानक संमिश्रण आहे आणि त्याचा अंत केलाच पाहिजे.''

११. 'राजकारण आणि धर्म'

घटना परिषदेत केलेले भाषण, ३ एप्रिल, १९४८

आपण नीतीमूल्यांशी निगडीत असलेल्या राजकारणाविषयी बरीच चर्चा केली आहे. आपण ज्याचा सदैव पाठपुरावा करावा असे हे एक उद्दिष्ट आहे. महात्मा गांधींनी गेल्या पंचविस वर्षाहून अधिक काळात नीतीमुल्यांवर आधारलेले राजकारण करण्याची आपल्याला शिकवण दिली आहे. याबाबतीत आम्हाला कितपत यश आले आहे याचा निर्णय जगाने करावयाचा आहे आणि भावी पिढ्यांनी ठरवावयाचे आहे. आम्ही ते महान उद्दिष्ट ठेवले होते आणि आमच्या परीने कमकुवतपणाने म्हणा किंवा धरसोडीच्या वृत्तीने म्हणा प्रयत्न केले. पण धर्माच्या अत्यंत संकुचित अर्थामुळे त्या राजकारणाची जातीय राजकारणांत परिणति होते. धर्माची आणि राजकारणाची सांगड घालणे हे अत्यंत भयानक संमिश्रण आहे आणि त्याचा अंत केलाच पाहिजे यात अजिबात शंका नाही.

या गोष्टीचे आणखीही एक अंग आहे हे आपण लक्षांत ठेवले पाहिजे. आपण लोकशाही आणि ऐक्य वगैरे गोष्टी बोलतो आणि या देशात जलद गतीने अधिकाधिक लोकशाही येईल आणि ऐक्य निर्माण होईल अशी मला आशा आहे. लोकशाही ही एक निर्भेळ राजकीय बाब आहे. एकोणीसाव्या शतकातील लोकशाहीची संकल्पना म्हणजे प्रत्येक व्यक्तीला मत ही त्या काळाला योग्य अशी संकल्पना होती पण ती अपूर्ण होती आणि आज लोक अधिक सखोल आणि अधिक विस्तृत पायावरील लोकशाहीचा विचार करीत आहेत. अखेर शेवटी एक मत असलेला दरिद्री माणूस आणि एक मत असलेला लक्षाधीश यांची बरोबरी होऊ शकत नाही. लक्षाधिशापाशी आपला प्रभाव पाडण्याचे अनेकविध मार्ग असतात, दरिद्री माणसापाशी काहीच नसते. ज्या व्यक्तीला भरपूर शिक्षण लाभलेले आहे ती व्यक्ति आणि जिला अजिबात शिक्षण मिळालेले नाही अशा व्यक्तींमध्ये समानता असू शकत नाही. अशाप्रकारे शैक्षणिक, आर्थिक आणि इतर अनेक बाबतीत लोकांमध्ये भेद आहेत. लोकांमध्ये काही प्रमाणात भेद राहणार असे मला वाटते. कर्तृत्व आणि संधीच्या बाबतीत माणसांमध्ये समानता नाही पण तरीही प्रत्येकाला जेवढी प्रगती करता येईल तेवढी संधी त्याला मिळावी असे मला वाटते.

आज भारतात काही गट, वर्ग आणि व्यक्ति यांच्यामध्ये प्रचंड तफावत आहे हे

भारताच्या आजच्या परिस्थितीचे वैशिष्ट्य आहे. सामाजिक जीवनाच्या शिखरावर आणि शिखराच्या पायथ्याशी असलेल्या लोकांमध्ये प्रचंड तफावत आहे. आपल्याला जर लोकशाही हवी असेल तर ही तफावत मोठ्या प्रमाणात कमी करणे आवश्यक आहे. सर्वांना समान संधि मिळण्याच्या बाबतीत राहणीमानाच्या बाबतीत आणि जीवनातील आवश्यकता पूर्ण करण्याच्या बाबतीत होईल तेवढे त्यांना निकट आणले पाहिजे. सध्या चैन आणि इतर बाबी बाजूला ठेवू या. जीवनातील चैन आणि आराम समाजातील विशिष्ट वर्गालाच मिळावा याचे काही खास कारण आहे असे मला वाटत नाही. सध्या भारतामध्ये प्रचंड भेदाभेद असल्यामुळे केवळ मानवतावादी दृष्टीने नव्हे तर लोकशाहीच्या परीपूर्णतेसाठी सामाजिक आणि आर्थिक बाबतीत खाली असलेल्या लोकांचा स्तर वाढविणे, त्यांना विकासाच्या आणि प्रगतीच्या सर्व संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या देशाचे हे सर्वसामान्यपणे मान्य करण्यांत आलेले धोरण आहे. सरकारने हे धोरण स्विकारलेले आहे. आता ह्या धोरणानुसार दलित मागासवर्गीयांसाठी काही राखीव जागा ठेवण्यांत आल्या आहेत, अनेक शिष्यवृत्या, शैक्षणिक सोयी सवलती वगैरे देण्यात आल्या आहेत.

केवळ वर्गीकृत जमातींनाच नव्हे तर देशातील इतर मागासवर्गीयांसाठी याहून अधिक सवलती देण्यांत येणार आहेत यात काही शंका नाही. ज्यांना सर्व प्रकारच्या साहाय्याची गरज आहे असे इतरही मागासलेल्या जमातींचे लोक आहेत. प्रत्येक मागासलेल्या जमातीच्या व्यक्तींला आम्ही मतदान करण्याचा अधिकार दिला म्हणजे आमचे कर्तव्य झाले असे म्हणून चालणार नाही. गेली शेकडो आणि हजारो वर्षे आपण त्यांच्या बाबतीतील कर्तव्य केलेले नसल्यामुळे त्यांना मत देण्याचा अधिकार देवून आपण यापुढे त्यांच्या बाबत आपल्यावर पडणाऱ्या जबाबदारीतून मोकळे होऊ शकणार नाही. ज्या लोकांना भूतकाळांत संधी नाकारण्यात आल्या अशा सर्व लोकांचे जीवनमान वाढविण्याच्या दृष्टीने आपल्याला सतत विचार केला पाहिजे. राजकीय दृष्टीने त्यांना राखीव जागा वगैरे देणे हाच हे कर्तव्य पार पाडण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे असे मला व्यक्तीशः वाटत नाही. आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांची झपाट्याने प्रगती घडवून आणणे हा या बाबतीतील सर्वोत्तम आणि मूलभूत मार्ग आहे. त्यामुळेच ते आपल्या पायावर उभे राहतील असे मला वाटते.

✦

''आपण सारेजण भारतापासून अनेक गोष्टींची अपेक्षा करतो. आपण त्याच्या मोबदल्यात भारताला काय देतो?''

१२. 'आपल्या पुढील कार्य'

दिल्ली आकाशवाणीवरील भाषण, १५ ऑगस्ट, १९४८

देश बांधव हो, बंधूनो, आणि मित्रहो, गेल्या वर्षी याच दिवशी आणि याच वेळी मी याच ठिकाणाहून भाषण केले होते. आज स्वतंत्र भारत एक वर्षाचा झाला. त्याच्या स्वातंत्र्याच्या या शैशवावस्थेत त्याने अनेक हाल अपेष्टा सहन केल्या, अनेक कसोट्यांना तो उतरला. तो या सर्व संकटांना आणि आपत्तींना तोंड देवून उभा राहिला. एखादे सुदृढ आणि सुस्थापित राष्ट्रही या आपत्तीपुढे तक धरु शकले नसते अशा या आपत्ती होत्या. या यशाबद्दल आणि आमच्या जनतेला ज्याचे श्रेय द्यावे लागेल अशा अनेक यशाबद्दल आम्ही उतराई आहोत. आपण आपले या काळातील कार्य कमी लेखता कामा नये, आपल्या जनतेने या आपत्तींना ज्या धैर्याने, कठोर परिश्रम करुन स्वार्थत्याग पूर्वक तोंड दिले त्याचा आपण विसर पडू देता कामा नये.

आपल्याला कोठे अपयश आले आणि आपण कोठे चुकलो याचाही आपण विसर पडू देता कामा नये. कारण आपण अनेक चुका केल्या आहेत आणि अनेक बाबतीत आपल्याला अपयश आले आहे. यातील कांही उघड आहेत पण आपले खरे अपयश आहे हे मनोवृत्ती बाबतचे आहे. गेली पंचवीस एक वर्षे ज्यांच्या कुशल मार्गदर्शनानुसार आपण लढे केले आणि वाटचाल केली त्या राष्ट्रपित्याने आखून दिलेल्या उच्च मानदंडानुसार आपण वागू शकलो नाही हे सर्वात मोठे अपयश आहे. उदात्त उदिष्टचे उदात्त साधनांनीच साध्य करता येतात. उदिष्टचे आणि साध्ये साध्य करण्यासाठी वापरलेल्या साधनांपासून त्याची फारकत करता येत नाही अशी त्यांची शिकवण होती. भिती मनातून काढून टाका कारण तिच्याच पोटी द्वेषाचा आणि हिंसेचा जन्म होतो असे आम्हांला त्यांनी सांगितले.

आपल्यापैकी अनेक जण हा धडा विसरले आणि त्यांना भीतीने जर्जर केले, कुणा दूरच्या वैऱ्याच्या नव्हे तर एकमेकांच्या भितीने त्यांना पछाडले आणि त्यामुळे अनेक दृष्कृत्ये घडून गेली.

आपण सारेजण भारताविषयी बोलतो आणि भारतापासून आपण अनेक गोष्टींची अपेक्षा करतो. उलट मोबदल्या दाखल आपण भारताला काय देतो? आपण जे त्याला देऊ त्याहून काहीही अधिक आपण त्याच्यापासून घेऊ शकत नाही. आपण जे प्रेम, सेवा आणि उत्पादन आणि सृजनशील श्रमाच्या रुपाने त्याला देऊ त्याहून

अधिक काही भारताकडून आपल्याला मिळू शकणार नाही. जसे आपण आहोत तसा भारत बनणार आहे. आपल्या विचारानुसार आणि कृती नुसार भारताची घडण होणार आहे. भारतभूची आपण बालके आहोत. आजच्या भारताचे लहान सहान अंश आहोत पण उद्याच्या भारताचे आपण जनक आहोत. आपण जर मोठ्या मनाचे असू तर भारतही तसाच होईल आणि आपण जर कोत्या मनाचे आणि संकुचित वृत्तीचे झालो तर भारतही तसाच होईल.

आपण आत्मसंशोधन करु या आणि आपल्या स्वप्नातील भारताचा विचार करु या. आपण पुरातन मूल्यांचा शोध घेऊ या आणि स्वतंत्र भारताच्या पार्श्वभूमीवर त्यांची स्थापना करु या. कारण स्वातंत्र्या बरोबर जबाबदाऱ्या येतात आणि स्वयंअनुशासन, कठोर परिश्रम, आणि स्वतंत्र जनतेच्या दृष्टीने ते टिकवून धरता येईल.

म्हणून आपण आपल्याला मर्यादा पाडणाऱ्या अथवा कमीपणा आणणाऱ्या सर्व गोष्टींचा त्याग करु या. आपण भीतीचा, जातीयवादाचा आणि प्रांतवादाचा त्याग करु या. जेथे आपल्या जनतेच्या हितसंबंधांना सदैव प्राधान्य देण्यात येईल आणि इतर संबंधांना दुय्यम स्थान देण्यांत येईल असा स्वतंत्र आणि लोकशाही भारत आपण निर्माण करु या. आपल्या जनतेला अनेकविध ओझ्यांपासून मुक्त केल्याखेरीज या स्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही, लोकशाही म्हणजे सहिष्णुता. ज्यांचे आपल्याशी एकमत आहे त्यांच्या बाबतीत नव्हे, तर ज्यांच्याशी मतभेद आहेत त्यांच्याशीही सहिष्णुतेने वागणे अत्यावश्यक आहे. स्वातंत्र प्राप्तीनंतर या स्वातंत्र्याला साजेल अशा प्रकारे आपल्या वागणुकीच्या पध्दतीत बदल घडून आले पाहिजेत.

आपल्याला ही लढाई लढावयाची आहे. आर्थिक अरिष्टांविरुध्द आणि उपेक्षितांचे पुनर्वसन करण्यासाठी आपल्याला लढावयाचे आहे. या लढाईत द्वेष, अथवा हिंसाचार यांना थारा नाही. पण केवळ आपल्या देशाची आणि जनतेची सेवा करण्याची ही लढाई आहे. या लढाईत प्रत्येक भारतीय सैनिक होऊ शकतो. व्यक्तींनी अथवा गटांनी बहुतांच्या कल्याणाकडे दुर्लक्ष करुन संकुचित हितसंबंधाचा विचार करण्याची ही वेळ नाही. हुज्जत घालत बसण्याची ही वेळ नाही.


म्हणून मी माझ्या देश बांधवांना आणि भगिनींना, ज्यांच्या अंत:करणात भारताविषयी प्रेम आहे आणि जनतेचा उध्दार करण्याची तळमळ आहे त्यांना या भेदाभेदांना मूठमाती देण्याचे आणि महान लोकांना शोभेल अशा प्रकारे ऐतिहासिक आणि उदात्त कार्य करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन करीत आहे.

विशेषत: देशातील युवकांना मी आवर्जून आवाहन करीत आहे कारण ते भावी काळाचे नेते आहेत आणि भारताचा सन्मान आणि स्वातंत्र्य टिकविण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडणार आहे.

माझी पिढी एक संक्रमणावस्थेतील पिढी आहे आणि आम्ही लवकरच

भारताच्या थोर आणि चिरंतन अस्मितेची तेजस्वी मशाल तरुणांच्या मजबूत हातामध्ये सोपविणार आहोत. त्यांनी ही मशाल किंचितही निस्तेज होऊ न देता उंच धरावी, तिचा प्रकाश प्रत्येक घरात पोचेल आणि जनतेला धैर्य, निष्ठा आणि सुबत्ता प्राप्त होईल अशी खबरदारी घ्यावी.

✦



''आपल्या पिढीच्या नशिबात श्रम, कठोर परिश्रमच लिहीलेले आहेत.''

१३. 'आपल्या पिढीला कठोर परिश्रमांची सजा'

नवी दिल्ली येथील भाषण, ५ डिसेंबर, १९४८

जीवन ही एक अत्यंत जटील आणि गुंतागुंतीची बाब आहे. व्यक्तीच्या दृष्टीने आणि राष्ट्राच्या दृष्टीने तर ती अधिकच जटील आणि गुंतागुंतीची आहे. यापैकी व्यक्ति महत्वाची की, राष्ट्र महत्वाचे हे सांगणे जरासे कठीणच आहे. कारण ती दोन्ही परस्परांवर अवलंबून आहेत. असे असले तरी मी अनेक वेळा म्हटल्याप्रमाणे भारतातील नद्यांच्या खोऱ्यांचा विकास ही एक अत्यंत मुलभूत आणि पायाभूत महत्वाची बाब आहे. गेली अनेक वर्षे मला या बाबतीत खूपच आस्था वाटत आली आहे. इंजिनिअर म्हणून मला तसे वाटत नाही कारण मी इंजिनिअर नाही पण सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, भारताच्या कोणत्याही मोठ्या प्रमाणावरील नियोजनाचा तो पाया आहे. या दृष्टीकोनातून मला या विषयाबाबत सतत आस्था वाटत आली आहे. मला नियोजनाबाबत आस्था आहे कारण भारतातील सूप्त साधन संपत्ती, प्रचंड साधनसंपत्ती आपल्या लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी वापरण्यात येत नाही ही एक विलक्षण आणि दुर्दैवी वस्तुस्थिती आहे असे मला दिसून आले आहे.

आपल्याला ह्या प्रचंड साधन संपत्तीचे वास्तवात रुपांतर घडवून आणावयाचे आहे. आशियाच्या आणि भारताच्या नकाशाकडे पहा. माझ्या बैठकीच्या खोलीत आणि कचेरीत तो नकाशा माझ्याकडे टक लावून पहात असतो आणि मी जेव्हा जेव्हा त्याच्याकडे पहातो तेव्हा तेव्हा माझ्या मन:चक्षूपुढे अनेक चित्रे तरळून जातात. आपला दिर्घकालीन पुरातन इतिहास प्राथमिक अवस्थेतील मानवाचा क्रमाक्रमाने होत गेलेला विकास, लांबच लांब पसरलेले व्यापारी तांड्यांचे मार्ग, संस्कृती, शेतकी आणि नागरी संस्कृती यांचा प्रारंभ, ज्या काळात पहिले कालवे आणि पाटबंधारे बांधण्यात आले तो काळ आणि त्यातून निर्माण झालेले सारे काही ही सर्व चित्रे माझ्या मनश्चक्षूंपुढे तरळून जातात. मग माझ्या मनांत भविष्यकाळा विषयी विचार येतात. आपल्या ईशान्य सीमेचे संरक्षण करणाऱ्या हिमालयाकडे, त्याच्या प्रचंड डोंगराच्या रांगांकडे माझे लक्ष केंद्रित होते. त्याच्याकडे पहा, त्याच्याविषयी विचार करा, प्रमाणाच्या दृष्टीने एवढा विशाल, एवढा प्रचंड वीजेचा साठा असलेला, सूप्त सामर्थ्य आणि शक्ति असलेला दुसरा असा एखादा भूभाग जगात कुठे आहे काय? हिमालयात आणि त्याच्यापासून नद्यांना मिळणाऱ्या पाण्यात जेवढी प्रचंड वीज कोंडलेली आहे तेवढी जगात इतरत्र कुठेही आढळणार नाही. मला असा प्रदेश ठाऊक नाही. याचा वापर करावयाचे मार्ग अनेक


आहेत. जनतेच्या हितासाठी शक्तीच्या या प्रचंड स्त्रोताचा वापर करणे हे मुख्यतः इंजिनीयरांचे काम आहे. या कार्यात अत्यंत परिणामकारक व अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडणे हे तुम्हा अभियंत्याच्या वाट्यास आले आहे. या दृष्टीकोनातून पाहिले तर भारतातील अभियंत्याचे काम अत्यंत महत्वाचे ठरते.

या देशात प्रत्येक क्षेत्रात आपल्याला अनेकविध कामे करावयाची आहेत. कोणी तरी एकदा असे म्हणाले की, आपण जागतिक इतिहासाच्या अशा एका कालखंडात जन्माला आलो आहोत की जो बदलत आहे आणि क्रांतिकारक आहे व अकल्पित गोष्टी घडत आहेत. आता या अकल्पित घटनांविषयी तक्रार करण्यात काहीच अर्थ नाही. आपण जन्माला आलो आहोत तर आपण त्यांना तोंड दिलेच पाहिजे. आपण पळून जाऊन शकत नाही. जर पळून जाणे शक्य नाही तर माणसांसारखे त्यांना तोंड देऊ या आणि संकटावर मात करु या. आमच्या पिढीला [भावी पिढ्यांचे मला ठाऊक नाही] आराम आणि खरी शांतता फारच थोडी लाभणार आहे. आमच्या पिढीला चैन आणि आराम करता येणार नाही. आमच्या नशिबात कठोर श्रम, कठोर परिश्रम लिहीलेले आहेत. या पिढीला कठोर परिश्रमाची सजा सुनावण्यात आली आहे. हे कठोर परिश्रम विधायक स्वरुपाचे असतील, ते कितीही कठोर असले तरी त्याच्यामुळे राष्ट्राची उभारणी होते. तुम्हाला कठोर परिश्रम करावे लागणार हे निश्चित!

या उभारणीच्या कार्यात अभियंत्यावर प्रचंड जबाबदारी आहे आणि ते आपली कर्तव्ये कशी आणि कोणत्या वृत्तीने पार पाडतात यावर बरेच काही अवलंबून आहे याची येथे उपस्थित असलेल्या अभियंत्यांना जाणीव व्हावी अशी माझी मनोमन इच्छा आहे. तुम्ही तुमच्या कामात प्रथम दर्जा राखला पाहिजे आणि आपली कामे कार्यक्षमतेने पार पाडली पाहिजेत अशी आमची अपेक्षा आहे कारण दुय्यम दर्जाला काहीच अर्थ नसतो. ते देशाच्या दृष्टीने वाईट आहे. त्याचबरोबर तुमच्या या कामात तुम्ही आणखी काही तरी ओतले पाहिजे, तुम्ही कोणत्या तरी उदात्त उद्दिष्टांसाठी, ध्येयाच्या परिपूर्तीसाठी उत्कृष्ट सृजनशील कार्य करीत आहात अशा वृत्तीने जर तुम्ही काम केलेत तर त्या कामात काहीतरी अधिक उच्च असे ओतले जाईल. जरा मागे वळून मध्य युगातील अथवा त्याही पलिकडच्या पुरातन काळातील प्राचीन इमारती, प्राचीन वास्तू, देवळे, प्रार्थना मंदिरे, मशिदी वगैरेच्या अवशेषांकडे पाहून घ्या. हे सारे कोणी बांधले, कुणाला ठाऊक नाही पण ज्यांनी कुणी हे बांधले ते केवळ उत्तम उभारणीकार, अभियंते नव्हते तर आपल्या कामाविषयी निष्ठा असलेले लोक होते हे लक्षात येते. निष्ठा असल्याखेरीज कोणीही कोणतीही सुंदर वास्तू उभी करु शकणार नाही. युरोपातील उत्कृष्ट प्रार्थना मंदिरे पाहा, त्यांचे उभारणीकार कोण होते हे क्वचितच कुणाला ठाऊक असेल पण ती उभारणीकारांच्या श्रध्देची साकार रुपे आहेत.

ती आपल्या डोळ्यांत भरतात कारण पुरावा समोरच उभा असतो. आपली प्रचंड देवालये आणि मशिदी यांच्याबाबतीतही तसेच आहे. आता आपण निराळ्या युगात राहात आहोत. आपण मशिदी, प्रार्थना मंदिरे आणि देवालये यांच्यासाठी वेळ आणि शक्ति खर्च करु शकत नाही पण इतर सार्वजनिक इमारती उभ्या करीत आहोत. या सार्वजनिक इमारतीही सुंदर असल्या पाहिजेत कारण त्यांच्याद्वारे ही निष्ठा व्यक्त झाली पाहिजे. म्हणून तुम्ही या निष्ठेने काम करावे असे मला वाटते आणि जर तुम्ही या निष्ठेने आणि वृत्तीने काम केलेत तर त्यामुळे तुम्हाला आनंदच होईल.

✦



''आज संरक्षण यंत्रणेचा अर्थ काय होतो हे लक्षांत घ्या. कारण सेनादल, नाविकदल आणि हवाईदल यापेक्षाही उद्योगधंदे म्हणजे संरक्षण यंत्रणा होय.''

१४. 'अधिक उत्पादन ही प्राथमिक आवश्यकता'

नवी दिल्ली येथील भाषण, १९ डिसेंबर, १९४७

आपल्यापैकी अनेकजण आपापल्या क्षेत्रातील कामगार अथवा औद्योगिक क्षेत्रातील तज्ञ आहात. मला या सर्व क्षेत्रांबाबत खूपच आस्था आहे आणि आपल्या विशिष्ट क्षेत्रात तज्ञ असलेल्या तज्ञांपेक्षाही सर्वसामान्य व्यक्तीला सर्वांगीण चित्र योग्य दृष्टीकोनातून पाहता येते या अर्थाने माझी भूमिका तज्ञांच्या मानाने अधिक चांगली आहे. असे असतांनाही गेल्या काही दिवसांत चालू असलेल्या तुमच्या विचार विनिमयांत सहभागी होण्याची संधी मला हवी होती. या विचार विनिमयात सहभागी होणाऱ्या तज्ञांचे मनोगत समजून घेण्याची मला इच्छा होती.

या अत्यंत महत्वाच्या प्रश्नांबाबत मतभेद आहेत. मूलभूत मतभेद आहेत, भिन्न दृष्टीकोन आहेत, हे उघड आहे. ज्यांना ध्येयवाद म्हणतात असे कांही ध्येयवाद आहेत आणि ज्याला व्यावहारिक दृष्टीकोन म्हणतात असे कांही दृष्टीकोन आहेत. पण ज्यांना खरोखरीच व्यावहारिक म्हणता येईल असे हे दृष्टीकोन नाहीत असे मला आढळून आले आहे. आपल्यापुढे एक हातभर दूर काय आहे एवढेच पाहाणे हाच व्यावहारिक दृष्टीकोन आहे असा कुणी आग्रह धरु नये. त्यासाठी दूरवर पहावे लागते. पण हे मतभेद आहेत हे खरे आणि केवळ सदिच्छेने आणि उत्तम सल्ल्याने ते दूर होतील, जादूने मतभेद नष्ट करता येतील असे समजणे वेडगळपणाचेच ठरेल. असे असले तरी मला वाटते की, दृष्टीकोनातील ही भिन्नता नष्ट न करताही काही घटनांच्या संदर्भात आपण एकत्र येऊन काम करणे इष्ट आहे एवढे जरी समजून घेतले तरी आपल्याला काही निष्कर्ष काढण्याच्या कामी मदतकारक वातावरण निर्माण होईल.

आता ही मतभिन्नता का निर्माण व्हावी? जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनामध्ये काही भिन्नता असल्यामुळे ते काही प्रमाणांत घडत असेल. जीवनातील विभिन्न उद्दिष्टये, सामाजिक स्थान आणि इतरही काही कारणांमुळे मतभेद निर्माण होत असतील. पण जरा स्पष्टच सांगावयाचे तर हे मतभेद निर्माण होतात कारण विविध सामाजिक गट काही लाभ मिळविण्यासाठी, मोबदला मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असतात. भांडवलदारांना कांही लाभ मिळावा असे वाटते, कामगारांना कांही लाभ हवा असतो, ग्राहकांना, उत्पादकांना, प्रत्येकाला अथवा प्रत्येकाच्या गटाला लाभ हवा असतो. पण एकवेळ अशी येते की हे गट परस्परांशी लढत असतांना लाभ नष्ट होतो

आणि कुणालाही काही शिल्लक राहात नाही. म्हणून काही वेळा लाभ मिळविण्याच्या आपल्या इच्छेला आवर घालण्याची, आपली हाव कह्यात ठेवण्याची आणि खुद्द लाभ कायम ठेवण्याचाही प्रसंग येतो. अशा परिस्थितीत लाभ मिळविण्याची आशा सोडून देण्याची आवश्यकता नाही, तर अग्रक्रम ठरविणे आवश्यक आहे. म्हणून प्रथम लाभ टिकवून ठेवला पाहिजे आणि नंतर मतभेदानुसार निर्णय घ्यावेत किंवा हवे तर संघर्ष करावेत, झगडे करावेत. पण जेव्हा संघर्षामुळे खुद्द लाभालाच धोका निर्माण होतो तेव्ह तो अतिशय दुर्दैवाचा आणि मुर्खपणाचा मार्ग ठरतो.

आपण एक वस्तुस्थिती लक्षांत ठेवली पाहिजे. आज भारतापुढे अनेक संकटे उभी ठाकली आहेत. यातील काही जरी आपल्याला आता समोर दिसत असली तरी राष्टाची उत्पादन करण्याची क्षमता हळुहळू नष्ट होत जाणे हे सर्वात मोठे अखेरचे संकट आहे. याचा आपल्यावर राजकीय, आर्थिक आणि सर्व प्रकारे परिणाम होतो आणि त्यामुळे आपल्या समोर असलेल्या संकटांना प्रतिकार करण्याची आपली शक्तीच हळूहळू कमी होत जाते. म्हणून तुम्ही आपली उत्पादन क्षमता आटविण्याचा क्रम थांबविला पाहिजे. आपल्या स्वत:च्या विशिष्ट अडचणी बरोबरच आपल्याला जर इतर जगाबरोबर काही अधिक संकटांचा मुकाबला करावा लागत असेल तर त्यांच्या बाबतीत आपण काय करणार आहोत? जो पहिला विचार एखाद्याच्या मनांत येतो तो असा की जग पुन्हा एकदा एका मोठ्या प्रमाणावरील संघर्षाकडे वाटचाल करीत असतांना या विघटन होणाऱ्या जगात आपण भारताला लवकरांत लवकर स्वत:च्या पायावर उभे केले पाहिजे. असे केले तर आपण टिकून राहण्याची, या संकटातून पार पडण्याची आणि निकटच्या भविष्य काळांत आपला प्रभाव पाडण्याची शक्यता आहे. जगातील ही अत्यंत नाजूक परिस्थितीतील शांतता किती काळ टिकेल हे कोणी सर्वश्रेष्ठ तज्ञही सांगू शकणार नाही. ती अनेक वर्ष टिकेल अशी आपण आशा करु या पण केव्हाही भंग होऊ शकेल. आणि तसे जर घडले तर अकल्पित गोष्टी घडतील याची आपल्याला जाणीव असेलच. आतापर्यंत आपल्याल जेवढा हादरा बसलेला नाही तेवढा हादरा या घटनेने बसण्याची शक्यता आहे.

आणि या अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीला आपण कसे सामोरे जाणार आहोत? तसे काही घडण्याच्या पूर्वी पुरेशी भक्कम संरक्षण यंत्रणा असलेल्या आर्थिक दृष्ट्या खंबीर आणि संतुलीत भारताची निर्मिती करुन आपण या संकटाचा मुकाबला करणार आहोत. आणि संरक्षण यंत्रणा याचा अर्थ काय हे लक्षात ठेवा. लोक या संदर्भात सेनादल, नाविकदल, हवाईदल यांचा उल्लेख करातात. संरक्षणाची साधने हीच आहेत हे उघड आहे. पण सेनादल, नाविकदल आणि हवाईदल याहूनही उद्योगधंदे आणि उत्पादन याचाच अर्थ संरक्षणाची तरतूद. तसे नसेल तर जगातील साऱ्या सैनिकांचा भारताला काहीच उपयोग होणार नाही. ✦

"उपाशी पोटी माणसाला अथवा दरीद्री देशाला स्वातंत्र्य नावाची गोष्ट काही कामाची नाही."

१५. 'औद्योगिक शांतता ही प्राथमिक गरज'

दिल्ली आकाशवाणी वरील भाषण, १८ जानेवारी, १९४८

मित्रहो आणि बंधूनो, मी उत्पादन विषयक अरिष्टाविषयी भाषण करावे अशी अपेक्षा आहे. पण माझे मन इतर गोष्टींनी आणि इतर अरिष्टांविषयीच्या विचाराने व्यापले आहे. आपण अनेक वस्तूंच्या उत्पादना विषयी बोलता पण चांगली माणसे आणि स्त्रिया उत्पन्न करणे ही राष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. अशा अनेक व्यक्ती भारतात आहेत. त्यांनी आपला चांगुलपणा, सत्य आणि आत्मबळाच्या द्वारे ही प्राचीन भूमी उजळून टाकली आहे. त्यांनी आमच्या सारख्या दुर्बळ आणि मर्त्य प्रमादशील लोकांवर प्रकाश टाकला आहे आणि आम्ही आडमार्गावर जाऊ लागलो तर त्या व्यक्ती आम्हाला त्यापासून परावृत्त करतात. आम्ही योग्य मार्गापासून खूपच भरकटलो आहोत आणि आमचा वारसा गमावला आहे आणि आमची किर्ती कलंकित केली आहे. आता हे खूप झाले. आपण आता निर्मितीच्या, उभारणीच्या आणि सहकार्याच्या, आपल्या बांधवांविषयीच्या सदिछेच्या मार्गावर वाटचाल केली पाहिजे.

संपत्ती म्हणजे उत्पादन. आपण जर उत्पादन केले नाही तर आपल्यापाशी पुरेशी संपत्ती जमा होणार नाही. संपत्तीचे वितरण तितकेच महत्वाचे आहे. काही मूठभर लोकांच्या हातात संपत्तीचा संचय होता कामा नये. पण वितरणाचा विचार करण्यापूर्वी उत्पादन होणे महत्वाचे आहे.

आपल्या पुढे आज अनेक समस्या आहेत. आर्थिक आणि इतर समस्याही आपल्यापुढे आहेत हे तुम्हाला ठाऊक आहे. नियंत्रण आणि चलनवाढ आणि इतरही प्रश्न आहेत. त्यात पुन्हा वस्तूंची टंचाई आहे. युध्दकालीन आणि शांततेकालीन अर्थरचनांमध्ये होणारे स्थित्यंतर अत्यंत मंद गतीने होत आहे. आणि खरे बोलायचे तर प्रगती ऐवजी आपली पिछेहाट होत आहे. ही आपल्या पुढील अत्यंत निकडीची आणि गंभीर बाब आहे तिचा आपण विचार केला पाहिजे कारण असेच होत राहिले तर आपल्या अर्थरचनेवर आणि समग्र भारतावर हळुहळू एक प्रकारचे अपंगत्व पसरत जाईल साऱ्या राष्ट्राचे नुकसान होईल.

आमची शेते, कारखाने आणि कार्यशाळा [वर्कशॉप] यांच्यामधून संपत्तीचे ओघ निघावेत आणि आमच्या देशातील लक्षावधी लोकांपर्यंत पोचावेत आणि त्यामुळे आपल्याला आपले स्वप्न पूर्ण झालेले पाहता येईल असे आम्हांला वाटते.

आपण स्वातंत्र्याविषयी बोलतो पण आर्थिक स्वातंत्र्य नसेल तर राजकीय स्वातंत्र्याला फारसा अर्थ रहात नाही. खरे तर उपाशी पोटी माणसाच्या आणि गरीब राष्ट्राच्या दृष्टीने स्वातंत्र्य नावाची गोष्टच अस्तित्वात नाही. गरीब मग ती व्यक्ति असो वा राष्ट्र असो त्यांना या जगात स्थान नाही. म्हणून आपण भरपूर संपत्ती जमा होण्यासाठी उत्पादन केले पाहिजे. योग्य रीतीने आर्थिक नियोजन करुन ती संपत्ती लक्षावधी लोकांपर्यंत विशेषत: सामान्य लोकांपर्यंत पोहोचेल अशी तरतुद आपण केली पाहिजे. त्यामुळे केवळ लक्षावधी लोकांची भरभराट होते असे नाही तर सारा देश संपन्न, समृध्द आणि मजबूत होतो. अनेक लोकांचा कपोलकल्पित धोक्यांवर विश्वास असतो आणि ते सतत इतर देशांशी संघर्ष होण्याच्या गोष्टी बेजबाबदारपणे बोलत असतात. असा कोणताही संघर्ष होणार नाही अशी मला आशा आहे.

असे असले तरी एका नव्या देशाने, नुकतेच स्वातंत्र्य मिळालेल्या राष्ट्राने आपले स्वातंत्र्य आणि स्वाधीनता यांचे रक्षण करण्यासाठी मोठी काळजी घेणे भाग आहे. सदैव दक्षता ही स्वातंत्र्याची किंमत आहे असे जे म्हटले आहे ते बरोबरच आहे. आपण हे कसे करणार आहोत? आपण आपल्यापाशी पुरेशी संपत्ती नसेल तर विकासाच्या योजना आणि कल्पना वास्तवात कशा उतरवणार आहोत? आपण कर्जाऊ रकमेवर दीर्घकाळ राहू शकत नाही आणि आपण जरी कर्जे घेतली तरी त्यासाठी आपली पत असणे आवश्यक आहे. आपण या रकमेची योग्य प्रकारे गुंतवणूक करण्याइतपत ताकदवान असणे आवश्यक आहे. या सर्वांसाठी आणि ताबडतोबीच्या गरजा भागविण्यासाठी आपण उत्पादन करणे अत्यावश्यक आहे. उत्पादनाच्या योजना पार पाडण्यासाठीही रकमा उपलब्ध करण्यासाठीही उत्पादन करणे आवश्यक आहे. म्हणून आपण या घटकेला उत्पादन करणे ही मूलभूत गरज आहे. या निष्कर्षाप्रत आपण येऊन पोचतो. आता उत्पादन म्हणजे कठोर परिश्रम, ते सतत केले पाहिजेत. उत्पादन म्हणजे काम थांबवता कामा नये, संप अथवा टाळेबंदी करता कामा नये.


कामगारांना संप करण्याचा अधिकार नाकारण्यात यावा असे म्हणणाऱ्यांपैकी मी नाही. कारण संप हे अतिशय मोलाचे शस्त्र आहे. या शस्त्राच्या सहाय्याने, कामगारांनी अनेक देशांत मजबूत आणि महत्वाचे स्थान प्राप्त करुन घेतले आहे. पण संप काही वेळा धोकादायक ठरतात. संप केवळ राष्ट्राच्याच नव्हे तर अंतिमत: खुद्द कामगारांच्याही उद्दिष्टांना घातक ठरतात असेही काही कालखंड येत असतात.

अर्थात सुरचित राष्ट्रामध्ये सर्वांना आपला योग्य वाटा मिळतो. अशा राष्ट्रांमध्ये संप आणि टाळेबंदी निरर्थक ठरतात. संप आणि टाळेबंदी हे अर्थरचनेमधील काही मूलभूत दोषांचे लक्षण आहे. आजच्या आमच्या, केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतरही भागामधील आर्थिक पध्दतीमध्ये खूप दोष आहेत. आपल्याला हे सारे बदलायचे आहे पण ते बदलतांना जे आज अस्तित्वात आहे त्याचीही मोडतोड होऊ

नये याची आपल्याला खबरदारी घ्यायची आहे. आपण काहीतरी घाईगर्दीने करायला जाऊ आणि त्यामुळे आपण जी उद्दिष्टे ठेवली आहेत त्यापासून दूर जाऊ असा एक धोका याबाबतीत संभवतो. म्हणून सध्या आपल्याला औद्योगिक शांतता हवी आहे, या कालखंडात आपण सर्वांनी देशाचे उत्पादन वाढविण्यासाठी विकासाच्या प्रचंड योजना अंमलात आणण्यासाठी सहकार्य केले पाहिजे.

आपण आपल्या सध्याच्या लोकसंख्येला पूर्णपणे रोजगार उपलब्ध करुन देऊ शकतो आणि देशाच्या संपत्तीत भर घालू शकतो. बेरोजगारी नष्ट करु शकतो. प्रत्येकाला जर रोजगार मिळाला तर कोणत्याही देशातील लोकसंख्या फाजील ठरत नाही. आम्ही सर्वांना रोजगार उपलब्ध करण्याचे काम करणार आहोत. आणि आम्हाला जर या कार्यात यश आले तर आर्थिक आणि कामगार क्षेत्रातील अखंड चालू असलेल्या संघर्षाचा त्याग करावा लागेल. पण मी यापूर्वीच सांगितल्याप्रमो कामगारांना जर योग्य वाटा मिळाला आणि त्यांची जर पिळणूक झाली नाही तरच ही समस्या सुटणार आहे.

तर आपण आता कामाला लागू या, कसून काम करुया. आपण उत्पादन करु या. पण जे आपण उत्पादन करु ते स्वत:चे खिसे भरण्यासाठी नव्हे तर राष्ट्रासाठी असेल. लोकांचे आणि सर्व सामान्य जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी आपण उत्पादन करु या. आपण जर हे केले तर आपल्याला भारताची प्रगती झालेली दिसेल आणि अनेक समस्या सुटलेल्या असतील. भारताची पुनर्उभारणी करणे ही आपल्या दृष्टीने सोपी गोष्ट नाही. आपली संख्या जरी मोठी असली आणि भारतापाशी साधन सामग्रीची आणि कर्तबगार, बुध्दिमान आणि कामसू व्यक्तींचीही जरी कमतरता नसली तरीही ती एक मोठीच समस्या आहे. आपल्या भारतातील या साधन सामुग्रीचा आणि मनुष्यबळाचा आपल्याला वापर करायचा आहे.



''हे जहाज समुद्रात लोटतांना भारतात काही महिन्यांपूर्वी जे राष्ट्राचे जहाज कालप्रवाहात लोटण्यात आले आणि जे वादळातून पार पडले आहे त्याची आठवण मनांत येते.''

१६. भारताच्या पहिल्या जहाजाचा सागर प्रवेश

विशाखापट्टणम् येथील भाषण, १४ मार्च, १९४८

हे जहाज समुद्रात लोटतांना माझ्या मनात अनेक विचारांनी गर्दी केली आहे. भारतात अनेक शतकानंतर एवढे मोठे जहाज बांधून सागरात लोटण्यात येत आहे. या प्रसंगी जहाज बांधणी हा भारताचा ज्या युगात एक महत्वाचा उद्योग होता त्या युगाची आपल्याला अपरिहार्यपणे आठवण होते. काय असेल ते असो, पण मला आपल्या गतकाळाचे आणि मध्य युगाचे महत्व वाटते. या भूतकाळात आपल्या देशाच्या दृष्टीने अनेक चांगल्या गोष्टी झाल्या आणि तितक्याच वाईट गोष्टीही झाल्या आहेत व तो आपल्या देशाच्या इतिहासाचा एक भाग बनला आहे. आपण जहाज बांधणीच्या उद्योगाचा विचार करतो पण देशाच्या कल्याणाचे विचार अधिक प्रमाणात मनांत येतात. हे जहाज सागरात लोटतांना काही महिन्यापूर्वी आम्ही आमची राष्टनौका सागरात लोटली या घटनेची आठवण होते. या दोन्ही घटनांमधील साम्य मनांत येऊन जाते. भारताची राष्ट्रनौका वादळी वाऱ्यातून बाहेर पडली आहे. आम्ही वादळातून सुखरुप बाहेर पडलो वा बाहेर पडणार आहोत पण भारताला यापुढेहि अनेक वादळांना तोंड द्यावे लागणार आहे. खरे तर आज साऱ्या जगातच अनेक वादळे घोंघावत आहेत आणि अनेक वादळे आगामी काळात येणार आहेत. आम्ही वादळांना तोंड देण्याच्या दृष्टीने पुरेसे खंबीर आहोत आणि तसा आमचा निर्धार कायम आहे हे आम्ही दाखवून दिले आहे. 'जल उषा' हे आमचे उत्तम जहाज सागरात लोटण्यात येत असतांना माझ्या मनांत आमच्या राष्ट्रनौकेच्या सागर प्रवेशाविषयी विचार येत आहे.

भारत हा एक पुरातन देश आहे आणि ते पर्वतांचे आणि सागरांचे अपत्य आहे. त्याला हिमालय आणि हिंदी महासागराने दोन्ही बाजूंनी वेढले आहे. इतर जगापासून अलग पडलेला तो देश नाही उलट जगातील इतर देशांशी निकटचे संबंध ठेवण्याच्या दृष्टीने अनुकुलता लाभलेला तो देश आहे, असा विचार माझ्या मनांत येतो. दुर्दैवाने गेल्या काही वर्षांपासून, २०० वर्षांपासून विशेषत: १५० वर्षांपासून तो पर्वताच्या आणि सागराच्या बाजूने अलग पडला होता. जगातील पाश्चिमात्य देशांशी, मुख्यत: इंग्लंडशी जे आमचे संबंध होते ते केवळ सागरी मार्गानेच ठेवण्यात आले होते. पण इतर संबंध राहिले नव्हते, तोडून टाकण्यात आले होते. मध्य आशियाचे पठार

आणि पूर्व आणि पश्चिम आशियाशी असलेले आमचे संबंध तुटले होते. पुरातन काळामध्ये आमचे सागराच्या आणि पर्वताच्या पलिकडील देशांशी निकटचे संबंध होते आणि मोठ्या प्रमाणात व्यापार चालत होता. आम्ही अलग पडलो नव्हतो हे या इतिहासावरुन दिसून येते. सारगापलिकडे जेव्हा आम्ही गेलो आणि दूरदूरच्या देशात जेव्हा आमच्या संस्कृतीचा आम्ही प्रसार केला तेव्हा आमची दृष्टी पुरोगामी होती.

त्या काळांत संकुचित मनोवृत्तीचे नामोनिशाण नव्हते, पण कालान्तराने धर्माच्या नावाखाली आपल्यामध्ये संकुचित मनोवृत्ती रुढ झाली. माणसाने माणसाला भेटण्यास बंदी करणारा हा धर्म कोणत्या प्रकारचा? धर्माच्या नावाखाली समुद्र प्रवास करणे हे पाप ठरविण्यात आले. जो धर्म माणसाला आपल्या आईकडे जाण्यास, तिच्यावर विश्वास ठेवण्यास बंदी करतो तो धर्म कोणत्या प्रकारचा म्हणावा? आपण जर आपल्या आईवर, वडिलांवर आणि भावांवर विश्वास ठेवला नाही तर आपण जगणार कसे आणि प्रगती करणार कशी? हा अशा प्रकारचा धर्म आणि असा संकुचित दृष्टिकोन आता पुरे झाला. आपल्याला आपल्या आईची भीती वाटते, तिच्याविषयी अविश्वास वाटतो मग विश्रांतीसाठी, संकटाच्या प्रसंगी आणि आश्रयासाठी कोठे जाणार? आपण आता पुन्हा समुद्राकडे, आपल्या मातेकडे जाऊ या आणि निर्भयपणे आपली जहाजे पाठवू या. भविष्यकाळात समुद्र हे आपले एक प्रतीक होऊ दे. आपण आपली भारताची राष्ट्रनौका खंबीर मनाने सागरात पाठवू या. भारताचा आपण विकास करु या, एवढेच नव्हे तर त्याचा दर्जा वाढवू या, इतर राष्ट्रांशी त्याला सहकार्य करु द्या. भविष्यकाळातील अलगपणा म्हणजे देशाचा मृत्यु आणि विनाश होय. कोणताही मोठा देश मग तो कितीही मोठा असला तरी त्याला अलगपणा परवडणार नाही कारण त्यामुळे तो जगापासून विभक्त होतो, जग प्रगती करीत असतांना तो मागे पडतो. आम्ही इतर देशांच्या अंतर्गत जीवनात हस्तक्षेप करु इच्छित नाही. आम्ही कुणावरही वर्चस्व गाजविणार नाही. आम्ही सर्वांशी मैत्री आणि सहकार्य करु इच्छितो त्याचबरोबर आम्ही कोणाचाही हस्तक्षेप सहन करणार नाही. अशा मनोभावनेतून मी हे जहाज आज सागरात लोटले आहे. ही व्यापारी अथवा नाविक साहसी वृत्ती चिरायु होवो!

आपण विशाखापट्टनम् येथे केवळ जहाजे बांधण्याचा कारखाना उभारीत नाही तर तो एक महत्वाचा नाविक तळही आहे. भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील तो एक अत्यंत महत्वाचा नाविक तळ आहे आणि त्याचा विकास व्हावा आणि आमच्या तरुणांनी, बाणेदार तरुणांनी नाविक दलांत सामील व्हावे अशी माझी इच्छा आहे. व्यक्तिशः मी जर तरुण असतो तर नाविक दलांत सामील झालो असतो. नाविक दलापेक्षा मला जर कशाचे अधिक आकर्षण वाटत असेल तर ते हवाई दलाचे. पण दुर्दैवाने, जीवनाने माझ्यावर घोर अन्याय केला आणि मला ज्याचा अतिशय राग आहे असे टेबलावरील काम मला करावे लागत आहे. ✦

''विशिष्ट कालखंडानंतर आपण परदेशातून अन्नधान्य आणणार नाही असा विचार केला पाहिजे असे मला वाटते. दोन वर्षांनंतर आपण उत्पादन केलेल्या अन्नधान्यावर जगू अथवा त्या प्रयत्नांत मरुन जाऊ.''

१७. 'औद्योगिक शांतता ही प्राथमिक गरज'

नवी दिल्ली येथे इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि इंडस्ट्रिजच्या फेडरेशनच्या २२ व्या वार्षिक अधिवेशनात केलेले भाषण, ४ मार्च १९४९

आपण काही वेळापूर्वी मला उद्देशून जे बोलतात, स्तुति केलीत, प्रेम आणि आपुलकी व्यक्त केलीत ते सर्व ऐकून मला बरे वाटले. पण असे असले तरी मी जेव्हा या अशा सभांना उपस्थित राहतो तेव्हा मला आणि माझ्या सरकारला आपण गुन्हेगाराच्या पिंजऱ्यातील कैद्याप्रमाणे वागवता असे मला वाटत आले आहे. आमच्या साऱ्या उणीवा, सारे दोष आणि गैरकारभार या साऱ्या गोष्टी आमच्यापुढे अगदी मुद्देसूदपणे मांडण्यात येतात. त्या केवळ आमच्यापुढे मांडण्यात येतात असे नाही तर काही वेळा आम्ही जरी सुधारण्याच्या पलिकडे गेलो असलो तरी कर्तव्य म्हणून त्या मांडण्यात येत आहेत असा संकेत आम्हाला देण्यात येतो. हे केवळ अशा सभांतूनच होते असे नव्हे तर विधान सभेतही असेच होते. विरोधकच नव्हे तर आमचे सहकारी सुध्दा अशी भाषणे करीत असतात. मी टीकेचे स्वागत करतो. तुम्ही आमचे दोष दाखविलेत, विशेषत: माझे दोष दाखविलेत तर त्याचे मी स्वागत करतो. काही वेळा तर मी स्वत: त्याचा मनाशी पाढा म्हणतो ही वस्तूस्थिती आहे. व्यक्तीने अथवा राष्ट्रानेही आपले कुठे चुकते आहे हे शोधून काढण्याचा प्रयत्न करणे आणि स्वत:च चुका सुधारणे केव्हाही चांगलेच आहे असे मला वाटते. टीकेला कधीही घाबरु नका, मी टीकेचे स्वागत करतो.

या टीकेमागे जर आम्ही जे करतो ते दुष्ट बुध्दीने करतो असा गर्भित अर्थ असेल तर त्या टीकेचे मी तितकेसे स्वागत करीत नाही. साहजिकच हे कुणालाही आवडत नाही. पण मला सर्व प्रकारच्या सभा संमेलनामध्ये अशा प्रकरच्या टीका आढळून येते. याला एक अपवाद आहे तो मी नंतर सांगणार आहे. उद्योगपती आणि व्यापारी आमच्यावर टीका करतात. कामगारांवर आम्ही दडपशाही करतो म्हणून कामगार नेते आमच्यावर टीका करतात. निर्वासितांसाठी आम्ही पुरेसे कार्य करीत नाही म्हणून ते टीका करतात. आम्ही प्रांतिक सरकारांना मदत करीत नाही म्हणून ती आमच्यावर टीका करतात. आम्ही हे करीत नाही आणि ते करीत नाही म्हणून आमच्यावर टीका होते. आम्ही काटकसर करीत नाही, सचिवालयातील अवास्तव

कर्मचारी वर्ग कमी करीत नाही म्हणून आमच्यावर टीका होते. नोकरकपात केल्याबद्दल आमच्यावर टीका होते. आमच्या परराष्ट्रीय धोरणावर आणि अंतर्गत धोरणांवरही टीका होते. नियंत्रणे बसवली तरी टीका होते. नियंत्रणे काढली तरी टीका होते. ही सारी निरोगीपणाची लक्षणे आहेत असे मी मानतो. एका प्रकारच्या सभांमधून माझ्यावर टीका होत नाही असे मी सांगितले होते. या देशातील सामान्य लोकांच्या सभांतून माझ्यावर टीका होत नाही. ते माझ्यावर टीका करीत नाहीत आणि याचा आपण क्षणभर विचार करावा असे मला वाटते.

आज सरकार या नात्याने आम्ही अस्तित्वात आहोत कारण या लोकांचा आमच्यावर विश्वास आहे. भारतातील लोकांचा, सामान्य जनतेचा आमच्यावर विश्वास नाही अशी जर मला शंका आली तर मी काहीही करीन पण या स्थानावर राहणार नाही. सामान्य जनतेच्या या आपुलकीमुळे आम्ही हे ओझे सांभाळीत आहोत. तसेच हे ओझे हलके नाही अथवा सुखकारक नाही हे तुम्ही जाणता. पण तरीही आम्ही हे ओझे सांभाळीत आहोत कारण एका विशिष्ट अवस्थेपर्यंत हे काम करीत राहणे हे आपले कर्तव्य आहे असे आम्हाला वाटते. आमच्याहून अधिक भक्कम आणि अधिक लायक खांद्यावर आम्ही ओझे देत नाही तोपर्यंत आपण ते सांभाळावे असे आम्हाला वाटते हे याचे अंशतः कारण आहे, पण मुख्य कारण हे की विशाल बहुसंख्य भारतीय जनतेचा आमच्यावर विश्वास आहे याची आम्हाला जाणीव आहे म्हणून आम्ही हे ओझे सांभाळीत आहोत.


आता मी म्हटल्याप्रमाणे टीकाही स्वागतार्हच आहे पण आमच्यावर आमचे मित्र आणि विरोधक टीका करीत असतात तेव्हा भारताच्या समस्यांबाबत आपली नेमकी भूमिका कोणती असावी? आपण अद्याप बदलत्या परिस्थितीशी पुरेशा-प्रमाणात जमवून घेतलेले नाही असे मला वाटते. मी जेव्हा 'आपण' म्हणतो तेव्हा त्यात देशातील सर्व प्रकारच्या लोकांचा, गटांचा, उद्योगपती आणि कामगार, व्यापारी आणि माझ्यासारखे राजकारणी, कॉंग्रेसजन आणि इतर या सर्वांचा समावेश होतो. आपण आपली मते वास्तव विद्यमान जगाशी जुळवून घेतलेली नाहीत. हे करणे अतिशय बिकट असते कारण विचार जरी तरळ असले तरी मन घटनांच्या मागे रेंगाळत राहते आणि ज्या संक्रमणाच्या कालखंडातून आपण जात आहोत आणि यापुढेही जाणार आहोत त्या काळांत लोकांची मने आणि विचार घटनांच्या मागे पडतात. आपल्या पैकी बहुतेक जणांनी राजकीय विचार असोत अथवा आर्थिक विचार असोत काही वर्षापूर्वी भारत जसा होता त्यानुसार आपल्या विचारांची जडण घडण केली आहे. भारतात परिवर्तन घडून येण्यापूर्वीच्या परिस्थितीनुरुप आपण विचार करीत असतो. राजकीय कृतीच्या बाबतीतील आपला दृष्टीकोनही विशेष दूर नसलेल्या त्या भूतकाळाशी निगडीत झालेला आहे. जगात अनेक कारणांमुळे मुख्यतः गेल्या जागतिक युध्दामुळे बदल घडून

आले आहेत याची आपल्याला जाणीव होत नाही.

" अन्नधान्याविषयी "

आता अन्नधान्याविषयी एक गोष्ट सांगायची आहे. आज अन्न ही आपल्यापुढील एक मूलभूत समस्या बनली आहे. अन्न ही एक अशी बाब आहे की त्या बाबतीतील परिस्थिती हाताळण्यात आपण अयशस्वी ठरलो आहोत, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. आपल्याला ज्या सहजतेने परदेशातून धान्य मिळते त्यामुळे या समस्येला योग्यप्रकारे तोंड देण्यास प्रतिबंध होतो असे मला वाटते. काही विशिष्ट कालखंडानंतर, दोन वर्षानंतर मी यात आणखी एक दिवसही वाढविण्यास तयार नाही, आपण परदेशातून अजिबात धान्य आणावयाचे नाही असा निश्चय केला पाहिजे असे मला वाटते. दोन वर्षांनंतर आपण जेवढ्या धान्याचे उत्पादन करतो तेवढ्यावरच गुजराण केली पाहिजे. त्या प्रयत्नांत आपल्याला मरण आले तरी बेहत्तर असा आपण विचार करावा असे मला वाटते. मूलतः भारताची अन्न समस्या बिकट नाही अशी माझी खात्री पटलेली आहे. कसे कोण जाणे पण आपणच ती बिकट केली आहे. अखेर शेवटी आपला अन्न तुटवडा सहा अथवा सात टक्के आहे. खराब हंमागामुळे तो सध्या फार तर दहा टक्के असेल. ज्या योजनांपासून लाभ होण्यासाठी आपल्याला पांच, सहा, सात वर्षे लागणार आहेत त्यांचा जरी विचार केला नाही तरी पुढील दोन वर्षात अधिक अन्नधान्य पिकवून, जमिनीचे जादा क्षेत्र शेतीसाठी उपलब्ध करुन अथवा आपल्या आहाराच्या संवयी बदलून हा तुटवडा आपण भरुन काढला पाहिजे. केंद्र सरकार व राज्य सरकारांनी, इतर संस्थांनीही याच उद्देशाने कार्य करावे असे मला वाटते. सध्या प्रमाणे परदेशातून येणाऱ्या अन्नधान्यावर अवलंबून राहून आपल्या अडचणी अधिक वाढविणे योग्य नाही असे मला वाटते.

✦



''काश्मिर अग्नी दिव्यातून पार पडले''

१८. 'कश्मिर संस्थानचे विलीनीकरण'

घटना परिषदेतील निवेदन, २५ नोव्हेंबर १९४७.

कश्मिरमध्ये आम्हांला आमच्या फौजांच्या सहाय्याने हस्तक्षेप का करावा लागला त्या घटनाक्रमाविषयी व त्या संस्थानात उद्भवलेल्या गंभीर समस्येविषयी आमची काय भूमिका आहे हे या सभागृहाला विशद करुन सांगण्याची संधी मला आज लाभली आहे या बद्दल मला आनंद होतो.

यावर्षी १५ ऑगस्ट रोजी ब्रिटीश राजवट संपल्यानंतर कश्मिर संस्थान कोणत्याच राष्ट्रात सामील झालेले नव्हते हे या सभागृहाला ठाऊक आहे. हे संस्थान कोणता निर्णय घेते या बाबतीत आम्हाला अत्यंत उत्कंठा होती. कश्मिरच्या भौगोलिक स्थानामुळे म्हणजे त्याच्या सीमा सोविएत संघराज्य, चीन आणि अफगाणीस्तान यांना लागून असल्यामुळे हे संस्थान भारताच्या सुरक्षिततेशी आणि आंतरराष्ट्रीय संबंधांशी अत्यंत निगडीत असलेले संस्थान आहे. आर्थिक दृष्ट्याही कश्मिरचा भारताशी घनिष्ट संबंध आहे. मध्य आशियातून भारताकडे जाणारे दळणवळणाचे मार्गही कश्मिर मधूनच जात आहेत.

असे असले तरी आम्ही या संस्थानावर भारतात सामील होण्यासाठी किंचितही दबाव टाकला नव्हता. कारण त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे याची आम्हांला जाणीव होती. आम्हाला केवळ उच्च पातळीवरील विलीनीकरण नको होते तर तेथील जनतेच्या इच्छेनुसार झालेले साहचर्य हवे होते. खरे तर आम्ही कोणताही निर्णय घाईगर्दीने घेण्यास उत्तेजन दिले नाही. जैसे थे करार करण्याच्या बाबतीतही कश्मिरने १५ ऑगस्ट नंतर लवकरच पाकिस्तानशी जैसे थे करार केल्यानंतरही आम्ही घाईगर्दीने कोणतीही पावले टाकली नव्हती.

कश्मिरला, तेथील लोकांना अत्यंत आवश्यकता असलेल्या अन्नधान्य, मीठ, साखर आणि पेट्रोल या वस्तूंचा पुरवठा करुन पाकिस्तानचे अधिकारी त्यांच्यावर गंभीर स्वरुपाचे दडपण आणत आहेत असे आम्हांला नंतर कळते. अशा प्रकारे काश्मिरची गळचेपी करुन त्याला पाकिस्तानमध्ये सामील करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आला होता. हा दबाव गंभीर स्वरुपाचा होता कारण वाहतुकीतील अडथळ्यांमुळे कश्मिरला भारताकडून हे आवश्यक पदार्थ मिळणे अवघड होते.

वायव्य सरहद्द प्रदेशातील टोळीवाल्यांना जमा करुन कश्मिरच्या सीमाभागात पाठविण्यांत येत आहे असे आम्हाला सप्टेंबरमध्ये कळले. ऑक्टोबरच्या सुरवातीला

परिस्थिती अधिकच चिघळत गेली. शेजारच्या पश्चिम पंजाबच्या प्रदेशातून जम्मू प्रदेशात सशस्त्र टोळ्या घुसल्या, त्यांनी स्थानिक जनतेवर अनन्वित अत्याचार केले, खेड्यांना आणि गावांना त्यांनी आगी लावल्या आणि अनेक लोकांना ठार मारले. निर्वासितांचे लोंढे जम्मूमध्ये जमा होऊ लागले.

सीमेच्या जम्मूच्या बाजूकडून तेथील हिंदू आणि रजपूत रहिवाश्यांनी या घटनांचा बदला घेतला. त्यांनी मुसलमानांना आपल्या गावांहून हाकलून दिले. सीमेवरील या संघर्षात उभय बाजूंनी अनेक गांवे नष्ट केली, जाळून टाकली.

पश्चिम पंजाबमधून जम्मूमध्ये आलेल्या हल्लेखोरांची संख्या वाढत गेली आणि ते सर्व प्रदेशभर पसरले. या हल्लेखोरांना अनेक मोक्याच्या ठाण्यांवर प्रतिकार करणारी कश्मिर संस्थानची फौज छीन्नविछीन्न झाली आणि कालान्तराने ती विसर्जित झाली. हे हल्लेखोर अधिक संघटित होते, त्यांना प्रशिक्षित अधिकारी आणि आधुनिक सशास्त्रे मिळालेली होती. त्यांना जम्मू प्रांतातील बराच विशेषतः पूंचभागातील प्रदेश ताब्यात घेण्याबाबत यश मिळाले. पूंच, मीरपूर, कोटली आणि इतर कांही भाग प्रतिकार करुन टिकून राहिले होते.

काश्मिरच्या जनसंघटनेचे नेते काश्मिर नॅशनल कॉंग्रेसचे अध्यक्ष शेख महंमद अब्दुल्ला यांची कालखंडात मुक्तता करण्यांत आली आणि आम्ही त्यांच्याशी आणि कश्मिरच्या महाराजांच्या प्रतिनिधींशी तेथील परिस्थितीबाबत विचार विनिमय केला. आम्ही कश्मिरच्या विलीनीकरणाचे स्वागतच करु पण आम्हांला घाईगर्दीने केलेले अथवा जबरदस्तीचे विलीनीकरण नको आहे. यापेक्षा जनतेने निर्णय घेईपर्यंत थांबायला आम्ही तयार आहोत, असे आम्ही त्यांना स्पष्टपणे सांगितले.

२४ ऑक्टोबर रोजी सरहद्दीवरील टोळीवाले आणि माजी सैनिकांच्या मोठ्या सशस्त्र जमावांनी मुझफराबादच्या सीमा ओलांडून ते श्रीनगरकडे कूच करीत आहेत असे आम्हाला कळले. या हल्लेखोरांनी पाकिस्तानी प्रदेश पार केला आणि त्यांच्यापाशी ब्रेनगन्स, मशिनगन्स, मॉर्टर्स आणि फ्लेमथ्रोअर्स होते आणि वाहनेही होती. हे हल्लेखोर काश्मिर खोऱ्यात श्रीनगरकडे वेगाने येत होते, वाटेत ते सर्वत्र जाळपोळ, लुटालूट आणि विध्वंस करीत होते. २५ आणि २६ ऑक्टोबर रोजी आम्ही आमच्या संरक्षण विषयक समितीत या परिस्थितीविषयी गंभीरपणे चर्चा केली. २६ ऑक्टोबर रोजी परिस्थिती अशी होती की, हल्लेखोर श्रीनगरवर चाल करुन येत होते, आणि वाटेत त्यांना थोपवू शकेल अशी लष्करी तुकडी उपलब्ध नव्हती. कश्मिर संस्थानच्या फौजांनी त्यांना उटीजवळ दोन दिवस थोपवून धरले. या सैनिकांच्या तुकडीच्या शूर सेनापतीने प्राणाचे मोल देऊन हा पराक्रम केला. हे दोन दिवस अत्यंत मोलाचे ठरले.

कश्मिरचे महाराज आणि शेख अब्दुला यांच्या वतीने या परिस्थितीत कश्मिर भारतीय संघराज्यात सामील करुन घ्यावे आणि भारताच्या फौजांनी हस्तक्षेप करावा

अशी विनंती करण्यात आली. या बाबतीत ताबडतोब निर्णय घेणे आवश्यक होते आणि जर आम्ही हा निर्णय २४ तासानंतर घेतला असता तर श्रीनगर शत्रूच्या हाती पडले असते आणि मुझफराबाद, बारामुल्ला आणि इतर शहरांसारखीच त्याची अवस्था झाली असती. कोणत्याही परिस्थितीत पाशवी आणि बेजबाबदार हल्लेखोरांच्या हातून कश्मिरचा नाश होणे आपल्याला मानवणार नाही हे स्पष्टच आहे. असे करणे म्हणजे अत्यंत हिणकस अशा भयानक आणि धर्मवेड्या शक्तींपुढे माघार घेण्यासारखेच होते आणि त्याचा भारतभर परिणाम झाला असता. या अवस्थेत हस्तक्षेप करणे सोपे नव्हते आणि त्यांत फार मोठा धोका होता, तरीही आम्ही हा धोका पत्करण्याचे आणि हस्तक्षेप करण्याचे ठरविले कारण दुसऱ्या कोणत्याही मार्गाने कश्मिरचा नाश झाला असता आणि त्यामुळे भारताला अधिक धोका होता.

पण हे विलीनीकरण स्वीकारतांना आम्ही कश्मिरच्या महाराजांना भविष्यकाळांत त्यांचे सरकार लोकेच्छेनुसार चालले पाहिजे आणि शेख अब्दुल्ला यांच्यावर म्हैसूर येथे स्वीकारलेल्या नमुन्यानुसार अंतरिम सरकार बनविण्याची कामगिरी सोपविली पाहिजे हे स्पष्टपण बजावले होते. आमच्या मते शेख अब्दुल्ला यांना कश्मिरमधील बहुसंख्य जनतेचा, मुसलमान, हिंदू आणि शीख जनतेचा पाठिंबा आहे. कश्मिरमधील शांतता आणि कायदाविषयक परिस्थिती सुधारली आणि त्या भूमीवरुन आक्रमकांना हुसकावून लावल्यानंतर या संस्थानाच्या विलीनीकरणाचा प्रश्न जनतेच्या संमतीने सोडविण्यात यावा असेही आम्ही स्पष्ट केले आहे.

जम्मूजवळ नोव्हेंबर महिन्यात ज्या काही घटना घडल्या त्याबद्दल मला अतिशय खेद होतो.

काही मुसलमान निर्वासितांना जम्मूपासून दूर नेतांना त्यांच्यावर बिगर मुसलमान निर्वासितांनी आणि इतरांनी हल्ले चढविले आणि तेथे अनेक लोक ठार करण्यात आले. त्यांना घेऊन जाणाऱ्या लष्करानेही योग्य ती कामगिरी केली नाही. तेथे आमचे लष्कर नव्हते आणि त्याचा या घटनेशी काहीच संबंध नाही हे मी या ठिकाणी सांगू इच्छीतो. आम्ही आमच्या फौजांना जनतेचे संरक्षण करा, निःपक्षपाती वर्तन करा आणि स्थानिक जनतेशी स्नेहभावाने वागा असे निक्षून आदेश दिले आहेत. त्यांनी या आदेशांचे पालन केले आहे. हे सांगतांना मला आनंद होत आहे.

पाकिस्तान सरकारने कश्मिरमधील आमच्या कृतीबद्दल जोरदार निषेध व्यक्त केला. निषेध व्यक्त करतांना त्यांनी कोणत्याही सरकारला शोभणार नाही अशी भाषा वापरली आहे. आणि आमच्यावर खोटेपणाचा आणि कटकारस्थान करण्याचा आरोप केला आहे. भारत सरकारने कश्मिरबाबत जी कृती केली ती अत्यंत सरळ आणि उघड आहे याबद्दल मला खात्री आहे. आणि मी तिचे जगापुढे केव्हाही समर्थन करु शकेन. आम्ही खरोखरच याबाबतीत अत्यंत सावधगिरी बाळगली आहे. क्षणिक भावनेच्या

भरात कोणतीही चूक होत नाही ना अशी आम्ही खबरदारी घेतली आहे. या सर्व प्रकरणात आमचे लष्कर अत्यंत उत्तम प्रकारे वागले आणि त्याने आपली उज्ज्वल परंपरा राखली आहे.

पाकिस्तान सरकारच्या बाबतीत मात्र मी असे म्हणू शकत नाही. पूर्व पंजाब आणि कश्मिरमध्ये मुसलमानांची मोठ्या प्रमाणावर हत्या करण्यांत आल्यामुळे टोळीवाल्यांनी उत्स्फूर्तपणे कश्मिरवर आक्रमण केले अशी त्यांची भूमिका आहे. त्यांचे हे म्हणणे संपूर्णपणे खोटे आहे. जम्मू प्रांतात मुसलमानांना ठार करण्यांत आले आणि त्यांची हकालपट्टी करण्यात आली या बद्दल मला अत्यंत दु:ख होते. पण याचा आमच्या सरकारशी आणि लष्कराशी काहीच संबंध नव्हता. पण गेल्या काही महिन्यांत पंजाब आणि जम्मूमध्ये एकमेकांना ठार मारण्याच्या या दु:खद प्रकारांवर या घटनेचा मोठाच परिणाम झाला होता. जम्मू प्रांतावर आणि खुद्द कश्मिरवर हल्लेखोरांनी आक्रमण करण्याच्या या साऱ्या प्रकाराची योजना पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांनी जाणून बुजून तयार केली होती असे दर्शविणारे भक्कम पुरावे आमच्यापाशी आहेत. त्यांनी या टोळ्यांना आणि माजी सैनिकांना जमा करण्यास मदत केली. त्यांना शस्त्रास्त्रांचा पुरवठा केला आणि त्यांना वाहनांचा आणि वाहनांना पेट्रोलचा पुरवठा केला. त्यांना अधिकारीही पुरविले, त्यांचे कार्य चालूच आहे. खरे तर त्यांचे उच्चपदस्थ अधिकारी आपण असे केले हे जाहिरही करीत आहेत. पाकिस्तानच्या सत्ताधाऱ्यांची सदिच्छा, संमत्ती आणि सक्रिय फाटिंब्याखेरीज प्रचंड शस्त्र सज्ज टोळ्या पाकीस्तान पार करुन कश्मिरमध्ये घुसू शकल्या नसत्या हे उघड आहे. बळाच्या जोरावर हे संस्थान काबीज करुन त्याचे पाकिस्तानशी विलीनीकरण जाहीर करणे या उद्देशाने पाकिस्तानच्या सत्ताधाऱ्यांनी या हल्ल्याची योजना काळजीपूर्वक आखली होती आणि संघटित केली होती असा निष्कर्ष काढण्याखेरीज दुसरा मार्गच रहात नाही. पाकिस्तानचे हे चढाईखोरपणाचे कृत्य केवळ कश्मिर विरुध्द नव्हते तर भारतविरुध्द होते. त्या सरकारची भूमिका समजून घेण्यासाठी पाकिस्तान सरकारच्या आणि मुस्लीम लीगच्या निम अधिकृत वृत्तपत्रांवर नजर टाकली तरी पुरेसे आहे. आम्ही ही योजना यशस्वी होऊ दिली असती तर कश्मिरच्या जनतेचा घात झाला असता आणि भारताबाबतच्या आमच्या कर्तव्यात आम्ही कसर केली असे झाले असते. साऱ्या भारताच्या जातीय आणि आर्थिक परिस्थितीवर त्याचे विपरित परिणाम झाले असते. भारतीय फौजा आणि या हल्लेखोरांच्या टोळ्या एकाच वेळी काढून घेण्यात याव्यात असे पाकिस्तानच्या सरकारने सुचविले आहे. ही सूचना चमत्कारिकच आहे. कारण पाकिस्तानच्या सरकारच्या आदेशानुसार हल्लेखोरांनी कश्मिरवर हल्ला चढविला असाच याचा अर्थ होतो. अनेक लोकांना ठार मारणाऱ्या आणि कश्मिरचा नाश करु पाहणाऱ्या गुंडपुंडांना आम्ही मानाने वागवू शकत नाही. पाकिस्तानचे सरकार ज्यांच्या पाठीशी आहे ते

सरकार नव्हे. आम्ही कश्मिरच्या जनतेचे संरक्षण करण्यासाठी कश्मिरमध्ये गेलो आणि हे आमचे कर्तव्य पार पडले की, आमच्या फौजा तेथे राहण्याची गरज नाही. आम्ही त्या काढून घेऊ. तो धोका टळेपर्यंत आम्ही कश्मिरच्या जनतेला वाऱ्यावर सोडून शकत नाही. पाकिस्तान सरकार जर प्रामाणिक असेल तर त्याने या हल्लेखोरांना आपल्या राज्यात प्रवेश करु देऊ नये. तेथे शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यास मदत करावी. त्यानंतर कश्मिरच्या जनतेने निर्णय करावा आणि आम्ही त्याला मान्यता देऊ. पण हा सशस्त्र संघर्ष चालू राहिला तर जनतेला शांततामय मार्गाने निर्णय घेण्याची संधी मिळणार नाही.

आमचा प्रामाणिकपणा सिध्द करण्यासाठी आम्ही असे सुचवितो की, जनतेला जेव्हा त्यांचे भवितव्य ठरविण्याची संधी देण्यात येईल तेव्हा ते कार्य युनोसारख्या नि:पक्षपाती संघटनेच्या देखरेखी खाली करण्यात यावे.

कश्मिरचे भवितव्य हिंसाचाराद्वारे आणि उघड उघड जबरदस्तीने ठरविण्यात यावे की जनतेच्या इच्छेद्वारे ठरविण्यात यावे ही खरी कश्मिरची समस्या आहे. पाकिस्तानने प्रोत्साहन दिलेले हल्लेखोर कश्मिरी बहुसख्यांक जनतेने उघडपणे व्यक्त केलेल्या इच्छेविरुध्द तलवारीच्या जोरावर त्याचे पाकिस्तानशी विलीनीकरण घडवून आणू पहात आहेत. राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याची ही पध्दती आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. पाकिस्तान आर्थिक आणि सामाजिक पुन:उभारणीच्या तातडीच्या कामाकडे लक्ष न देता अशा पध्दतींना संमत्ती देत आहे ही एक शोकांतिका आहे. कश्मिर अग्निदिव्यातून पार पडले आहे आणि गेल्या काही आठवड्यांत कश्मिरच्या जनतेने ज्या हालअपेष्टा सहन केल्या त्याबद्दल त्यांना मी सहानुभूती व्यक्त केली तर या सभागृहाला निश्चितच आवडेल अशी मला खात्री वाटते. निसर्गाने एवढे सौंदर्य बहाल केलेल्या या सुंदर भूमीवर खून, जाळपोळ, लूटालूट आणि स्त्रियांवर बलात्कार आणि बालकांवर अत्याचार करणाऱ्या लोकांनी गेल्या काही आठवड्यात धूमाकूळ घातला आहे. कश्मिरमधील लोकांनी अत्यंत जीवनावश्यक वस्तूंची टंचाई सहन केली आहे. शेख अब्दुल्ला यांच्या शौर्यशाली नेतृत्वाखाली ते संकटकाली एकजूटीने राहिले आणि त्यांनी साऱ्या भारताला जातील ऐक्यामुळे काय घडून येऊ शकते हे दाखवून दिले. भविष्य काळात काय व्हायचे असेल ते होईल पण कश्मिरच्या इतिहासातील हे प्रकरण चिंतनीय ठरणार आहे आणि आम्ही या शूर लोकांना त्यांच्या बिकट परिस्थितीत साहाय्यक ठरलो याबद्दल आम्हांला पश्चाताप करण्याची वेळ येणार नाही. भारत आणि कश्मिर यांचे संबंध पुरातन काळापासून निगडीत झालेले आहेत. गेल्या कांही आठवड्यांमध्ये या संबंधात एक नवा दुवा निर्माण झाला आहे आणि तो दुवा कोणीही तोडू शकणार नाही.

✦

''इतर देश जोपर्यंत कटकटी निर्माण करीत नाहीत तोपर्यंत सर्वांशीच निकट मैत्रीचे संबंध ठेवण्याचा आमचा विचार आहे.''

१९. 'भारताचा जागतिक घडामोडींमध्ये प्रवेश.'

घटना परिषदेतील भाषण, ४ डिसेंबर, १९४७

सभागृहातील आपली भाषणे पुस्तकी स्वरुपाची होती असे मी म्हटले तर मला माफ करा. या भाषणांत विद्यमान जगाशी मुलभूत संबंध असलेल्या प्रश्नांचा, युध्द आणि शांततेशी निगडित असलेल्या प्रश्नांचा उहापोह करण्यात आला नव्हता. पण सभागृहाला जेव्हा युध्द अथवा शांततेशी संबंधित असलेल्या प्रश्नांचा विचार करावा लागतो आणि निर्णय घ्यावा लागतो तेव्हा आपल्याला केवळ ध्येयवादी तत्वांचा आश्रय घेऊन चालत नाही.

आज परराष्ट्रीय घडामोडी अत्यंत वास्तववादी झाल्या आहेत. एका चुकीच्या पावलाने, एका चुकीच्या शब्दप्रयोगामुळे अनर्थ घडू शकतात. आपल्या राजदूताला प्रथम आपले तोंड बंद ठेवावे लागते, त्याने सार्वजनिक ठिकाणी अथवा खाजगी रित्याही काही बोलता कामा नये हा पहिला दंडक आहे. आमच्या गत जीवनात आम्ही मौन बाळगण्यास शिकलेलो नाही. 'पण आपण ही संवय आता लावून घ्यायला हवी. खाजगीतही मौन बाळगले पाहिजे नाही तर आपल्या बोलण्यामुळे राष्ट्रीय उद्दिष्टाला धोका पोचण्याचा अथवा वाईटपणा येण्याचा संभव असतो.

या पार्श्वभूमीवर आपण आंतरराष्ट्रीय संबंधांचा विचार केला पाहिजे असे मला वाटते. एकमेकांशी सतत भांडणाऱ्या आणि खोडसाळपणा करणाऱ्या सोविएत संघराज्यातील आणि अमेरिकेतील काही मुत्सद्यांविषयी अथवा दूर कोपऱ्यातील ब्रिटीश साम्राज्यशाहीविषयी बोलणे म्हणजेच परराष्ट्रीय घडामोडी ही आपली कल्पना आपण सोडून दिली पाहिजे. आपण ब्रिटीश साम्राज्यशाहीविषयी इतके बोलतो की तसे बोलण्याची आपल्याला संवयच जडली आहे. कोणत्याही विषयाची आर्थिक, राजकीय आणि इतर सर्व अंगे अवगत करुन घेणे, तो समजून घेणे याला सर्वांत अधिक महत्व आहे. तुम्ही जे काही परराष्ट्रीय धोरण आखाल त्या बाबतीत आपल्या देशाच्या दृष्टीने सर्वांत अधिक लाभदायक काय हे शोधून काढणे ही एक कला आहे. आपण शांतता आणि स्वातंत्र्याविषयी बोलतो आणि त्यांच्याविषयी आपल्याला खरोखरीच तळमळ वाटते. पण अखेर शेवटी सरकार देशाच्या भल्यासाठी कार्य करीत असते, ते शासन चालविते आणि जी गोष्ट निकटच्या काळात अथवा दूरगामी दृष्टीकोनातून देशाला उघड उघड अहितकारक आहे ते सरकार कधीच करणार नाही.

म्हणून देश कोणताही असो, साम्राज्यवादी असो, समाजवादी असो अथवा कम्युनिस्ट असो, त्या देशाचा परराष्ट्रमंत्री प्रथमतः आपल्या देशाच्या हितसंबंधांचाच विचार करतो. पण यातही फरक आहे. काही लोक इतर परिणामांचा विचार न करता केवळ आपल्या देशाचाच विचार करतात. अदूर दृष्टीने विचार करतात. दुसरे कोणी दूरदृष्टीने इतर देशांचे हितसंबंधही आपल्या देशाच्या हितसंबंधांइतकेच महत्वाचे आहेत असा विचार करतात. शांततेच्या हितसंबंधाइतकेच महत्वाचे आहेत असा विचार करतात. शांततेच्या हितसंबंधांना सर्वांत अधिक महत्व आहे कारण युध्द पेटले तर सर्वांनाच हालअपेष्टा भोगाव्या लागतील. म्हणून दूर दृष्टीने विचार केला तर स्वार्थासाठीही इतर देशांशी सहकार्य करणे इतर देशाविषयी सद्‌भाव बाळगणे आवश्यक आहे. खरोखरच स्वार्थासाठीही याच धोरणाची गरज आहे.

आपण जर संकुचित राष्ट्रवादी धोरण स्वीकारले तर जातीयवादी घोषणांनी जसा समाज उत्तेजित होतो तसा तो क्षणिक उत्तेजित होईल पण ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दृष्ट्या चुकीचे ठरते कारण त्यामुळे तुमची अंतिम उद्दिष्टांवरून नजर ढळते आणि ते तुम्हालाही घातक ठरते. म्हणून जागतिक सहकार्याच्या आणि जागतिक शांततेच्या अनुषंगाने, जागतिक शांतता टिकविण्याच्या दृष्टीनेच आम्ही भारताच्या हितसंबंधाचा विचार करण्याचे ठरविले आहे.

आम्ही इतर देशांबरोबर घनिष्ट मैत्रीचे संबंध ठेवण्याचे ठरविले आहे, त्यांनी काही कटकटी निर्माण केल्या तर गोष्ट निराळी. आम्ही अमेरिकेशी मैत्री ठेवू. आम्ही अमेरिकेशी सहकार्य करु इच्छितो आणि सोविएत संघराज्याशीही संपूर्ण सहकार्य करु इच्छितो. अमेरिकेचा एक प्रमुख प्रतिनिधी काही काळ आपल्या देशात आला होता हे सभागृहाला ठाऊक आहे. एक दोन आठवड्यात नवी दिल्ली येथे सोविएत वकिलातीचे उद्‌घाटन होणार आहे आणि सोविएत संघराज्याचा महत्वाचा प्रतिनिधी भारतात येणार आहे.

परदेशांतील भारतीय

परदेशात गेलेल्या भारतीय बांधवांचा इतिहास रोमांचकारक आहे. त्यातील काहीजण तर अत्यंत दयनिय परिस्थितीत स्वदेश सोडून गेले आहेत. ते परदेशात कसे गेले? ते स्वतंत्र देशाचे नागरिक नव्हते. अत्यंत बिकट परिस्थितीत त्यांना काम करावे लागत होते. तरी ते जेथे गेले तेथे त्यांनी आपले भवितव्य उत्तम प्रकारे घडविले. त्यांनी स्वतःसाठी आणि ज्या देशाचा त्यांनी स्वीकार केला त्या देशासाठी कठोर परिश्रम केले. त्यांनी स्वतःचेही कल्याण करुन घेतले आणि त्या देशालाही फायदा करुन दिला.

ही रोमांचकारक कथा आहे आणि भारताला अभिमान वाटावा अशी ती घटना आहे. मी तर तसे म्हणेन की अत्यंत विपन्नावस्थेत कंत्राटी मजूर म्हणून परदेशात गेलेल्या या भारतीयांनी परिश्रम करुन प्रगती करुन घेतली आहे. भारत हा बाकी

काहीही असले तरी अमर्याद सामर्थ्य असलेला देश आहे आणि त्याने खूपच प्रसार केला हे खरेच आहे. प्रचंड सामर्थ्य आणि लोकसंख्या असलेल्या चीन प्रमाणेच भारताविषयीही शेजारी राष्ट्रांना जराशी धास्तीच वाटते. आपल्या संख्येच्या बळावर आणि काही वेळा आपण तेथे जे आर्थिक स्थान निर्माण करतो त्यामुळे इतरांवर मात करण्याकडे आपला कल असतो. यामुळे साहजिकच इतरांना भय वाटते. कदाचित त्यांच्यापाशी आपल्या एवढे सामर्थ्य नसावे आणि मग ते स्वत:चे रक्षण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे परदेशातील भारतीयांच्या प्रस्थापित हितसंबंधांबाबत किंवा तेथे निर्माण होऊ पाहणाऱ्या हितसंबंधांबाबत प्रश्न निर्माण होतात. असे प्रश्न उपस्थित झाले आहेत आणि अशा प्रसंगी भारतीयांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याचा आमचा हेतू असणार हे उघडच आहे. पण त्याबरोबर आम्ही त्या देशाच्या हितसंबंधांवर निखारा ठेवून भारतीयांच्या हितसंबंधाचे संरक्षण करु शकत नाही. या बाबतीत अडचण आहे. असे असले तरी आम्ही सर्व न्याय्य हितसंबंधांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करु याबद्दल काहीच शंका नाही.



"आपण दीन आणि दुबळ्या देशाचे नागरिक नाही आणि आपण घाबरून जाणे मूर्खपणाचे आहे."

२०. 'राष्ट्रगटांपासून असंलग्नता'

घटना परिषदेतील भाषण, ८ मार्च १९४८

आता मी हा गट आणि तो गट अशा भाषेत बोलत नाही. जगाच्या प्रांगणामध्ये जे गट निर्माण झाले आहेत त्याहून अगदी स्वतंत्र राहून मी बोलत आहे. आपण आपले धोरण सर्वसाधारणपणे एका विशिष्ट मर्यादेतच अनुसरले पाहिजे. कारण आपण ते संपूर्णपणे अनुसरु शकत नाही, नाहीतर आपल्याला त्या धोरणाचा त्याग करावा लागेल. आपण अनुसरलेल्या धोरणाचा म्हणजेच दडपशाहीला बळी पडलेल्या राष्ट्रांच्या बाबतीत काही विशिष्ट आदर्शाच्या बाजून उभे राहण्याच्या धोरणाचा त्याग करुन आपण या अथवा त्या बड्या राष्ट्राच्या गटाशी संलग्न होणे हिताचे नाही. त्यांच्या ताटातील काही उष्टी शीते आपल्याला मिळतील या आशेने त्यांच्या छावणीत दाखल होणे याहून अधिकच घातक आहे असे मला वाटते. ध्येयवादी आणि उच्च नैतिकतेच्याच नव्हे तर संधीसाधूपणाच्या आणि संकुचित राष्ट्रवादाच्या दृष्टिकोनातूनही ते तितकेच घातक आहे.

राष्ट्रीय हितसंबंधांच्या अत्यंत संकुचित दृष्टिकोनातूनही हे धोरण अत्यंत गर्हणीय आणि घातक आहे असे मला वाटते.

युरोपातील काही छोट्या राष्ट्रांना अथवा आशियातील काही छोट्या राष्ट्रांना परिस्थितीमुळे काही बड्या राष्ट्रांपुढे नमावे लागते आणि त्यांचे मांडलीक व्हावे लागले तर ते मला समजू शकते कारण त्यांचा इलाजच नसतो. त्यांना विरोध करणारे राष्ट्र एवढे मोठे असते की त्यांना दुसरीकडे कोठे वळताच येत नाही. पण भारताची स्थिती अशी आहे असे मला वाटत नाही.

आपण एखाद्या दीन आणि दुबळ्या राष्ट्राचे नागरिक नाही आणि आपण लष्करी दृष्टीनेही सर्वांत बलाढ्य राष्ट्राला घाबरणे मूर्खपणाचे आहे, असे मला वाटते. एखादे बडे राष्ट्र लष्करी दृष्ट्या आपल्या विरोधात गेले तर आपल्यावर कोणती परिस्थिती ओढवेल या बाबतीत मी भ्रमांत नाही. त्यामुळे आपले नुकसान होईल यात मला शंका वाटत नाही, पण अखेरशेवटी आम्ही राष्ट्रीय आंदोलनाच्या रुपाने जगातील सर्वांत बलाढ्य राष्ट्राशी मुकाबला केला होता. आम्ही त्याला विशिष्ट पध्दतीने विरोध केला व त्या मार्गाने बरेच काही यशही संपादन केले. आमच्यावर आलेल्या वाईटात वाईट प्रसंगी, बड्या राष्ट्राचा आम्ही लष्करी दृष्ट्या मुकाबला करु शकलो नाही तरी

त्यांच्यापुढे शरणागती पत्करुन आमचे सारे आदर्श गमावण्यापेक्षा आमच्या पध्दतीने त्यांच्याशी मुकाबला करणे अधिक चांगले याबद्दल मला शंका नाही.

म्हणून आपण या अथवा त्या गटाच्या लष्करी सामर्थ्यांला घाबरण्याचे कारण नाही. मी घाबरत नाही आणि या देशाच्या वतीने मी जगाला सांगू इच्छितो की आम्ही या किंवा त्या राष्ट्राच्या लष्करी सामर्थ्यांला घाबरत नाही आणि आमचे धोरण निष्क्रियतेचे अथवा नकारात्मक धोरण नाही.

मतस्वातंत्र्य आणि कृती स्वातंत्र्य, केवळ दीर्घ काळाच्या नव्हे तर निकटच्या भविष्यकाळाच्या दृष्टीनेही महत्वाचे ठरते असे मला वाटते. काही विशिष्ट कृतींच्या बाबतीत आपण विशिष्ट देशांशी निकटचे सहकार्य करु नये असा याचा अर्थ नाही. भारताला आर्थिक आणि लष्करी दृष्ट्या मजबूत करणे, बडे राष्ट्र बनण्यासाठी नव्हे कारण ते आपल्या कुवती पलिकडे आहे. पण इतर कोणी आपल्यावर हल्ला केला तर संरक्षण करण्याइतपत मजबूत करण्याहून अधिक महत्वाची अशी दुसरी कोणतीच गोष्ट नाही असे सरकारचे मत आहे.

आपल्याला हे करावयाचे आहे. आम्हाला इतर देशांकडून मदत हवी आणि आम्हाला ती मोठ्या प्रमाणात मिळणार आहे. आम्हाला कोणतीही मदत कोणी नाकारली आहे असे मला आढळून आलेले नाही. आर्थिक साहाय्य अथवा राजकीय साहाय्य स्विकारतांना आपली सर्व अंडी एकाच टोपलीत ठेवणे, एकाच ठिकाणाहून मदत घेणे शहाणपणाचे ठरत नाही. त्याच बरोबर आपल्या स्वाभिमानाचा बळी देऊन मदत घेता कामा नये. असे केले तर आपल्याला कोणीच मान देणार नाही, आपल्याला किरकोळ लाभ होईल पण अखेरशेवटी हे लाभही नाकारण्यात येतील.

म्हणून निव्वळ संधीसाधूपणाच्या दृष्टीकोनातून म्हणा, हवे तर सडेतोडपणाचे, प्रामाणिक पणाचे म्हणा पण स्वतंत्र धोरण अत्यंत चांगले ठरते. विशिष्ट काळात हे धोरण कसे असेल हे मला अथवा या सभागृहाला सांगणे अवघड आहे कारण परिस्थिती दर दिवशी झपाट्याने बदलत असते. विशिष्ट परिस्थितीत दगडापेक्षा वीट मऊ या नात्याने निवड करावी लागते. आपण नेहमीच कमी हानीकारक पर्यायाची निवड केली पाहिजे.

आम्ही या देशात लोकशाहीचा पाठपुरावा केला आहे. आम्ही स्वतंत्र सार्वभौम भारताचा पाठपुरावा करीत आहोत. आता लोकशाहीच्या खऱ्याखुऱ्या मूलभूत लोकशाहीच्या, ज्यात केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक लोकशाहीचाही समावेश होतो अशा संकल्पनेच्या विरुध्द जे काही आहे त्याला आम्ही विरोध करतो. इतर कोणतीही संकल्पना अथवा इतर कोणताही निराळा व्यवहार आमच्यावर लादण्याचा प्रयत्न झाला तर आम्ही त्याचा प्रतिकार करू.

एखाद्या गटात सामील होणे याचा अर्थ काय? याचा मुळांत एकच अर्थ होतो.

विशिष्ट प्रश्नांबाबत आपल्या दृष्टीकोनाचा त्याग करुन इतरांना खूष करण्यासाठी, त्यांची मर्जी संपादन करण्यासाठी इतरांच्या दृष्टीकोनाचा स्वीकार करा हाच याचा अर्थ होतो. माझ्या मते त्याचा अर्थ हाच आहे, दुसरा काहीच नाही कारण जो आपला दृष्टीकोन आहे तोच इतरांचा असेल तर आपला विचार सोडण्याचा प्रश्नच येत नाही आणि आम्ही त्या गटाबरोबर अथवा देशाबरोबर जाण्यास काहीच हरकत नाही. आपला जेव्हा त्यांच्या दृष्टिकोनाला विरोध असतो तेव्हाच प्रश्न उपस्थित होतो आणि तेव्हा आपण आपल्या दृष्टीकोनाचा त्याग करतो आणि इतरांच्या मर्जीत राहण्यासाठी त्यांच्या दृष्टीकोनाचा स्वीकार करतो.

आता आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये नव्हे, तर या सभागृहातही अनेक वेळा आपण तडजोडीसाठी स्वत:चा दृष्टीकोन सोडून देतो त्याचप्रमाणे काही महत्वाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये आमच्या मताला मुरड घालण्याची शक्यता मान्य करण्यास मी तयार आहे. ते संपूर्णपणे वैध आहे आणि बऱ्याच वेळा तसे करण्यात येते. पण असा दृष्टिकोन सरधोपटपणे स्वीकारला तर कोणत्याही देशाकडून काहीही मिळविण्यासाठी स्विकारलेला तो एक अत्यंत हिणकस दृष्टिकोन ठरतो. या सभागृहाने असा दृष्टिकोन स्वीकारण्याचे ठरविले तरी कोणताही हेतू साध्य करण्याचा तो अत्यंत हिणकस मार्ग आहे याची जाणीव ठेवावी हे मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीने जरी आपण कमकुवत असलो – कारण आपण लष्करी दृष्ट्या बडे राष्ट्र नाही आणि औद्योगिक दृष्ट्या प्रगत नाही हे उघडच आहे, असे असतांनाही जागतिक घडामोडीत भारताला आजही विशिष्ट स्थान प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. आज संयुक्त राष्ट्र संघटनेत आणि सुरक्षा मंडळात तुम्हाला जी गडबड दिसते ती आपल्या या स्थानामुळेच निर्माण झाली आहे. हे विशिष्ट स्थान नसते तर ती दिसली नसती. ही वस्तुस्थिती तुम्ही विसरता कामा नये. आपण जर युरोपातील अथवा आशियातील कुठलेतरी नगण्य छोटे राष्ट्र असतो तर विशेष फरक पडला नसता. पण आपले विशिष्ट स्थान आहे आणि ते दिवसेंदिवस अधिक बलवत्तर होत जाणार आहे. म्हणून आपण जे काही करतो त्यावर टीका टिपणी होते आणि आपले हे महत्व अनेक लोकांना डांचत राहते. हा आपल्या दृष्टिकोनाचा अथवा, या अथवा त्या राष्ट्रगटाशी संलग्न असण्याचा प्रश्न नाही. बडे राष्ट्र होण्याचे, बडी सत्ता होण्याचे सूप्त सामर्थ्य आपल्यामध्ये आहे ही वास्तुस्थिती आहे आणि त्यामुळेच आपण सामर्थ्यवान होण्यास सहाय्य होणारी कोणतीच गोष्ट काही लोकांना आवडत नाही.

✦

"नको तेवढा उपदेश करणे . . . सतत कुणाला चांगले होण्यास सांगण्याचा परिणाम चांगला होत नाही."

२१. परदेशातील प्रचार

घटना परिषदेतील भाषण, मार्च १९४८

आपण जाहीरातबाजीच्या दृष्टीने, निव्वळ प्रचारकी दृष्टीकोनातून परदेशातील प्रचार कार्याकडे पहावे असे मला वाटत नाही. आपण तसे करु शकणार नाही कारण त्यासाठी प्रचंड खर्च करावा लागेल आणि प्रचंड कर्मचारीवर्गही लागतो. पण तसे करता कामा नये असे मला वाटते याचे कारण मला तो दृष्टिकोनच अजिबात आवडत नाही हे आहे. या दृष्टिकोनातून केलेला प्रचार अपरिहार्यपणे रटाळ होत जातो, त्याचा काही काळ प्रभाव पडल्यासारखे वाटले तरी हळूहळू त्याची किंमत कमी होत जाते आणि हा विशिष्ट प्रकारचा अतिरेकी प्रचार आहे याची जनतेला जाणीव होऊ लागते. त्यापेक्षा मी येथे भारतातील किंवा परदेशातील जनतेसमोर वस्तूस्थिती सांगेन. अर्थात, ही वस्तूस्थिती मी आपल्या दृष्टिकोनातून सांगेन, या वस्तूस्थितीची पार्श्वभूमी सांगेन पण होता होईल तेवढी वस्तूस्थितीच सांगेन आणि निष्कर्ष काढण्याचे काम जनतेवर सोपवीन. जनतेसमोर वस्तूस्थिती कशी मांडण्यात येते यावर जगात बरेच काही अवलंबून असते. अंकशास्त्र जवळजवळ कोणतीही गोष्ट सिध्द करु शकते.

असे असले तरी हे प्रचाराचे काम कोठेही, विशेषत: परदेशात फसवेगिरीचे ठरते. त्याच्यावर टीका करणे सोपे असते आणि या टीकेपैकी बरीच टीका योग्य असते असं मला वाटतं. कागदावर अतिशय चांगल्या दिसणाऱ्या योजना आखणे कदाचित सोपे असेल पण त्या व्यवहारात यशस्वी ठरत नाहीत. आपण पूर्वी एकदा जेव्हा परदेशातील प्रकाशन कार्याविषयी चर्चा केली तेव्हा मी सांगितल्याप्रमाणे परदेशातील प्रकाशन कार्य परराष्ट्रीय धोरणाशी इतके निगडित झालेले असते की सर्व साधारणपणे प्रत्येक देश या कार्याची संघटना आपल्या अंतर्गत यंत्रणेद्वारे नव्हे तर परराष्ट्रीय कचेरीद्वारे करतो. आपल्या देशात अनेकविध कारणांमुळे, युध्द काळातील घटनांमुळे, कारण या कार्याचा विचार त्याच काळात करण्यात आल्यामुळे परदेशातील प्रकाशन कार्य हा आपल्या माहिती खात्याच्या कार्याचा भाग बनला आहे.

मी याबाबतीत जेवढा विचार करतो तेवढे माझ्या लक्षांत येते की, ही व्यवस्था समाधानकारक नाही. देशांतर्गत प्रकाशन कार्य आणि परदेशातील प्रकाशन कार्य यांच्यामध्ये घनिष्ठ सहकार्य असले पाहिजे हे उघडच आहे. पण परदेशातील प्रचार कार्यामध्ये परराष्ट्रीय व्यवहार खात्याने सध्यापेक्षा अधिक मोठ्या प्रमाणात भाग घेणे

अधिक योग्य ठरेल असे मला वाटते.

सध्या आपण जी पत्रके, निवेदने आणि इतर साहित्य प्रसृत करतो त्यांचा चांगलाच उपयोग होतो पण त्यासाठी आपण जेवढा पैसा खर्च करतो त्या मानाने त्याचे मोल काहीच नाही. सरकारचा मंत्री म्हणूनच नव्हे तर एक व्यक्ती, अथवा काँग्रेस संघटनेचा एक सदस्य या नात्यानेही मी हे कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या काळापासून आपण जी पत्रके, निवेदने, पुस्तिका आणि इतर साहित्य प्रसिध्द करतो ते सारे कचऱ्याच्या टोपलीत जाते असा माझा आजचा नव्हे तर पूर्वीपासूनचा ग्रह आहे. ज्या लोकांना तुमचे म्हणणे पटलेले आहे, आणि जे त्या साहित्याचा वापर करतात आणि आपल्या फायद्यासाठी ठेवून घेतात अशा लोकांव्यतिरिक्त फारच थोड्या लोकांवर त्याचा प्रभाव पडतो.

आता ग्रामीण प्रदेशात आकाशवाणीचा प्रसार करण्याच्या महत्वाच्या बाबतीत या सभागृहात दुमत होणार नाही. मला वाटते हा वेळाचा प्रश्न नाही, समजा तुम्ही या प्रसारणास दर दिवशी एका तासाऐवजी पाच तास दिलेत तर ते ठराविक वेळात हे कार्यक्रम ऐकतील एवढेच, आपण या गोष्टीचे स्तोम माजविता कामा नये. त्याचबरोबर संबंधित व्यक्तीला आपल्या कार्यक्रमापासून लाभ झालाच पाहिजे या निश्चित कल्पनेनेच आपण काम करणे योग्य होईल असे मला वाटते. हे कार्यक्रम सुधारण्याच्या प्रयत्नांबाबतीत सन्माननीय सदस्यांची प्रतिक्रिया कोणती असेल ते मला ठाऊक नाही पण व्यक्तिशः माझी या बाबतीतील प्रतिक्रिया तीव्र आणि विरोधी आहे. जर कोणी मला उपदेश करणार असेल तर मी उपदेश ऐकणार नाही. सर्वसाधारण समाजाची मानसिक प्रतिक्रिया हीच असते असे मला वाटते. नको तेवढा उपदेश करणे, तुमच्या कल्याणासाठी तुम्हाला सल्ला देण्याचा नको तेवढा प्रयत्न करणे, वारंवार तुम्हाला चांगले होण्यास सांगणे याचा परिणाम चांगला होत नाही. या समस्येकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. तुम्हाला जर शिक्षण द्यायचे असेल तर ते तुम्ही मनोरंजनाद्वारे, करमणुकीद्वारे, हलक्या फुलक्या पध्दतीने, तुम्हाला वाटले तर काही वेळा जडजंबाळ पध्दतीनेही हे काम करु शकता. तुम्ही मुलांना प्रशिक्षण देतांना जर सतत जडजंबाळ पध्दतीचा वापर केलात तर तुम्ही त्यांच्या जीवनाचा नाश कराल. तुम्ही त्यांना अधिक चांगल्या रीतीने वागविले पाहिजे. तज्ञांनी विचार करावा असा हा विषय आहे एवढीच माझी सूचना.

✦

''राष्ट्रीय घटनाक्रमात आणि जागतिक घडामोडीत भारत आता आघाडीवर आला आहे.''

२२. 'पूर्व आणि पश्चिमेचा संगम'

घटना परिषदेतील भाषण, ४ मार्च, १९४९

भारतीय संघराज्य हे एक शिशू राष्ट्र आहे. दीड वर्षाचे शिशू राष्ट्र आहे. पण भारत हा शिशू देश नाही हे लक्षांत ठेवा. भारत हा एक प्राचीन देश आहे. त्याच्या पाठीशी हजारो वर्षांचा इतिहास आहे. या इतिहासकाळात त्याने केवळ आपल्याच विशाल सीमारेषांत नव्हे, जगात आणि विशेषत: आशियात मुलभूत महत्वाची कामगिरी पार पाडली आहे. आता गेल्या एक दीड वर्षात भारत पुन्हा एकदा मानवी घटनाक्रमाच्या प्रमुख प्रवाहांत दाखल झाला आहे.

आता या गोष्टीला मोठे ऐतिहासिक महत्व आहे. मी तर म्हणेन की तो आशियाच्या इतिहासाच्या प्रमुख प्रवाहात दाखल झाला आहे. आशियाने आपल्या हजारो वर्षाच्या दीर्घ इतिहासात अत्यंत महत्वाची कामगिरी पार पाडली आहे. अर्थात भारतानेही अशीच कामगिरी पार पाडली आहे. पण गेल्या दोन एक शतकात युरोपातील आणि नंतरच्या काळात अमेरिकेतील वैज्ञानिक आणि तंत्रविषयक विकासामुळे आशियावर युरोपचे वर्चस्व प्रस्थापित झाले आणि साऱ्या जगातील त्यांच्या हालचालींवर मर्यादा पडल्या. आशिया मर्यादित आणि संकुचित झाला. या काळात भारतात आणि आशियात अनेक बदल घडून आले. पण सर्वसाधारणपणे भारत आणि आशियातील इतर देश युरोपच्या राजकीय आणि आर्थिक वर्चस्वापुढेही टिकाव धरुन राहिले. आता तो कालखंड, ते युग संपले आहे आणि भारत आता राष्ट्रीय घटनाक्रमांच्या आणि जागतिक घडामोडींच्या आघाडीवर आला आहे असे मला वाटते.

आशिया आणि युरोप यांच्यामधील संबंधांची फेररचना ही आजच्या घडीची एक प्रमुख समस्या आहे. आपण जेव्हा आशियाविषयी बोलतो तेव्हा भारताला त्याच्या विशिष्ट आकांक्षेमुळे नव्हे तर इतिहासामुळे आणि इतर अनेकविध कारणांमुळे आशियाच्या बाबतीत अपरिहार्यपणे महत्वाची कामगिरी पार पाडावयाची आहे हे लक्षांत ठेवा. आणि एवढेच नव्हे तर भारत हे विविध प्रवाहांचे आणि शक्तीचे, ज्याला ढोबळ मानाने पूर्व आणि पश्चिम म्हणता येईल यांचे एक संगम स्थान होणार आहे.

नकाशाकडे पहा, तुम्हाला जर मध्यपूर्वेशी संबंधित अशा कोणत्याही प्रश्नांचा विचार करायचा असेल तर भारत अपरिहार्यपणे त्या चित्रात येतो. नैऋत्य आशियातील कोणत्याही प्रश्नांविषयी तुम्हाला विचार करायचा झाला तर तुम्ही भारताखेरीज त्याचा

विचार करुच शकत नाही. अतिपूर्वेबाबतही तसेच आहे. मध्यपूर्वेचा आणि नैऋत्य आशियाचा कदाचित संबंध येतो. आशियातील प्रादेशिक संघटनांचा जरी तुम्ही विचार केलात तरी तुम्हाला इतर प्रदेशांशीही संपर्क ठेवावा लागतो आणि तुमच्या मनांत कोणताही प्रदेश असला तरी भारताच्या महत्वाकडे दुर्लक्ष करु शकणार नाही.


आशिया आणि युरोप यांच्या संबंधाची फेररचना हा आजचा एक महत्वाचा व महत्तम प्रश्न आहे. पूर्वीच्या काळी पाश्चिमात्य देशांच्या आर्थिक आणि राजकीय वर्चस्वामुळे त्यांनी आशियाकडे दुर्लक्ष केले होते किंवा त्याला जेवढे महत्व द्यायला हवे होते तेवढे महत्व दिले नव्हते. खरे तर आशियाची त्यांनी उपेक्षाच केली होती आणि त्याचा दुदैवी परिणाम म्हणून राजकीय मुत्सद्दीही तेथे घडत असलेल्या फेरबदलांकडे दुर्लक्ष करीत होते. या फेरबदलांची आता बरीचशी दखल घेण्यात येत आहे असे मला वाटते, पण तरीही पुरेशी नाही. संयुक्त राष्ट्रांमध्येही आशियाच्या समस्या, आशियाचा दृष्टिकोन आणि आशियाबाबतचा दृष्टिकोन यांच्याबाबत हवा तितका उत्साह दिसून येत नाही. ज्याला आशियाचा दृष्टिकोन आणि युरोपचा दृष्टिकोन म्हणता येईल त्यांच्यामधील भेद अनेक प्रकारे दिसून येतात. आज आशियाला निकडीच्या मानवी समस्यांबाबत अधिक चिंता वाटते. आशियातील प्रत्येक देशापुढे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या प्रमुख समस्या आहेत. हे सारे देश कमी जास्त प्रमाणांत अविकसित देश आहेत. आपल्याला या समस्यांबाबत चिंता आहे. सत्तेच्या राजकारणाच्या समस्यांशी आमचा प्रत्यक्ष संबंध पोचत नाही. आमच्यापैकी काहीजण मनातल्या मनात या समस्यांबाबत विचार करीत असतात तो प्रश्न निराळा!

दुसऱ्या बाजूला युरोपला, काही उध्वस्त प्रदेश सोडून या समस्यांबाबत चिंता वाटत नाही. युरोपला सत्तासंघर्षाचा आणि सत्ता हाती असल्यामुळे उद्‌भवणाऱ्या समस्यांचा वारसा लाभलेला आहे. त्यांना हातातून सत्ता जाण्याची भिती आहे, दुसऱ्या कुणाच्या हाती अधिक सत्ता जाण्याची आणि एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर हल्ला करण्याची भिती आहे. म्हणून युरोपियन दृष्टिकोन हा गतकाळातील युरोपातील संघर्षाचा वारसा आहे.

आपण आशियातील लोक नैतिक अथवा भावनिक दृष्टीने युरोपातील लोकांपेक्षा श्रेष्ठ आहोत असा माझ्या या म्हणण्याचा अर्थ नाही. काही बाबतीत तर आपण कमी आहोत अशी माझी कल्पना आहे. पण युरोपातील देशांना संघर्षाचा वारसा मिळालेला आहे. आशियातील देशांना किमान सध्यातरी कुणाला अशा प्रकारचा वारसा मिळालेला नाही. आशियातील देशांची कुठे कुठे आपल्या शेजाऱ्यांशी भांडणे असतील पण युरोपातील देशांना जसा संघर्षाचा मुलभूत वारसा मिळालेला आहे तसा त्यांना लाभलेला नाही. आशियातील देशांच्या दृष्टीने ही एक अत्यंत सोयीस्कर बाब आहे आणि आशियातील देशांनी आणि भारताने युरोपातील संघर्षामध्ये खेचले जाणे ही

अत्यंत मूर्खपणाची गोष्ट आहे. जगाची हळूहळू एक होण्याकडे प्रवृत्ती आहे, ते जसे शांततेत एक होईल तसेच ते युध्दातही एका अर्थी एक होईल हे आपण लक्षांत ठेवले पाहिजे. जेव्हा महायुध्द पेटेल तेव्हा कोणताही देश त्यापासून अलग राहील अस कोणीही म्हणून शकणार नाही. पण तरीही आपण हे संघर्ष टाळण्याच्या आणि त्यात न गुंतण्याच्या दिशेने आपले धोरण आखले पाहिजे.

✦



''भारताची सेवा करण्याच्या माझ्या दीर्घ कालावधीत माझ्यावर बऱ्याच चुका आणि प्रमाद करण्याचे आरोप करण्यात आले, पण भारताचा आणि भारतीयांचा सन्मान आणि स्वाभिमान यांना धक्का पोचेल असे काहीही करण्याचा अद्याप तरी माझ्यावर आरोप करण्यांत आलेला नाही.''

२३. 'ऐतिहासिक निर्णय'

दिल्ली आकाशवाणीवरील भाषण, १० मे १९४९

लंडन बैठकीच्या निष्कर्षाबाबतचे निवेदन आपण वाचलेच असेल. मी स्वदेशी आल्यानंतर आपल्या बहुसंख्य जनतेने या निर्णयाचे स्वागत केले असे मला दिसून आले, पण मी जे काही केले त्यावर कठोर टीका करणारेही लोक आहेत. त्यांनी माझ्या कृतीचे 'एक घोडचूक' आणि 'भारतीय जनतेच्या राष्ट्रीय भावनांवरील आघात' या शब्दात वर्णन केले आहे. भारताची सेवा करण्याच्या दीर्घ कालावधीमध्ये माझ्यावर चुका आणि प्रमाद करण्याचे आरोप करण्यात आले पण भारताचा अथवा भारतीयांचा सन्मान आणि स्वाभिमान यांना धक्का पोचेल असे काही करण्याचा आरोप अद्याप तरी माझ्यावर करण्यांत आलेला नाही. म्हणून ज्या काही व्यक्तींच्या मतांना मी महत्व देतो ह्यापैकी कोणी जर मी अत्याचार केला असे समजत असतील तर ही एक अतिशय गंभीर बाब आहे.

मी माझ्या लक्षावधी देशबांधवां समवेत गेल्या वीस आणि त्याहून अधिक वर्षात भारताच्या स्वातंत्र्याबाबत ज्या शपथा घेतल्या आहेत त्या प्रत्येक शपथेचे शब्दशः पालन केले आहे याबद्दल माझ्या मनांत किंचितही शंका नाही हे मी तुम्हाला सांगू इच्छितो. लंडनमध्ये मी केलेल्या कृतीने भारताच्या सन्मानाला आणि हितसंबंधांना धक्का तर पोचलेलाच नाही उलट त्याचा सन्मान अधिक उंचावला आहे आणि जगातील त्याचे स्थान अधिक मजबूत झाले आहे याबद्दल मला खात्री आहे.

ज्या माझ्या बहुसंख्य देशबांधवांनी या अगोदरच माझ्या या कृतीला संमती दर्शविली आहे त्यांना उद्देशून नव्हे तर ज्या थोड्या व्यक्तींनी या कृतीवर टीका केली आहे त्यांना उद्देशून मी भाषण करणार आहे. हे टीकाकार काही एका गैरसमजामुळे असे वागत आहेत, काहीतरी गुप्त कलमे असली पाहिजेत आणि काहीतरी लपविण्यात येत आहे असा चुकीचा ग्रह त्यांनी करुन घेतला असावा अशी माझी कल्पना आहे. याबाबतीत गुप्त काहीही करण्यात आलेले नाही आणि आपल्या सार्वभौमत्वावर अथवा अंतर्गत आणि परराष्ट्रीय धोरणावर मर्यादा पडतील असे आर्थिक, राजकीय अथवा लष्करी क्षेत्रातील कोणत्याही प्रकारचे बंधन आम्ही स्वीकारलेले नाही हे मी या ठिकाणी

सांगू इच्छितो. शांततेसाठी आणि सर्व देशांच्या मैत्रीसाठी कार्य करण्याचे आणि सत्ता गटांशी संलग्न होण्याचे टाळण्याचे आपले परराष्ट्रीय धोरण आहे हे मी अनेक वेळा जाहिर केले आहे. आजही आमच्या धोरणाची तीच कोनशिला आहे. परतंत्र राष्ट्रांच्या स्वातंत्र्याला आम्ही पाठिंबा देतो आणि वांशिक भेदाभेद नष्ट करण्यात यावेत अशी आमची भूमिका आहे. राष्ट्रकुलामध्ये इतर देशाबरोबर सामील झालेले सार्वभौम भारतीय प्रजासत्ताक या धोरणांचा पाठपुरावा करण्यास संपूर्णपणे स्वतंत्र राहील एवढेच नव्हे तर ते अधिक प्रमाणात आणि पूर्वीपेक्षाही अधिक प्रभावीपणे या धोरणांचा पाठपुरावा करील अशी मला खात्री वाटते.

आम्ही 'पूर्ण स्वराज्य' [संपूर्ण स्वातंत्र] हस्तगत करण्याची फार पूर्वी शपथ घेतली आहे. आम्ही ते हस्तगत केले आहे. इतर देशांशी दोस्तीचा करार केल्यामुळे राष्ट्रांचे स्वातंत्र्य नष्ट होते काय? दोस्तीचे करार सर्वसाधारणपणे उभयपक्षांना बंधनकारक असतात. सार्वभौम राष्ट्रकुलातील राष्ट्रांच्या संघात अशा प्रकारची बंधने स्वीकारण्यात आलेली नाहीत. त्याच्या लवचिकपणात आणि त्याच्या संपूर्ण स्वातंत्र्यातच या संघाचे सामर्थ्य सामावलेले आहे. कोणत्याही एका सदस्य राष्ट्राला राष्ट्रकुलातून बाहेर पडावेसे वाटले तर ते केव्हाही बाहेर पडू शकते हे सर्वांना ठाऊक आहे. राष्ट्रकुल हे कोणत्याही अर्थाने सर्वश्रेष्ठ शासन नव्हे हे आपण लक्षांत ठेवले पाहिजे. राजा हा या स्वतंत्र संघाचा प्रतीकात्मक प्रमुख असावा असे आम्ही मान्य केले आहे. पण या राष्ट्रकुलामध्ये राजाला या पदाशी निगडीत असे कोणतेच कार्य नियुक्त करण्यात आलेले नाही. भारताच्या राज्यघटनेबाबत बोलायचे तर राजाला त्यात काहीच स्थान नाही. मी साहजिकच भारताच्या हितसंबंधांकडे लक्ष दिले कारण ते माझे आद्य कर्तव्यच आहे. मी माझ्या या कर्तव्याचा नेहमीच जगाच्या कल्याणाच्या संदर्भात विचार केला आहे. आमच्या गुरुजींनी आम्हाला हेच शिकविले आणि त्यांनी आम्हाला इतरांशी मैत्रीचे आणि शांततेचे संबंध ठेवण्याचा मार्ग चोखाळण्याची आणि भारताचे स्वातंत्र्य आणि स्वाभिमान सदैव टिकवून धरण्याची शिकवण दिली. जग आज संघर्षग्रस्त आहे आणि क्षितीजावर संकटे डोकावत आहेत. माणसांच्या मनांत द्वेष आणि भीतीने घर केले आहे आणि संशयाने त्यांची नजर मंदावली आहे. म्हणून जगातील तणाव कमी करण्यासाठी टाकलेले प्रत्येक पाऊल स्वागतार्ह आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यामधील जुना वाद उभय देशांनी सन्माननीय अशा स्नेहभावनेने मिटवणे हे एक चांगले लक्षण आहे असे मला वाटते. जगामध्ये अनेक विनाशकारक शक्ती आहेत आणि आपण अधिक विनाशाच्या बाजूने आपले वजन टाकू शकतो पण जुन्या जखमा भरुन काढण्याच्या आणि सहकार्याच्या उद्दिष्टाला दुजोरा देण्याची कोणतीही संधी स्वागतार्हच ठरते.

✦

"मानवी संस्कृतीचा प्रारंभ आशियात झाला आणि मानवाने येथूनच जीवनाच्या अनंत साहसांच्या मार्गावर वाटचाल करण्यास सुरुवात केली."

२४. 'आशियाला पुनश्च स्वत्व प्राप्त झाले'

आशियायी संपर्क परिषदेतील उद्घाटनाचे भाषण, २३ मार्च १९४७

आशियातील स्त्री पुरुषांनो, आपण येथे कशासाठी आलात? आपल्या या मातृखंडातील विविध देशातून तुम्ही येथे दिल्ली या पुरातन शहरात एकत्र का आला आहात? आमच्यापैकी काही जणांनी मोठ्या धाडसाने आपल्याला या परिषदेसाठी निमंत्रण पाठविले आणि तुम्ही त्या निमंत्रणाचे हार्दिक स्वागत केले. आज केवळ आमच्या आवाहनाला प्रतिसाद देऊनच नव्हे तर त्याहूनही अधिक सखोल अशा तळमळीमुळे आपण या ठिकाणी आला आहात.

आपण एका युगाच्या अंतसीमेवर आणि नव्या ऐतिहासिक कालखंडाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. मानव समाजाच्या उपक्रमातील आणि इतिहासातील दोन कालखंडाच्या विभाजन रेषेवर उभे राहून आपण आपल्या भूतकाळाचे सिंहावलोकन करु शकतो आणि आपल्या डोळ्यांपुढे साकार होणाऱ्या भवितव्याचाही वेध घेऊ शकतो. आशियाला आज दिर्घ कालीन निद्रीस्त अवस्थेनंतर अचानक पुन्हा एकदा जागतिक घडामोडीमध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आपण जर हजारो वर्षाचा इतिहास पाहिला तर इजिप्तशी अत्यंत घनिष्ट सांस्कृतिक संबंध असलेल्या आशिया खंडाने मानव समाजाच्या उत्क्रान्तीमध्ये अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडली आहे. आशिया खंडात मानवी संस्कृतीचा प्रारंभ झाला आणि येथूनच मानवाने जीवनाच्या साहसी मार्गावर वाटचाल करण्यास सुरुवात केली. येथेच मानवाने सत्याचा सातत्याने शोध घेतला आणि मानवाचा आत्मा साऱ्या जगाला प्रकाश देणाऱ्या दिपस्तंभाप्रमाणे तेवत राहिला होता.

ज्या चैतन्यशील आशियातून सर्व दिशांकडे संस्कृतीचे ओघ वाहत गेले तो हळूहळू गतीशून्य आणि अपरिवर्तनीय बनला. नवचैतन्य घेतलेले इतर लोक आणि इतर भूखंड पुढे गेले, त्यांनी हातपाय पसरले आणि जगाचा मोठा भाग काबीज केला. हे महाखंड परस्पर विरोधी युरोपियन साम्राज्यवाद्यांचे कुरण बनले आणि युरोप हे इतिहासाचे आणि मानवी घडामोडींचे केंद्र बनले.

हे दृश्य आता बदलत आहे आणि आशियाला पुन्हा एकदा स्वत्व प्राप्त होत आहे. आपण एका प्रचंड संक्रमणावस्थेत राहत आहोत. आशियाने इतर राष्ट्रांबरोबर आपले न्याय्य स्थान घेण्याची अवस्था आज़च आपल्या डोळ्यापुढे साकार होत आहे.

आम्ही चीनच्या प्रतिनिधींचे स्वागत करतो. या महान देशाने आशियाला खूपच काही दिले आहे. आणि त्याच्या पासून आम्हाला खूप अपेक्षा आहेत. दूरवर पसरलेल्या आणि भारतावर मोठा प्रभाव पाडणाऱ्या एका थोर संस्कृतीच्या वारसदाराचे पश्चिम आशियातील इजिप्त आणि अरब देशांतील प्रतिनिधींचेही आम्ही स्वागत करतो. भारताशी ज्यांचे इतिहासाच्या प्रारंभ काळापासून संबंध आहेत त्या इराणचे प्रतिनिधी येथे आले आहेत. भारताच्या संस्कृतीचा ज्यांच्या संस्कृतीशी मिलाप झालेला आहे आणि ज्यांच्या चालू असलेल्या स्वातंत्र्य लढ्याने आम्हाला स्वातंत्र्य जिंकावे लागते देणगीच्या रुपाने ते मिळत नाही अशी आठवण करुन दिली आहे त्या इंडोनेशियाचे आणि इंडोचीनचे प्रतिनिधीही येथे आले आहेत. एका महान नेत्याच्या कर्तृत्वाने ज्या देशाला नवजीवन प्राप्त झाले आहे त्या तुर्कस्तानचे, कोरिया आणि मंगोलिया, सयामा आणि मलाया, आणि फिलीपाईन्सचे प्रतिनिधीही येथे आले आहेत. सोविएत संघराज्यातील आशियायी प्रजासत्ताकांनी आमच्या पिढीच्या कालावधीत प्रचंड प्रगती केली आहे आणि ज्यांच्यापासून आपण बरेच काही शिकू शकतो त्यांचे प्रतिनिधीही येथे आले आहेत. आमचे शेजारी, अफगाणीस्तान, तिबेट, नेपाळ, भूतान, ब्रह्मदेश, श्रीलंका, ज्यांच्याकडून आम्ही विशेष सहकार्याची आणि घनिष्ठ स्नेहसंबंधांची अपेक्षा करतो त्याचे प्रतिनिधीही येथे आले आहेत. आम्ही या सर्वांचे येथे हार्दिक स्वागत करतो. आशियाला या परिषदेत चांगलेच प्रतिनिधीत्व लाभले आहे. एक दोन देशांचे प्रतिनिधी येथे आलेले नाहीत. त्यांना प्रतिनिधी पाठविण्याची इच्छा नव्हती म्हणून नव्हे तर आपल्या नियंत्रणापलीकडील परिस्थितीमुळे ते प्रतिनिधी येथे येऊ शकले नाहीत. ऑस्ट्रेलिया आणि न्युझीलंड या देशांनी पाठविलेल्या निरीक्षकांचेही आम्ही स्वागत करतो कारण आपल्या अनेक समस्या, विशेषत: प्रशांत सागरी आणि आशियातील आग्नेय प्रदेशाबाबतच्या समस्या सामायिक स्वरुपाच्या आहेत आणि त्यांची उकल करण्यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे.

मी तुमच्याशी भूतकाळाविषयी नव्हे तर वर्तमान काळाविषयी बोलू इच्छीतो. आपण येथे आपल्या गतकाळातील इतिहासाविषयी आणि संबंधांविषयी बोलण्यासाठी आलो नाही तर भविष्य काळातील संबंध जोडण्यासाठी एकत्र आलो आहोत. ही परिषद आणि या परिषदेमागे असलेली कल्पना कोणत्याही आक्रमक स्वरुपाची अथवा कोणा एका खंडाविरुध्द वा देशाविरुध्द नाही हे मी येथे सांगणे आवश्यकच आहे का? जेव्हापासून या परिषदेची बातमी देशादेशी पसरली तेव्हापासून युरोप आणि अमेरिकेतील काही लोक हिच्याकडे संशयाने पाहू लागले आहेत. युरोप अथवा अमेरिकेविरुध्द एक प्रकारचे अखिल आशियायी आंदोलन उभे करण्यात येत आहे असा त्यांच्या मनात संशय आहे. आमच्या मनात कोणाच्याही विरुध्द काही योजना नाही. साऱ्या जगात शांततेला आणि प्रगतीला प्रोत्साहन देणे ही आमच्या मनातील

महान योजना आहे. प्रदीर्घ काळापासून आम्ही पाश्चिमात्यांच्या दरबारातील याचक होतो आता ही गोष्ट इतिहासजमा झाली पाहिजे. आता आम्ही आमच्या पायावर उभे राहू इच्छीतो आणि जे कोणी आमच्याशी सहकार्य करु इच्छीतात त्या सर्वांशी सहकार्य करु इच्छीतो. इतरांच्या हातची खेळणी बनण्याचा आमचा विचार नाही.


जागतिक इतिहासातील या अरिष्टाच्या काळात आशिया निश्चितपणे महत्वाची भूमिका पार पाडणार आहे. आशियातील देशांचा यापुढे कोणीही प्यादी म्हणून वापर करु शकणार नाही. जागतिक घडामोडीत त्यांची स्वत:ची धोरणे असणे स्वाभाविकच आहे. युरोप आणि अमेरिकेने मानवाच्या प्रगतीला मोठाच हातभार लावला आहे. आणि त्यासाठी आपण त्यांची स्तुती केली पाहिजे, त्यांना मान दिला पाहिजे आणि त्यांच्यापासून खूप काही शिकले पाहिजे. पण पाश्चिमात्य देशांनी आपल्याला असंख्य वेळा युध्दात आणि संघर्षात खेचले आणि एवढेच नव्हे एका भयंकर युध्दानंतर अल्पावधीतच आज आपल्यावर येऊन ठेपलेल्या अण्वस्त्र युगातही आगामी युध्दाची भाषा ऐकू येत आहे. या अणूयुगात आशियाने शांततेच्या रक्षणासाठी परिणामकारक रीतीने कार्य केले पाहिजे. खरे तर आशियाने आपली भूमिका पार पाडल्याखेरीज शांतता टिकणारच नाही. आज अनेक देशांत संघर्ष आहेत आणि आशियातील आपणा सर्वांपुढे आपल्या अनेक अडचणी उभ्या आहेत. असे असले तरी आशियाचा समग्र दृष्टिकोन आणि वृत्ती शांततेला पूरक आहेत आणि जागतिक घडामोडींमध्ये आशियाने प्रवेश केल्यामुळे जागतिक शांततेला जोरदार चालना मिळणार आहे.

राष्ट्रे जेव्हा स्वतंत्र असतील आणि त्याचबरोबर जेव्हा सगळीकडच्या मानव समाजाला स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि संधी उपलब्ध होईल तेव्हाच शांतता निर्माण होईल. म्हणून शांतता आणि स्वातंत्र्याचा त्यांच्या राजकीय आणि आर्थिक अंगासकट विचार करणे आवश्यक आहे. आशियातील देश अत्यंत मागासलेले आहेत आणि तेथील लोकांचे राहणीमान अत्यंत खालावलेले आहे हे आपण लक्षांत ठेवले पाहिजे. या आर्थिक समस्या आपण अत्यंत तातडीने सोडविल्या पाहिजेत नाही तर अरिष्टे आणि संकटे आपल्यावर मात करतील. म्हणून आपण सामान्य माणसाचा विचार केला पाहिजे आणि आपली राजकीय सामाजिक आणि आर्थिक रचना अशाप्रकारे निर्माण केली पाहिजे, कीं त्याला चिरडून टाकणारी त्याच्या डोक्यावरील ओझी कमी होतील आणि त्याला विकासाच्या सर्व संधी उपलब्ध होतील.

आपण मानवी घडमोडींच्या अशा एका अवस्थेप्रत आलो आहोत कीं जेव्हा एका जगाचे आणि एखाद्या प्रकारच्या जागतिक संघराज्याचे उद्दिष्ट आवश्यक होऊन बसले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या मार्गात जरी अनेक धोके आणि अडथळे असले तरी ते उद्दिष्ट मात्र आवश्यक होऊन बसले आहे. आपण या उद्दिष्टांसाठी कार्य केले पाहिजे आणि या मोठ्या समुहाच्या आड येणाऱ्या राष्ट्र गटांमध्ये सामील होता

कामा नये. म्हणून आम्ही शैशवास्थेतून यातनेने आकार घेणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या रचनेला पाठिंबा देतो. पण एका जगाच्या निर्मितीसाठी आपण आशियातील लोकांनी उदात्त उद्दिष्टांसाठी एकत्र येऊन कार्य करणाऱ्या आशियातील देशांबाबतही विचार केला पाहिजे.

✦



''हे महत्वाचे आहे --- आपले डोळे जर लाल असतील आणि आपले मन जर वासनेने धूरकटलेले असेल तर उदात्त उद्दिष्टेही साध्य होऊ शकत नाहीत.''

२५. 'संयुक्त राष्ट्रांना उद्देशून'

पॅरिस येथे संयुक्त राष्ट्र आमसभेत केलेले भाषण, ३ नोव्हेंबर १९४८

मला या महासभेपुढे भाषण करण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला कृतज्ञ आहे. या प्रसंगी मला जरा गोंधळल्यासारखे वाटते, भारावल्यासारखे वाटते, कारण ही आमसभा जगाचे प्रतिनिधित्व करते आणि आपण येथे उपस्थित असलेले लोक, लहान असो वा मोठे असोत, कसेही असलो तरी आपण एका उदात्त उद्दिष्टांची प्रतिके आहोत आणि त्या उदात्त उद्दिष्टांच्या महानतेचा काही अंश आपल्यालाही लाभतो आणि त्यामुळे आपण आहोत त्यापेक्षाही अधिक मोठेपणा आपल्याला प्राप्त होतो.

म्हणून या सभेत भाषण करण्याचे धाडस करतांना मी गोंधळून गेलो आहे. तुम्ही येथे गुंतागुंतीच्या आणि अवघड समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहात आणि या प्रसंगी मी तुमच्यापुढे असलेल्या त्या मोठ्या समस्यांविषयी बोलण्याचे धारिष्ट करणार नाही. तुम्ही जगाचे ते ओझे आणि दुःख वाहत रहा. पण या समस्यांच्या बाबतीत सर्वसाधारणपणे जो दृष्टिकोन घेण्यात येतो तो योग्य असतो का असा मला बऱ्याच वेळा प्रश्न पडतो. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेने या महान संघटनेची तत्वे आणि उद्दिष्टे सुंदर भाषेत नमूद केली आहेत. त्या भाषेत काही सुधारणा करणे कुणाला शक्य होईल असे मला वाटत नाही.

आपली उद्दिष्टे स्पष्ट आहेत, ध्येय स्पष्ट आहे आणि असे असताही त्या ध्येयाकडे पाहतांना बऱ्याच वेळा आपण हरवून जातो. त्या प्रमुख उद्दिष्टांकडे वाटचाल करण्याऐवजी किरकोळ गोष्टींमध्येच गुरफटून जातो असे मला वाटते. काही वेळा खुद्द उद्दिष्टेच ढगांआड लुप्त होतात.

मी अशा एका देशातून आलो आहे की ज्याने दीर्घकालीन लढ्यानंतर शांततामय लढ्यानंतर स्वातंत्र्य आणि स्वावलंबन प्राप्त केले आहे. या दीर्घ कालीन लढ्याच्या काळांत आपण आपल्या उद्दिष्टांचा विसर पडू देता कामा नये, एवढेच नव्हे तर ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ज्या पध्दतींचा वापर करण्यात येतो त्यांचाही विसर पडू देता कामा नये असे आमच्या थोर शिक्षकाने आम्हांला शिकविले आहे. केवळ उदात्त उद्दिष्टे असूनच भागत नाही तर त्यासाठी जी साधने आपण वापरतो ती साधनेही चांगली असणे तितकेच महत्वाचे आहे यावरही त्यांनी भर दिला आहे. या सूत्राचा येथे पुनरुच्चार करण्यास मला आपण परवानगी द्यावी कारण आपली उद्दिष्टे

कितीही चांगली असली, संयुक्त राष्ट्रे म्हणून आपण ठेवलेली अंतिम उद्दिष्टये अथवा वेळोवेळी आपल्यापुढे येणारी तात्कालीन छोटी उद्दिष्टे, राष्ट्रगटाची अथवा विशिष्ट राष्ट्रांची उदिष्टे काहीही असोत, आपले डोळे जर लालभडक असतील आणि मने जर वासनेमुळे धुरकटलेली असतील तर ती उद्दिष्टचे साध्य करता येणार नाहीत हे आपण लक्षांत ठेवले पाहिजे.

म्हणून आपले ध्येय काय आहे यापेक्षा आपण ते साध्य करण्यासाठी काय करतो याचा जरा विचार करणे आपल्या दृष्टीने अत्यंत आवश्यक ठरते. अर्थात आपल्या ध्येयाचा आपण कधीच विसर पडू देता कामा नये हे तितकेच खरे. ही महान संघटना ज्या तत्वासाठी आणि उद्दिष्टांसाठी उभी करण्यात आली त्यांची आपण नेहमीच आठवण ठेवली पाहिजे. आता या तत्वांचा आणि उद्दिष्टांचा केवळ पुनरुच्चार जरी केला तरी आपण काही वेळा वासनेमुळे आणि पूर्वग्रहांमुळे आपल्या मार्गापासून किती दूर जातो हे आपल्या लक्षांत येईल. दोन महायुध्दानंतर, या युध्दाचा परिणाम म्हणून ही संघटना अस्तित्वात आली. या युध्दांपासून आपण कोणता धडा शिकलो? द्वेषभाव आणि हिंसाचाराद्वारे आपण शांतता निर्माण करु शकत नाही. या परस्पर विरोधी बाबी आहेत. द्वेषभाव आणि हिंसाचाराद्वारे केवळ द्वेषभाव आणि हिंसाचारच निष्पन्न होतो हा इतिहासाचा, दीर्घकालीन इतिहासाचा आणि विशेषत: मानव जातीचा विनाश करणाऱ्या या दोन महायुध्दांचा धडा आहे. आपण द्वेष आणि हिंसाचाराच्या चक्रात सापडले आहोत आणि काही निराळ्या मार्गाचा शोध घेतल्याखेरीज, निराळे साधन हुडकून काढल्याखेरीज कितीही उत्तम विचार विनिमय केला तरी त्यातून आपण बाहेर पडू शकणार नाही. आपण जर या चक्रात फिरतच राहिलो तर ही संघटना ज्या युध्दांना प्रतिबंध करण्यासाठी, युध्दे टाळण्यासाठी स्थापन करण्यात आली ती युध्दे होतच राहतील. साऱ्या जगभर विनाश होतच राहील आणि कोणत्याही राष्ट्राला किंवा राष्ट्र समुहाला या संघटनेचे उद्दिष्ट साध्य करता येणार नाही.

आम्ही आशियातील लोकांनी वसाहतवादाचे आणि साम्राज्यवादी वर्चस्वाचे दुष्ट परिणाम भोगलेले असल्यामुळे आम्ही इतर वसाहतीच्या देशांना स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे अशी अपरिहार्यपणे प्रतिज्ञा केली आहे. असे देश आशियात आमच्या शेजारी आहेत आणि आमचे त्यांच्याशी घनिष्ठ संबंध आहेत. आम्हाला त्यांच्याविषयी सहानुभूती आहे. आम्ही त्यांच्या लढ्याकडे सहानुभूतीने पाहतो. कोणतेही लहान अथवा मोठे राष्ट्र या लोकांच्या स्वातंत्र्यप्राप्तीला प्रतिबंध करीत असेल तर ते जागतिक शांततेला घातक असेच कार्य करीत आहे.

भारतासारखे जे मोठे देश वासाहतिक अवस्थेतून बाहेर पडले आहेत त्यांना इतर देशांनी वासाहतिक जोखडाखाली राहावे लागावे ही कल्पनाच करता येत नाही.

आशियातील आम्ही लोक, आणखी एक समस्या मूलभूत आहे असे मानतो

आणि तिच्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. वांशिक समानतेचा प्रश्न ही ती समस्या आहे आणि संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत तिचा समावेश आहे. या समस्येचा पुनरुच्चार करणे योग्यच आहे कारण या वांशिक समानतेच्या प्रश्नांचा संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत वारंवार उल्लेख करण्यात येत असतो.

मी या प्रश्नाच्या एखाद्या विशिष्ट अंगाचा उल्लेख करावा असे मला वाटत नाही पण या प्रश्नाच्या विश्वव्यापी स्वरुपाची मी या आमसभेला आठवण करुन देऊ इच्छितो. वांशिक विषमतेच्या प्रश्नामुळे जगातील मोठ्या प्रदेशांना ग्रासले आहे, हे सर्वांना ठाऊक आहे. भविष्यकाळात ही विषमता सहन करण्यात येईल असा प्रदेश जगात असणार नाही असे आम्हाला वाटते. केवळ वांडगाईनेच काही ठिकाणी तो टिकवून धरण्यात आली तर ती गोष्ट निराळी. वांशिक भेदाभेद जर पाळण्यात येत असतील आणि ते जर जागतिक शांततेला धोकादायक असेल आणि त्याने जर संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील तत्वांचा भंग होत असेल तर हे सारे सहन करणे म्हणजे संघर्षाची बीजे जोपासण्यासारखेच आहे हे उघड आहे.

या भेदाभेदाचे परिणाम भूतकाळात युरोपच्या मानाने आशिया, अफ्रिका आणि जगाच्या इतर भागात प्रकर्षाने दिसून आले आहेत आणि भविष्यकाळात यातून संघर्ष निर्माण होणार आहेत आणि ही समस्या जर योग्य रीतीने समजून घेतली नाही तर ती सुटणार नाही अशी ही समस्या आहे.

जगात अनेक गोष्टींची टंचाई असतांना, जगाच्या अनेक भागात अन्न आणि इतर जीवनावश्यक वस्तूंची वाण असतांना आणि लोक उपासमारीने मरत असतांना संयुक्त राष्ट्रांच्या महासभेचे लक्ष केवळ अनेक राजकीय समस्यांवरच केंद्रित झाले आहे ही एक मोठी चमत्कारिक बाब आहे. आपल्यापुढे आर्थिक समस्याही आहेत. या आमसभेने आपल्यापुढील काही तीव्र स्वरुपाच्या राजकीय समस्या काही काळापुरत्या बाजूला ठेवून आपली मने स्थिरावून मुलभूत आणि निकडीच्या आर्थिक समस्यांकडे पहावे आणि जगाच्या ज्या भागात अन्नाचा तुटवडा आहे त्या भागाकडे अधिक लक्ष द्यावे असा विचार माझ्या मनात येतो पण हे शक्य होईल काय? आज जग भितीने व संशयाने ग्रस्त झालेले आहे. त्यातील काही सकारण आहेत हेही खरे आहे. पण माणसाला भिती वाटली की त्यातून वाईट परिणाम आणि दुष्ट परिणाम उद्भवतात. भीती हा चांगला सहकारी नाही. या भीतीच्या भावनेने बड्या देशांनाही ग्रासले आहे. त्यांना भीतीने, युध्दाच्या गंभीर स्वरुपाच्या भीतीने आणि अनेक प्रकारच्या भीतीने ग्रासले आहे. ते असो, पण कोणत्याही प्रकारचे आक्रमण सहन करण्यात येणार नाही कारण आक्रमणाच्या केवळ कल्पनेनेच समतोल ढळतो आणि त्यामुळे संघर्ष उद्भवतो हे आपण मान्य करतो अथवा आपल्याला मान्य करावे लागेल असे मला वाटते. कोणत्याही प्रकारच्या आक्रमणाला प्रतिकार केलाच पाहिजे. ✦

"विश्वविद्यालय हे मानवतावादाचे, सहिष्णुतेचे, विवेक आणि प्रगतीचे, वैचारिक साहसाचे आणि सत्यशोधनाचे प्रतीक आहे."

२६. 'विश्वविद्यालयाची कार्ये.'

अलाहाबाद विश्वविद्यालयाच्या पदवी समारंभ प्रसंगी केलेले भाषण,
१३ डिसेंबर १९४७

राष्ट्राचे जीवन आणि विशेषत: भारतासारख्या राष्ट्राचे जीवन प्रामुख्याने खेडेगावांत सामावलेले आहे. असे असले तरी या युगाच्या संस्कृतीच्या सर्वश्रेष्ठ यशसिध्दी शहरातून दिसून येतात आणि तेथेचे मानवी जीवनाचे अत्यंत घृणास्पद स्वरुपही दिसून येते. म्हणून ही शहरे मला भारतीय संस्कृतीने युगानुयुगे केलेली प्रगती आणि तिचे आंतरिक सामर्थ्य आणि संस्कृती यांच्यामधील समतोलाची आठवण करुन देतात. भारताच्या आमच्या या वारशाचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. असे असले तरी आज आपण कोठे आहोत?

आधुनिक जगामध्ये विश्वविद्यालये खूपच शिकवू शकतात आणि त्यांच्या कार्याची व्याप्ती सतत वाढत आहे. मी स्वत: विज्ञानाचा पुरस्कर्ता आहे आणि वैज्ञानिक पध्दतीने आणि दृष्टीकोनाद्वारेच जग वाचणार आहे असा माझा विश्वास आहे. पण विद्येचा कोणताही मार्ग आपण स्वीकारला आणि तो आपल्याला किफायतशीर वाटला तरी विद्येच्या प्रासादाला जर काही विशिष्ट पाया नसेल तर तो निसरड्या वाळूवर उभा करण्याजोगे ठरणार आहे. विश्वविद्यालयाला या गोष्टीची जाणीव असणे आवश्यक आहे आणि राष्ट्र ज्या उच्च दर्जाच्या विचाराद्वारे आणि कृतीद्वारे घडते त्यावर भर दिला पाहिजे. विशेषत: आज अत्यंत झपाट्याने होणाऱ्या संक्रमणाच्या अवस्थेत जेव्हा जुनी मूल्ये आपण सोडून दिली आहेत आणि आपण नवी मूल्ये स्वीकारलेली नाहीत अशा काळात तर हे अत्यंत आवश्यक आहे. आपण ज्या स्वातंत्र्याची दिर्घकाळ प्रतीक्षा करीत होतो ते स्वातंत्र्य आपल्याला लाभले आहे. कमीत कमी हिंसाचारानंतर मिळाले आहे. पण त्यानंतर अल्पावधीतच आम्हाला रक्ताच्या आणि अश्रूंच्या समुद्रातून चालावे लागले. यामुळे आम्हांला जी लाज वाटली ती त्या रक्तापेक्षा आणि अश्रूंपेक्षाही अधिक यातनादायक होती. त्यावेळी आमची मूल्ये आणि आमचे मापदंड कोठे होते? आम्ही पुरातन काळात ज्यांचा पुरस्कार केला ते सारे कोठे होते? अचानक या देशावर अंध:कार पसरला आणि लोकांना वेडेपणाने पछाडले. भयाने आणि द्वेषाने आमची मने आंधळी झाली आणि संस्कृतीने आमच्यावर टाकलेली सर्व संयमाची बंधने गळून पडली. भयानक प्रकारामागोमाग भयानक प्रकार घडत गेले

आणि मानवाच्या पाशवी अत्याचारामुळे अचानक रीतेपणा निर्माण झाला. सारा प्रकाश विझून गेल्यासारखे दिसले. या तुफानात सगळेच दिवे विझले नाहीत. काही दिवे तेवत राहिले. आम्ही मृतांविषयी आणि मरणाऱ्यांविषयी आणि ज्यांची दु:खे मरणाहूनही अधिक आहेत अशा लोकांविषयी दु:खी झालो. आम्ही देशाविषयी, मातृभूमी विषयी, जिच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही दिर्घकाळ झटलो त्या मातृभूमीविषयीही दु:खी झालो.

प्रकाश विझल्या सारखे वाटले. पण एक तेजस्वी ज्योत तेवत राहिली आणि आसमंतात पसरलेल्या औदासिन्यावर प्रकाश टाकीत राहिली. आणि त्या विशुध्द ज्योतीकडे पाहून आम्हाला सामर्थ्य आणि आशा परत मिळाली. आमच्या जनतेवर जरी कितीही मोठी क्षणिक आपत्ती ओढवली तरी भारताचा आत्मा भक्कम आणि निर्मळ आहे. तो वर्तमानकाळातील गोंधळावर मात करतो आणि तात्कालीन क्षूद्र अडचणींची काळजी करीत नाही असे आम्हाला वाटते. या महिन्यांमध्ये भारतातील महात्मा गांधींच्या उपस्थितीचा अर्थ तुमच्यापैकी किती जणांना जाणवला आहे? गेल्या पन्नास वर्षाहून अधिक काळात त्यांनी भारताची केलेली उत्तम सेवा आणि त्याच्या स्वातंत्र्यासाठी केलेला लढा आपणा सर्वांना ठाऊक आहे. पण गेल्या चार महिन्यांत त्यांनी केलेल्या सेवेला तोड सापडणार नाही. विरघळणाऱ्या जगात ते खडकासारखे खंबीर राहिले, सत्याचा दिपस्तंभ होऊन राहिले. आणि त्यांचा मृदू आवाज घोळक्याच्या कोलाहलावर मात करुन त्यांना कार्याचा मार्ग दाखवित राहिला.

आपल्या वारशाचा जरी आपण बऱ्याच वेळा दुरुपयोग केला असला तरी तो अत्यंत उदात्त आहे. भारताने कितीही दु:ख आणि दैन्य सोसले असले तरीही ते एक महत्वाचे जोमदार राष्ट्र होते आणि आहे. विधायक आणि सृजनशील क्षेत्रातील त्याचे चैतन्य आशियायी जगाच्या अनेक भागासह आणि इतरत्रही पसरले आहे आणि त्याच्या मागोमाग त्याला दैदिप्यमान विजय प्राप्त झाले आहेत. भारताने हे विजय तलवारीने नव्हे तर मने आणि अंत:करणे जिंकून मिळविलेले असल्याने सुखदायक होते आणि समशेर बहादूर आणि त्याचे पराक्रम इतिहास जमा होतील पण हे विजय टिकून राहतात. पण याच चैतन्याला जर योग्य दिशा मिळाली नाही तर ते गुदमरते, विनाश करते आणि त्याचा अध:पात होतो.

आम्ही आमच्या अल्पशा जीवनावधीत भारतातील आणि जगातील विधायक आणि सृजनशील आणि विनाशाच्या शक्तींचे खेळ पाहिले आहेत. अखेर कोणत्या शक्तीचा विजय होणार? आणि आपण कोणती बाजू घेणार? आपल्यापैकी प्रत्येकापुढे, विशेषत: ज्या लोकांमधून राष्ट्राचे नेते निर्माण होणार आहेत आणि भावी काळाचे ओझे ज्यांच्या खांद्यावर पडणार आहे त्यांच्यापुढे ही मूलभूत समस्या आहे. आपल्याला कुंपणावर बसून चालणार नाही. या समस्येकडे दुर्लक्ष करता येणार नाही. ज्या काळात स्पष्ट विचारांची आणि परिणामकारक कृतीची आवश्यकता आहे त्या काळात आपण

आपली मने, द्वेषाच्या आणि वासनेच्या आहारी जाऊ देता कामा नये.

आपण कोणत्या प्रकारच्या भारतासाठी आणि जगासाठी झटत आहोत? द्वेषभाव आणि हिंसाचार, भीती आणि जातीयवाद, आणि संकुचित प्रांतवादाने आपले भवितव्य अडवायचे आहे काय? खचितच नाही. हे अलाहाबाद शहर, केवळ माझा या शहराशी घनिष्ट संबंध आहे म्हणून मला ते प्रिय नाही तर भारताच्या इतिहासातील त्याच्या सहभागामुळे ते मला प्रिय आहे. या शहरात स्वप्ने पाहण्यात आणि भावी भारताची दृश्ये मनात चितारण्यात माझे बालपण व तारुण्य गेले. या स्वप्नांमध्ये खरोखरीच काही तथ्यांश होता की ती केवळ रोगी मनाची लीला होती? त्या स्वप्नांपैकी काही स्वप्ने वास्तवात उतरली पण मी जशी कल्पना केली त्या प्रकारे नाही आणि कित्येक स्वप्ने तर उद्याप अधुरीच राहिली आहेत. आपण साध्य केलेल्या यशाबद्दल विजयाची भावना नाही तर रीतेपणाची आणि सभोवताली पसरलेली दु:खाची भावना आहे आणि आपल्याला लक्षावधी लोकांच्या डोळ्यातील अश्रू पुसावयाचे आहेत.

विश्व विद्यालय हे मानवतावादाचे, सहिष्णुतेचे, विवेकाचे आणि प्रगतीचे, वैचारिक साहसाचे आणि सत्याच्या संशोधनाचे प्रतीक आहे. मानव समाजाच्या उच्चतम उदिष्टांकडील वाटचालीचे ते प्रतीक आहे. विश्व विद्यालयांनी जर आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडले तर ते राष्ट्राच्या आणि जनतेच्या दृष्टीने हिताचे आहे. पण हे विद्येचे मंदिरच जर संकुचित दृष्टीकोनाचे आणि हीन उद्दिष्टांचे माहेरघर झाले तर राष्ट्राची भरभराट होईल काय? अथवा लोकांचा दर्जा वाढेल काय?

म्हणून आमची विश्वविद्यालये आणि शिक्षण संस्थांवर आणि त्यांच्या चालकांवर मोठी जबाबदारी आहे. त्यांनी आपल्या ज्योती तेवत ठेवल्या पाहिजेत. जनसमुदाय जेव्हा भावनेला बळी पडतो आणि इतरांना आदर्श घालून देण्याचे ज्यांचे कर्तव्य आहे तेच जेव्हा आंधळे होतात तेव्हा या संस्थांनी योग्य मार्ग सोडता कामा नये. आपण दुष्टपणाने आणि दुष्टप्रवृत्तींशी लांगूल चालन करुन आपले काहीतरी भले होईल अशा आशेने त्या मार्गाने गेलो तर आपले ध्येय चुकीच्या साधनांद्वारे कधीच पूर्णपणे साध्य करता येणार नाही.

✦

"आपण जेथे गेलात तेथे आपण दुःखितांचे सांत्वन केलेत, आशा आणि प्रोत्साहन दिलेत."

२७. 'मौंटबॅटनना उद्देशून'

लॉर्ड आणि लेडी मौंटबॅटन यांना निरोप देण्याच्या प्रसंगी केलेले भाषण,
२० जून १९४८

पंधरा महिन्यांपूर्वी जवळ जवळ याच दिवशी आपल्यापैकी काहीजण नव्या व्हाईसरॉयचे आणि त्यांच्या पत्नीचे स्वागत करण्यासाठी पालम विमानतळावर गेलो होतो. आपल्यापैकी काहीजण उद्या त्यांना निरोप देण्यासाठी पुन्हा पालम विमानतळावर जाऊ. पंधरा महिने गेलेत आणि हे पंधरा महिने दिर्घ कालावधी वाटतो आणि तरीही लॉर्ड आणि लेडी मौंटबॅटन आणि पमेला मौंटबॅटन कालच येथे आले होते असे वाटते पण आपण जर पुन्हा एकदा मागे वळून पाहिले तर या पंधरा महिन्यांतील सुख दुःखाच्या प्रसंगांच्या अनुभवांमुळे एक युग व्यतीत झाल्यासारखे वाटते.

तीन चार तासांपूर्वी दिल्ली शहरात त्यांना निरोप देण्याचा जो भव्य समारंभ झाला त्यानंतर माझे भाषण म्हणजे एक प्रकारचा उताराच ठरणार आहे. कारण तो समारंभ हे मैत्रीचे आणि आपुलकीचे असे सुंदर निदर्शन होते. त्या घटनेनंतर कोणत्याही शब्दांद्वारे आणि शब्दप्रयोगांद्वारे या भावना व्यक्त करणे अवघड आहे. त्या प्रसंगी लॉर्ड आणि लेडी मौंटबॅटन यांना काय वाटले असेल ते मला ठाऊक नाही. फार तर मी त्याचा अंदाज करु शकतो पण मी अशा समारंभांना सरावलेला असूनही माझ्यावर या समारंभाचा चांगलाच प्रभाव पडला आहे. एवढ्याशा, अल्प कालावधीत एका इंग्रज पुरुषाला आणि स्त्रीला भारतात एवढी लोकप्रियता कशी लाभली याचे मला आश्चर्य वाटते.

या वादळी आणि तणावपूर्ण आणि बिकट कालखंडानंतर या सर्वांशी संबंधित असलेल्या गव्हर्नर जनरलविषयी आणि त्याच्या पत्नीविषयी लोकांच्या मनात एवढी आपुलकीची आणि प्रेमाची भावना कशी निर्माण होऊ शकते याचे मला विशेषच आश्चर्य वाटते.

भारतात जे घडून गेले त्याच्याशी या भावनांचा तितकासा संबंध नव्हता. तर उलट या दोघांच्या मनात भारताविषयी जे प्रेम, मैत्रीची भावना आणि सदिच्छा आहे त्याचा तो परिणाम आहे, हे उघड आहे. भारतीयांनी या दोघांना अथांग उत्साहाने, दुर्दम्य चिकाटीने, आशावादी वृत्तीने काम करतांना पाहिले आहे. आणि ती दोघे आपल्या कुवतीनुसार भारताची सेवा करीत आहेत, असे त्यांना आढळून आले आहे.

भारतात अनेक उणीवा आणि वैगुण्ये आहेत पण आम्हाला जेव्हा भारताविषयी मित्रभाव आढळतो, सेवाभाव आढळतो तेव्हा त्या व्यक्तीविषयी आमच्या मनात प्रेमभावना निर्माण होते. जे भारताचे मित्र आहेत आणि भारताची सेवा करतात ते कुणीही असले आणि कोठलेही असले तरी आमचे मित्र होतात. म्हणून भारतीय जनतेला जेव्हा लॉर्ड आणि लेडी मौंटबॅटन यांच्या मनात भारताविषयी आणि भारतीय जनतेविषयी नि:शंयपणे मित्रभावना आहे आणि ते भारताची मनोभावे सेवा करीत आहेत असे जाणवले तेव्हा त्यांनी मौंटबॅटन यांच्यावर प्रेमाच्या आणि आपुलकीच्या भावनेचा वर्षाव केला. ते याहून अधिक काही करु शकत नाहीत. तुम्हाला अनेक मौल्यवान भेटवस्तू आणि नजराणे मिळतील पण जनतेचे प्रेम आणि आपुलकी याहून अधिक मौल्यवान आणि दुर्मिळ असे दुसरे काहीच नाही. माननीय महोदय आणि महोदया, या प्रेमाचा आपुलकीचा प्रभाव आपण स्वत: पाहिला आहे. मी तर म्हणेन की, या सर्वाधिक मौल्यवान भेटवस्तू आहेत. म्हणून आपण हे सर्व पाहिल्यानंतर मला काही व्यक्तीगत आणि व्यक्तीनिरपेक्ष गोष्टींखेरीज आणखी जास्त काहीच सांगायचे राहिलेले नाही.

आपण या ठिकाणी व्यक्तीच्या नात्याने आणि श्रेष्ठ सार्वजनिक पदाधिकाऱ्याच्या नात्याने आला होतात. आमच्यापैकी बरेचजण आपले मित्र झाले आणि आपण इतिहासातील एका चमत्कारिक क्षणी एकत्र आलो होतो आणि या ऐतिहासिक अंकातील आपण पात्रे होतो. आपण गेल्या वर्षभरात जे कांही केले त्याबाबत निष्कर्ष काढणे मला अथवा इतर कुणालाही अवघड आहे. आपण या घटनांच्या अतिशय निकट आहोत आणि आपला त्यांच्याशी फार जवळचा संबंध आहे. कदाचित आपण, आम्ही आणि तुम्ही अनेक चुका केल्या असतील. एक किंवा दोन पिढ्यांनंतरचे इतिहासकार कदाचित आपण केले हे योग्य केले की अयोग्य केले या बाबतीत निर्णय देऊ शकतील. पण आम्ही जे केले ते योग्य की अयोग्य हे ठरविण्याचा रास्त निकष कदाचित आम्ही योग्य तेच करण्याचा प्रयत्न केला किंवा नाही हा आहे कारण आम्ही आमच्या सर्व शक्तीनिशी योग्य तेच कण्याचा प्रयत्न केला असेल तर विशेष बिघडत नाही. प्रत्यक्षात ते चुकीचे ठरले तर खूपच बिघडते ही गोष्ट निराळी. मी आमच्या स्वत:च्या हेतूविषयी निर्णय घेऊ शकत नाही पण आपण योग्य ते करण्याचा प्रयत्न केला असा मला विश्वास वाटतो आणि तुम्ही भारताच्या कल्याणासाठीच प्रयत्न केलेत याबद्दल मला खात्री वाटते, म्हणून आपल्याला अनेक पापे माफ करण्यात येतील आणि चुकाही माफ करण्यात येतील.

महाशय, आपण येथे बहुत किर्ती संपादन करुन आला होतात पण भारतात अनेकांची किर्ती धुळीला मिळाली. तुम्ही अतिशय अडचणींच्या आणि अरिष्टांच्या काळात येथे राहिलात तरी आपली किर्ती शाबूत राहिली हा पराक्रम वाखाणण्या जोगा

आहे. आमच्या पैकी ज्या अनेक जणांचा या अरिष्टाच्या काळात आपल्याशी दररोज संबंध आला ते तुमच्या पासून बरेच काही शिकले, जेव्हा काही वेळा आम्ही हारलो होतो तेव्हा आपल्यामुळे आमच्यामध्ये आत्मविश्वास उत्पन्न झाला आणि आम्ही आपल्याकडून जे पाठ शिकलो ते टिकून राहतील. आमच्या भविष्यकाळातील कार्यात त्यांचे आम्हाला सहाय्य होईल याबद्दल मला शंका वाटत नाही.

बाईसाहेब, मी आपल्याला उद्देशूनही चार शब्द बोलू इच्छितो. कुणा देवानं अथवा परीने सौंदर्य, बुध्दिमत्ता, लावण्य, मोहकपणा आणि उत्साह या अद्वितीय दैवी देणग्या आपल्याला दिल्या आहेत आणि ज्या स्त्रिला हे गुण लाभले आहेत ती कुठेही गेली तरी तिला थोरवी प्राप्त होणारच. पण ज्यांच्यापाशी खूप आहे त्यांना अधिकच मिळते आणि देवाने याहूनही अधिक दुर्मिळ असे गुण सहृदता, मानवजातीविषयी प्रेम, दु:खितांची आणि संकटग्रस्ताची सेवा करण्याची तळमळ आपल्याला दिले आहेत. या सर्व गुणांच्या संयोगामुळे एक दैदिप्यमान व्यक्तीमत्व आणि दु:खितांचे दु:ख हरण करण्याचा गुण आपल्या ठायी आला आहे. आपण जेथे गेलात तेथे आपण दु:खितांचे सांत्वन केलेत, आशा आणि प्रोत्साहन दिलेत.

पमेला मौंटबॅटन यांच्याविषयी मी चार शब्द बोलणार आहे. त्या थेट शाळेतून येथे आल्या आणि त्यांनी आपल्या अंगच्या सद्गुणांच्या साहाय्याने भारतातील बिकट परिस्थितीत प्रौढ व्यक्तीचे कार्य पार पाडले. येथे हजर असलेल्या सर्वांना त्यांनी हे काम किती उत्तम प्रकारे पार पाडले आणि त्यांचे किती कौतुक झाले हे ठाऊक आहे.

मी अधिक काही बोलू इच्छित नाही पण अनेकांनी तुम्हाला ते सांगितले असेल या बद्दल मला शंका नाही तेच पुन्हा एकदा सांगतो ते असे की, आम्ही जरी आपल्याला निरोप देत असलो तरी तो निरोप आहे असे आम्ही मानत नाही.



''त्यांचे सारे आयुष्य ही एक कविता आणि एक गीत बनले होते.''

२८. 'सरोजिनी नायडू'

घटना परिषदेतील दुखवट्याचे भाषण, ३ मार्च १९४९

सरोजिनी नायडू गेल्या दीड वर्षाहून अधिक काळ अनेक समस्यांनी ग्रस्त असलेल्या एका मोठ्या राज्याच्या राज्यपाल होत्या. या अल्पकालावधीत, त्या राज्याचे मुख्यमंत्री आणि मंत्री, विविध जाती जमाती, वर्ग आणि धर्मसंप्रदायाचे लोक यांच्यापासून कामगार आणि शेतावरील शेतकरी या सर्वांना त्यांच्या अंत:करणात स्थान मिळाले होते. यावरुन त्यांनी आपली जबाबदारी अतिशय यशस्वीपणे अतिशय उत्तमप्रकारे पार पाडली होती हेच दिसून येते. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल, त्या राज्याचा एक थोर सेवक या नात्याने त्या अत्यंत यशस्वी झाल्या. पण राज्यपाल या नात्याने मी त्यांच्याविषयी काही फारसे बोलणार नाही कारण त्या सर्वसाधारण राज्यपाल ज्या मगदूराच्या व्यक्ति असतात त्याहून कितीतरी पटीने अधिक श्रेष्ठ होत्या. त्या नेमक्या किती मोठ्या होत्या हे सांगणे मला जरा कठीणच वाटते कारण त्या आम्हा सर्वांचा एक भाग बनल्या होत्या. आमच्या आजच्या राष्ट्रीय परंपरेचा एक भाग बनल्या होत्या आणि आमच्या स्वातंत्र्य लढ्याच्या दीर्घ कालावधीत ज्या व्यक्तींना त्यांच्याबरोबर कार्य करण्याचे महत् भाग्य लाभले त्यांचा त्या एक भाग बनल्या होत्या.

हे एक अत्यंत बुध्दिमान व्यक्तीमत्व होते. अत्यंत उमदे आणि विविध गुण संपन्न असे हे व्यक्तिमत्व होते. अनेक दैवी गुण लाभलेले असे हे व्यक्तीमत्व होते पण सर्वांत महत्वाची गोष्ट ही की त्यांना जगावेगळेच व्यक्तिमत्व प्राप्त करून देणारे काही विशिष्ट गुण लाभलेले होते. त्यांनी कवयित्री म्हणून जीवनाची सुरुवात केली. कालान्तराने जेव्हा अपरिहार्य अशा घटनाक्रमाने त्या राष्ट्रीय लढ्यात खेचल्या गेल्या आणि त्यांनी तडफेने आणि उत्साहाने त्या लढ्यात उडी घेतली. त्यानंतर त्यांनी लेखणीने कागदावर कविता लिहिली नाही तर त्यांचे सारे जीवन हीच एक कविता बनली, एक गीत बनले. आणि त्यांनी एक अद्‌भूत किमया केली. त्यांनी आमच्या राष्ट्रीय लढ्याला कलात्मकता आणि काव्य प्रदान केले. आमच्या राष्ट्रपित्याने ज्याप्रमाणे आमच्या लढ्याला नैतिक उदात्तता आणि भव्यता प्रदान केली होती त्याप्रमाणे सरोजिनी नायडू यांनी त्या लढ्याला कलात्मकता आणि काव्य दिले. संकटांना आणि सर्वनाशाला केवळ तोंड देण्याचेच नव्हे तर सहजतेने आणि ओठावर काव्य आणि चेहऱ्यावर हास्य ठेऊन त्यांना सामोरे जाण्याचे धैर्य आणि उत्साह त्यांनीच आम्हाला प्राप्त करुन दिला. मी स्वत: आणि आपल्यापैकी बहुतेक जण राजकारणी


आहोत त्यामुळे आपल्या राष्ट्रीय जीवनाला केवळ राजकारणाच्या पातळीवरुन कलात्मकतेच्या उदात्त स्तरावर आणण्याचा गुण त्यांच्या अंगी होता, त्या या बाबतीत यशस्वी झाल्या ही त्यांची कामगिरी सर्वाधिक महत्वाची वाटते.

त्यांच्या जीवनाचे सिंहावलोकन केले असता त्यांच्या अंगी अनेक गुणांचा अद्‌भूत संगम झालेला दिसतो. त्यांचे सारे जीवन जोमदार होते. त्यांचे पन्नास वर्षांचे जीवन म्हणजे केवळ अस्तित्वच नव्हे तर जोमदार गतीशील अस्तित्व होते. आपल्या जीवनाच्या अनेक अंगांना सांस्कृतिक आणि राजकीय अंगांना त्यांनी स्पर्श केला होता आणि त्यांनी ज्याला म्हणून स्पर्श केला त्यांत त्यांनी आपल्या ठिकाणची ज्योत चेतवली होती. खऱ्या अर्थाने ती एक ज्वाला होती. पण त्याचबरोबर त्या शीतल वाहत्या जलधारेसारख्या, आपल्या राजकारणाचा भावनावेग मानवतेच्या शीतल स्तरावर आणणाऱ्या सोज्वळ, सौम्य धारेसारख्या होत्या. म्हणून तसा केवळ एक आत्मिक सौंदर्याचा साक्षात्कार होता आणि तो नष्ट झाला एवढेच आपण या ठिकाणी म्हणू शकतो, याहून काही निराळे म्हणणे अवघड आहे.

आपल्या भावी पिढ्या त्यांचे स्मरण करतील यात शंकाच नाही पण जे कुणी आमच्या नंतर येतील, ज्यांना त्यांचे साहचर्य लाभलेले नाही त्यांना या व्यक्तीमत्वाची संपन्नता, जी शब्दातीत आहे आणि जिची नोंद करणे अशक्य आहे तिची जाणीव होणे दुरापास्त आहे. त्यांनी भारतासाठी परिश्रम केले. परिश्रम कसे करावेत आणि उदात्त उद्दिष्टांसाठी कसा स्वार्थ त्याग करावा याचे त्यांना चांगले ज्ञान होते आणि हे सर्व त्यांनी इतक्या सहजतेने व कौशल्याने केले की त्यात काही आत्मिक यातना सहन कराव्या लागतात असे कुणालाच जाणवले नाही. त्यांच्या सारख्या संवेदनाक्षम व्यक्तीला या काळात अत्यंत क्लेश सहन करावे लागले आणि ते त्यांनी अत्यंत सहजतेने सहन केले. इतक्या आनंदाने त्यांनी या सर्व हालअपेष्टा सहन केल्या की त्यात विशेष असे काही आहे असे कुणालाही जाणवले नाही. अशाप्रकारे त्यांनी आमच्या लढ्याला एक उदात्त स्वरुप प्राप्त करुन दिले होते आणि हे कार्य इतर कुणी करु शकले असते अथवा भावी काळात करील असे मला वाटत नाही.

महाशय, त्यांच्या ठिकाणी अनेक गुणांचा विलक्षण संगम झाला होता असे मी म्हणतो. भारतीय संस्कृतीला ज्या अनेकविध छटांमुळे आजचे माहात्म्य प्राप्त झाले आहे त्या विविधतापूर्ण सांस्कृतिक प्रवाहांच्या त्या प्रतिनिधित्व करीत होत्या. भारतातील अनेकविध सांस्कृतिक प्रवाहांचा आणि त्याचबरोबर पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीतील प्रवाहाचाही त्यांच्या ठायी सुरेख संगम झालेला होता आणि म्हणून त्या महान राष्ट्रीय नेत्या होत्या. पण त्याचबरोबर खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय विभूती होत्या आणि विशेषत: जगात त्या जेथे जेथे गेल्या तेथे तेथे त्यांना योग्य ती मान्यता मिळत होती आणि त्यांची जगातील थोर विभूतींमध्ये गणना होत होती. आजच्या काळात

जेव्हा परिस्थितीच्या दबावामुळे आम्ही प्रसंगी संकुचित राष्ट्रवादाकडे घसरत जाण्याची आणि ज्या थोर नेत्यांनी आमच्या राष्ट्रीय आंदोलनाचा पाया घातला त्यांना स्फुर्ती देणाऱ्या उदात्त उद्दिष्टांचा आम्हाला विसर पडण्याची शक्यता आहे अशा काळात त्यांची आठवण करणे हितावह आहे.



''आपण जरी कोणत्याही पक्षाचे असलो तरी आपण सर्वांनी सुयोग्य आणि शोभनीय वर्तणूकीची उच्च पातळी राखणे हे सर्वाधिक महत्वाचे आहे.''

२९. 'सार्वत्रिक निवडणूका'

आकाशवाणीवरील भाषण, २२ नोव्हेंबर १९५१

आज रात्री मी आपल्याशी सार्वत्रिक निवडणूकांविषयी बोलणार आहे. तुम्हां सर्वांना निवडणूकांविषयी थोडेफार ठाऊक आहे आणि साहजिकच तुम्हांला त्यांच्याविषयी औत्सुक्य असणे योग्यच आहे. इतिहासातील अपूर्व अशा या लोकशाही प्रक्रियेविषयी आपण एवढी आस्था दाखविणे योग्यच आहे. भारतीय प्रजासत्ताकाचे नागरिक या नात्याने आपण या निवडणूकांत स्वारस्य दाखविणे महत्वाचे आहे, कारण त्यांचा भारताच्या भवितव्यावर परिणाम होणार आहे यात काहीच शंका नाही. जनतेने राष्ट्रीय घडामोडींमध्ये आणि ज्या निवडणूकांद्वारे सरकार निर्माण होते त्या निवडणूकांमध्ये क्रियाशील आणि सुबुध्द स्वारस्य घेणे हा लोकशाहीचा पाया आहे.

दुदैवाने आमचे अनेक मतदार सुशिक्षित नाहीत आणि त्यामुळे आम्हाला विविध पक्षांची आणि उमेदवारांची निवडणूक चिन्हे असलेल्या रंगीत पेट्या तयार कराव्या लागल्या आहेत. यामुळे केंन्द्र आणि राज्य सरकारांवर खर्चाचा जादा बोजा पडणार आहे. यासाठी त्यांनी केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या हाताखाली काम करणारा प्रचंड कर्मचारी वर्ग नियुक्त केला आहे. पण खुद्द जनतेने जर सहकार्य केले नाही तर सरकारने कितीही चांगले संघटनात्मक कार्य केले तरी निवडणूका यशस्वी होणार नाहीत. म्हणून ज्या प्रक्रियेद्वारे जनता आम्हाला मते देते आणि त्यांचे सुबुध्द सहकार्य देते ती प्रक्रिया तिने समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

अनेक संघटित पक्षांनी आपले उमेदवार उभे केले आहेत. काही अपक्ष उमेदवारही उभे राहण्याची शक्यता आहे. या निवडणूकांत प्रत्येक पक्षाला आणि प्रत्येक उमेदवाराला समान आणि चांगली संधी मिळाली पाहिजे. आपले सरकार एका पक्षाचे आहे या वस्तूस्थितीमुळे तो पक्ष निवडणूकांच्या काळात काही खास जादा अधिकारांना पात्र ठरत नाही. सरकारी अधिकाऱ्यांनी काम नि:पक्षपातीपणे काटेकोर तटस्थतेने केले पाहिजे असे आदेश केंद्र आणि राज्य सरकारांनी दिलेले आहे. कायद्याने सार्वजनिक कर्मचाऱ्यांना अयोग्य वर्तणूकीबद्दल शिक्षा देण्याची तरतूद केली आहे. निवडणूक आयोगानेही अनेक वेळा अशा प्रकारचे इषारे दिले आहेत आणि अयोग्य आणि बेकायदेशीर वर्तणूकीबाबत योग्य ती शिक्षा करण्यात येईल याबद्दल कोणीच शंका बाळगण्याचे कारण नाही.

उमेदवारांनी आणि त्यांच्या एजंटांनी आपल्या कर्तव्याची आणि जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे आणि निवडणूकांच्या जटील कायद्यांचा परिचय करुन घेतला पाहिजे.

सरकारचे अेनक मंत्री निवडणूकांमध्ये उमेदवार म्हणून उभे असतील. त्यांचे काम तर अधिकच अवघड आहे. आपल्याला निवडणूकीत यश मिळावे म्हणून त्यांनी कोणत्याही प्रकारे आपल्या स्थानाचा वापर करता कामा नये. त्यांनी आपली सरकारी कामे, निवडणूकी बाबतची आणि खाजगी कामे होता होईल तेवढी अलग अलग ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे या दृष्टीने सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय ध्वजाचा पक्षाच्या हेतूसिध्दीसाठी वापर करता कामा नये हे सदैव लक्षात ठेवले पाहिजे. खरे तर राष्ट्रीय ध्वजाचा अधिकृत वापर करण्याच्या बाबतीत कडक नियम करण्यात आले आहेत. निवडणूकीच्या हेतूने राष्ट्रध्वजाचा केव्हाही वापर होता कामा नये.

राष्ट्रापुढील प्रमुख समस्यांबाबत मतदारांचे मनोगत जाणून घेणे आणि मतदारांनी आपले प्रतिनिधी निवडणे हे लोकशाहीवादी निवडणूकीचे उद्दिष्ट आहे. पक्ष आपले कार्यक्रम समाजापुढे ठेवतात आणि आपला कार्यक्रम कसा चांगला आहे आणि इतर कार्यक्रमात काय दोष आहेत हे मतदारांना पटवून देण्यासाठी जोरदार प्रचार करतात. या परस्परविरोधी प्रचारांमुळे मतदारांना शिक्षण मिळावे, ज्ञानप्राप्ती व्हावी आणि योग्य प्रतिनिधी निवडण्यास सहाय्य व्हावे अशी अपेक्षा आहे.

काही कारणांमुळे निवडणूकांमध्ये बऱ्याच प्रमाणात उत्तेजना निर्माण होते. काही वेळा तर भावनांचाही क्षोभ होतो. दुदैवाने या भावना उद्रेकामुळे गैरवर्तणूक घडते आणि लोकशाहीची सर्वसाधारण पातळी खालावते. आपण या बाबतीत खबरदारी घेणे आवश्यक आहे.

आपण कोणत्याही पक्षाचे असलो तरी आपण सर्वांनी सुयोग्य आणि शोभनीय वर्तणूकीची उच्च पातळी राखणे सर्वाधिक महत्वाचे आहे. आपल्या भाषणाच्या अथवा लेखनाच्या द्वारे होणारा प्रचार व्यक्तिगत असता कामा नये तर धोरणे आणि कार्यक्रम यांच्या बाबतीत असला पाहिजे. तो कोणत्याही परिस्थितीत व्यक्तिगत टीका आणि शिवीगाळ या हीन पातळीवर येता कामा नये. आपण आज जे आदर्श निर्माण करु त्यांचेच अनुकरण भावी काळात करण्यात येणार आहे आणि त्यानुसारच आगामी काळातील निवडणूका होणार आहेत.

✦

''आपल्याला खूप काही हवे आहे – अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, खरे तर जीवनातील सर्वच महत्वाच्या गोष्टी हव्या आहेत. पण त्या मिळणार कशा? घोषणा करुन अथवा ठराव पास करुन तर त्या निश्चितच मिळणार नाहीत!''

३०. 'मधला मार्ग'

नवी दिल्ली येथील इंडियन केमिकल मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशनच्या सभेत केलेले भाषण, २६ डिसेंबर १९५०

येथील काही वृत्तपत्रांतील जाहिराती पाहिल्यानंतर कोणती तरी एक शक्तीवर्धक गोळी तयार करणे हा आपला एक प्रमुख उद्योगधंदा आहे असे मला वाटते. या गोळ्यांची चव आणि परिणाम मला ठाऊक नसल्यामुळे आणि दररोज वृत्तपत्रात या जाहिराती पाहिल्यामुळे मला या गोष्टी वा या गोळ्या तयार करणाऱ्या आणि त्यांची एवढी जाहिरात करणाऱ्या लोकांविषयी खूपच राग आहे. मी तर यापुढे जाऊन असे म्हणेन की या औषधांच्या युगातील मी एक नाठाळ व्यक्ति आहे कारण मी क्वचितच औषधे अथवा गोळ्या घेतो. पण इतर लोकांना त्यांची गरज आहे आणि त्यांना मी वंचित करु इच्छीत नाही.

भारताविषयी विचार करावयाचा म्हटले तर जी वस्तुस्थिती आहे तिच्या आधारेच विचार करायला हवा. आपण कोणती एक घोषणा अथवा सूत्र पकडून त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करुन चालणार नाही. भारतात असो वा इतरत्र कोठेही, ज्या धोरणांमुळे लाभ होईल अशी धोरणेच यशस्वी होतील. याबाबतीत दुसरी कोणती कसोटी नाही. ढोबळ मानाने बोलायचे झाले तर एका बाजूला कम्युनिझमच्या अनेकविध शक्ती आणि दुसऱ्या बाजूला मी ज्यांना विशिष्ट नांव देऊ शकत नाही अशा शक्तींमधील हा संघर्ष आहे. मी त्याला भांडवलशाही म्हणणार नाही कारण त्यात अनेक प्रकारच्या अनेकविध छटा आहेत. खरोखर जगात ज्याची वाढ होत आहे तो एक प्रकारचा लोकशाही समाजवाद आहे. त्याची हळूहळू आणि कमी अधिक प्रमाणात वाढ होत आहे. या दोन्ही परस्परविरोधी शक्ती कोणत्याही असल्या तरी त्यांची खरी कसोटी रणांगणावर होणार नाही. त्यांची अंतिम कसोटी त्यांच्या फलश्रुतीवरुन होणार आहे.

आपण आपल्या समस्या होता होईल तेवढ्या वास्तववादी दृष्टिकोनातून समजून घेतल्या पाहिजेत. ज्या शब्दांमागे दीर्घकालीन इतिहास आहेत आणि जे मनात गोंधळ उडवतात ते शब्द आपण टाळले पाहिजेत. आपण जेव्हा ते वाद युक्तीवाद म्हणून मांडण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपण हरतो. भावनांचा उद्रेक होतो आणि


वस्तूस्थितीकडे दुर्लक्ष होते. जी व्यक्ती स्वत:ला समाजवादी म्हणवते तिचे स्वत:चे काही सर्वसाधारण दृष्टीकोन असतात काही उद्दिष्टे असतात. दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचे काही अगदी भिन्न दृष्टिकोन असतील. या दोन व्यक्तींना जर तुम्ही एकत्र आणलेत तर त्या परस्परांवर कठोर शब्दांचे प्रहार करतील आणि निष्पन्न काहीच होणार नाही. पण त्या समजा एकत्र आल्या आणि 'चला आपल्याला हे काम करावयाचे आहे' असे म्हणून कामाला लागल्या तर काहीतरी निष्पत्ती होण्याची शक्यता आहे. इथे भारतात आपल्याला खूप काही हवे आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य. खरे तर जीवनातील सर्व महत्वाच्या गोष्टी आपल्याला हव्या आहेत. त्या कशा मिळवायच्या? घोषणा करुन अथवा समाजवाद, भांडवलशाही अथवा इतर कोणत्या वादाविषयी ठराव करुन निश्चितच काही साध्य होणार नाही. आपल्याला साधन सामग्रीचे उत्पादन करावे लागेल आणि त्यांचे योग्य प्रकारे वितरण करावे लागेल. हे सारे योग्य प्रकारे कसे करावे याचा आपण विचार केला पहिजे.

अमेरिकन भांडवलशाहीमध्ये उत्पादन करण्याचे अद्भूत, खरे तर अतिशय प्रचंड सामर्थ्य आहे. अमेरिकन भांडवलशाहीचे हे सामर्थ्य सतत सारखेच नव्हते, ते बदलले आहे आणि बदलत आहे. शिवाय तिला हे साध्य करायला १५० वर्षे लागली. तिच्यापाशी प्रचंड आर्थिक साधनसंपत्ती असलेला प्रदेश आहे. इतर देशांना प्रगतीला अडथळा आणणारी जशी संघर्षाची पार्श्वभूमी होती तशी पार्श्वभूमी अमेरिकेला लाभली नाही. तेथे प्रचंड लोकसंख्या नव्हती अथवा सरंजामशाहीचे अवशेष नव्हते. तो एक विस्तीर्ण भूप्रदेश असलेला नवा देश होता आणि त्याने १५० वर्षांत विकासाची सध्याची पातळी गाठली आहे. म्हणून अमेरिकेने जे केले ते आपण करु या असे म्हणणे वेडगळपणाचे आहे. मला ते माझ्या मार्गाने करावेसे वाटते, पण मी ते कसे करावे? अमेरिकेला स्थिरस्थावर व्हायला आणि विकास करायला जशी १५० वर्षे मिळाली तशी १५० का १०० वर्षेही मला मिळणार नाहीत. मला तेवढा विस्तीर्ण भूप्रदेश आणि अडथळ्यांपासून व संघर्षापासून, अनमोल अशी मुक्तताही लाभणार नाही. मला तेवढा कालावधी नाही आणि तशाच संधीही लाभलेल्या नाहीत. भारत हा सर्व प्रकारच्या संघर्षाची पार्श्वभूमी असलेला मोठा देश आहे, अनेक प्रकारच्या शक्ती येथे कार्य करीत आहेत. मला माझ्या समस्या ताबडतोबीने अथवा निकटच्या भविष्यकाळांत सोडवायच्या आहेत, शंभरेक वर्षात नाही.

अमेरिकेतील खाजगी उद्योगधंद्यांनी हळूहळू विकास केला आणि आता त्यांना प्रचंड साधनसंपत्ती असलेल्या उद्योगधंद्यांचे स्वरुप प्राप्त झाले आहे. भारतातील खाजगी उद्योग धंद्यांपाशी तसे करण्याइतपत कुवत अथवा कर्तबगारी अथवा साधनसंपत्ती आहे काय? त्यांच्यापाशी कर्तृत्व आहे आणि साधनसंपत्ती आहे पण स्वत:च्या पायावर उभे राहून या परिस्थितीवर मात करण्याइतपत ताकद नाही. आपण हे करु शकत नाही हे

उघड आहे. आमचे खाजगी उद्योगधंदे नदी खोऱ्यांच्या योजना हाती घेऊन शकतात काय? घेऊ शकत नाहीत कारण त्या त्यांच्या कुवतीच्या पलिकडे आहेत. त्या योजनांपासून ताबडतोब लाभ मिळणार नाहीत. आपल्याला वर्षानुवर्षे वाट पहावी लागणार आहे.

✦



''आपल्या सर्व उपलब्ध साधन संपत्तीचा, विशेषतः स्वच्छेने दिलेल्या आणि योग्य दिशेने वापरलेल्या कमाल श्रमशक्तीचा समाजाच्या आणि व्यक्तीच्या कल्याणासाठी वापर करणे हा लोकशाहीवादी नियोजनाचा अर्थ आहे.''

३१. 'पाया रचण्याचे कार्य'

तीन दिवसांपूर्वी मी त्रावणकोर - क्रोचीन या भारतातील अती दक्षिणेच्या संस्थानात, देशातील काही निसर्गम्य प्रदेशात गेलो होतो. या संस्थानात उच्च शिक्षण घेतलेले लोक राहतात. देशात कुठेही इतरत्र इतके सुशिक्षित लोक राहात नाहीत. ते एक पुरोगामी संस्थान आहे आणि तेथे दोन महत्वाचे कार्यक्रम पार पाडतांना मला खूप आनंद झाला. संस्थानाच्या उत्तर आणि दक्षिण प्रदेशांना जोडणाऱ्या रेल्वे मार्गाने उद्घाटन आणि मोनेझाइटवर संस्कार करणाऱ्या कारखान्याचे उदद्घाटन असे ते दोन कार्यक्रम होते. तेथील एका अभयारण्यात जेथे सुसंस्कृत मानवापासून पशूंचे रक्षण करण्यात येते अशा ठिकाणी मी दोन दिवस एकान्तात व्यतीत केले.

भारताच्या त्या दक्षिणेच्या टोकावरुन मी उत्तरेला हिमालयापर्यंत पसरलेल्या विस्तीर्ण देशाचे चित्र डोळ्यापुढे रेखाटले आणि त्याच्या दिर्घ आणि चढउतार असलेल्या इतिहासाचा विचार केला. आम्हाला अद्भूत वारसा लाभलेला आहे पण त्याचे आम्ही कसे रक्षण करणार आहोत? ज्या देशाने आम्हाला एवढे काही दिले आहे त्याचे पांग आम्ही कसे फेडणार आहोत आणि त्याला महान् आणि सामर्थ्यवान कसे करणार आहोत?

आम्ही जेव्हा सभोवती जगाकडे पाहतो तेव्हा आम्हाला आशादायक असे खूपच आढळते. पण निराशा वाटावी असेही खूप आहे कारण तेथे भीती, द्वेष आणि हिंसाचार आहे, युध्दाची भाषा चालू आहे. जग ज्या पारितोषिकासाठी झटत होते ते पारितोषिक जेव्हा आवाक्यात आल्यासारखे दिसत आहे, तेव्हाच हे सारे घडत आहे. आम्ही जेव्हा आमच्या स्वतःच्या देशाकडे पाहतो तेव्हा चांगले आणि वाईट, त्याची उभारणी करण्यासाठी झटणाऱ्या प्रभावी शक्ती आणि त्याचबरोबर त्याला खंडित करणाऱ्या, त्याचे विघटन करु पाहणाऱ्या शक्तीही आपल्याला दिसून येतात. आपण एकूण जगाच्या भवितव्यावर परिणाम होईल असे काही फारसे करु शकत नाही. पण आपल्या ३६ कोटी लोकांचे भवितव्य घडविण्यासाठी मात्र धैर्याने प्रयत्न करु शकतो.

भारताच्या दृष्टीने देशाचे ऐक्य अबाधित राखणे ही पहिली आवश्यकता आहे. केवळ राजकीय ऐक्य नव्हे तर मनांचे आणि हृदयांचे ऐक्य हवे. देशाच्या ऐक्याला बाधा आणणाऱ्या संकुचित वृत्तीचा नाश करणारे आणि धर्माच्या नांवाखाली उभारण्यात

येणारे भेदाभेद अथवा राज्या राज्यांमधील अथवा कोणत्याही प्रकारचे भेदाभेद दूर सारणारे ऐक्य आपल्याला हवे आहे. आपली अर्थरचना आणि सामाजिक रचना कालबाह्य झाली आहे आणि आपल्या सर्व जनतेला भौतिक आणि आत्मिक दृष्टीने सुखदायक होऊ शकेल अशा रीतीने तिची फेररचना करणे अत्यंत अगत्याचे होऊन बसले आहे. या रचनेमध्ये मूलभूत स्थित्यंतर घडवून आणण्याचे, खाजगी नफ्याच्या अभिलाषेचे, आणि व्यक्तिगत लोभाचे वर्चस्व नसलेल्या समाजाची स्थापना करण्याचे उद्दिष्ट असलेल्या सामाजिक तत्वज्ञानाचा आपण स्वीकार केला पाहिजे. राजकीय आणि आर्थिक सत्तेचे योग्य वितरण झालेले आहे अशी समाजरचना आपण घडविली पाहिजे. सर्वांना समान संधी असलेल्या सहकारी तत्वांवर आधारलेल्या वर्गविहीन समाजाच्या प्रस्थापनेचे ध्येय आपण ठेवले पाहिजे. हे ध्येय साध्य करण्यासाठी आपण शांततामय पध्दतीचा आणि लोकशाहीच्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

आपण विज्ञानाच्या युगात जगत आहोत. आपण क्रान्त्यांविषयी ऐकतो आणि वाचतो पण विज्ञान ही गोष्ट गेल्या १५० वर्षांतील सर्वांत मोठी क्रांतिकारक शक्ती आहे. या शक्तीने मानवी जीवनात स्थित्यंतर घडवून आणले आहे आणि राजकीय, सामाजिक आणि आर्थिक संघटनांमध्ये बदल घडवून आणला आहे. ही प्रक्रिया वाढत्या वेगाने चालू आहे आणि आपण ती समजून घेतली पाहिजे आणि तिच्याशी जमवून घेतले पाहिजे.

नियोजन मंडळाने अडीच वर्षे परिश्रम करुन तयार केलेल्या पंचवार्षिक योजनेविषयी मी आपल्याशी बोलणार आहे. लोकसभेने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे आणि आता सर्व शक्तीनिशी तिची अंमलबजावणी करण्याची वेळ आली आहे. या योजनेत मी ज्या सामाजिक तत्वज्ञानाचा उल्लेख केला त्याला साकार रुप देण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या सर्व साधन सामग्रीचा आणि विशेषत: स्वेच्छेने दिलेल्या आणि योग्य दिशेने वापरलेल्या कमाल श्रमशक्तीचा, समाजाच्या आणि व्यक्तीच्या कल्याणासाठी वापर करणे हा लोकशाही नियोजनाचा अर्थ आहे.

मी काही मिनिटात तुम्हांला या योजनेविषयी जास्त काही सांगू शकणार नाही आणि तुम्ही या योजनेचा, किमानपक्षी तिच्या गोषवाऱ्याचा अभ्यास करावा असे मला वाटते कारण या योजनेचा तुमच्यापैकी प्रत्येकावर परिणाम होणार आहे आणि लोकशाही समाजामध्ये प्रत्येकाला आपली कार्ये समजली पाहिजेत आणि त्याने ती पूर्ण करण्यास मदत केली पाहिजे. ही योजना साहजिकच साऱ्या देशाची आहे पण तिच्यात प्रत्येक भागाचा, राज्याचा आणि छोट्या स्थानिक विभागांचाही स्वतंत्रपणे विचार करण्यात आला आहे. या योजनेत, राष्ट्रीय विकास कार्यामध्ये स्वयंसेवी संघटनांना आणि कार्यकर्त्यांनाही महत्वाची भूमिका पार पाडण्यासाठी भरपूर वाव आहे. आपल्या देशात सार्वजनिक क्षेत्र आहे आणि खाजगी विभाग आहे आणि या योजनेची उद्दिष्टे

पूर्ण होण्याच्या दृष्टीने सार्वजनिक विभागाचे जीवनावर नियंत्रण असणे आवश्यक आहे. शेतकी, उद्योगधंदे आणि सामाजिक सेवा या विविध कार्याचा सदर योजनेत सातत्याने विचार करण्यात आला आहे. शेतकी हे आपले प्रमुख कार्य राहणे भागच आहे. त्याच्यावर जास्तीत जास्त भर देण्यात आला आहे कारण शेतकीच्या समृध्दीच्या आधारेच आपण औद्योगिक प्रगती करु शकतो. पण देशाच्या समग्र अर्थरचनेत शेतकी बसविणे आवश्यक आहे. कोणत्याही आधुनिक देशाच्या निर्मितीसाठी छोट्या आणि बड्या उद्योगधंद्याची वाढ होणे आवश्यक आहे. खरे तर, औद्योगिक विकासाखेरीज आपल्या जनतेच्या राहणीमानात वाढ होणे अशक्य आहे अथवा आपल्या राष्ट्राला त्याच्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी पुरस्त सामर्थ्य जमा करणेही अशक्य आहे.


शेतकीच्या विकासासाठी योग्य जमिनविषयक धोरण स्वीकारणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक राज्यांत जमिनदारी आणि जंहागिरदारी पध्दती नष्ट करुन आम्ही या दिशेने थोडीशी प्रगती केली आहे. आपण हे कार्य पूर्ण केले पाहिजे, सर्व प्रकारचे मध्यस्थ नष्ट केले पाहिजेत आणि जमिन मालकीच्या प्रमाणाची मर्यादा निश्चित केली पाहिजे. आधुनिक शेतकी तंत्राचा लाभ घेऊ शकेल अशी सहकारी शेती पध्दती स्वीकारणे ही या पुढची पायरी आहे. दारिद्रयाविरुध्द लढायचे असेल आणि राहणीमान वाढवायचे वा उंचावयाचे असेल तर शेतकीचे आणि उद्योगधंद्याचे उत्पादन वाढविणे आवश्यक आहे आणि दारिद्रय निर्मूलन आणि जनतेच्या राहणीचे मान वाढविणे ही आपल्यापुढील निकडीची कार्ये आहेत.

आपण शांततापिय राष्ट्र आहोत आणि आपले सर्वसाधारण धोरण आणि आपली अर्थरचना शांततेच्या आणि शोषण टाळण्याच्या पध्दतीवर आधारण्यात येणार आहे. आपल्याला विकास करायचा आहे म्हणून आपल्याला समतोल अर्थरचनेची आणि होता होईल तेवढ्या प्रमाणात स्वावलंबनाची गरज आहे. आपल्या स्वदेशी बाजारपेठेचा विस्तार करण्यासाठी विशेषत्वाने काम करणे आपल्याला आवश्यक आहे कारण त्यामुळेच जनतेचे राहणीमान वाढणार आहे. स्वावलंबन वाढविण्यासाठी आणि रोजगार देण्यासाठी ग्रामीण आणि हस्त कारागिरीलाही अतिशय महत्वाचे स्थान देणे आवश्यक आहे.

आम्ही या योजनेद्वारे पुढे ठेवलेली काही उद्दिष्टे मी येथे सांगणार आहे. पहिले उद्दिष्ट अन्नाविषयीचे आहे. आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाले पाहिजे. आपल्या या निकडीच्या आवश्यकतेसाठी आपण इतर देशांवर अवलंबून राहता कामा नये. या योजनेद्वारे अंदाजे ८० लक्ष टन धान्याची आपण पैदास करणार आहोत. नव्या मोठ्या पाटबंधाऱ्यांच्या योजनांद्वारे ८० लक्ष एकर जमिनीला आणि छोट्या योजनांद्वारे १ कोटी १० लक्ष एकर जमिनीला पाणी पुरवठा करण्याचा आमचा विचार आहे. शिवाय ७० लक्ष एकर जमिन लागवडीलायक करण्यात येणार आहे. बड्या नद्या

जोडण्याची योजना तुम्हाला ठाऊक आहे. या योजनेमुळे जमिनीला पाणी पुरवठा करण्यात येईल आणि शिवाय उद्योग धंद्यांना १० लक्ष किलोटन हून अधिक वीज उपलब्ध करण्यांत येणार आहे. आज वीज हा सर्व विकासाचा पाया बनला आहे. आम्ही पाटबंधाऱ्यांच्या छोट्या प्रकल्पांना अधिक महत्व दिले आहे कारण त्यांच्यापासून त्वरित आणि विस्तृत प्रमाणावर लाभ होऊ शकतो.

✦



''शांतता हे एक सदैव पाठपुरावा करावा असे ध्येय आहे, याबाबतीत तुम्हाला कितीही थकवा आला तरी बेहेत्तर!''

३२. 'जनतेने निर्णय घ्यावा'

जम्मू आणि कश्मिर संस्थानाबाबत मी काही दिवसांपूर्वी सभागृहात बरेच सविस्तर निवेदन केले होते याची आपल्याला आठवण असेल. मी त्यावेळी जे बोललो त्याची पुनरुक्ती करुन मी सभागृहाला शीण देऊ इच्छित नाही. पण यावेळी मी या समस्येच्याबाबतीतील काही अंगावर विशेष भर देऊ इच्छितो.

गेली जवळ जवळ पांच वर्षे कश्मिर समस्या हे भारत सरकारच्या शिरांवरील एक अत्यंत जड असे ओझे होऊन राहिले आहे. ती एक जटील समस्या असल्यामुळे अतिशय जड झाली आणि आमच्या होकाराने अथवा नकाराने सुटणार नाही अशी ही समस्या आहे. तिच्यात इतर अनेक बाबीही गुंतलेल्या आहेत. या जगात अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या आपण बदलू इच्छितो पण आपण आपल्या मतानुसार जग घडवू शकत नाही. आपण ज्या काळाला जगाच्या शोकान्तिकेचा काळ असे म्हणता येईल अशा काळात सध्या राहत आहोत हे सभागृहाला चांगले ठाऊक आहे आणि आपण म्हणजे केवळ या सभागृहातील आपण नव्हे तर साऱ्या जगातील लोक ही शोकान्तिका टाळण्याचा आणि येनकेन प्रकारेण जगाला शांतता लाभावी असा प्रयत्न करीत आहेत. पण घटनाक्रमावर कोणीही संपूर्ण नियंत्रण ठेऊ शकत नाही. अर्थात प्रत्येक जण काही प्रमाणात घटनांना आकार देण्याचा, कोणत्या तरी प्रकारे त्यांच्यावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत असतो. पण कार्यप्रवृत्त असलेल्या अनेकविध शक्ती आणि भावना आणि पूर्वग्रह यांची अंतिम निष्पत्ती काय होईल हे कुणीही सांगू शकणार नाही. जम्मू – कश्मिर संस्थानाचे दुर्दैव आणि आमचे दुर्दैव हा जगाच्या विशाल चित्राचा एक अल्पसा का होईना पण एक भाग बनला आहे.

या समस्येच्या बाबतीत अनेक देशांनी रस घेतल्यामुळे आणि सल्ला मसलत केल्यामुळे आमच्या मार्गातील अडचणी अधिकच वाढल्या आहेत. ती एक आंतरराष्ट्रीय समस्या आहे आणि भारताखेरीज आणखी कुणा एका राष्ट्राचा तिच्याशी संबंध असला तरी आणि तसा तो असल्यामुळे ती एक आंतरराष्ट्रीय समस्या होणे स्वाभाविकच आहे. या समस्येबाबतीतील आमच्यावर पडणाऱ्या जबाबदाऱ्यांमुळे या आंतरराष्ट्रीय स्वरुपात अधिकच भर पडली आहे. या बाबतीत आमच्यावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत? भारताच्या या प्रदेशाचे कोणत्याही आक्रमणापासून संरक्षण करणे ही या बाबतीतील पहिली जबाबदारी होती. ही राष्ट्राची प्राथमिक जबाबदारी आहे. दुसरे

म्हणजे जम्मू आण कश्मिरच्या जनतेला आम्ही दिलेल्या वचनाचे पालन करणे हे आमचे कर्तव्य होते आणि हे वचन दुहेरी होते. आक्रमण आणि जुलूम जबरदस्ती आणि जाळपोळ, आक्रमणाबरोबर होणाऱ्या सर्व प्रकारांपासून त्यांचे रक्षण करणे ही आमची पहिली जबाबदारी होती. आणि दुसरे वचन आम्हीच आमच्या बाजूने त्यांना दिले होते. या जनतेने आपले भवितव्य अंतिमत: स्वत:च ठरवावे असा या वचनाचा अर्थ होता. आम्ही संयुक्त राष्ट्रांना दिलेल्या अभिवचनाचे पालन करावे ही आमची तिसरी जबाबदारी होती, आणि या समस्येच्या शांततामय सोडवणूकीसाठी कार्य करणे ही आमची चौथी जबाबदारी होती. आम्ही कुणालाही तसे वचन दिले नव्हते पण आम्ही अगदी सुरुवातीपासूनच अंगिकारलेल्या धोरणाचा तो अर्थ होता. आम्ही शांततेच्या ध्येयाशी एकनिष्ठ असल्यामुळे आम्ही शांततेच्या धोरणाचा पाठपुरावा करणे हे स्वाभाविकच आहे. शिवाय आपण ज्या जगात राहत आहोत ते जग आपत्तीच्या कड्यावर उभे असल्यासारखे दिसत असल्यामुळे आपल्या कोणत्याही कृत्यामुळे जग आपत्तीमध्ये कोसळू नये म्हणून आपण अत्यंत खबरदारी घेणे आवश्यक होते.

अशाप्रकारे आम्हाला हे चार हेतू डोळ्यापुढे ठेवावे लागले होते आणि काही वेळा त्यांच्यामध्ये तारतम्य राखणे आम्हाला कठीण झाले होते. काही वेळा ते विभिन्न दिशेला जाताहेत असे आम्हाला दिसून येत होते. या सर्व बाबींमधून जर एकच निष्कर्ष निघाला असता तर ते अधिक सोपे झाले असते. पण ते विभिन्न दिशेने नेणारे असल्यामुळे आमच्या जबाबदाऱ्यांचा विचार करता आम्हाला एकाच पध्दतीने नव्हे तर अनेक पध्दतीने कार्य करावे लागत होते. यामुळे अडचणी निर्माण झाल्या. आम्ही या अडचणींना तोंड दिले आणि अशा परिस्थितीत आम्ही काय करावे आणि काय करू नये हे ठरविणे आम्हाला कठीण झाले. म्हणून ही महत्वाची अभिवचने, आणि इतर सर्व बाबींमध्ये समतोल राखण्याच्या बाबतीत सभागृहाने विचार करावा असे मला वाटते.

आम्ही चार वर्षे आणि आठ महिन्यापूर्वी हा प्रश्न संयुक्त राष्ट्रांकडे नेला. या मार्गाने आम्ही शांततेच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करीत आहोत असा आमचा विश्वास होता आणि तेथे एखाद्या कराराव्दारे आम्ही कश्मीरचा प्रश्न साडवू शकू अशी आमची अपेक्षा होती. संयुक्त राष्टांनी आणि तिच्या अनेक संघटनांनी अनेक प्रयत्न केल्यानंतरही ही समस्या सुटली नाही. या समस्येच्या शांततापूर्ण तडजोडीसाठी कमालीची चिकाटी आणि संयम ज्यांनी दर्शविला त्या डॉ. फ्रँक ग्रॅहॅम यांना धन्यवाद देताना मी सभागृहात जे बोललो त्याची मी या ठिकाणी पुनरूक्ती करू इच्छितो. आमच्याबाबतीत बोलायचे तर, इतर लोकांना जरी त्याच मार्गाने वाटचाल करण्याचा कंटाळा आला असला तरी आम्ही त्यांना अखेरपर्यंत मदत करीत राहू. शांतता हे एक सदैव पाठपूरावा करावा असे उद्दिष्ट आहे. मग या बाबतीत तुम्हाला कितीही शीण आला तरी बेहतर! या देशातील आमच्या अनेक मित्रांना आणि सहकाऱ्यांना या

प्रक्रियेचा बराच शीण आला आहे असे दिसते पण कश्मिर समस्येचा पाठपूरावा जे लोक करीत आहेत त्यांच्या मानाने हा शीण काहीच नाही. दिवसामागून दिवस, आठवड्यांमागून आठवडे आणि महिन्यांमागून महिने गेले तरी आम्ही हे ओझे वाहत आहोत. आम्हाला जरी कितीही शीण आला तरी आम्ही उतावेळपणाने काही करू शकत नाही, संतापून काही करू शकत नाही, भावनांच्या आहारी जाऊ शकत नाही. भावनांच्या आहारी जाऊन काही करणे व्यक्तींच्या दृष्टीने वाईट असते आणि राष्ट्राच्या दृष्टीने तर ते अतिशय घातक असते. म्हणून आम्ही संयम पाळीत आहोत. सीमारेषेपलिकडून जरी आम्हाला युध्दाच्या आरोळ्या आणि धमक्या ऐकू आल्या तरीही आम्ही संयम बाळगला आणि या देशातील जनतेने आणि वृत्तपत्रांनीही संयम पाळला याबद्दल मला आनंद होतो. संयुक्त राष्ट्रांनी आमच्या विनंतीनुसार या प्रश्नात लक्ष घातले आहे आणि आम्ही जर संयुक्त राष्ट्रांकडे गेलो नसतो तर इतर कोणी त्यांच्याकडे गेले असते. आम्ही संयुक्त राष्ट्रांकडे सोपवलेला प्रश्न काढून घेतो असे सांगणे म्हणजे हाती काही न लागताच उतावीळपणा आणि संताप दर्शविण्यासारखे आहे. आपण काही साध्य करू अशी ज्यांना आशा वाटते त्यांचीही निराशा करण्यासारखे आहे. म्हणून आपण संयुक्त राष्ट्रांकडून सदर प्रश्न काढून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. पण भारत सरकारने आणि भारतीय संघ राज्याने संयुक्त राष्ट्रसंघटनेचाच त्याग करावा असा जर या सभागृहाने निर्णय घेतला तर गोष्ट निराळी!

संयुक्त राष्ट्रातील ज्या घडामोडी मला तिच्या सनदेशी, तिच्या इतिहासाशी आणि घोषित उद्दीष्टांशी विसंगत आहेत असे आढळून आले तेव्हा मी काही वेळा विनम्रपणे या घडामोडींबाबत टीका केली. पण संयुक्त राष्ट्रे जरी काही वेळा आपल्या ध्येयापासून काही प्रमाणात आड मार्गाला गेली असली आणि त्यांच्यात काही दोष असले तरी ती आजच्या जगाच्या रचनेतील एक मुलभूत, मौलीक बाब आहे असा माझा ठाम विश्वास आहे. ही संघटना नसणे किंवा ती विसर्जित करणे ही जगाच्या दृष्टीने एक अत्यंत दु:खद घटना ठरेल. म्हणून या आमच्या देशाने, जी एक प्रकारची जागतिक रचना हळूहळू विकसित होत आहे तिला कमजोर करण्याचे कोणतेही कृत्य करू नये अशी माझी इच्छा आहे. कदाचित आमच्या जीवनावधित खऱ्या अर्थाने जागतिक रचना अस्तित्वात येणार नाही पण अशी जागतिक रचना अस्तित्वात आल्याखेरीज गत्यंतरच नाही, तीच एक आशा आहे कारण मोठ्या प्रमाणावरील, अक्राळविक्राळ जागतिक संघर्ष हाच या जागतिक रचनेचा पर्याय आहे. म्हणून या जागतिक रचनेच्या सुरूवातीपासूनच ती कमजोर होईल असे आपण काही करता कामा नये. विशिष्ट संघटनेशी आपले कदाचित मतभेद होतील अथवा काही वेळा आपण तिच्यावर जशी टीका करतो तशी टीकाही करू ही गोष्ट निराळी.

कश्मिरच्या समस्येचा विचार करताना आपण वर्तमानकाळापुरताच विचार करता कामा नये. जेव्हा तेथे अस्वस्थता निर्माण झाली तेव्हापासून म्हणजे चार पांच वर्षापासून विचार केला पहिजे. खरे तर त्याही पूर्वीपासून म्हणजे कश्मिरमध्ये आपण राजेशाही विरूध्द लढा सुरू झाला त्या काळापासून, अठरा, एकोणीस वर्षापासून विचार केला पाहिजे. हे आंदोलन हळूहळू वाढत गेले आणि त्याने महाराजाच्या सत्तेला आव्हान दिले. या कालावधीत या लढ्याला साहजिकच अनेक चढउतार आले, लोकांना तुरूंगात टाकण्यात आले, गोळ्या घालण्यात आल्या. आमच्या स्वातंत्र्य लढ्यात जे आम्ही सोसले तेच सारे कश्मिरमध्ये घडून आले. कश्मिरमधील लोक तेव्हा स्वातंत्र्यासाठी लढत होते – एवढेच नव्हे तर भारतातील सर्वच संस्थानातील जनता स्वातंत्र्यासाठी लढत होती. पाकिस्ताचे पुढारी त्याकाळात काय करीत होते याची आठवण करणे उद्‌बोधक ठरेल. मुस्लीम लीगने सर्व संस्थानांतील राजेशाहीस पाठिंबा दिला होता. त्यांनी कदाचित उघडपणे हस्तक्षेप केला नसेल पण खाजगीरीतीने त्यांनी निश्चितच संस्थानिकांना साहाय्य केले, तेच कश्मिरमध्ये घडले. महाराजा हिंदू होता हे मला ठाऊक आहे पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुस्लीम लीगने त्याच्याशी दोस्ती केली होती आणि महाराजा तिला राष्ट्रीय आंदोलनाविरुध्द साहाय्य करीत होता. त्यांच्यात विशेष प्रेम होते असे नाही पण या प्रचंड राष्ट्रीय आंदोलनाला विरोध करावयाचा असल्यामुळे सर्व प्रकारचे प्रतिगामी गट या हेतूने एकत्र आणण्यात आले होते.

पण काहीही खटाटोप केले तरी राष्ट्रीय आंदोलनाला आव्हान करु शकेल अशी शक्ती उभी राहू शकली नाही. छोटे गट आणि तुरळक पक्ष होते पण हे परिणामकारक ठरु शकले नाहीत. या सर्व कालखंडात आणि कश्मिरवर आक्रमण होण्यापूर्वीपर्यंत मुस्लीम लीगच्या नेत्यांनी अनेकवेळा शेख अब्दुल्ला यांना आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न केला होता. हे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत कारण उभयतांचे दृष्टिकोन परस्परविरोधी होते. आपण आज कश्मिरच्या सन्माननीय सदस्यांचे भाषण ऐकले आहे आणि त्यांनी जी प्रवृत्ती दर्शविली आहे ती जातीयवादापासून अत्यंत भिन्न आहे. माझे मित्र श्री. अल्वा यांनी धर्मनिरपेक्ष शासनाविषयी बरेच काही सांगितले. आपण सध्या जे धर्मनिरपेक्ष शासन आहोत त्याहूनही अधिक धर्मनिरपेक्ष असावे असे मला वाटते. आपण आपल्या राज्य घटनेत जे आदर्श ठेवले आहेत ते साध्य करण्यासाठी झटावे असे मला वाटते. अनेक लोक त्या आदर्शावर हल्ले चढवित आहेत, अनेक जण त्यांचा पाडाव करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यांनी जरी उघड हल्ले चढविले नाहीत तरी ते त्यांचा पाडाव होईल अशी कृत्ये करीत असतात. वेगळ्या शब्दात सांगावयाचे तर या देशात जातीयवादी आणि संकुचित वृत्तीचे लोक खूपच आहेत. कश्मिरमध्ये जातीवाद आणि आम्ही शिरोधार्य मानलेल्या आदर्शामध्ये सरळ सरळ लढाई होती आणि आहे. भारत आंणि पाकिस्तान कश्मिरवर कब्जा ठेवण्यासाठी

लढत आहेत, जणू काही तो कोणी प्रबळ देशाने ताब्यात घ्यावा असा लूटीचा माल आहे असे समजणे अगदीच वेडगळ पणाचे आहे. कश्मिरमध्ये लोकानी एका मुलभूत तत्वासाठी लढा केला आहे. कश्मिरच्या जनतेने त्या ध्येयासाठी आमच्या फौजांपेक्षाही अधिक तीव्र संघर्ष केला आहे. आमच्या फौजा तेथे जाण्यापूर्वी तीन दिवस कश्मिरच्या खोऱ्यात तेथील सरकारला अनुकूल अशा शक्ती किंवा पोलीस नव्हते हे आपल्याला आठवत नाही काय? त्यावेळी तेथे सत्तेवर होते ते आपले चंबूगबाळे उचलून पळून गेले होते आणि शत्रू कश्मिर खोऱ्याच्या उंबरठ्यावरच जाळपोळ करीत होता आणि लूटमार करीत होता हे सांगायला मला अत्यंत दु:ख होते.

कश्मिरच्या खोऱ्यात त्यावेळी काय घडले? तेथील जनतेमध्ये जर आक्रमकांविषयी थोडीशी जरी सहानुभूती असती तरी सारे कश्मिर खोरे त्यांना सहजासहजी मिळाले असते. राष्ट्रीय ऐक्याची भावना आणि राष्ट्रीय जाणीव जर तेथील जनतेत नसती तर त्या प्रदेशाचे तुकडे तुकडे झाले असते. सरकारी यंत्रणा मोडून पडल्यामुळे तेथे प्रचंड गोंधळ आणि अराजक माजले असते. पण झाले उलटेच. कश्मिर खोऱ्यातील जनतेने तीन संपूर्ण दिवस शांतता राखली आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या नि:शस्त्र स्वयंसेवकांनी त्यांच्या देशभक्तीला आवाहन केले. रात्रंदिवस निगराणी ठेवली. श्रीनगरपासून केवळ सहा मैलावर शत्रू आला असतांनाही तेथील एकही दुकान बंद झाले नव्हते.

लोक जेव्हा सार्वमताविषयी बोलतात आणि भारताने कश्मिरवर जबरदस्ती केली आहे असा दोषारोप करतात तेव्हा त्यांनी मी जे सांगितले ते लक्षात ठेवावे. मौलाना मसूदी यांनी म्हटल्याप्रमाणे कश्मिरमध्ये जर सार्वमत घेतले तर सध्याच्या सरकारचाच विजय होईल यात मला तरी काही शंका वाटत नाही.

आक्रमणाविषयी आणि त्यानंतर काय घडले याविषयी बाकीची सर्व हकीकत आपल्याला ठाऊक आहे. हे सर्व घडल्यानंतरही परदेशातील आमचे काही मित्र जे बोलतात, लिहितात आणि ज्या प्रकारे वागतात ते पाहून मला मोठे आश्चर्य वाटते. या घटनांविषयीचे त्यांचे ज्ञान मर्यादित आहे हे मी समजू शकतो पण ज्या निर्धास्तपणाने ते आम्हाला कायदे सांगतात आणि काही वेळा ज्या धाष्टर्याने ते आम्हाला उपदेश करतात ते सारेच आम्हाला आश्चर्यकारक वाटते.

✦

''अमेरिका हा देश दूरवरच्या भारतालाही अपरिचित नाही आणि आमच्यापैकी अनेकजण या देशाला ज्या ध्येयांनी आणि उद्दिष्टांनी थोरवी प्राप्त करुन दिली त्या उद्दिष्टांची उपासना करीत वाढलो आहोत.''

३३. 'एक शोधयात्रा'

मी या देशात (अमेरिकेत) तुमच्या प्रचंड यशापासून काहीतरी शिकावे म्हणून आलो आहे. माझ्या जनतेचे अभिवादन कळविण्यासाठीही मी येथे आलो आहे. माझ्या भेटीमुळे आपल्या उभय देशांमधील सामंजस्य अधिक भक्कम होण्यास सहाय्य होईल अशी मला आशा वाटते. आपल्या उभय देशांना निबध्द करणाऱ्या भौतिक बंधांपेक्षाही अधिक मजबूत असलेले अदृष्य बंध माझ्या भेटीमुळे अधिक दृढ होतील अशी मला आशा वाटते. आपल्या अध्यक्षांनी परवा केलेल्या भाषणात माझी ही भेट म्हणजे एक शोध यात्रा आहे असे मोठे सूचक उद्‌गार काढले आहेत. अमेरिका हा देश दूरवरच्या भारतातही अपरिचित असा देश नाही आणि आमच्यापैकी अनेकजण ज्या ध्येयांनी आणि उद्दिष्टांनी या देशाला थोरवी प्राप्त करुन दिली आहे त्यांची उपासना करीतच वाढलो आहोत. पण आपल्याला जरी उभय देशांचा इतिहास आणि काही प्रमाणात संस्कृती ठाऊक असली तरी आवश्यकता आहे, ती खऱ्या सामंजस्याची आणि ज्या बाबतीत आपले मतभेद आहेत त्याबाबतीत परस्परांचे दृष्टिकोन समजून घेण्याची. याच सामंजस्यामधून समान उद्दिष्टांसाठी फलदायक सहकार्याची वाढ होते. आज जगात सर्वात अधिक वाण जर कशाची असेल तर ती राष्ट्राराष्ट्रांमधील आणि जनसमुदायांमधील सामंजस्याची. म्हणून मी येथे आलो आहे अमेरिकेच्या मनाचा आणि अंत:करणाचा शोध घेण्यासाठी आणि आमचे मन आणि अंत:करण आपल्यापुढे खुले करण्यासाठी. अशाप्रकारे आपण सामंजस्य आणि सहकार्य वाढवू शकू. आपल्या उभय देशांची तीच उत्कट इच्छा आहे अशी मला खात्री आहे. आपण माझे हार्दिक स्वागत केले आणि त्याचा माझ्यावर चांगलाच प्रभाव पडला आहे. खरे तर मी या स्वागतामुळे गहिंवरून गेलो आहे.

वॉशिंग्टनमधील माझ्या गेल्या दोन दिवसांच्या मुक्कामात मी या राष्ट्राच्या थोर उभारणीकारांच्या स्मारकांना भेट दिली. मी केवळ उपचार म्हणून या स्मारकांना भेट दिली नाही तर ती माझ्या अंत:करणात कोरलेली होती आणि या स्मारकांनी मला आणि माझ्याप्रमाणेच अनेक देश बांधवांना स्फूर्ती दिली आहे. ही स्मारके म्हणजे खऱ्या अर्थाने देवालयेच आहेत आणि प्रत्येक पिढीने त्यांना भेट दिली पाहिजे आणि केवळ या देशाच्याच नव्हे तर जगाच्या स्वातंत्र्याची मशाल ज्या थोर नेत्यांनी धारण केली त्या

मशालीचा थोडासा अंश तरी या पिढ्यांनी आपल्या मनांत जतन केला पाहिजे. कारण जे खऱ्या अर्थाने थोर आहेत त्यांचा संदेश एखाद्या विशिष्ट देशापुरता सीमित राहात नाही तर तो साऱ्या जगासाठी असतो. अमेरिकेने गेल्या दीड शतकात स्वातंत्र्यासाठी आणि अतुलनीय अशा समृध्दीसाठी संघर्ष केला आहे आणि ते एक बलाढ्य आणि बडे राष्ट्र बनले आहे. भौतिक सुबत्ता आणि वैज्ञानिक आणि तंत्रविषयक प्रगतीचा एक चकित करुन सोडणारा इतिहास तिच्या पाठीशी आहे. अमेरिकेच्या इतिहासाच्या प्रारंभ काळांत घालून दिलेल्या उदात्त तत्वांशी ती जर निबध्द राहिली नसती तर तिला हे साध्य करता आले नसते कारण भौतिक प्रगतीला जर नैतिक तत्वांचा आणि उदात्त आदर्शाचा पाया नसेल तर ती फार काळ टिकू शकत नाही अथवा चालू शकत नाही.

तुमच्या स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्यांत ही तत्वे आणि आदर्श ग्रंथीत करण्यात आली आहेत. सर्व मानव समान जन्माला आले आणि निर्मात्याने त्याला काही जन्मसिध्द अधिकार बहाल केले आहेत. जीवनाचा, स्वातंत्र्याचा आणि सौख्याचा पाठपुरावा करण्याचा अधिकार यात समाविष्ट आहेत हे स्वयंसिध्द सत्य या जाहिरनाम्यात नमूद करण्यात आले आहे.

भारताचा आवाज याहून निराळा आहे यात काही शंका नाही. तो पुरातन युरोपचा आवाज नाही तर अधिक पुरातन आशियाचा आवाज आहे. एका पुरातन संस्कृतीचा.तो वैशिष्ट्यपूर्ण जोमदार आवाज आहे. पण त्यात नविनता आहे आणि तुमच्या कडून आणि इतर पाश्चिमात्य देशांकडून आम्ही बरेच काही शिकलो आहोत. म्हणून तो आवाज जुना आहे आणि नवाही आहे, त्याची सखोल मुळे भूतकाळात आहेत पण त्यात आजची गतीमानताही आहे.

पण अमेरिका आणि भारत यांच्या आवाजात कितीही भिन्नता आढळली तरी त्यांच्यात बरेचसे साम्यही आहे. तुमच्या प्रमाणे आम्हीही क्रांतीद्वारे स्वातंत्र्य हस्तगत केले आहे. आमच्या पध्दती वेगळ्या होत्या एवढेच! तुमच्या प्रमाणे आमचेही संघीय तत्वावर आधारलेले प्रजासत्ताक होणार आहे. ही या महान प्रजासत्ताकाच्या संस्थापकांची देणगी आहे. तुमच्या विशाल प्रजासत्ताकाप्रमाणेच भारतासारख्या विस्तीर्ण देशात केंद्रीय नियंत्रण आणि राज्यांची स्वायतता यात संतुलन राखणे आवश्यक होऊन बसते आहे. ज्या लोकांना स्वातंत्र्य, समानता आणि प्रगती प्रिय आहे अशा सर्व लोकांना हवे असलेले मुलभूत अधिकार – व्यक्ति स्वातंत्र्य, मानवांमधील समानता आणि कायद्याचे राज्य यांना आम्ही आमच्या राज्यघटनेमध्ये अग्रस्थान दिले आहे. अशाप्रकारे आम्ही आमच्या संस्थांमध्ये आणि त्याच बरोबर आमच्या जनतेच्या विचारांमध्ये लोकशाहीची मूळे सखोल रुजवून स्वतंत्र राष्ट्रांच्या समुहात प्रवेश केला आहे.

आम्ही राजकीय स्वातंत्र्य हस्तगत केले आहे पण आमची क्रांती अद्याप पूर्ण

झालेली नाही, अद्यापही तिची प्रगती होत आहे कारण जीवनाचा आणि सुखाचा पाठपुरावा करण्याचा अधिकार मिळाल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याने जनतेचे समाधान होणार नाही. आर्थिक प्रगतीशिवाय या अधिकारांची अमंलबजावणी होऊ शकत नाही. म्हणून आमच्या जनतेच्या राहणीमानात सुधारणा करणे, राष्ट्राच्या आर्थिक वाढीच्या आड येणारे सर्व अडथळे दूर करणे हे आमच्या पुढील निकडीचे कार्य आहे. आज आम्ही आशियातील प्रमुख समस्या बनलेली आणि भारताची प्रमुख समस्या, शेतकीची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या जमिन मालकीच्या पध्दतीमध्ये जे सरंजामदारीचे अवशेष होते ते नष्ट करण्यात येत आहेत. जमिन कसणाऱ्याला श्रमाचा मोबदला मिळाला पाहिजे आणि जमिनीची मालकी त्याच्याकडे असावी अशी आम्ही खबरदारी घेत आहोत. ज्या देशात अद्यापही शेतकी हाच प्रमुख उद्योग व्यवसाय आहे अशा देशात ही सुधारणा आवश्यक आहे. केवळ व्यक्तीच्या सुखासमाधानासाठी नव्हे तर समाजाच्या स्थैर्यासाठीही ही सुधारणा आवश्यक आहे. जगातील काही भागातील आणि विशेषतः आशियातील सामाजिक अस्थैर्याचे कारण शेतकी क्षेत्रातील असमाधानात सामावलेले आहे. आधुनिक जगाच्या दृष्टीने अत्यंत विसंगत असलेल्या जमिनीच्या मालकीच्या पध्दतीमुळे ही स्थिती निर्माण झाली आहे. बहुजन समाजाचे खालावलेले राहणीमान हे आशिया आणि आफ्रिकेतील मोठ्या भागामधील सामाजिक अस्थैर्याचे आणखी एक महत्वाचे कारण आहे.

✦



''भारताची उभारणी करणे आणि काहीही करुन आमच्यापुढील समस्या सोडविणे ही आजची आमच्यापुढील सर्वांत मोठी चिंतेची बाब आहे आणि बलवत्तर इच्छा आहे.''

३४. 'मैत्रीपूर्ण सहकार्य'

आशिया हा एक घटक आहे अशी बरीच चर्चा चालू आहे. एका अर्थी आशिया हा एक भौगोलीक घटक आहे. इतर अनेक प्रकारेही आशिया हा एक घटक आहे. पण मुख्यतः तो एका विधायक अर्थाने एक घटक बनला होता. वास्तविक पाहता जवळ जवळ सर्व आशिया विविध युरोपियन राष्ट्रांची वसाहत बनला होता असे मला म्हणावयाचे आहे. या अर्थाने तो एक घटक होता. युरोपियन साम्राज्यवाद्यांविरुध्द ज्या वाताहतिक प्रदेशातील अनेकविध जनसमुदाय स्वातंत्र्यासाठी लढत होते असे हे खंड होते. या लढ्यांमुळे आणि त्यांच्या उद्दिष्टांतील साधर्म्यामुळे तो एक घटक बनला होता. पण त्याचबरोबर येथे अनेक प्रकारची विभिन्नताही आढळून येते. आशिया हा एक एकसंघ घटक आहे असे समजणे तितकेसे बरोबर नाही. चिनी लोक आणि पश्चिम आशियातील लोक यांच्यामध्ये फारच कमी साम्य आहे. त्यांची सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि इतर पार्श्वभूमीही अगदी विभिन्न आहे. अशाच प्रकारे आशियातील इतर प्रदेशही अलग अलग आहेत. अतिपूर्व प्रदेश, मध्यपूर्व, आणि अरबी आणि इराणी आणि बाकीचे प्रदेश आशियाखंडात आहेत. यापैकी कोणत्याही प्रदेशाचा विचार केला तरी भारताचा या संदर्भात विचार करणे अपरिहार्य ठरते. अरब जगाचा चिनी जगाशी अथवा आग्नेय आशियाची विशेष संबंध येत नाही. कदाचित काही थोडा संबंध येईल पण जास्त नाही. पण भारताचा चिनी जगाशी आणि आग्नेय आशियाशीही तितकाच निकटचा संबंध आहे. भौगोलीक दृष्ट्या भारत आसाच्या ठिकाणी आहे. रणनितीच्या आणि इतर अनेक दृष्टिकोनातून पहिले तर भारत केंद्रस्थानी वसलेला आहे.

आम्हाला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात नेतृत्वाची भूमिका पार पाडण्याची इच्छा नाही हे मी सांगितलेच आहे. परिस्थितीनेच जर आम्हाला भाग पाडले तर आम्हाला तशी भूमिका पार पाडावी लागेल. भारताला आशियाचे नेतृत्व करण्याची इच्छा आहे अशी लोक चर्चा करतात. आम्हाला कोठेच कुणाचे नेतृत्व करण्याची इच्छा नाही. भारताची उभारणी करणे आणि येनकेन प्रकारेण आमच्या पुढील समस्या सोडविणे ही आजची आमच्या पुढील एक अत्यंत चिंतेची बाब आहे आणि बलवत्तर इच्छा आहे आणि यानंतर आशियात आणि जगाच्या इतर भागात आम्ही जी उदात्त उद्दिष्टे उराशी बाळगली आहेत ती साध्य करण्यासाठी झटणे आणि संयुक्त राष्ट्रात वा इतरत्र, इतर

देशांशी सहकार्य करणे ही आमची मनिषा आहे. आम्हाला हवे असो वा नसो, आम्ही एकाकी राहूच नाही हे आम्हाला कळले आहे. कोणताही देश तसा राहू शकत नाही. आम्ही तर निश्चितच राहू शकत नाही. आमचा भूगोल, आमचा इतिहास, विद्यमान काळातील घटना हे सारे आम्हाला विशाल चित्राकडे खेचून नेते.

सुरुवातीच्या काळातील अमेरिका आणि भारत यांच्यामध्ये काही प्रमाणात साम्य आहे हे माझ्या लक्षात आले आहे काय? असे मला विचारण्यात आले आहे. येथे एक मोठा देश वाढत आहे या अर्थाने साम्य आहे. तिच्या भोवती विशेषतः दक्षिणेला काही छोटे देश होते आणि उत्तरेकडील या बलदंड देशाचा त्यांच्यावर आर्थिक आणि इतरही बाबतीत प्रभाव पडत होता. म्हणून भारतासारख्या मोठ्या देशाच्या अस्तित्वाचा बाजूच्या देशांवर तसाच प्रभाव पडतो काय असेही मला विचारण्यात आले. याबाबतीत उभय देशांत साम्य नाही. पण तरीही काही प्रमाणात साम्य आहे. आम्हाला आवडो वा ना आवडो भारतीय उपखंडात आम्हाला महत्वाची भूमिका पार पाडावी लागत आहे. आम्हाला ते आवडत नाही कारण आमच्या शिरावर आमचीच भरपूर ओझी आहेत आणि त्यात आम्ही भर घालू इच्छित नाही. पण मी म्हटल्याप्रमाणे आम्ही या बाबतीत दुसरे काहीच करु शकत नाही. भारताला आग्नेय, दक्षिण, पश्चिम आशियात उल्लेखनीय आणि महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. जर भारताने ही भूमिका योग्य रीतीने पार पाडली नाही तर तो नकळत निर्माल्यवत होऊन जाईल.

✦



''आपण पूर्व आणि पश्चिम, पौर्वात्य आणि पाश्चिमात्य असे म्हणतो, पण या विभागणीत वास्तवता फारच थोडी आहे.''

३५. 'नवचैतन्यशाली आशिया'

कॅनडाच्या संसदेपुढे केलेले भाषण, ओटावा – आक्टोबर १९४९

या महान् राष्ट्राच्या राजधानीला भेट देतांना आणि भारत सरकारच्या आणि जनतेच्या वतीने आपल्याला अभिवादन करतांना आणि सदिच्छा व्यक्त करतांना मला आनंद होतो. गेल्या बारा महिन्यात मला आपले पंतप्रधान सेंट लॉरेन्स आणि तुमचे परराष्ट्रमंत्री पीअर्सन, यांच्याशी महत्वाचा विचार विनिमय करण्याचे सद्भाग्य लाभले होते. आम्ही अनेक महत्वाच्या बिकट समस्यांवर विचार विनिमय केला आणि प्रत्येक प्रश्नाबाबत आमचे आणि कॅनडाचे दृष्टिकोन समान आहेत अथवा निकटचे आहेत हे मी सांगितले तर मी काही गुपित सांगतो आहे असे नाही. विशेषत: गेल्या एप्रिल महिन्यात लंडन येथे भावी काळात राष्ट्रकुलाशी संबंध कसे ठेवावेत याविषयी विचार करण्यासाठी भरलेल्या पंतप्रधानांच्या बैठकीत तुमच्या सरकारने आणि त्याच्या प्रतिनिधींनी दाखविलेल्या सामंज्यस्याचा मी या संदर्भात उल्लेख करु इच्छितो. तुमचे नेते सर जोन मॅक्डोनाल, सर विल्फ्रेड लॉरियर आणि तुमचे माजी पंतप्रधान मॅकेन्झी किंग यांच्या उदात्त परंपरेला शोभेल अशीच ही वृत्ती आहे. संपूर्णपणे स्वतंत्र राहून, कोणत्याही बाह्य नियंत्रणाने बध्द न होता राष्ट्रकुलाशी सहकार्य करण्याची ती परंपरा आहे. कॅनडा हा देश या संबंधांच्या उत्क्रांन्तीचा एक प्रणेता आहे. स्वतंत्र आणि समान राष्ट्रांचा एक संघ या नात्याने राष्ट्रकुलाची उभारणी करणारे ते एक राष्ट्र आहे. भारत लवकरच प्रजासत्ताक राष्ट्र होणार आहे हे तुम्हाला ठाऊक आहे. पण तरीही तो राष्ट्रकुलाचा सदस्य राहणार आहे. म्हणून आमचा दर्जा बदलला तरी आपल्या गतकाळातील सहकार्यात खंड पडणार नाही अथवा त्यात बदल होणार नाही. उलट ते अधिकच मजबूत होईल कारण स्वतंत्र लोकांच्या स्वेच्छेच्या वृत्तीतूनच सामायिक कार्याचा उगम होतो. राष्ट्रकुलाच्या इतिहासातील ही घटना अद्वितीय अशीच आहे. जगात इतरत्र आणि कोणत्याही काळात असे घडलेले नाही. जगातील शांततेच्या आणि समृध्दतेच्या मार्गावरील ही एक महत्वाची घटना आहे.

कॅनडा हा एक प्रचंड देश आहे आणि त्याच्या कक्षा खंडांना भिडणाऱ्या आहेत. ॲटलांटिक पार केला की तो युरोपला भिडतो आणि पॅसिफिक महासागर पार केला की आशिया खंडाशी त्याचा संबंध येतो. गतकाळातील इतिहासावरुन तुमचा युरोपातील घटनांशी एवढा निकटचा संबंध कसा आला हे यावरुन ध्यानात येते.

आम्हाला आशिया खंडात एवढे सखोल स्वारस्य का हे इतिहासावरुन आणि भौगोलीक कारणावरुन दिसून येते. पण आजच्या जगामध्ये तुम्ही काय किंवा आम्ही काय, राष्ट्राच्या अथवा विशिष्ट खंडापुरते सीमित राहूच शकत नाही. या दृष्टीने जग फारच लहान आहे. आपण जर परस्परांशी सहकार्य केले नाही आणि शांततेने राहिलो नाही तर आपण एकमेकांवर कोलमडून पडू आणि परस्परांचे नरडे पकडू.

आपण पूर्व आणि पश्चिम आणि पौर्वात्य आणि पाश्चिमात्य असे म्हणतो पण प्रत्यक्षात या विभागणीला विशेष अर्थ नाही. वस्तुतः कथित पूर्व भौगोलिक दृष्ट्या तुमच्या पश्चिमेला आहे. गेल्या दोनशे अथवा तीनशे वर्षात काही युरोपियन राष्ट्रांत औद्योगिक संस्कृतीचा विकास झाला आणि ती राष्ट्रे अद्यापही शेतीप्रधान असलेल्या आशियायी राष्ट्रांपासून अनेक प्रकारे विभिन्न झाली. तंत्रविषयक प्रगतीने त्यांना लाभलेल्या ताकदीमुळे त्यांच्या संपत्तीत आणि सत्तेत भर पडली आणि वसाहतवादाचे आणि साम्राज्यवादाचे नवे युग सुरु झाले. आशियाचा मोठा भाग या काळात युरोपातील काही देशांच्या वर्चस्वाखाली आला. इतिहासाच्या दूर पल्ल्याच्या दृष्टीने हा कालखंड छोटासाच होता आणि आपण सध्या त्याचा अंत होतांना पाहत आहोत. गेल्या दीडशे वर्षात जो साम्राज्यवाद चरम सीमेवर होता, तो आता नष्ट होत आहे आणि सध्या तो काही देशांतच रेंगाळत आहे. या उरलेल्या देशांतील साम्राज्यवादाचाही लवकरच अंत होईल आणि तो जेवढा अधिक लवकर होईल तेवढे शांततेच्या आणि जागतिक सुरक्षिततेच्या दृष्टीने चांगले होईल.

आज जगातील खंडांची जननी आणि इतिहासातील प्रमुख संस्कृतीचे माहेरघर असलेल्या आशियात नवचैतन्य निर्माण होत आहे. त्याला नव्याने प्राप्त होत असलेले स्वातंत्र्य खळबळ माजविणारे आहे. कारण गेल्या दोन शतकात त्याची वाढ खुंटली होती. सर्वत्र नैराश्य पसरले होते. आणि नव्या शक्ती निर्माण होत होत्या. या शक्ती मुख्यतः राजकीय स्वातंत्र्य मिळवू इच्छिणाऱ्या राष्ट्रवादी शक्ती होत्या पण त्यांच्या पाठीशी बहुजन समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची बलवत्तर इच्छा असलेल्या शक्तीही होत्या. जेथे राष्ट्रवादाला अडथळा निर्माण करण्यात आला तेथे संघर्ष निर्माण झाला आणि आग्नेय आशियात आज संघर्ष निर्माण झाला आहे तसा तो निर्माण होतो. आग्नेय आशियातील आजची अस्थिर परिस्थिती हा एखाद्या वैचारिक संघर्षाचा भाग आहे असे मानणे ही एक भयानक चूक ठरेल. जगाच्या या भागातील सर्व असंतोष आणि अस्वस्थता खरे पाहिले तर स्वातंत्र्याला निर्माण केलेल्या अडथळ्यांचा आणि बेसुमार दारिद्र्याचा परिपाक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीला गती देणे आणि त्या मार्गातील अडथळे दूर करणे हाच यावरील उपाय आहे.

हे जर साध्य झाले तर आशिया शांततेचा आणि स्थैर्याचा एक प्रमुख घटक बनेल. आशियाचे तत्वज्ञान हे शांततेचे तत्वज्ञान होते आणि आहे. ✦

"आपल्याला आवश्यकता आहे शांततेच्या प्रवृत्तीची, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सुसंस्कृतपणे वागण्याची."

३६. 'शांततेची प्रवृत्ती'

ब्रिटीश नभोवाणीवरील भाषण, लंडन, १२ जानेवारी १९५१

मित्रांनो, इंग्लंडला येण्यात मला नेहमीच आंनद होतो. माझे येथे अनेक मित्र आहेत. येथे आल्यावर माझ्या गतकाळातील अनेक स्मृती माझ्या भोवती वावरत असतात. म्हणून येथे पुन्हा एकदा येण्याची संधी मिळाली तर मला आंनद होतो. पण आज जगावर जे अरिष्ट कोसळले आहे आणि आपल्यापैकी प्रत्येकाला जे ओझे वाहावे लागत आहे त्यामुळे माझ्या या आनंदाला ग्रहण लागले आहे. त्यामुळे मला तुमच्याशी बोलतांना जरा अवघडल्यासारखे वाटत आहे. पुन:पुन्हा तेच ते सद्विचार बोलून दाखविण्यात विशेष काही अर्थ नाही. माझ्या सध्याच्या अवस्थेमध्ये आपल्यापुढे असलेल्या अनेक गंभीर बाबींविषयी स्पष्टपणे बोलणे मला तितकेसे सोपे वाटत नाही. माझ्या येथील मित्रांशी संबंधित असलेल्या बाबींविषयी बोलणे मला शोभण्याजोगे नाही पण इंग्लंडमधील सार्वत्रिक मित्र भावनेमुळे मी ज्या मित्रांचा दृष्टिकोन समान आहे आणि जे विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सहकार्य करु इच्छीतात अशा मित्रांशी बोलण्याचा धीर करीत आहे.

ते उद्दिष्ट कोणते? आज युध्द लांबवणे आणि शांतता राखणे हेच ते उद्दिष्ट आहे. माझ्या पिढीतील बहुतेक जणांनी आपल्या जीवनाचा मोठा भाग व्यतीत केला आहे. आमचे आता फार थोडे दिवस राहिले आहेत. आमच्या पिढीचे कार्य होते याला आता विशेष महत्व नाही. पण इतर लक्षावधी लोकांच्या आणि एकूण जगाच्या दृष्टीने त्याला मोठे महत्व आहे. आज साऱ्या जगातील लक्षावधी लोक एका प्रकारच्या निलंबित मृत्यूदंडाच्या धाकाखाली असल्यासारखे वावरत आहेत आणि दररोज जनतेच्या मनात युध्द अपरिहार्य आहे अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्यात येत आहे. आपण सर्वजण असाहाय्यपणे या कडेलोटाकडे लोटले जात आहोत. जबाबदारीच्या पदावरील अधिकाधिक लोक भावनावेगाने, सूडाची आणि प्रतिटोल्याची भाषा बोलत आहेत. ते सुरक्षिततेची भाषा बोलतात पण सारी सुरक्षितता नष्ट होईल अशा प्रकारे वागत असतात. ते शांततेची भाषा बोलतात पण युध्दाच्या दृष्टीने विचार करतात आणि कृती करतात.

आपण ही घसरगुंडी थांबवू शकत नाही इतके का आपण असाहाय्य आहोत? आपण ती थांबवू शकतो अशी मला खात्री वाटते. कारण सर्व देशातील विशाल बहुजन

समाजाला शांतता हवी आहे. मग अशा परिस्थितीत उघड उघडपणे त्यांच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या शक्तींनी त्यांना विरुध्द दिशेला काय म्हणून ढकलावे? राजकारणी आणि मुत्सद्दी मंडळी काळजीपूर्वक शब्दरचना केलेली सूत्रे शोधून काढून राजकारणाच्या तंत्राद्वारे शांततेसाठी प्रयत्न करीत असतात. गेले दहा दिवस राष्ट्रकुलातील देशांचे पंतप्रधान या जागतिक शांततेची समस्या सोडविण्यासाठी झटत आहेत. आम्हा सर्वांना मनापासून शांतता हवी आहे. आमच्या परिश्रमामुळे आम्हाला हवे असलेले इप्सित साध्य करण्यास साह्य होईल अशी मला आशा वाटते. पण केवळ सूत्रापेक्षा अधिक काही तरी हवे आहे असे मला वाटते. आम्हाला आवश्यकता आहे शांततेच्या वृत्तीची आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सुसंस्कृतपणे वागण्याची. आम्हाला शांततेची प्रवृत्ती हवी आहे. जाताजाता शांततेचा उल्लेख करणारी युध्दाची प्रवृत्ती नको आहे.

मी विशेषत: या शांततेच्या प्रवृत्तीकडे माझे आणि तुमचे मन वळवू इच्छीतो. आपण एका आंतरराष्ट्रीय अरिष्टाच्या भोवऱ्यात सापडलो आहोत आणि मानवी मनामध्ये निर्माण झालेले अरिष्ट हे आज आपल्यापुढे उभे ठाकलेले अरिष्ट आहे. आपण एक महान संस्कृती उभारली आहे आणि तिच्या सिध्दी अतुलनीय आहेत. भविष्यकाळात ही संस्कृती याहूनही मोठ्या सिध्दी हस्तगत करणार आहे. पण या भौतिक सिध्दी जरी खूपच प्रचंड असल्या तरी कोणत्याही कारणाने का होईना आपण या संस्कृतीच्या गाभ्यापासून दूर चाललो आहोत. अखेर शेवटी संस्कृती आणि सभ्यता माणसाच्या मनामध्ये आणि माणसाच्या वागण्यामध्ये वसत असते. आपल्या भोवती पसरलेल्या तिच्या भौतिक प्रदर्शनामध्ये ती वसत नसते. युध्दाच्या काळात सुसंस्कृतपणाची प्रक्रिया बंद पडते आणि आपण मानवी मनाच्या कोणत्या तरी रानटीपणाच्या अवस्थेत जाऊन पोचतो. आपण मनाच्या या रानटी अवस्थेकडे वेगाने जात आहोत काय?

आपल्याला जर शांततेची इच्छा असेल तर आपण शांततेची प्रवृत्ती जोपासली पाहिजे आणि ज्यांना आपल्या विषयी शंका वाटते अथवा ज्यांना आपण त्यांचे विरोधक आहोत असे वाटते त्यांना आपण जिंकून घेतले पाहिजे. आपल्याला इतरांनी समजून घेतले पाहिजे. भारत आणि इंग्लंडचे उदाहरण आपल्यापुढे आहे आणि ते उभयतांना अभिमान वाटावा असेच उदाहरण आहे. आपण उभयतांनी दीर्घकाळ सतत संघर्ष केल्यानंतरही या मूलभूत शांततेच्या प्रवृत्तीनेच आपल्या समस्यांचा विचार केला आणि आपण त्या सोडविल्या, एवढेच नव्हे तर अथांग सामंजस्य आणि मित्रभाव निर्माण करुन ठेवला. राष्ट्रांच्या संबंधात जेव्हा आपल्यापुढे अरिष्ट निर्माण होईल तेव्हा तेव्हा आपण हे मोठे उदाहरण लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या पुढील समस्या सोडविण्याचा तोच एक सुसंस्कृत मार्ग आहे आणि त्यामुळे कडवटपणा आणि भेदभाव राहत नाही.

मी निराशावादी नाही. दुर्दैवाने आजच्या जगात बळाशिवाय तरणोपाय नाही असे दिसून येते. आपल्याला स्वसंरक्षण करावे लागते आणि कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्याची तयारी ठेवावी लागते. आपल्याला आक्रमणाला आणि तशाच इतर आपत्तीना तोंड द्यावे लागते. दुष्ट प्रवृत्तींना शरण जाणे केव्हाही वाईटच ठरते. पण दुष्ट प्रवृत्तीचा प्रतिकार करताना आपण भावनाविवश, भयग्रस्त होता कामा नये. वाहून जाता कामा नये आणि दुष्ट प्रवृत्तींच्या आधीन होता कामा नये. दुष्ट प्रवृत्तींना आणि आक्रमणाला प्रतिकार करतांना आपण शांततेची प्रवृत्ती ठेवली पाहिजे आणि जे आपल्याला भयापोटी अथवा इतर काही कारणाने विरोध करतात त्यांच्याशी मैत्री करण्याची तयारी ठेवली पाहिजे. आमचे थोर नेते महात्मा गांधी यांनी आम्हाला हीच शिकवण दिली आणि आम्ही अपूर्ण असल्यामुळे त्या शिकवणुकीपासून स्फुर्ती घेत आहोत.



मराठी ग्रंथ संग्रहालय
मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
9327
दिनांक

''संस्कृतीला जर काही मोल असेल तर तिच्यात एक प्रकारचा गतीमानतेचा गुण असणे आवश्यक आहे.''

३७. 'संस्कृती म्हणजे काय?'

भारतीय सांस्कृतिक संबंध मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी केलेले भाषण, ३ मार्च १९४९

माझ्या मनात फार गोंधळ उडाला आहे आणि तो काय आहे हे मी अगदी स्पष्टपणे सांगणार आहे. जगात आपल्या सभोवती जे काही चालते हे पाहून आपल्या मनात अनेक मूलभूत प्रश्न निर्माण होतात. राष्ट्रे, व्यक्ती आणि सामाजिक गट, परस्परांना समजून घेण्याची भाषा बोलतात आणि लोकांनी परस्परांना समजून घेतले पाहिजे हे उघडच आहे असे दिसून येते. पण जेव्हा मी इतिहासाची पाने चाळतो अथवा विद्यमान काळातील घटनांचा अभ्यास करतो तेव्हा मला जे लोक परस्परांना चांगले ओळखतात तेच भरपूर भांडतात असे आढळून येते. युरोप अथवा आशियामध्ये जे देश परस्परांच्या शेजारी राहतात आणि परस्परांना चांगले ओळखतात तेच एकमेकांच्या खोड्या काढतात. यावरुन केवळ परिचय असल्याने सहकार्य मिळते अथवा मैत्री होते असे नाही हे यावरुन दिसून येते. ही काही नवी गोष्ट नाही. दिर्घकालीन इतिहासावरुनही हेच दिसून येते. विशिष्ट राष्ट्रांमध्ये काही खोड आहे की या प्रश्नाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातच काही चूक आहे? की याहून आणखी एखाद्या बाबतीत चूक घडून आली आहे? आपण जेव्हा संस्कृतीसंबंधी बोलतो तेव्हा लोक ज्या संस्कृतीविषयी एवढे बोलतात ती 'संस्कृती' म्हणजे काय? असा प्रश्न माझ्या मनात निर्माण होतो. तरुणपणी मी जर्मन 'कल्टूरा' विषयी ऐकले होते. जर्मन लोकांनी युध्दाच्या, प्रदेश जिंकण्याच्या आणि इतर अनेक मार्गांनी त्याचा प्रसार करण्याचे प्रयत्न केले होते, याचीही मला आठवण आहे. प्रत्येक राष्ट्राची आणि व्यक्तीची संस्कृतीबाबतची विशिष्ट कल्पना आहे असे दिसून येते. आपण जेव्हा सांस्कृतिक संबंधांविषयी बोलता तेव्हा जरी ते सैध्दांतिक दृष्ट्या योग्य असले तरी प्रत्यक्षात या विशिष्ट कल्पनांचा संघर्ष होतो आणि परिणामी मैत्री निर्माण होण्याऐवजी अधिक दुरावाच निर्माण होतो. 'संस्कृती' म्हणजे काय? हा एक मूलभूत प्रश्न आहे. आणि मी तिची व्याख्या तुम्हाला सांगण्यास खचितच अपात्र आहे कारण मलाच ती सापडलेली नाही.

आपल्याला प्रत्येक राष्ट्र आणि प्रत्येक जनसमुदाय आपल्या संस्कृतीचा विकास करतांना दिसून येतो. या संस्कृतीची पाळेमुळे शेकडो, हजारो वर्षाच्या इतिहासात जडलेली असतात. हे जनसमुदाय एकत्र येण्याच्या स्वयंप्रेरणेनुसार पुढील काळात एकत्र राहून घडत गेले. या संकल्पनेवर दुसऱ्या संकल्पनांचा परिणाम होतो आणि या विविध

संकल्पनांची क्रिया आणि प्रतिक्रिया आपल्याला दिसून येते. इतर संस्कृतीचा परिणाम जिच्यावर झालेला नाही अशी निर्भेळ, निर्मळ आणि कमालीची विशुध्द संस्कृती जगात कुठेही आढळणार नाही असे मला वाटते. ज्याप्रमाणे कोणीही व्यक्ती मी शंभर टक्के विशिष्ट एका वंशाची आहे असे म्हणू शकणार नाही कारण शेकडो हजारो वर्षाच्या कालावधीत न चुकता अनेक बदल होत असतात आणि वंश संकर घडून येतात त्याप्रमाणे कोणतीही संस्कृती निर्भेळ राहू शकत नाही.

अशा प्रकारे विशिष्ट राष्ट्राच्या संस्कृतीमध्ये तिच्या मुलभूत घटकांचे वर्चस्व कायम राहिले तरी त्या संस्कृतीतही थोडी फार सरभेसळ होणे साहजिक आहे. हा प्रकार जर शांततेने होत राहिला तर त्यात काहीच अडचण नाही. पण बऱ्याच वेळा त्यातून संघर्ष उद्‌भवतात. काही वेळा आपल्या संस्कृतीवर परकीय आणि उपऱ्या संस्कृतीचे आक्रमण होत आहे अशी भीती काही समुदायांच्या मनात निर्माण होते. मग हे समुदाय कवचात जातात, अलग होतात आणि त्यांचे विचार आणि कल्पना बाहेर जाण्यास प्रतिबंध होतो. ही अतिशय विघातक परिस्थिती आहे कारण कोणत्याही बाबतीत आणि विशेषत: सांस्कृतिक बाबींच्या संबंधात गतीरोध ही सर्वात विघातक बाब आहे. संस्कृतीचे जर काही मोल व्हायचे असेल तर तिला काही सखोलपणा हवा. तिच्यामध्ये विशिष्ट गतीमानतेचाही गुण हवा. अखेर संस्कृती अनेकविध बाबींवर अवलंबून असते. एखाद्या राष्ट्राच्या अथवा जनसमुदायाच्या विकासाच्या प्रारंभ काळात ज्याला आपण मूलभूत घडण म्हणू ती सोडल्यास तिच्यावर भौगोलिक परिस्थितीचा, हवामानाचा आणि इतर अनेक बाबींचा परिणाम होत असतो. अरेबियन संस्कृतीवर भौगोलीक परिस्थितीचा आणि अरबी वाळवंटाचा प्रगल्भ परिणाम झाला आहे. आपल्या पुरातन साहित्यामध्ये दिसून येते त्याप्रमाणे भारताच्या संस्कृतीवर हिमालयाचा, जंगलांचा आणि विशाल नद्यांचा आणि इतर बाबींचा मोठा परिणाम झालेला दिसतो हे उघड आहे. ती या भूमीतील स्वाभाविक वाढ होती. शिल्पशास्त्र, संगीत आणि साहित्य अशा संस्कृतीच्या विविध घटकांमधील कोणत्याही दोन घटकांचा मिलाप होतो आणि एक सुंदर मिश्रण तयार होते. पण जेव्हा संस्कृतीची स्वाभाविकपणे वाढ होत नाही अथवा तिचा कृत्रिम विकास करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा संघर्ष होणे अपरिहार्य ठरते. आणि नंतर माझ्या मते जे संस्कृतीच्या सर्व कल्पनांच्या मूलत: विरोधी आहे असे काहीतरी निर्माण होते. मनाची कवाडे इतर प्रभावांसाठी बंद होतात. मन अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येतो हा त्याचाच परिणाम आहे. भारताच्या इतिहासावरुन हे आपल्या लक्षांत येते. भारताचा विकास आणि वाढ आणि ऱ्हास त्याने स्वत:ला ज्या काळात कोंडून घेण्याचा प्रयत्न केला त्या कालखंडाशी निगडित झालेला आहे. भारत जेवढा अलग राहिला तेवढा तो गतीहीन झाला. जीवन मग ते व्यक्तीचे, गटाचे, राष्ट्राचे अथवा समाजाचे असले तरी ती एक गतीशील, बदलणारी, वाढणारी बाब

आहे. ज्यामुळे ही गतीशील वाढ थांबते ते जीवनाला विघातक आहे आणि नष्ट करणारी आहे.

✦



''आपण मानव समाजाच्या कल्याणासाठी निसर्गाची रहस्ये उघडकीस आणतो, ती समजून घेतो आणि त्याचा वापर करतो.''

३८. 'वैज्ञानिक वृत्ती'

इंधन संशोधन विद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी केलेले भाषण, २२ एप्रिल १९५०

महाशय, आपण वैज्ञानिक वृत्तीचा उल्लेख केलात. ही वृत्ती म्हणजे नेमके काय आणि तिच्याबाबतच्या कल्पनेच्याबाबतीत आपले कितपत एकमत आहे आणि मतभेद आहेत हे मला कळलेले नाही. विज्ञान ही सर्व साधारण समजाप्रमाणे, उद्योगधंद्याची दासी आहे काय? विज्ञान उद्योगधंद्यांना निश्चितच मदत करते. उद्योगधंद्यांमुळे राष्ट्राला व्यवसाय उपलब्ध होतो, जनतेचे राहणीमान सुधारते आणि विकासाच्या अधिक संधी उपलब्ध होतात म्हणून ते उद्योगधंद्यांना साहाय्य करते. मला वाटते हे तुम्ही मान्य कराल पण त्यातही एक गोम आहे. अखेर विज्ञान म्हणजे काय?

महाशय, वैज्ञानिकांनी निसर्गाविरुध्द युध्द पुकारले आहे असा आपण आताच उल्लेख केलात. मी हाच विचार निराळ्या प्रकारे मांडू इच्छीतो. आपण मानव जातीच्या कल्याणासाठी निसर्गाचे सहकार्य घेतो, निसर्गाची ओळख करुन घेतो, त्याचा उपयोग करुन घेतो. शोध घेणे हे विज्ञानाचे क्रियाशील तत्व आहे. आता समाज रचनेचे अथवा समाजाचे क्रियाशील तत्व कोणते असा प्रश्न मी विचारु इच्छीतो. सर्वसाधारणपणे तो पुराणमतवादी असतो, आपण जेथे आहोत तेथेच राहण्याची त्याची इच्छा असते, काही थोड्या सुधारणा आणि काही प्रमाणात भर घालण्याची त्याची इच्छा असते. पण जसे आहे तसेच पुढे चालविण्याची त्याची इच्छा असते, बदलण्याची इच्छा नसते. परिवर्तन नव्हे तर सातत्य हे समाजाचे क्रियाशील तत्व आहे. अशा प्रकारे समाजामध्ये सातत्य आणि पुराणमतवाद यांचे सहअस्तित्व आणि बदल घडवून आणणारे आणि सातत्याला आव्हान देणारे संशोधनाचे वैज्ञानिक तत्व यांचा एक प्रकारचा अंतर्गत संघर्ष चालू असतो असे आपल्याला आढळून येते. म्हणून वैज्ञनिकाची जरी स्तुती झाली आणि त्याला शाबासकी दिली तरी समाजाला तो पूर्णत: आवडत नाही कारण तो आहे ती परिस्थिती बदलून टाकतो. सर्वसाधारणपणे बोलायचे तर विज्ञानाला खरे तर समाजात आवश्यक त्या सोयी सवलती देण्यात येत नाहीत. युध्दाच्या रुपाने देशावर संकट कोसळले तरच अपवाद म्हणून त्याला सोयी सवलती देण्यात येतात. त्यावेळी सारे बाजूला ठेवण्यात येते आणि हेतू जरी दुष्ट असला तरी विज्ञानाला मुक्तव्दार देण्यात येते.

स्थितीप्रिय समाजाचा स्वाभाविक पुराणमतवाद आणि समाजाच्या पायामध्ये

बऱ्याच वेळा बदल घडवून आणणारी वैज्ञानिकांची स्वाभाविक क्रांतिकारक संशोधन वृत्ती यांच्यातील संघर्ष पाहणे मोठे उद्‌बोधक असते. विज्ञान राहण्याच्या स्थितीत आणि मानवी जीवनावर, मानवाच्या जगण्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या परिस्थितीतच परिवर्तन घडवून आणते.

जे बहुसंख्य लोक विज्ञानाविषयी उथळपणे बोलतात आणि विज्ञान ही आपले कार्य सुकर करणारी उद्योगधंद्याची दासी आहे असे समजतात ते उद्योगपती वरवरचा विचार करतात असे मी या ठिकाणी सांगू इच्छीतो. आणि ते खरेच आहे. अर्थात त्यामुळे त्यांचे काम सोपे होते. त्यामुळे राष्ट्राची संपत्ती वाढते. आणि परिस्थितीही सुधारते. विज्ञानाने हे सारे होते. पण विज्ञानाचे महत्व याहून अधिक आहे. विज्ञान केवळ जुन्यालाच चांगले रुप देत नाही हे त्याच्या इतिहासावरुन दिसून येते. ते काही वेळा जुन्यात बदल घडवून आणते. ते केवळ जुन्या सत्यात नव्याची भर घालीत नाही तर काही वेळा ते ज्या नव्या सत्याचा शोध लावते त्यामुळे जुन्या सत्याचा काही भाग नष्ट होतो आणि माणसांच्या विचारांत आणि त्यांच्या जीवनपध्दतीत बदल होतो. यावरुन विज्ञान केवळ जुन्याची चांगल्या प्रकारे पुनरावृत्ती करीत नाही अथवा त्यात केवळ भर टाकीत नाही तर जगाला आणि मानवी विवेकबुध्दीला जे नवे आहे असे काहीतरी निर्माण करते.

आपण या विचाराच्या अनुरोधाने पुढे गेलो तर वैज्ञानिक वृत्ती या शब्दांचा अर्थ काय होतो? त्याचे अर्थ अनेक होतात. विज्ञानाने जुन्या सत्यात केवळ जी सुधारणा केली ती सुधारणाच नव्हे तर एकदम नवे सत्य स्वीकारण्याची तयारी ठेवणे हा याचा अर्थ आहे. विज्ञानाच्या वृत्ती विरुध्द असलेले जुने सत्य फेटाळून लावण्याची तयारी ठेवली पहिजे. जुन्याला भाव आहे. ते सहज विकले जाते. आपण दीर्घ काळ जुन्याबरोबर राहिलो असल्यामुळे ते नष्ट झालेले पाहण्याची आपली तयारी नसते. म्हणून जुन्यालाच चिकटून राहता कामा नये. नव्या संशोधनाच्या विरुध्द असेल तर त्या सामाजिक रचनेचा, औद्योगिक रचनेचा आणि अर्थ रचनेचा त्याग करण्याची तयारी ठेवणे हा वैज्ञानिक वृत्तीचा अर्थ आहे.

बऱ्याच देशांची काहीही म्हटले तरी, प्रत्यक्षात बदलण्याची इच्छा नसते. मानव प्राणी हा मूलतः एक पुराणमतवादी प्राणी आहे. तो एका विशिष्ट जीवनपध्दतीला सरावलेला असतो आणि जर कोणी त्यात बदल करु पाहील तर ते त्याला आवडत नाही. पण बदल घडून येतात आणि लोकांना त्यांच्याशी जमवून घ्यावे लागते. भूतकाळात त्यांनी तसे जमवून घेतले आहे. मी म्हटल्याप्रमाणे सर्व देश सर्वसाधारणपणे पुराणमतवादी असतात. पण आमचा देश सर्वसाधारण पेक्षाही अधिक पुराणमतवादी आहे. म्हणून मी हे विचार आपल्यापुढे मांडण्यात धारिष्ट केले आहे. मला जनतेच्या विचारांमध्ये एक चमत्कारिक विरोधाभास दिसून येतो. वैज्ञानिकांच्या विचारामध्येही

मला तो दिसून येतो. हे वैज्ञानिक विज्ञानाची स्तुती करतात. प्रयोग शाळेत विज्ञान विषयक कार्य करतात पण जीवनाच्या इतर क्षेत्रात ते जे काही करतात तेव्हा विज्ञानाच्या पध्दती, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि वैज्ञानिक वृत्तीचा त्याग करतात. ते संपूर्णपणे अशास्त्रीय बनतात. विज्ञानाविषयी जर आपण योग्य दृष्टिकोन धारण केला तर काही चांगलेच होईल आणि त्यामुळे नेहमीच चांगले होईल यात काही शंका नाही. विज्ञान आपल्याला व्यवहाराच्या नव्या पध्दती शिकवते. ते औद्योगिक जीवनाच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणते पण मूलभूत गोष्ट ही की त्याने आपल्याला सरळ विचार करण्यास, सरळ कृती करण्यास आणि जर सबळ कारणे असतील तर कशाचाही त्याग करण्यास आणि कशाचाही स्वीकार करण्यास भिऊ नका असे शिकविले आहे. विशेषतः आपल्या देशाने ही कल्पना समजून घ्यावी, हीचे महत्व जाणून घ्यावे असे मला वाटते. कारण आपला देश एका अर्थाने भूतकाळात विचाराच्या क्षेत्रात मुक्त, स्वतंत्र राहिला आहे आणि सत्याच्या खोल विहीरीत काय आहे हे पाहण्याचे धैर्यही त्यानेच दाखविले आहे.

✦



''गतकाळातील अनेक समस्या म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्य–सेवा आणि मानव समाजाच्या सर्व गरजा आज पूर्ण होऊ शकतात.''

३९. 'उदात्त आदशाचे प्रतीक – युनेस्को'

भारतीय विज्ञान परिषदेच्या उद्घाटनाचे भाषण, बंगलोर, २ जानेवारी १९५०

या परिषदेचे उद्घाटन करताना मी काय बोलावे अशी आपली अपेक्षा आहे याची मला कल्पना नाही. मला येथे पंतप्रधान या नात्याने येण्याचे आणि भाषण करण्याचे आमंत्रण देण्यात आले आणि मी ही जबाबदारी सहजपणे टाळू शकेन असे मला वाटत नाही. पण मी केवळ पंतप्रधान नाही. मी माणूसही आहे. सर्व साधारणपणे पंतप्रधान काही अपवाद सोडता, माणसेच असतात असे मी समजतो. मी बऱ्याच वेळा प्रकाशाचा किरण दिसावा म्हणून प्रयत्न करीत असतो. आपण काय करावे हे आपल्याला दिसावे, सत्याचा मार्ग, सत्याचे आकलन व्हावे म्हणून धडपड करीत असतो. माझ्या या संघर्षाची आणि प्रयत्नांची कबुली देणे पंतप्रधानाला शोभत नाही असे तुम्हाला वाटत असेल आणि मलाही वाटते. पंतप्रधान खंबीर असला पाहिजे. त्याचे हेतू निश्चित असले पाहिजेत. आणि आपण काय करावे आणि कसे करावे हे त्यांना अचूक माहीत असले पाहिजे. पण मी या मोठ्या देशाचा पंतप्रधान आहे हे क्षणभर विसरून समान उद्दिष्टांसाठी झटणाऱ्या मित्रांशी काही मिनिटे बोलावे आणि माझ्या काही अडचणी तुम्हाला सांगाव्यात, कारण या अडचणी केवळ माझ्या मनातील नाहीत तर त्या तुमच्याही मनातील आणि जगातील लक्षावधी लोकांच्याही मनातील अडचणी आहेत, असे मला वाटते.

युनेस्को हे एक उदात्त आदर्शाचे प्रतीक आहे. आपण या संघटनेची उद्दिष्टे तिची सनद अथवा विविध प्रसंगी तेथे केलेली भाषणे वाचून पहा. तिने काय केले आणि ती काय करु इच्छीते याची यादी पहा. आपल्यापैकी बहुतेक जण या अथवा त्या बाबतीत तिच्यावर टीका करतील पण ती संघटना मुख्यतः या जगाने योग्य मार्गाने विकास करावा अशी इच्छा मनात बाळगणाऱ्या सर्व सद्प्रवृत्त लोकांनी ज्या उदात्त ध्येयाला हातभार लावला पाहिजे त्या ध्येयाचे प्रतीक आहे.

आपण जेव्हा आपल्या विविध विभागातील कार्याविषयी चर्चा करता तेव्हा माझ्या मनात एक शंका येते. आणि ती ही की, आपण जी अनेकविध कार्ये करतो त्यातील कोणती ज्याला मुख्यतः अंतर्गत अरिष्ट म्हणता येईल त्या बाबतीतील आहेत. हे अरिष्ट अनेक प्रकारे व्यक्त होते पण मुख्यतः ते माणसाच्या मनातील अरिष्ट आहे. आपल्या भोवती जे घडत आहे त्या बाबतीत जर आपण पुरेसे संवेदनाशील असू तर

आपल्या सर्वांना या अरिष्टाने ग्रासले आहे हे आपल्या लक्षांत येईल.

हे युग मुख्यत: वैज्ञानिक आणि तंत्रविषयक विकासाचे युग आहे. हा तंत्रविषयक विकास वाढत्या वेगाने होत आहे आणि त्याचा मानवाच्या जीवनावर परिणाम होत आहे आणि त्याच्या मृत्यूतच त्याची परिणती होईल यात शंका नाही. अनेक प्रकारे त्याची प्रचंड प्रगतीत परिणती होत आहे आणि गत काळातील अनेक समस्या म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्यसेवा आणि मानव समाजाच्या सर्व गरजा आज पूर्ण होऊ शकतात असे आपण खात्रीने म्हणू शकतो. जगात आज सर्वांना पुरुन उरेल इतके निर्माण होत आहे. म्हणुन संघर्षाची जुनी कारणे आज राहिलेली नाहीत. पण तरीही काही उणीव आहे. वस्तुस्थिती अशी आहे की या तंत्रविषयक युगामध्ये संघर्ष नष्ट करण्याची शक्यता असूनही अधिक संघर्ष निर्माण झाले आहेत. हाही एक विरोधाभास आहे कारण शांततामय प्रगती, राष्ट्रा राष्ट्रांमधील सहकार्य आणि सामंजस्य या बाबतीत सतत चर्चा चालू असतांनाही आपण विरोधी दिशेला जात आहोत. आपला परस्परांशी अधिक परिचय झाल्यामुळे आपसातील सामंजस्य आणि सलोखा वाढण्याऐवजी आपण परस्परांचा तिटकारा करु लागलो आहोत. आपण या अंतर्विरोधावर मात कशी करणार? युनेस्को पुढील मूलभूत समस्या हीच आहे असे मी समजतो. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अडचणी कशा दूर कराव्यात? शिक्षण, विज्ञान आणि संस्कृती यांचा योग्य प्रकारे वापर कसा करावा आणि त्यांचा चुकीच्या मार्गाने वापर कसा होऊ देऊ नये ही खरी समस्या आहे. आज जगतिक घडामोडींवर ज्याची छाया पसरली आहे अशी ही बाब आहे आणि या महत्वाच्या बाबी जोपर्यंत महत्वाचा काही तोडगा निघत नाही तो पर्यंत या प्रयत्नांना यश येणार नाही. ते कसे करावयचे हे मला ठाऊक नाही.

✦

"प्रेक्षकांना ज्या वस्तू आपल्या जीवनात आणि सभोवताली पाहण्याचा सराव आहे ज्या वस्तूंशी त्यांचा संबंध पोचतो अशाच वस्तू येथे असाव्यात."

४०. 'वस्तुसंग्रहालयाचा उद्देश'

मद्रास शासकीय वस्तु संग्रहालयाच्या शताब्दी निमित्त आणि मद्रास राष्ट्रीय कला दालनाच्या उद्घाटन प्रसंगी केलेले भाषण, २७ नोव्हेंबर १९५१

या शताब्दी समारंभाचे मला निमंत्रण दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. कारण सामान्य व्यक्ति म्हणून वस्तुसंग्रहालयाबाबत मला अतिशय आस्था वाटते. मी कोणत्याही बाबतीतील तज्ञ नाही पण अनेक विषयात मी रस घेतो. मला अनेक विषयात स्वारस्य आहे. तज्ञांचा समाजाला उपयोग होतो हे उघडच आहे पण बऱ्याच वेळा ते तज्ञांच्या जगात वावरतात आणि परिणामी त्यांचा, जे तज्ञ नाहीत अशा सामान्य माणसांशी संबंध राहात नाही. मी याचा केवळ अशासाठी उल्लेख करतो की, तज्ञ विशारद एकूण मानव समाजाशी संबंध नसलेल्या कोणत्या तरी उच्च विश्वात वावरत असतात आणि त्या विश्वात मी म्हटल्याप्रमाणे केवळ काही थोड्याच व्यक्तींना प्रवेश असतो.

आता वस्तुसंग्रहालये अनेक दृष्टीने अत्यंत आवश्यक आहेत आणि मी माझ्या आयुष्यातील अत्यंत सुखद काळ वस्तु संग्रहालयात काढलेला आहे. भारतातील नव्हे तर मुख्यत: युरोपियन देशातील वस्तुसंग्रहलयांना मी भेट दिली तो काळ माझ्या आयुष्यतील अत्यंत सुखद काळ होता असे मी समजतो. मला या वस्तु संग्रहालयात अधिक काळ व्यतीत करता आला नाही याबद्दल मला दु:ख होते. वस्तु संग्रहालय म्हणजे नेमके काय आणि त्याने काय साध्य होते हे प्रश्न असे आहेत की त्यांची उत्तरे अनेक प्रकारे देता येतील. तो राष्ट्राचा इतिहास आहे. अथवा कपाटात बंद करुन ठेवलेला तुमचा भूतकाळ आहे, तुम्ही तुमचा भूतकाळ पाहावा म्हणून तो तेथे ठेवलेला असतो. तेथे सुंदर वस्तूंचा संग्रह करुन ठेवतात आणि लोकांनी सुंदर वस्तू पाहाव्यात हे केव्हाही चांगलेच आहे. सौंदर्य म्हणजे काय याची जाण अधिकाधिक लोकांना राहिलेली नाही असे दिसून येते आणि लोक स्वत:भोवती अशा काही गोष्टी जमा करतात की ज्यांच्यामध्ये सौंदर्याखेरीज बाकीचे सर्व गुण आहेत असे दिसून येते. लोकांना खऱ्या सौंदर्याची ओळख राहिलेली नाही हा खरोखरीच मोठा चमत्कारिक प्रकार आहे. याचे कारण काय? मी हे केवळ भारताविषयीच बोलत नाही तर अनेक देशामध्येही हीच गत आहे. आधुनिक युगाचेच हे लक्षण आहे की काय हे नकळे. पण आपण अधिकाधिक बटबटीत होत चाललो आहोत. याहूनही वाईट गोष्ट ही की

आपण यातच धन्यता समजतो. म्हणून सुंदर वस्तू जमा करणे चांगलेच आहे. मुलांच्या खेळण्यासारखी गोष्ट घ्या. त्यांना मोठ्या ओबडधोबड वस्तू भेट म्हणून देण्यात काय मतलब आहे? मला कळत नाही. मुलांना पशूपक्षी आवडतात हे खरे आणि ते त्यांना जरुर द्यावेत. त्यांना सुंदर वस्तू काय म्हणून देऊ नयेत आणि त्यांना बालपणापासून सौंदर्याचा आस्वाद घेण्यास कां शिकवू नये? त्यांना जे समोर दिसते त्याच वस्तूच्या प्रतीकृती त्यांना देण्यात काय अर्थ आहे? या अशा खेळण्यांमुळे त्यांचे कुतुहल जागृत होते यात शंका नाही पण ती सौंदर्याच्या बाबतीत संवेदनाशून्य होतात. साऱ्या जगात वाढत असलेल्या या प्रवृत्तीमुळे कोणत्याही प्रकारच्या सौंदर्या विषयीची जाण कमी होत असल्यामुळे भूतकाळातील आणि विद्यमानकाळातील सुंदर वस्तू जमा करणे श्रेयस्कर ठरते, त्यामुळे किमान सुंदर वस्तू म्हणजे काय असते याचे काही निकष तरी उपलब्ध होतील. म्हणून ज्या लोकांना दैनंदिन जीवनात सर्व साधारणपणे सुंदर वस्तु पहायला मिळत नाहीत ते वस्तुसंग्रहालयात तरी काही काळ सौंदर्याचे दर्शन घेतील.

मी ज्याला साररुपी इतिहास म्हणालो ते वस्तुसंग्रहालयाचे आणखी एक रुप आहे. लोक तेथे चमत्कारिक रीतीने ठेवलेल्या चमत्कारिक वस्तू पाहयला जातात काय? पांचशे वर्षापूर्वीच्या अथवा हजार वर्षापूर्वीच्या वस्तू पाहायला जातात की आजही ज्यांना महव आहे अशा वस्तू पाहायला जातात? इतिहास कसा शिकवितात हे मला ठाऊक नाही कारण महाविद्यालयात मी इतिहास शिकलो नाही. मी स्वत:च वाचन केले आणि त्या वाचनासाठी मला तज्ञांचे मार्गदर्शन लाभले नव्हते. ते सहज केलेले वाचन होते आणि मी भरपूर वाचन केले. मला त्याचा आंनदही वाटला. भूतकाळात घडलेल्या विलक्षण घटनांविषयी केवळ वाचन करावे असे नव्हे तर विद्यमान काळाशी त्याचा असलेला संबंध समजून घ्यावा या दृष्टीने मी वाचन केल्यामुळे ते मला अधिक आनंददायक वाटले.

त्यामुळेच ते मला अधिक जिवंत वाटले. तसे नसते तर जीवनाशी अथवा जगाशी संबंध नसलेली ती एक चमत्कारिक बाब ठरली असती. वाचन सुसंबद्ध असले पाहिजे. भूतकाळातील घटनांचा कशाशी तरी संबंध जोडला गेला पाहिजे आणि त्या कशाचा तरी विद्यमान काळाशी संबंध जोडला गेला पाहिजे. असे झाले तरच इतिहासाला आपल्या दृष्टीने जीवंतपणा प्राप्त होतो.

हेच तत्व वस्तु संग्रहालयाला लागू केले पाहिजे. वस्तू संग्रहालयाबाबत जनतेला स्वारस्य वाटावे आणि ते शैक्षणिक महत्त्वाचे व्हायचे असेल तर प्रेक्षकांना जीवनात आणि त्याच्या परिसरात ज्या वस्तूंचा सराव आहे, त्यांच्याशी संबंधित असलेल्या वस्तू तेथे असल्या पाहिजेत. वस्तुसंग्रहालय म्हणजे दूरच्या असंबद्ध भूतकाळाचे प्रतीक असता कामा नये. आमचे तज्ञ या दृष्टीने कितपत विचार करतात आणि आपली वस्तुसंग्रहालये त्या दृष्टीने कितपत तयार करतात ते मला ठाऊक नाही. हा

सर्वसामान्य पुराणवस्तु संग्राहकांचा दृष्टीकोन नाही. पुराण वस्तु संग्राहक ही एक आवश्यक बाब आहे यात शंकाच नाही पण जो स्वत:च पुराण वस्तू बनतो तो विशेष कामाचा नाही. त्याचा आधुनिक जगाशी संबंध हवा. माझ्या या व्यक्तिगत विचार प्रदर्शनाबद्दल मला माफ करा. आपण भूतकाळातील कोणताही कालखंड त्या नंतरच्या कालखंडापासून अथवा वर्तमान काळापासून फारकत झालेला आहे असे समजणे चुकीचे आहे असे मला वाटते आणि तसे जर पाहयचे असेल तर मला त्यात फारसे स्वारस्य नाही. त्याचा आणि माझ्या सध्याच्या विचारांचा आणि कार्याचा जर थोडासाही संबंध असेल तर ते एक वरदान आहे आणि मला त्यात स्वारस्य आहे. मी माझे हे काहीसे व्यक्तीगत विचार येथे सांगत आहे कारण तुमच्यापैकी काही सद्गृहस्थांना विशेषत: वस्तुसंग्रहाशी संबंधित असलेल्यांना या विषयात स्वारस्य असेल असे मला वाटते. एका विशिष्ट विषयातील तज्ञ होण्याच्या उत्साहामध्ये लोकांचा सर्वांगीण दृष्टीकोन नाहीसा होतो. हा जगापुढील सर्वात मोठा धोका आहे हे मी अत्यंत विनम्रपणे सांगू इच्छितो, ते विशिष्ट विषयातील तज्ञ होतात, चांगले तज्ञ होतात पण विशाल दृष्टीकोन गमावून बसतात आणि त्यामुळे त्यांना केवळ तज्ञ म्हणता येईल. तुम्हांला वर्डसवर्थ कवीच्या या काव्य पंक्ती ठाऊक असतील –

''नदीकाठचे रानफुल
त्यांच्या नजरेत ते एक पिवळे फुल होते
त्याहून अधिक काही नाही!''

या काव्यपंक्ती वाचल्यानंतर त्या फुलांच्या लॅटिन भाषेतील नांवाचा अभ्यास करणारा पण ज्याला फुलांच्या सौंदर्याची कदरच नाही असा वनस्पती शास्त्रज्ञ डोळ्यापुढे येतो. थोडक्यात सांगयचे तर आपण एखाद्या विषयातील तज्ञ होतो पण इतर विषयात आपल्याला काहीच चातुर्य नसते. अनेक विषयात पारंगत असलेल्या या जगात चातुर्य फारच कमी आहे. कदाचित याचे कारण हे असावे की आपणा सर्वांना जीवनाच्या काही अल्प अंशाबाबत थोडेसे ज्ञान असते आणि अथांग विश्वाबाबत फारच थोडे ज्ञान असते.

आता पुन्हा वस्तुसंग्राहालयाकडे वळू या. तो भूतकाळातील आणि वर्तमान काळातील सर्व प्रकारच्या सुंदर आणि उपयुक्त वस्तूंचा संग्रह आहे आणि त्याने जीवनाच्या विशाल व्यवहाराची आपल्याला थोडीफार कल्पना करुन द्यावी अशी अपेक्षा आहे. त्याने आपल्याला अंतिमत: विद्यमान काळातील जीवन व्यवहाराचा परिचय करुन दिला पाहिजे अथवा किमानपक्षी तो समजण्यास साहाय्य केले पाहिजे.

✦

''आधुनिक जगात मनाचे कार्य कमी कमी महत्वाचे होत आहे अथवा किमानपक्षी ते पूर्वी इतके महत्वाचे राहिलेले नाही.''

४१. आधुनिक जीवन विचाराला प्रोत्साहन देत नाही.

युनेस्कोच्या परिसंवादातील भाषण, नवी दिल्ली, २०-१२-१९५१.

आता माझी मुख्य अडचण ही आहे की, आधुनिक जग, आपण ज्याला मानसिक जग म्हणतो त्या जगापासून अगदीच दूर चाललो आहे असे मला वाटते. मी सध्या आत्मिक जगाची तर गोष्टच बोलत नाही आणि तरीही आधुनिक जग ही संपूर्णपणे मानसिक जीवनाची निष्पत्ती आहे. सरते शेवटी आपण जे सारे काही सभोवती पाहतो आणि ज्याची आपल्याला जाणीव होते ते सारे मानवी मनाने निर्माण केले आहे. संस्कृती ही मानवी मनाची निर्मिती असूनही विलक्षण गोष्ट ही की, आधुनिक जगात मनाच्या कार्याचे महत्व कमी कमी होत आहे, किमानपक्षी ते पूर्वी होते तितके महत्वाचे राहिलेले नाही असे वाटू लागते. विशिष्ट क्षेत्रांत मनाचे महत्व आहे हे खरे आणि त्या विशिष्ट क्षेत्रांत आपली प्रगतीही होत आहे पण एकूण पाहता मनाचे महत्व कमी होत आहे, हे माझे मत आहे. माझी ही मनोभावना जर बिनचुक असेल तर आपण जी संस्कृती निर्माण करीत आहोत किंवा केली आहे तिच्यात काहीतरी मूलत: चुकले आहे. जे बदल एवढ्या झपाट्याने होत आहेत त्यांच्यामुळे जीवनाच्या इतर अंगांवर भार पडतो आणि मनाने ज्या प्रकारे कार्य केले पाहिजे तसे करण्यास कोणत्या तरी कारणाने प्रतिबंध होतो. जगाच्या इतिहासाच्या प्रारंभीच्या काळात मन जसे कार्य करीत होते तसे ते आज करीत नाही एवढे मात्र खरे. जर हे खरे असेल तर ही गोष्ट जगाच्या दृष्टीने निश्चितच चांगली नाही कारण यामुळे आपली संस्कृती ज्या पायावर उभारली आहे, ज्या आधारावर माणसाने क्रमाक्रमाने प्रगती केली आणि तो आज उच्च स्तरावर येऊन पोचला आहे त्या इमल्याच्या पायालाच हादरा बसतो.

भारतात आम्हाला आमच्या जनतेला जीवनाच्या प्राथमिक आवश्यकता उपलब्ध करण्याबाबत विशेष चिंता वाटते. आमच्या जनतेला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य वगैरे सोयी सुविधा उपलब्ध करण्याची समस्या आमच्यापुढे आहे. या प्राथमिक आवश्यकता जोपर्यंत आम्ही आमच्या जनतेला देऊ शकत नाही तोपर्यंत जीवनाच्या इतर आवश्यकतांविषयी बोलणे व्यर्थ आहे. उपाशी माणसांशी परमेश्वराविषयी बोलण्यात अर्थ नाही. तुम्ही त्याला अन्न दिले पाहिजे. या प्राथमिक आवश्यकता पूर्ण केल्या पाहिजेत हे खरेच आहे पण या समस्या सोडवितांनाही

आपल्यापुढे काही ध्येये आणि उद्दिष्टे असणे आवश्यक आहे. त्या उद्दिष्टांचा अथवा ध्येयांचा जर काही कारणाने मानवी मनाच्या विकासासाठी असलेला संबंध तुटत असेल तर काही तरी चुकते आहे यात काहीच शंका नाही. मी जे बोलतो आहे ते खरे आहे की नाही आणि आपले एकमत आहे किंवा नाही हे मला ठाऊक नाही आणि ते जर खरे असेल तर त्यात सुधारणा करण्यासाठी काय करावे हेही मला कळत नाही.

तसे म्हटले तर मी आधुनिक संस्कृतीच्या सिद्धींचा, विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या विकासाचा आणि वापराचा मोठा चाहता आहे. मानव समाजाला अभिमान वाटावा अशीच ही गोष्ट आहे आणि जर या सिध्दींमुळे भावी प्रगतीची क्षमता कमी होत असेल आणि मनाचा कस जर कमी झाला तर या प्रक्रीयेत निश्चितच काहीतरी चूक आहे. अंतिमत: मनाचे वर्चस्व हवे हे अगदी उघड आहे. मी या संदर्भात आत्म्याचा उल्लेख करीत नाही, पण त्याचाही संबंध येतोच. जगाला जर मानसिक ऱ्हासाचा आणि नैतिक अध:पतनाचा रोग जडला तर मानवी संस्कृतीच्या मुळातच बिघाड होतो. हा मानवसमाज बराच काळ जरी तग धरुन राहिला तरी तो अधिकाधिक निर्जीव होत जातो आणि सरतेशेवटी कोलमडून पडतो. मी जेव्हा गतइतिहासातील कालखंडाकडे दृष्टिक्षेप टाकतो तेव्हा मला काही कालखंड उल्लेखनीय वाटतात. त्यात मानवी मनाने मोठ्या सिध्दी हस्तगत केल्या आहेत असे दिसून येते. तर इतर कालखंडात त्यामानाने काहीच घडले नाही असे दिसून येते. काही वंशांनी काही काळ बरीच प्रगती केलेली दिसून येते आणि पुढील काळात ती उघड उघड खुंटल्यासारखी दिसते – किमानपक्षी सिध्दीच्या दृष्टीने तरी ती कुंठित होते. म्हणून मला असे वाटते की तौलनिक दृष्ट्या उच्च संस्कृती ज्या कारणाने उतरणीला लागल्या आहेत तसेच आज होऊ लागले आहे आणि आपल्या आधुनिक संस्कृतीच्या रचनेमध्ये अंतर्गत दौर्बल्य निर्माण होते आहे.

मला असे वाटते की आपला दृष्टिकोन चुकीचा असल्यामुळे आपली दिशाभूल होते. या औद्योगिकीकरण आणि यांत्रिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आपल्याला प्रचंड भौतिक सुबत्ता प्राप्त झाली आणि ते मानव जातीला मिळालेले वरदानच ठरले आहे. पण त्यामुळेच आपल्यात मतभेद निर्माण झाले आहेत आणि ते अधिक तीव्र होत आहेत. त्याचबरोबर त्याने मानसिक जीवनाचा ऱ्हास होत आहे आणि आत्मनाशाच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे.

आज जेव्हा आपण प्रचंड प्रगतीच्या कालखंडात वावरत आहोत त्याच काळात आपल्यावर प्रचंड संकटेही कोसळू पाहात आहेत. यातून मधला मार्ग शोधणे थोडे अवघडच होऊन बसले आहे. प्रगती थोडीशी साध्य करावी आणि त्याचबरोबर संकटांची व्याप्तीही कमी करावी असे मला वाटते. ही प्रधान समस्या आहे. तुमच्या परिषदेने या प्रश्नावर प्रकाश टाकावा असे मला वाटते. औद्योगिक क्रान्तीमुळे व्यक्तीला


विचार करण्यास वेळ किंवा संधी मिळत नाही असे वातावरण निर्माण होते आणि त्यामुळे जगाच्या मानसिक जीवनाचा ऱ्हास होतो असे मी म्हटले तर ते योग्यच ठरेल नाही कां? आज अनेक थोर विचारवंत आहेत हे मी नाकारीत नाही पण ते विचार न करणाऱ्या बहुजन समाजामध्ये लूप्त होण्याचीही शक्यता आहे.

आपण लोकशाही राबवितो आणि तिच्याविषयी खूप चर्चा करीत आहोत आणि मानव समाजावर राज्य' करण्याच्या ज्या अनेक पध्दती उपलब्ध आहेत त्यामध्ये लोकशाही हाच सर्वोत्कृष्ट मार्ग आहे याबद्दल मला किंचितही शंका नाही. त्याचबरोबर आपण आज-आज याचा अर्थ गेल्या वीस पंचवीस वर्षात-अनियंत्रित लोकशाहीचा उदय होत आहे असे आपल्याला दिसून येते. आपण जेव्हा लोकशाहीविषयी बोलतो, तेव्हा आपण सर्व साधारणपणे एकोणिसाव्या शतकाच्या अथवा २० व्या शतकाच्या पूर्वार्धातील या संज्ञेच्या वापराच्या मर्यादेत विचार करतो. विलक्षण तंत्रविषयक विकासामुळे त्या नंतरच्या काळात काहीतरी निराळे घडून आले आहे आणि दरम्यान लोकशाहीचाही प्रसार झाला आहे. परिणामी औद्योगिक क्रान्तीच्या काळात वाढलेला, ज्याला विचार करण्यास प्रोत्साहन मिळालेले नाही अथवा संधी मिळालेली नाही असा प्रचंड जनसमुदाय अस्तित्वात आला आहे. हा बहुजन समाज भौतिक सुखांच्या दृष्टीने गतकाळातील पिढयांच्या मानाने अधिक चांगल्या स्थितीत राहतो पण त्याला विचार करण्यास क्वचितच सवड मिळते आणि असे असले तरी लोकशाही पध्दतीनुसार हाच बहुजन समाज सरतेशेवटी राज्य करणार आहे अथवा राज्य करणाऱ्यांना निवडून देणार आहे.

हे लोक कमी जास्त प्रमाणात त्यांना आवश्यक असलेल्या व्यक्तींची निवड करण्याची शक्यता आहे काय? ते जरा शंकास्पदच आहे. आणि कोणावरही दोषारोप न करता मी असे म्हणू शकतो आणि विशेषत: मी राजकारणी असल्यामुळे दोषारोप न करता सांगू शकतो कीं आधुनिक लोकशाहीच्या प्रौढ मतदानाच्या पध्दतीनुसार निवडून येणाऱ्या व्यक्तींची गुणवत्ता हळूहळू घसरत जाणार आहे. या पध्दतीनुसार नामवंत व्यक्ती निवडून येतील यात शंकाच नाही पण विचार कमी झाल्यामुळे आणि प्रचाराच्या आधुनिक पध्दतीमुळे त्यांची गुणवत्ता निश्चितच घसरत जाते. प्रचाराचा सगळा गोंगाट, आणि प्रचाराच्या यंत्रणेमुळे माणसांना विचार करण्यास प्रतिबंध होतो. हे लोक एखाद्या हुकूमशहाला अथवा संवेदनाशून्य पण या गोंगाटाला न जुमानता दोन पायावर उभ्या राहणाऱ्या राजकीय नेत्याला निवडून देऊन या गोंगाटाबाबतची त्यांची प्रतिक्रीया व्यक्त करतात. या प्रचाराच्या गोंगाटापुढे ज्याचा निभाव लागत नाही असा प्रतिस्पर्धी निवडणुकीत पडतो पण हा नेता निवडून येतो ही एक असाधारण परिस्थिती आहे. लोकशाहीच्या विकासाची स्तुती करणे ठीक आहे आणि मला ते सर्व मान्य आहे. मला बोलावयाचे आहे ते लोकशाहीविषयी नाही तर आधुनिक जीवन मानसिक जीवनाला

प्रोत्साहन देत नाही हा मुद्दा मला येथे सांगायचा आहे. मानसिक जीवनाला जर प्रोत्साहन मिळाले नाही तर अपरिहार्यपणे संस्कृतीचा ऱ्हास होतो, वंशाचं ऱ्हास होतो आणि दोन्ही अंतिमतः कोणत्या तरी प्रचंड आपत्तीत सापडतात अथवा सहजपणे निस्तेज होतात आणि इतर सामान्य संस्कृती आणि वंशासारख्या होऊन जातात.

✦



"आज इतिहास कुणा एका देशाचा इतिहास राहिलेला नाही. तो मानवजातीचा इतिहास बनला आहे कारण आपण सर्वजण एका समान नियतीने एकत्र बांधले गेलो आहोत."

४२. बुध्दाचा संदेश

आंतरराष्ट्रीय बौध्द सांस्कृतिक परिषदेतील भाषण, सांची, २० नोव्हेंबर १९५२.

साऱ्या जगातून येथे आलेल्या भिक्षूंच्या आणि बौध्द विद्वानांच्या गांभीर्यपूर्ण अशा या मेळाव्यात मला एक प्रकारच्या इतिहासाचे दर्शन होते. आम्हा भारतीयांना या परिषदेचे महत्व वाटते आणि साऱ्या जगालाही तितचे महत्व वाटले पाहिजे कारण ते इतिहासाच्या एका परिवर्तनाच्या टप्प्यावर येऊन ठेपले आहे. गौतम बुध्दाच्या संदेशाने आपल्या व्यथित आणि पीडित जगाच्या समस्या निश्चितच सुटू शकतील. मी सांचीला संदेश देण्यासाठी आलो नाही तर स्वत:साठी काही शोधण्यासाठी आलो आहे. या विदीर्ण आणि विकृत जगामध्ये मी एक अत्यंत गोंधळून गेलेला माणूस आहे. मला प्रकाश दिसत नाही आणि बऱ्याच वेळा मी अडखळून पडतो. माझ्यात काय कमी आहे ते मी शोधण्याचा प्रयत्न करतो आणि माझ्या देशाला आणि माझ्या जनतेला माझ्याकडून काय हवे आहे याचाही मी शोध घेण्याचा प्रयत्न करतो.

आज इतिहास कुणा एक देशाचा इतिहास राहिलेला नाही. तो मानव जातीचा इतिहास बनला आहे. कारण आपण सर्वजण एका समान नियतीने एकत्र निबध्द झालेले आहोत.

भारतात इतर देशांप्रमाणेच आपल्याला योग्य मार्ग दाखविण्यासाठी अनेक थोर विभूती होऊन गेल्या. या थोर शिकवणूकीचा भारतात केवळ उदय झाला असे नाही तर इतर देशांतील अंध:कार नष्ट करण्यासाठी त्यांचा परदेशातही येथूनच प्रसार झाला. बुध्दाने २५०० वर्षापूर्वी जो संदेश दिला त्याने केवळ भारताला अथवा आशियालाच नव्हे तर साऱ्या जगाला प्रकाश दिला आहे.

या ठिकाणी जो प्रश्न अपरिहार्यपणे उपस्थित होतो तो हा की बुध्दाचा थोर संदेश सध्याच्या जगाला कितपत उपयुक्त ठरतो? कदाचित तो उपयुक्त ठरेल अथवा ठरणार नाही पण मला एवढे मात्र ठाऊक आहे कीं आपण जर बुध्दाने प्रतिपादन केलेल्या तत्वाचे अनुसरण केले तर अंतिमत: जगाला शांतता आणि सौहार्दता प्राप्त करुन देऊ शकू. आपल्याला जे काही ठाऊक आहे त्यानुसार आपण या परिषदेत कदाचित मानव जीवनाच्या कल्याणासाठी उपयोगी पडतील अशा फुलांच्या रोपांची बीजे या ठिकाणी पेरीत आहात, असे मला वाटते. ✦

''भविष्यकाळ संघर्षांनी आणि अडचणींनी भरलेला आहे असे दिसून येते पण ज्या मानवाच्या आत्म्याने एवढी तग धरली तो पुनः एकदा विजयी होईल या बद्दल मला किंचितही शंका नाही.''

४३. विनम्र सत्यशोधक

कोलंबिया विश्वविद्यालयाने डॉक्टर ऑफ लॉ पदवी प्रदान केली त्या प्रसंगी केलेले भाषण, न्यूयॉर्क, १७ ऑक्टोंबर १९४९

एका मोठ्या देशाचा पंतप्रधान अथवा राजकारणी या नात्याने मी या ठिकाणी आलेलो नाही तर एक विनम्र सत्यशोधक आणि सत्याचा मार्ग शोधून काढण्यासाठी सातत्याने झटणारा माणूस म्हणून मी येथे आलो आहे. मला नेहमीच यश मिळालेले नाही पण मी उद्दिष्टे आणि आदर्श यांना समर्पक अशी आपली कृती आहे किंवा नाही हे पाहण्याचा प्रयत्न करीत असतो. ही प्रक्रिया नेहमीच अवघड असते. पण ती संघर्षमय आणि वासनापूर्ण जगात अधिकच अवघड होऊन बसते. राजकारणी मंडळींना दैनंदिन समस्यांना तोंड द्यावे लागते आणि ताबडतोबीचे इलाज शोधून काढावे लागतात. तत्ववेत्ते अंतिम उद्दिष्टाचा विचार करतात आणि त्यांचा दैनंदिन जगाशी आणि त्याच्या समस्यांशी संबंध नसण्याचा संभव असतो, यापैकी कोणताच दृष्टीकोन पुरेसा आहे असे दिसत नाही. या दोन्ही दृष्टिकोनांचा मिलाप करून प्लेटोच्या तत्वज्ञानी राजासारखे वागणे शक्य आहे काय? या विश्वविद्यालयाचा प्रमुख म्हणून आपल्याला एका कृतीशील आणि तत्वज्ञ थोर व्यक्तीच्या कार्याचा अनुभव असल्यामुळे आपण मला या प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्यास साहाय्य करु शकता.

या सातत्यपूर्ण आणि जोरदार हालचालींच्या जगामध्ये माणसांना विचार करण्यास वेळ नाही आणि आदर्शांचा आणि ध्येयांचा विचार करण्यास तर मुळीच वेळ नाही. पण आपल्याला कोणत्या मार्गाने जावयाचे आहे आणि आपली उद्दिष्टे कोणती आहेत हे जाणून घेतल्या खेरीज आपण विद्यमान काळात तरी काय करू शकतो? विश्व विद्यालयाच्या शांततापूर्ण वातावरणातच आपण या मूलभूत समस्यांचा योग्य रीतीने विचार करु शकतो. आज विश्वविद्यालयात असलेली आणि उद्या ज्यांच्यावर जीवनातील समस्यांचा भार पाडणार आहे अशा तरुण तरुणींनी आपल्यापुढे सुस्पष्ट उद्दिष्टे आणि मूल्य ठेवण्याचे शिक्षण घेतले तर आगामी पिढ्यांना आशा आहे. या आधीच्या पिढ्यांत अनेक थोर व्यक्ती निर्माण झाल्या पण पिढयांचा विचार केला तर या पिढ्यांनी जगाला वारंवार संकटात लोटले आहे. दोन जागतिक युध्दे हा या पिढीच्या जीवनाचा भाग आहे. ही जबरदस्त किंमत आहे आणि दुःखाची बाब ही कीं एवढी किंमत देऊनही


आपल्याला खरी शांतता विकत मिळाली नाही अथवा संघर्ष थांबले नाहीत आणि त्याहूनही अधिक दु:खाची बाब ही कीं मानव जात आपल्या अनुभवांपासून काही शिकत नाही आणि पूर्वी ज्या मार्गावर संकटे आली त्याच मार्गाने पुढे जात आहे.

आपण युद्धे केली आणि विजय मिळविले आणि विजयोत्सव साजरे केले. पण विजय कसला आणि तो मोजायचा कसा? काही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी युध्द करण्यात येते असे मला वाटते. शत्रूचा पराभव करणे एवढेच युध्दाचे उद्दिष्ट नसते तर विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्याच्या मार्गातील अडथळा दूर करण्यासाठी शत्रूचा पराभव करांवा लागतो. पण जर उद्दिष्ट साध्य झाले नाही तर शत्रूवरील विजयाने केवळ हानी होते आणि खऱ्या अर्थाने तो विजयच नव्हे. पण आपण असे पाहिले आहे की, युध्दात शत्रूचा पराभव करणे हेच एकमेव उद्दिष्ट होऊन बसते आणि बऱ्याच वेळा मूळ खऱ्या उद्दिष्टाचा विसर पडतो. परिणाम असा होतो कीं शत्रूवर मिळविलेला विजय अंशिक ठरतो आणि त्यामुळे मूळ प्रश्न सुटतच नाही. त्याने ताबडतोबीची समस्या जरी सुटली तरी त्याचवेळी अनेक समस्या आणि काही वेळा त्याहूनही अधिक बिकट समस्या निर्माण होतात. म्हणून सदा सर्वकाळ, युध्दाच्या आणि शांततेच्या काळात आपल्या मनात आपली उद्दिष्टे सुस्पष्ट असली पाहिजेत आणि ती साध्य करणे हे आपले ध्येय आपण ठेवले पाहिजे.

मला असे वाटते कीं, आपल्यापुढील साध्य आणि ते सिध्द करण्यासाठी आपण वापरलेल्या साधनांचा नेहमीच निकटचा आणि घनिष्ट संबंध असतो. पण ध्येय जरी कितीही चांगले असले तरी ते साध्य करण्याचे साधन योग्य नसले तर त्यामुळे ध्येय भ्रष्ट होण्याची अथवा आपण चुकीच्या मार्गाला लागण्याची शक्यता असते. अशा प्रकारे साध्य आणि साधने यांचा घनिष्ट आणि अतूट संबंध असतो आणि त्यांना अलग करता येत नाही. खरे तर ही पुरातन काळापासून अनेक थोर व्यक्तींनी दिलेली शिकवण आहे पण दुर्दैवाने तिची क्वचितच आठवण ठेवण्यात येते. आशियातील अनेक देशांनी राष्ट्रांच्या कुटुंबात प्रवेश केला आहे इतर देशही लौकरच या समुहात सामील होतील अशी आम्हाला आशा वाटते. आफ्रिकेतील देशांविषयीही आम्हाला अशीच आशा वाटते. ही प्रक्रिया झपाट्याने चालू राहावी आणि अमेरिकेने आणि युरोपने आपल्या प्रचंड प्रभावाचा आणि शक्तीचा तिला गती देण्यासाठी वापर करावा. आम्ही आमच्या डोळ्यापुढे केवळ राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातच नव्हे तर मानवाच्या मनात ही होणारे बदल पाहत आहोत. आशिया पुन्हा एकदा गतीशील होत आहे आणि त्याला प्रगती करण्याची आणि आपल्या विशाल लोकसमुदायांच्या राहणीमानात सुधारणा करण्याची उत्कंठा लागली आहे. या विराट खंडातील ही जागृती मानव जातीच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे आणि त्यासाठी उच्च दर्जाच्या कल्पक मुत्सद्देगिरीची आवश्यकता आहे. या जागृतीच्या समस्या त्यांच्याकडे भीतीच्या

भावनेने अथवा अलीप्तपणे पाहून सुटणार नाहीत. या समस्या सोडविण्यासाठी मैत्रीचा आणि समजूतदार दृष्टिकोन, सुस्पष्ट उद्दिष्टे आणि ती साध्य करण्यासाठी सामुदायिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. शस्त्रास्त्रांसाठी प्रचंड साधन सामुग्रीचा आणि शक्तीचा वापर करणे हे आज अनेक राष्ट्रांच्या अंदाज पत्रकांचे वैशिष्ट्य आहे पण त्यामुळे जागतिक शांततेची समस्या सुटत नाही. या साधन संपत्तीपैकी थोड्याशा अंशाचा जरी इतर मार्गाने अथवा हेतूंनी वापर केला तरी शांततेला आणि मानव समाजाच्या सौख्याला अधिक भक्कम आधार उपलब्ध होणार आहे.

✦



''आपण विरोधाभासाच्या आणि चिरंतन अरिष्टाच्या काळात राहत आहोत. आपण शांततेच्या गोष्टी करतो आणि युध्दाची तयारी करतो.''

४४. अरिष्टांचे युग.

कॅलिफोनिर्यया विश्वविद्यालयातील भाषण. ३ ऑक्टों. १९४९.

आपण विरोधाभासाच्या आणि अखंड अरिष्टाच्या युगात राहत आहोत. आपण शांततेविषयी बोलतो आणि युध्दाची तयारी करतो. आपण आंतरराष्ट्रीयत्वाविषयी आणि एकात्म जगाविषयी चर्चा करतो आणि तरीही आपल्या कृतींवर संकुचित राष्ट्रवादाचे नियंत्रण असते. विचारांचा संघर्ष आहे असे म्हणतात आणि त्यातून जो युक्तीवाद आणि संघर्ष निर्माण होतो त्यात बहुदा ज्या आदर्शांनी आणि उद्दिष्टांनी आपल्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे त्यांचा विचार बाजूलाच राहतो. आपण एका तात्पुरत्या इलाजाकडून दुसऱ्या तात्पुरत्या इलाजाकडे धाव घेतो, घटनांच्या गतीबरोबर आपण धावूच शकत नाही. आपण इतिहास घडविणारे आहोत अशी प्रौढी मारणारे आपण अविरतपणे घडणाऱ्या घटनांचे दास बनतो आणि आमच्या मनांत भीतीने धडकी भरते आणि भितीच्या पाठोपाठ द्वेष निर्माण होतो.

आपल्यापैकी कोणीही आणि विशेषत: ज्यांच्या शिरावर जबाबदारी आहे त्यांना वास्तवाकडे आणि क्षणिक धोक्यांकडे दुर्लक्ष करता येत नाही. आपण स्वत:च निर्माण केलेल्या आदर्शवादाच्या जगात राहू शकत नाही. आपण जिला ताबडतोबीची वास्तवता समजतो ती कदाचित संक्रमणावस्था असते आणि त्या घटनांचे महत्व समजण्यासाठी आणि त्यांच्यावर नियंत्रण करण्यासाठी आपण सखोल विचार करणे आवश्यक असते. जगाने तंत्रज्ञानाच्या आणि भौतिक सुधारणांच्याबाबतीत आश्चर्यजनक प्रगती केली आहे ते चांगलेच आहे आणि आपण त्याचा पुरेपूर लाभ घेतला पाहिजे. पण मानव समाजाच्या विकासाच्या दिर्घकालीन इतिहासाने आपल्याला दाखवून दिले आहे की बदलत्या काळानुसार बदलत नाहीत अशी काही मुलभूत सत्ये आणि वास्तवता असते आणि जर आपण या सत्यांना धरुन राहिलो नाही तर आपण भलतीकडेच जाण्याची शक्यता आहे. सध्याच्या पिढीपाशी ज्ञानाचा आश्चर्यकारक संग्रह असूनही ती बऱ्याच वेळा भलतीकडेच भरकटली आहे आणि तिच्या डोक्यावर सदैव धोका टांगलेला आहे.

म्हणून आपल्यात उणीव कोणती आहे? आणि मानवी व्यवहारातील या अरिष्टातून आपण कोणता मार्ग काढू शकतो? मी कोणी देवदूत नाही किंवा माझ्यापाशी कोणतीही यक्षिणीची कांडी नाही. मी मार्ग शोधण्यासाठी धडपड करीत आहे, सरळपणे विचार करीत आहे आणि होता होईल तेवढ्या प्रमाणात कृतींचा

विचाराशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करीत आहे. मला तसे करणे बऱ्याच वेळा अवघड जाते कारण राजकीय स्तरावरील कृती ही व्यक्तीगत नव्हे तर गटाची अथवा समुदायाची कृती असते. असे असले तरी जे धोरण आणि विचार सत्याकडे आणि मानवी स्वभावाकडे दुर्लक्ष करतात आणि हिंसाचाराचा आणि द्वेषभावनेचा पुरस्कार करतात त्यांचे परिणाम अनिष्टच होणार अशी मला खात्री पटलेली आहे. आपले हेतू जरी कितीही चांगले असले आणि आपली उद्दिष्टे जरी कितीही उदात्त असली तरी आपण स्वीकारलेला मार्ग आणि साधने जर चुकीची आणि अनिष्ट असतील तर आपण आपले उद्दिष्ट साध्य करु शकणार नाही. आपल्याला जर शांतता हवी असेल तर आपण युद्धासाठी नव्हे तर शांततेसाठीच प्रयत्न केले पाहिजेत. जगातील विविध लोकांमध्ये सदिच्छा आणि सद्भाव वसावा अशी जर आपली इच्छा असेल तर आपण द्वेष करता कामा नये, द्वेषाचा प्रचार करता कामा नये. आज जगामध्ये खूपच हिंसाचार आणि द्वेष बोकाळला आहे हे अगदी खरे आहे आणि आपण आक्रमणापुढे नमणार नाही तसेच हा प्रकारही चालू देता कामा नये. आपण दुष्ट प्रवृत्ती आणि आक्रमणाविरुध्द लढले पाहिजे पण ते करताना आपण आपल्या उद्दिष्टांची आणि ध्येयाची आठवण ठेवली पाहिजे. पण त्याचबरोबर आपली साधने त्यांना अनुसरुन आहेत की नाही याचीही आठवण ठेवली पाहिजे.

आश्चर्यकारक प्रगती केलेल्या आधुनिक संस्कृतीच्या विकासामुळे अधिकारांचे आणि सत्तेचे अधिकाधिक केंद्रीकरण झाले आहे. व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर सतत अतिक्रमणे होत आहेत. कदाचित काही प्रमाणात हे अपरिहार्यही आहे. कारण आधुनिक जग बऱ्याच प्रमाणातील केंद्रीकरणाखेरीज चालूच शकत नाही. पण आपण असे पाहिले आहे की, सत्तेच्या केंद्रिकरणाची प्रक्रिया अशा टोकापर्यंत नेण्यात येते की व्यक्तीगत स्वातंत्र्याचा जवळ जवळ लोप होतो. शासनसंस्था सर्व बाबतीत सर्वश्रेष्ठ होऊन बसते अथवा व्यक्तींच्या काही गटांच्या हाती सत्ता अशाप्रकारे एकवटते की व्यक्ती स्वातंत्र्याचा लोप होतो. विभिन्न आणि काही वेळा परस्पर विरोधी विचारसरणीचे लोक आपापल्या भूमिकेवरुन शासनाच्या अथवा गटांच्या हाती सत्तेचे केंद्रिकरण होण्यास प्रोत्साहन देतात. यामुळे अंततः मानवाला केवळ दुःख होते असे नाही तर मानव समाजाच्या विकासाला अत्यंत आवश्यक असलेल्या सृजनशील बुध्दिमत्तेलाही ग्रहण लागते. शासन सत्तेचा केंद्रित अधिकार आणि प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याची आणि संधीची हमी यांमध्ये आपण कोठे तरी समतोल साधणे आवश्यक आहे.

वस्तुस्थितीला आपल्या आवडीनुसार आकार देण्यापूर्वी माणसाच्या मनातील या आणि अशा प्रकारच्या समस्या आपल्याला सोडवाव्या लागतील. या समस्यांचा विचार करण्यासाठी, जेथे जीवन व्यवहारात सहभागी होण्याच्या आणि तो भार तोलण्याच्या हेतूने उगवत्या पिढीला प्रशिक्षण देण्यात येते अशा विश्वविद्यालयापेक्षा अधिक योग्य

जागा कोणती असू शकते?

विश्वविद्यालयाच्या सुंदर परिसरात, निसर्ग सौंदर्याने आणि मानवी बुध्दिमत्तेने विनटलेल्या येथील वातावरणात मी उभा असतांना जगाचे सारे संघर्ष आणि दु:ख माझ्यापासून खूप दूर आहे असे मला वाटते. सारा भूतकाळ, आशिया, युरोप आणि अमेरिकेचा भूतकाळ माझ्याभोवती गर्दी करुन सोडीत आहे आणि वर्तमान काळाच्या तलवारीच्या धारेवर उभा राहून मी भविष्यकाळात डोकावण्याचा प्रयत्न करीत आहे. मला या भूतकाळात मानवाने प्रतिकूल परिस्थितीविरुध्द आणि असंख्य संकटांविरुध्द केलेला दीर्घकालीन लढा दिसतो. मला त्याने वारंवार पत्करलेले हौतात्म्य दिसते, बलीदान दिसते पण त्याचबरोबर सर्व प्रकारच्या आपत्तीं विरुध्द वारंवार उठून उभी राहणारी आणि विजयी होणारी मानवाची अस्मिताही दिसते. इतिहासाच्या या पटलापुढे पाहून आपण त्यापासून ज्ञान, धैर्य आणि स्फूर्ती घेऊ या. भूतकाळाच्या आणि वर्तमानाच्या दडपणाखाली आपण विशेष दबून जाण्याची गरज नाही. गतकाळातील या सर्व युगांचे आपण वारसदार आहोत आणि या जगाच्या एका महान् संक्रमणाच्या अवस्थेत आपण आपली भूमिका पार पाडावयाची आहे. तो एक सन्मान आहे आणि जबाबदारी आहे आणि आपण ती निर्भयपणे आणि शंकाकूल न होता स्विकारावयाची आहे. इतिहास मानवाच्या स्वातंत्र्याच्या लढ्याची गाथा सांगतो आणि त्याला जरी अनेक अपयशे आली असली तरी त्याच्या सिध्दी आणि विजय खरोखरीच उल्लेखनीय आहेत. खरे स्वातंत्र्य हे केवळ राजकीय स्वातंत्र्य नसते तर ते आर्थिक आणि आत्मिकही असते. ते प्राप्त झाले तरच मानवाची वाढ होईल आणि तो आपले नियतीने ठरवून दिलेले कार्य पूर्ण करु शकेल. हे स्वातंत्र्य म्हणजे केवळ परस्परांशी लढणाऱ्या राष्ट्रांमध्ये परिणत होणारे समुदायांचे स्वातंत्र्य नव्हे तर स्वतंत्र आणि सुव्यवस्थित जगाच्या संदर्भातील स्वतंत्र राष्ट्रीय समुदायांमधील व्यक्तिगत स्वातंत्र्य असले पाहिजे अशा दृष्टीने आज आपण स्वातंत्र्याचे चित्र पाहिले पाहिजे. आशिया, युरोप आणि अमेरिका यांच्या समस्यांकडे यापुढे अलगपणे पाहता येणार नाही. एकाच जागतिक समस्याचे ते भाग आहेत.

आपला भविष्यकाळ संघर्षांनी आणि आपत्तींनी परिपूर्ण आहे असे दिसत असले तरी ज्या मानवाच्या आत्म्याने एवढ्या आपत्ती सोसल्या आहेत त्याचा पुनरपि एकदा विजय झाल्याखेरीज राहणार नाही याबद्दल मला यत्किंचितही शंका नाही.

✦

"आज आपल्याला एकात्मिक जीवन पध्दती नाही."

४५. विश्वविद्यालयाचे कार्य आणि भूमिका

सिलोन विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभ प्रसंगी केलेले भाषण
कोलंबो, १२ जानेवारी १९५०.

हे आंतरराष्ट्रीय परिषदांचे युग आहे. परिषद ही नेहमीच, जवळ जवळ नेहमीच चांगली गोष्ट असते. कारण त्या निमित्ताने लोक एकत्र टेबलाभोवती जमतात. मैत्रीच्या भावनेने विचार विनिमय करतात आणि समस्यांची उकल करण्यांत जरी त्यांना नेहमीच यश आले नाही तरी तसा प्रयत्न करणे नेहमीच श्रेयस्कर असते. तसा प्रयत्न करणे केव्हाही चांगले असते. पण गतकाळात आम्हाला समस्या सोडविण्याच्या कामी अपयश कां यावे याचे मला बऱ्याच वेळा आश्चर्य वाटते. मुत्सद्यांमध्ये बुध्दीचातुर्य कमी पडते कीं समंजसपणा कमी पडतो? मला तसे वाटत नाही कारण ते शांतता आणि सहकार्यासाठी तळमळीने प्रयत्न करणारे कर्तृत्ववान मुत्सद्दी होते. पण असे असूनही कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यांना तोडगा सापडला नाही हे खरे. असे कां व्हावे? मला कळत नाही पण कदाचित आपण क्षणिक समस्या सोडविण्यासाठी वरवर प्रयत्न करतो आणि खोलवरची कारणे पाहत नाही हे एक कारण असावे. तुम्ही याचा विचार करावा असे मी म्हणतो कारण यात निश्चितच काही तरी अडथळा आहे. आम्हाला कितीही तळमळ असली तरी काही वेळा आम्ही परस्परांमधील समझोत्याच्या आड येणारे जुने आणि नवे अडथळे दूर करु शकत नाही. आणखी मला असे वाटते की आपली संस्कृती जरी कितीही अभिमानास्पद असली, विज्ञानात आणि तंत्रशास्त्रात जरी आपण कितीही प्रगती केली असली तरी जीवनाच्या काही मूलभूत बाबींवरील आपली पकड सुटली आहे. जीवनाला स्थैर्य देणाऱ्या एखाद्या बाबीवरील आणि मूल्यांचे मापन करणाऱ्या एखाद्या मापदंडावरील आपली पकडच सुटली आहे.

आपण विज्ञानात खूप प्रगती केली आहे. माझी विज्ञानावर खूपच निष्ठा आहे. आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाने जग संपूर्णपणे बदलले आहे. जगाला जर त्याच्या समस्या सोडवावयाच्या असतील तर त्या अपरिहार्यपणे विज्ञानाच्या साधनानेच सोडवाव्या लागतील, त्याचा त्याग करुन नव्हे. पण विज्ञानाच्या केवळ प्रगतीमुळे बऱ्याच वेळा लोक विज्ञानभ्रष्ट होतात असे मला आढळून आले आहे. हे असे म्हणणे चमत्कारिक आहे. पण विज्ञानाची व्याप्ती एवढी वाढली आहे आणि ते इतके सर्वव्यापी झाले आहे की, आपण वैज्ञानिक गोष्टींचे सर्वांगीण ज्ञान करुन घेऊ शकत नाहीत आणि त्या प्रत्येक विषयात अधिकाधिक संकुचित होत जातात. कोणी एखाद्या विषयात पारंगत

होत असतील पण त्यांची एकूण जीवनावर पकड नसते.

आपण ज्या पुरातन भारतीय आणि ग्रीक संस्कृतीविषयी वाचन करतो त्यावरुन आपल्याला किमानपक्षी मला तरी असे दिसून येते कीं त्या काळच्या लोकांचे ज्ञान जरी खूपच मर्यादित असले तरी त्यांच्यापाशी निश्चितच जीवनाविषयी एकात्मिक दृष्टिकोन होता. त्यांचा दृष्टिकोन तितकासा विस्कळीत नव्हता. आजच्या सर्वसामान्य पदवीपूर्ण अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याला जेवढे कळते तेवढेच जरी त्यांना कळत होते तरी त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन एकात्मिक होता. त्यांच्या जीवनविषयक एकात्मिक दृष्टिकोनामुळे ते जीवनातील समस्यांकडे विशिष्ट प्रकारच्या चातुर्याने पाहत असत.

हे खरे की खोटे हे मला ठाऊक नाही कारण भूतकाळाकडे पाहताना प्रत्येकाची दृष्टी जरा अवास्तव गौरवाची असते. मी कदाचित चुकतही असेन पण कोणत्याही परिस्थितीत एक गोष्ट मात्र निश्चितपणे मला वाटते ती ही कीं आजच्या लोकांना जीवनाविषयी एकात्मिक दृष्टिकोन नाही. आपण कितीही हुषार असलो आणि आपण कितीही ज्ञान संपादन केले असले तरी आपण फारसे चतुर नाही. आपण जरी एकाच जगात एकत्र आलो असलो तरी आपण जुन्या लोकांपेक्षा अधिक संकुचित आहोत. आपण वेगाने प्रवास करतो, दळणवळन वाढले आहे, आपल्याला परस्परांविषयी अधिक माहिती आहे आणि आपल्यापाशी रेडिओ आणि तशीच इतर साधनेही आहेत. हे सर्व व्यापक प्रभाव असूनही आपण मनाने संकुचित आहोत. ही एक विलक्षण गोष्ट आहे जी मला समजत नाही.

मी हे विचार विश्वविद्यालयातील लोकांसमोर व्यक्त करीत आहे. कारण ही समस्या इतर संघटनांपेक्षा विश्वविद्यालयांनीच सोडवावयाची आहे. विश्वविद्यालयांनी जर मूलभूत चातुर्य शिकविले नाही, जर त्यांनी ज्या लोकांना विशिष्ट नोकऱ्या हव्या आहेत असे पदवीधर तयार केले तर बेकारीचा प्रश्न काही प्रमाणात सुटेल अथवा तंत्र विषयक अथवा इतर प्रकारचे काही साहाय्य होईल. पण त्यांनी विद्यमान काळातील समस्या ज्यांना समजतात आणि जे समस्या सोडवू शकतात असे लोक तयार केले असे म्हणता येणार नाही.

मी आणि तुम्ही आशियात राहतो. आशियातील आजची नवी आणि बदलती परिस्थिती ही एक अत्यंत महत्वाची वस्तुस्थिती आहे. आशियात जे घडत आहे ती एक ऐतिहासिक महत्व असलेली वास्तव परिस्थिती आहे. तिचे संपूर्णपणे आकलन होणे किंवा ती समजणे अवघड आहे. पण समग्र आशियात काही तरी खूप महत्वाचे घडले आहे आणि घडत आहे हे कुणाच्याही लक्षात येते. त्यात एक प्रकारची गतीशीलता आहे. जे घडते आहे त्यातील बरेचसे आपल्याला आवडत नाही आणि त्यातील थोडेसे आपल्याला आवडेल पण वस्तुस्थिती ही आहे की आशियात प्रचंड आणि शक्तीशाली प्रवाह संचार करीत आहेत. आपण कुठे तरी उंच आणि अलिप्त कक्षात बसून

त्यांच्याकडे आवडीने अथवा नाराजीने पाहात राहणे तितकेसे योग्य नाही. जर आपल्याला या घटनाक्रमात परिणामकारक भूमिका पार पाडावयाची असेल तर ते प्रवाह समजून घेतले पाहिजेत. आशियाच्या बऱ्याच मोठ्या भागाला गेल्या तीन चार शतकात ग्रहण लागल्यासारखे झाले होते. आणि तेथे दिर्घकाळ राजकीय स्वातंत्र्याची उर्मी वसत होती.

आपण जर आशियाचा प्रदीर्घ इतिहास वाचलात तर या हजारो वर्षांपैकी बऱ्याच मोठ्या काळात आशियाने जागतिक घडामोडीत महत्वाची भूमिका पार पाडली आहे हे आपल्या लक्षात येईल. गेल्या तीन चार शतकातच आशिया गतीशून्य, निष्क्रिय होता आणि त्याच्यात अनेक गुण असूनही विचारांच्या आणि कृतीच्या दृष्टीने तो गतीहीन झाला होता. साहजिकच तो अधिक प्रगत, जोमदार आणि गतीशील देशांच्या वर्चस्वाखाली गेला. ती जगाची रीतच आहे आणि योग्य रीत आहे. तुम्ही जर गतीहीन असाल तर त्याचे फळ तुम्हाला भोगलेच पाहिजे. आणि आता आशियात बदल होत आहेत असे आपल्याला दिसते आणि ते उशीराने होत असल्यामुळे अत्यंत झपाट्याने होत आहेत आणि अनेक प्रकारची उलथा पालथ होत आहे. आणि अनेक नको त्या गोष्टीही घडत आहेत. पण आपल्या भोवती हे प्रचंड बदल घडत आहेत ही एक महत्वाची वस्तुस्थिती आहे. आशियातील या बदलांमधून कोणती निष्पत्ती होईल हे मला ठाऊक नाही. आणि आपल्या पैकी कुणालाही ते ठाऊक असेल असे मला वाटत नाही.

तुम्ही आणि मी आज या बदलत्या आशियात राहत आहोत. आपल्यापैकी अनेकांना या समस्यांना तोंड देण्याचा बोजा उचलावा लागणार आहे. या समस्या केवळ आजच्या अथवा उद्याच्या नाहीत तर एका पिढीलाच नव्हे तर अनेक पिढ्यांना पुरतील अशा या समस्या आहेत. हे ओझे तुम्हालाच उचलायचे आहे कारण आमच्या पैकी ज्या अनेकांना तुम्ही मान देता ते आम्ही जीवनाच्या उताराला लागलो आहोत. आणि आमची कार्य अथवा परिश्रम करण्याची फारच थोडी वर्षे शिल्लक राहिली आहेत. आम्ही त्या काळात कसोशीने आमच्या ताकदीनुसार कार्य करु या बद्दल मला शंका नाही. पण मुख्यतः हे ओझे तुम्हाला, आजच्या पदवीधारकांनाच उचलायचे आहे. त्यासाठी तुम्ही तुमची मने आणि शरीरे तयार करायची आहेत. या समस्या अगाध चातुर्याने समजून घ्यायच्या आहेत आणि क्रियाशील राहून त्या सोडवायच्या आहेत. आजच्या जगात तुम्ही पंडिताच्या अलिप्त वृत्तीने राहणे योग्य नाही अथवा इतरांवर टीका करुनही भागणार नाही. आज प्रत्येक व्यक्तीला आपला बोजा उचलावाच लागतो. जर तिने उचलला नाही तर ती व्यक्ती कुचकामी ठरते.

आमचे अनेक तरुण आणि तरुणी उत्साही, तळमळीच्या आणि जोशपूर्ण आहेत असे मला आढळून आले आहे पण त्या प्रत्यक्ष जीवनाच्या वास्तवतेपासून

अगदीच दूर असतात हे मी तुमच्याचविषयी नव्हे तर भारताविषयीही बोलतो कारण मला सिलोनविषयी जास्त माहिती नाही. विद्यार्थी दशेमध्ये ते बऱ्याच वेळा विविध विषयांवर चर्चा करतात, ठराव संमत करतात पण नंतर प्रत्यक्ष जगात पदार्पण केल्या नंतरही ते जीवन म्हणजे एक सतत चालणारे चर्चासत्र आहे असे समजतात, अविश्वासाचे ठराव संमत करतात, काहीही न करता इतरांवर टीका करीत राहतात.

आणखी एक गोष्ट, विश्वविद्यालय हे प्रामुख्याने एक सांस्कृतिक स्थळ आहे. पण हा मुद्दा मला मूळ पदावर घेऊन जातो. या परिसरात सर्वत्र खूपच संस्कृती पसरलेली दिसते. आणि सर्वसाधारणपणे जे लोक संस्कृतीविषयी मोठमोठ्याने बोलतात त्यांना माझ्या मते अजिबात संस्कृती नसते. पहिली गोष्ट ही की संस्कृती भडक नसते, ती शांत, संयत आणि सहिष्णू असते. तुम्ही एखाद्या व्यक्तीची संस्कृती तिच्या शांत चित्तावरुन, एखाद्या हावभावावरुन, एखाद्या शब्दप्रयोगावरुन अथवा खास करुन एकूण तिच्या जीवनावरुन ओळखू शकता.

प्रत्येक देशाची काही खास सांस्कृतिक वैशिष्ट्ये असतात. अनेक युगायुगातून ती विकसित होत आलेली असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक युगाची संस्कृती असते आणि काही खास जीवनपध्दती असते. प्रत्येक देशाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये महत्वाची असतात आणि ती जर काळाला साजेशी नसतील तर ती टिकून राहत नाहीत. म्हणून काहीही झाले तरी आपल्या राष्ट्राच्या खास संस्कृतीचा अवलंब करा. पण राष्ट्रीय संस्कृतीहूनही अधिक सखोल असे काही तरी आहे आणि ते म्हणजे मानवी संस्कृती. ती मूलभूत संस्कृती नसेल तर तुम्हाला तुमच्या ज्या राष्ट्रीय संस्कृतीचा एवढा अभिमान वाटतो तिला खरी मूळे नाहीत असे म्हणावे लागेल आणि तिचा तुम्हाला विशेष फायदा होणार नाही. विशेषत: आज आपण आपल्या राष्ट्रीय संस्कृतीबरोबरच जिला जागतिक संस्कृती म्हणता येईल अशी संस्कृती विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. एक जग या कल्पनेविषयी बरीच चर्चा आहे आणि आज ना उद्या केव्हा तरी ही चर्चा फलदायी ठरली पाहिजे असे मला वाटते. नाहीतर या जगाचे तुकडे तुकडे होतील. आमच्या पिढीला कदाचित हे एक जग पाहायला मिळणार नाही पण जर या 'एक जगा'साठी आपल्याला सिध्द व्हायचे असेल तर आपण आज किमानपक्षी त्याचा विचार तरी केला पाहिजे. तुम्हाला टिकवून धरण्यासाठी संस्कृती तरी आहे आणि असे असतांना तुम्हाला संकुचित विवरामध्ये राहण्याची आणि आपण इतर जगाहून श्रेष्ठ आहोत असे सिध्द करण्याचा प्रयत्न करण्याची गरजच नाही.

या नव्या वर्षात आपल्या भोवती सर्व प्रकारची भीषण संकटे वावरतांना दिसत आहेत. आज जगात भय हीच रुढ भावना आहे. जवळ जवळ सर्वच जग कशाला तरी भीत आहे. प्रत्येक देश दुसऱ्या देशाला भितो आणि भय ही अनेक प्रकारच्या अनिष्ट परिणामांची जननी आहे. भय ही एक अत्यंत दुष्ट भावना आहे आणि आपण सर्वजण

भयाच्या दडपणाखाली वावरत आहोत. आपण जर या भयाच्या दडपणाखालून काही प्रमाणात मुक्त झालो तर आपल्या अनेक समस्या सोडविणे आपल्याला सुलभ जाईल.

आम्हाला या जगामध्ये भयाबरोबरच खूपच आशा, तळमळ आणि सुखद घटनांची अपेक्षाहि दिसत आहे. येथे विनाशक आणि नकारात्मक प्रवृत्तीबरोबरच सृजनशील आणि विधायक प्रवृत्तीही कार्य करीत आहेत. या प्रवृत्तीपैकी कोणत्या प्रवृत्तीचा निकटच्या अथवा दूरच्या भविष्यकाळात विजय होईल हे मला ठाऊक नाही पण अखेर शेवटी सृजनशील आणि एकात्मिक, प्रवृत्तीचाच विजय होईल असा विश्वास असल्याखेरीज मला आणि तुम्हाला योग्य रीतीने कार्य करताच येणार नाही, हे उघड आहे.

ते काहीही असले तरी कोणत्या तरी उदात्त ध्येयासाठी झटल्यामुळे ध्येयसिध्दीलाच थोडाफार हातभार लागतो असे नव्हे तर आपल्यालाही समाधान लाभते. आपण काही कुणी प्रेषित नाही आणि उद्या काय होणार हे आपण जाणू शकत नाही पण आपल्याला हव्या असलेल्या भविष्यकाळाकरिता झटण्यात समाधान आहे. यामुळे तुमच्या जीवनात असे काही लाभते कीं जीवनाला काही अर्थ प्राप्त होतो. तुम्ही जर एखाद्या उदात्त उद्दीष्टाला जीवन समर्पित केलेत तर त्यामुळे तुम्हाला गौरव प्राप्त होतो. फळ मिळो वा न मिळो तुम्ही त्यासाठी झटलात हीच एक फल प्राप्ती आहे.

आपल्या भोवती सर्वत्र दुष्ट प्रवृत्ती पसरलेल्या आहेत आणि जगाची कितीही अधोगती झाली असली तरी आपल्याला या जगात राहावयाचे आहे. असे असले तरी जगात चांगलेही खूपच आहे आणि एक हिंदू या नात्याने ज्याला दैवी शक्ती म्हणतात ती व्यक्तीमध्ये आणि समुदायामध्ये वसत आहे याची आपण जाणीव ठेवली पाहिजे. आपण जर आपले पाय जमिनीवर भक्कम रोवून उभे राहिलो आणि काल्पनिक लहरीपणात रमलो नाही आणि त्याचबरोबर आपल्यात ती दैवी शक्ती असेल तर आपण समतोला राखू शकू आणि काही प्रमाणात एकात्मिक व्यक्तीमत्वाचा विकास करु शकू. कोणी तरी म्हटले आहे आणि ते आंपण समजून घ्यावे असे मला वाटते. 'परमेश्वरा मी जरी पृथ्वीवर जगत असलो, पृथ्वीपूत्र असलो तरी तारांगण हा माझा जनक आहे.'

✦

''कोणत्याही प्रकारची शक्ती स्थिर असू शकत नाही. ज्या क्षणी वाढ खुंटते त्या क्षणी सडण्याची क्रिया सुरु होते आणि मृत्यू ही त्याची परिणती आहे.''

४६. गतीशील जीवन

सौगोर विश्वविद्यालयाततील भाषण, ३० ऑक्टोबर १९५२.

भारत हे एक अनेकविध प्रवृत्तींचे आणि गुण वैशिष्ट्यांचे अजब मिश्रण आहे असे मला वाटते. यापैकी काही प्रवृत्तींबद्दल मला आनंद होतो, विश्वास वाटतो आणि इतर काहींच्या बाबतीत माझे मन भयाकूल होते. यातील कोणत्या प्रवृत्तींची वाढ होईल आणि कोणत्या प्रवृत्तींचा अखेर विजय होईल या बाबतीम मी भाकित करू शकत नाही. ते भविष्यकाळच दाखवून देईल. मी एवढेच सांगेन की मला माझ्या देशाविषयी आणि जनतेविषयी अपार विश्वास आहे. त्याचबरोबर आमच्या देशाला कोणता रोग जडला आहे हे मला उघड दिसते. आम्ही मनाने संकुचित आहोत आणि दृष्टीने अधू आहोत. आपल्याकडे मनाच्या सृजनशीलतेची वाण आहे एवढेच नव्हे तर त्याची वाढ होईल असे वातावरणही नाही. भारतात ''संस्कृती'' हा शब्द ज्या पध्दतीने मिरविण्यात येतो ती पध्दत पाहून मला मोठे आश्चर्य वाटते. माझ्या मते जेथे असे करतात तेथे संस्कृती नसते एवढाच त्याचा अर्थ आहे. संस्कृती ही गाजावाजा करण्याजोगी गोष्ट नाही. संस्कृती जास्त बोलत नाही अथवा आरोळ्या ठोकत नाही. काल परवाच मी रविंद्रनाथ टागोरांची एक कविता – तिचा अनुवाद वाचला. या कवितेत त्यांनी भारताच्या अभूतपूर्व विविधतेने जेथे अनेकविध प्रवाह एकत्र येऊन आपली आजची संस्कृती निर्माण झाली आहे तिचे वर्णन केले आहे. संस्कृतीच्या या अनेकविध प्रवाहांना सामावून घेण्याची क्षमता हा भारताच्या सृजनशीलतेचा एक भाग आहे. म्हणून आपण आपल्यापाशी सर्व काही आहे आणि परकीयांकडून आपण काही ग्रहण करण्याची आवश्यकताच नाही अशी वृत्ती निर्माण करणारा अभिमानाचा आणि मूर्खपणाचा संकुचित दृष्टिकोन स्वीकारण्याचे काहीच कारण नाही. आग्नेय आशिया आणि अति पूर्वेकडील देशांनी भारताच्या सांस्कृतिक वारशाचा मुक्तपणे वापर केला आहे. त्याचप्रमाणे इतर सांस्कृतिक वारशांचे पुरावेही आपल्याला आढळून येतात. तसेच भारतातही आपल्याला इतर संस्कृतीचे पुरावे दिसून येतात. अर्थात भारतीय संस्कृतीने जरी इतर संस्कृतींना सामावून घेतले असले तरी तिचा मूलाधार बदललेला नाही. आपल्या प्राचीन पूर्वजांचा देश असा होता. हळूहळू एक बदल घडून आला. आम्हाला स्वत:ला बाहेर जाऊ नये अथवा बाहेरच्यांनी आत येऊ नये असे वाटू लागले. आमच्यात संकुचित कोनाडे तयार झाले आणि क्षुद्र भेद निर्माण झाले. प्रत्येक विभाग

इतर जाती जमातींपासून अलग राहू लागला. आम्ही परदेश गमनाला जवळ जवळ बंदीच घातली होती. आपण भारताबाहेर गेलो तर आपला धर्म, आपली जात भ्रष्ट होईल अशी आम्हाला भीती वाटू लागली. आम्ही जीवनाच्या इतर महत्वाच्या अंगांपेक्षा, काय खावे, काय प्यावे, कुणाला स्पर्श करावा, करू नये याला अधिक महत्व देऊ लागलो. आता जो बदल घडून आलेला दिसत आहे तो अचानक घडलेला नाही. स्वत:मध्ये गढून जाणे, सभोवती घडणाऱ्या सर्व गोष्टींकडे डोळेझाक करणे आणि आज आपल्यापाशी आहे तेच सर्वस्व आहे, अधिक काही शिकण्याजोगे नाही असे आपल्याला वाटू लागले. हे सारे मानसिक बदल हळूहळू घडून आले आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती किंवा जमात अशा प्रकारे विचार करू लागते तेव्हा तिचा विनाश निश्चितच ठरलेला आहे. कारण जीवन ही एक सतत वाढणारी आणि गतीशील प्रक्रिया आहे. कोणत्याही प्रकारची शक्ती स्थिर राहू शकत नाही. ज्या क्षणी वाढ खुंटते त्याच क्षणी सडण्याची प्रक्रिया सुरू होते आणि मृत्यू ही त्याची अंतिम परिणती होते. अशा प्रकारे आपण भारतातील लोक आपल्या जीवनात आणि संस्कृतीच्या बाबतीत गतीहीन झालो. अनेक शतके चालू असलेली ही सडण्याची प्रक्रिया आपल्याला आपल्या वाङमयात दिसून येते. आपण उत्कृष्ट वाङमयाने सुरुवात केली. नंतर अभिजात संस्कृत वाङमय आले, तेही सुंदर होते. पण पुढे या साहित्याची अधोगती झाली आणि आपल्याला संस्कृत भाषा क्लीष्ट झालेली आणि दोन दोन पानांचे एक एक वाक्य असलेली संस्कृत भाषा पाहावयास मिळू लागली. तिच्यात कोणत्याही प्रकारचा जोश अथवा सामर्थ्य दिसेनासे झाले. मल्लीनाथी आणि रीचा ही भाषेच्या अवनतीची उदाहरणेच आहेत. उदात्त कल्पनांपासून स्फूर्ति घेण्याऐवजी आपण आपल्यापाशी होते तेही गमावून बसलो. आपले प्राचीन वास्तूशास्त्र उत्कृष्ट होते आणि जगातील श्रेष्ठ वास्तुशास्त्रांत त्याची गणना होत होती, आता त्याची काय अवनती झाली आहे ते पहावे, त्याच्यात अद्यापही कारागिरी राहिली आहे. पण साधेपणातून त्याच्या रचनेत जो रुबाबदारपणा आला होता तो नष्ट झाला आहे. ते अधिकाधिक बोजड होते गेले. त्यात सौंदर्य नव्हते, केवळ कठोर परिश्रम होते. देश जेव्हा गतीशील असतो तेव्हा त्याचे अनेक अंगांतून प्रत्यंतर येते. आम्ही पुन्हा गतीशील होण्याची आशा करतो. कदाचित आम्हाला पुनरपि गतीशील होण्यापूर्वी हा धडा शिकणे आवश्यकच होते असे दिसते.

जे गतीहीन आणि अर्धमेले आहे त्यापासून स्फुर्ति काय घेणार? हा मुख्य प्रश्न आहे. लोक इतक्या संकुचित पध्दतीने कसे राहतात, प्रत्येक नव्या गोष्टीसाठी आपली मने कशी बंद करतात आणि केवळ भारतीय संस्कृतीविषयीच कसे बोलतात याचे मला आश्चर्य वाटते. मला संस्कृतिविषयी थोडेफार कळते. जे कोणी कवाडे बंद करा असे सांगतात त्यांना संस्कृतीविषयी काहीच कळत नाही. प्रत्येक प्रक्रिया वाढ दर्शवित असते. जे लोक परकीय गोष्टी बाद करण्यावर विश्वास ठेवतात ते आपली मने


संकुचित करतात आणि साऱ्या राष्ट्राला गतीहीन संस्कृतीच्या कालखंडात लोटतात. आपण गतीशील राहिलो नाही तर आपण टिकणार नाही.

गेल्या काही पिढ्यांच्या काळात जगामध्ये किती प्रचंड बदल घडून आले आहेत याची तुम्हाला जाणीव आहे काय? तुम्ही त्याबाबतीत विचार करावा असे मला वाटते. भारताचे उदाहरण घ्या. अशोक अथवा अकबराच्या काळातील एखाद्या माणसाने जर त्यापूर्वीच्या दीडशे वर्षापूर्वीच्या भारताकडे पाहिले असते तर त्याला काही बदल झालेले आढळले असते पण त्याला मूलभूत बदल झाले आहेत असे दिसले नसते. मानवी जीवनाचा ढाचा बदलला नव्हता. घोडा हेच अद्यापही वाहतुकीचे आणि दळणवळणाचे साधन होते. तसे ते हजारो वर्षे होते. अचानक आणि मुख्यत: विज्ञानाच्या वापरामुळे प्रचंड बदल घडून आला. केवळ दळणवळणाच्या साधनातील बदलामुळे जगात जी उलथापालथ घडून आली ती खरोखरीच आश्चर्यजनक आहे. विज्ञान किती पुढे गेले आहे याची जाणीव व्हायला एवढेही पुरेसे आहे. पांचशे वर्षापूर्वी आपल्याला स्थिर राहणे शक्य होते. पण आज कोणीही गतीहीन राहू शकत नाही. आज सारेच बदलत आहे. या बदलाची चाल आणि गती भयानक आहे. गेल्या पांच वर्षात आम्ही एक चांगली गोष्ट केली ती ही की झपाट्याने होणाऱ्या वैज्ञानिक बदलाचा परिचय करुन घेण्यासाठी आम्ही अनेक राष्ट्रीय प्रयोगशाळा स्थापन केल्या आहेत हे मी जाताजाता सांगू इच्छितो. गतीहीन राहणे वाईट आहे कारण एखाद्या देशाने गतीहीन होणे म्हणजे गतीरोध आणि गतीरोधामुळे विनाश होतो.

गतीशील आणि सृजनशील राहणे हे एक व्यावहारिक धोरण आहे आणि उच्च सांस्कृतिक दृष्टिकोन आहे. भारताला प्रचंड वैभवाशाली परंपरा असताना मानसिक संकुचितपणात रुतून बसणे विघातक आहे. आपल्यापैकी किती जणांचा हा गतीशील दृष्टिकोन आहे आणि कितीजण सरकारी नोकरी मिळविण्याच्या विचारात आहात? तुम्ही सरकारी नोकरीत गेलात किंवा इतर कोणताही व्यवसाय पत्करलात तरी तुमचे ध्येय कोणते? काही शेकडो रुपये कमावणे हेच काय? कीं तुम्ही काही तरी सृजनशील आणि चांगले करणार आहात. तुम्ही आपल्या आयुष्याची, कुचकामी अस्तित्वाची काही वर्षे विशेष काही न करता रखडत काढणार आहात काय? हा भारतापुढील मोठा प्रश्न आहे. आपले गुण आणि दोष काहीही असोत, त्याची भली मोठी यादी करता येईल पण जीवनाला साहसी वृत्तीने सामोरे जाण्यावर माझा विश्वास आहे. गाजावाजा न करता आणि आरोळ्या न ठोकता जीवनाला अर्थ्या वाटेवर गाठावे असा माझा विचार आहे. जीवनाविषयीचा आणि त्याच्या समस्यांबाबतचा तुमचा दृष्टीकोन साहसी आणि क्रियाशील राहणार आहे की गतीहीन राहणार आहे. यावरच तुम्ही निसर्गाशी जमवून घेता की निसर्ग तुमच्याशी जमवून घेणार आहे हे अखेर शेवटी ठरणार आहे. तुमची महत्वाकांक्षा कोणती? मी जेव्हा देशभर फिरतो तेव्हा असंख्य तरुण आणि तरुणींच्या

डोळ्यात महान् कार्य करण्याची महत्वाकांक्षा मला दिसावी अशी माझी इच्छा असते. काही वेळा मला चित्त थरारुन सोडणारे डोळे दिसून येतात, त्यांच्यात मला गुणवत्ता पाहायला मिळते. मला असे डोळे आणि चेहरे जितके अधिक प्रमाणात दिसतील तेवढा भविष्यकाळाविषयीचा माझा विश्वास दुणावतो. जे तरुण आणि तरुणी साहसी वृत्तीचे आणि संकटांना न कचरता सामोरे जाणारे आहेत त्यांच्यावरच हा भविष्यकाळ अवलंबून आहे.

✦



"वृत्तपत्रे प्रचंड स्वरुपाची मदत करु शकतात, अधिक चांगली आणि उच्च दर्जाची, सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठीच नव्हे तर जीवनातील मामुली व्यवहाराची आचार संहिता निर्माण करण्याच्या बाबतीतही ती मदत करु शकतात."

४७. स्वातंत्र्य आणि स्वैराचार

अखिल भारतीय वृत्तपत्र संपादक परिषदेतील भाषण,
नवी दिल्ली, ३ डिसेंबर १९५०.

वृत्तपत्रे आजच्या आपल्या जीवनात, विशेषत: लोकशाही देशाच्या जीवनात अत्यंत महत्वाचे कार्य पार पाडीत असतात असे वारंवार सांगण्यात येते. इतर देशात हे कार्य सर्वाधिकारशाहीच्या दिग्दर्शनानुसार पार पाडण्यात येते पण लोकशाहीवादी देशांत ते कार्य कायद्याच्या कक्षेत राहून वृत्तपत्रे हवे तसे पार पाडू शकतात. या कक्षा खूपच विस्तृत असतात हे मी येथे सांगू इच्छीतो. आता हा बोजा खूपच मोठा आहे. अर्थात जेव्हा एखाद्या समुदायाला शक्ती अथवा जादा अधिकार प्राप्त होतात तेव्हा हा बोजा प्रचंड असणे क्रमप्राप्तच आहे. आम्ही स्वातंत्र्य संपादन केले आणि त्याचा आम्हाला अभिमान वाटतो. पण स्वातंत्र्य आणि स्वाधीनता ही काही एकांगी बाब नाही. स्वातंत्र्याबरोबर प्रचंड जबाबदाऱ्यांही येतात. स्वातंत्र्यावर जेव्हा घाला येईल तेव्हा त्याचे संरक्षण करण्याची, केवळ परकीय हल्ल्यांपासूनच नव्हे तर त्याहूनही अधिक महत्वाचे म्हणजे अंतर्गत दौर्बल्यापासूनही त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडते.

राष्ट्राने परकीय धोक्यापेक्षाही अंतर्गत दलदलीपासून अधिक सावध राहणे विशेष महत्वाचे आहे. स्वातंत्र्याबरोबरच त्याचे परकीय हल्ल्यापासून संरक्षण करण्याची जबाबदारी येते हे उघडच आहे. पण दुसरी जबाबदारी अधिक मोठी आहे. देशाची अंतर्गत ताकद वाढविणे, नीतीधैर्य, राष्ट्राचा आत्मविश्वास टिकवून धरणे ही अधिक महत्वाची जबाबदारी आहे. मी ज्याला ढोबळपणे योग्य सल्ला म्हणतो त्यानुसार वागण्याने विशेषत: भावनेच्या भरात विचार न करण्याच्या संवयीने आणि समस्यांचा शांतपणे विचार करण्याने हे साध्य होऊ शकेल. अरिष्टाच्या काळात जेव्हा लोक उत्तेजित होण्याची, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवण्याची शक्यता असते अशा काळात या गोष्टींना विशेषच महत्व प्राप्त होते.

अर्थात वृत्तपत्रे सर्व प्रकारची असतात आणि भारतात हजारो वृत्तपत्रे आहेत. जबाबदार वृत्तपत्रे आहेत. काही वेळा जबाबदारीने वागणारी आणि काही वेळा बेजबाबदारपणे वागणारी वृत्तपत्रे आहेत. काही वृत्तपत्रे बेजबाबदार असतात आणि

काही वृत्तपत्रांना तर कल्पनेच्या भराऱ्या मारण्यात आणि इतर बेजबाबदार कृत्ये करण्यातच स्वारस्य असते. सुदैवाने ही वृत्तपत्रे महत्वाची नाहीत. जुन्या काळात सरकारच्या मते दुष्ट प्रवृत्तीच्या वृत्तपत्रांना दडपणे हे सरकारचे कार्य आहे असे मानण्यात येई. अर्थात हा दृष्टिकोन अगदीच चुकीचा आहे. कारण दुष्ट प्रवृत्ती दडपणे हा त्यांच्यावरील उपायच नाही.

आम्ही म्हणजे ज्यांनी आपल्या अधिकारांसाठी लढा दिला आणि जे आजही लढा देत आहेत त्यांना केवळ अधिकार ही बाब अपूर्ण आहे आणि त्याच्याबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्यांचा जर राष्ट्राला विसर पडला तर ते जास्त काळ टिकू शकत नाहीत या वस्तुस्थितीचे विस्मरण होण्याची शक्यता असते. व्यक्ती, नागरिक अथवा समुदायाच्या दृष्टीने आपण अद्यापही जबाबदाऱ्यांचा विचार कमी करतो पण अधिकारांचा आणि खास अधिकारांचा विचार मात्र खूपच करतो. यामुळे राष्ट्र कमकुवत होते आणि आपण केवळ टीकाकार बनतो आणि कोणत्याही प्रकारे विधायक हातभार न लावता तक्रारी करीत राहतो. हे एकूण राष्ट्राला पण मुख्यत: वृत्तपत्रांना लागू होते. माझ्या म्हणण्याचा अर्थ हा की वृत्तपत्रांनी जुन्या काळात सरकारी हस्तक्षेपाविरुध्द आपल्याला स्वातंत्र्य मिळावे म्हणून लढा दिला आणि त्यांना क्रमाक्रमाने भरपूर स्वातंत्र्य मिळाले. मला असे वाटते की आमची म्हणजे सरकारची जरी अनेक वैगुण्ये असली तरी सध्याच्या घटकेला आमच्या देशात जे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य देण्यात येत आहे किंवा वृत्तपत्रे घेत आहेत. त्याहून अधिक स्वातंत्र्य जगातील इतर कोणत्याही देशात क्वचितच मिळत असेल. मी तुमच्याशी अगदी स्पष्टपणे बोलणार आहे. वृत्तपत्र स्वातंत्र्यामुळे जे काही प्रसिध्द होते ते विशाल दृष्टिकोनातून पाहिले तर केवळ घोषणेपुरतेच नाही तर ते लोकशाहीच्या प्रक्रियेचा एक आवश्यक भागच आहे. वृत्तपत्रांनी घेतलेले स्वातंत्र्य जरी सरकारला आवडले नाही आणि ते धोकादायक आहे असे जरी सरकारला वाटले तरी वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करणे चुकीचे आहे. निर्बंध घातल्यामुळे काहीही बदलत नाही. तुम्ही काही गोष्टींची केवळ जाहीर अभिव्यक्ती दडपून टाकू शकता पण त्यामुळे त्यामागील विचारांच्या आणि कल्पनांच्या प्रसाराला प्रोत्साहन मिळते. म्हणून वृत्तपत्र स्वातंत्र्याचा गैरवापर केल्यामुळे उद्भवणाऱ्या सर्व धोक्यांचा विचार करुनही निर्बंधित अथवा नियंत्रित वृत्तपत्रांपेक्षा संपूर्ण स्वातंत्र्य उपभोगणारी वृत्तपत्रसृष्टी मला अधिक पसंत आहे.

जबाबदारीच्या अभावी स्वातंत्र्याचे क्रमाक्रमाने जवळ जवळ स्वैराचारात रुपांतर होते. स्वैराचार हा शब्द संदिग्ध आहे आणि मला तो आवडत नाही पण त्याचा या संदर्भात वापर करण्यात येतो आणि याहून अधिक समर्पक शब्द मला आठवत नाही. स्वैराचार म्हणजे अखेर शेवटी मानसिक क्षय आणि राष्ट्रीय जीवनाला जर मानसिक क्षय झाला तर त्याचा सर्व अंगांवर परिणाम होणार हे उघड आहे. हे वृत्तपत्रांनाही लागू

आहे. वृत्तपत्रांना लाभलेल्या स्वातंत्र्याबरोबरच जर स्वैराचाराची आणि बेजाबदारपणाची वृत्ती वाढत गेली तर त्यामुळे केवळ त्यांच्या स्वातंत्र्यालाच नव्हे तर त्यांच्या प्रतिष्ठेलाही धोका निर्माण होईल. आपल्याला स्वातंत्र्य हवे यात काहीच शंका नाही पण सार्वजनिक जीवनात, वृत्तपत्र सृष्टीतही आपण दृष्टिकोनाचा प्रामाणिकपणा राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अर्थात भूतकाळातील आणि विद्यामान काळातील पत्र पंडितांनी आणि पत्रकारांनी वृत्तपत्रे कशी असावीत हे उच्च दर्जाच्या भाषेत सांगितले आहे आणि जबाबदार पत्रकार नेहमीच तो उच्च दर्जा कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात याबद्दल मला शंका नाही. पण पत्रकारांनी आणि त्यांच्या संघटनांनी या समस्येची उकल करावी, इतर कोणत्याही यंत्रणेच्या, खुद्द सरकारच्याही अखत्यारीतील ही बाब नाही हाच या काळातील योग्य दृष्टिकोन आहे असे मला वाटते. त्यांनी स्वतःच आपला दर्जा वाढवावा. शासन करुन हे त्यांना करता येणार नाही कारण ते सरकारचे अंमलबजावणीचे खाते नाही. आपल्या प्रमादशील बांधवांना ते जे करतात ते वाईट आहे असे पटवून देऊन त्यांनी हे कार्य करावयाचे आहे. एखाद्या नियतकालीकाने जर काही बेजाबबदार वर्तन केले तर त्याच्या वर्तनावर इतर वृत्तपत्रांनी टीका केली आहे असे मला क्वचितच आढळून आले आहे. वृत्तपत्रांनी एकमेकांवर चिखलफेक करणे चांगले नाही हे मला ठाऊक आहे आणि वृत्तपत्रांमध्ये वाद माजविण्याचाही माझा विचार नाही. मला असे सांगायचे आहे की एखाद्या जबाबदार संस्थेला आपल्या व्यवसायातील एखाद्या व्यक्तीने मोठी चूक केली तर त्याच्या वर्तनावर इतर वृत्तपत्रांनी टीका केली आहे असे मला क्वचितच आढळून आले आहे. अर्थात प्रत्येक व्यक्तीला आपले विचार मांडण्याचा हक्क आहे हे मी नाकारीतत नाही. काही विशेष प्रतिष्ठा नसलेली वृत्तपत्रे जो बेदरकार, बेजबाबदार आणि अशोभनीय व्यवहार करतात त्याला माझा आक्षेप आहे. या संस्थेने खंबीरपणे हवे तर नम्रतेने पण खंबीरपणे या मंडळींना ते जे करतात ते आपल्याला पसंत नाही हे सांगितले पाहिजे. अशा प्रकारे ही संस्था समाजाचे या बाबतीत मार्गदर्शन करील.

मी अशोभनीय वर्तणुकीचा उल्लेख केला. आपण एका चमत्कारिक, झपाट्याने बदलणाऱ्या जगात राहत आहोत. अनेक अडचणी आणि संकटे कोसळली तरी अखेर शेवटी चांगलेच निष्पन्न होईल अशी आपल्याला आशा वाटते. पण साऱ्या जगभर मानसिक आणि नैतिक दर्जा झपाट्याने खालावत चालला आहे ही एक विद्यमान काळातील एक अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. आपले विघटन होत आहे, तुकडे होत आहेत. अखेर आपण विघटनाच्या प्रक्रियेमुळे थोडेसे विमनस्क अवस्थेत, उन्मादावस्थेत राहतो आणि कोणत्याही बाबतीत योग्य निर्णय घेऊ शकत नाही. अखेर आपल्या जीवनात जर काही मूल्ये नसतील तर ते काहीसे फोल ठरते. आपल्या सामाजिक आणि मानसिक व्यवहारात जर काही मूल्ये नसतील तर आपण कुठे चाललो

आहोत आणि कशासाठी झटत आहोत हे कळणे अवघड होऊन बसते. व्यावहारिक दर्जाच्या आणि मूलभूत उद्दिष्टांच्या बाबतीत महान देश जेमतेम राहू शकत नाहीत. आपल्यापैकी ज्यांना भारतीय इतिहासाच्या गेल्या तीस वर्षांचा व्यक्तीगत अनुभव आहे त्यांनी या इतिहासातील काही कालखंडात लोकांमध्ये उच्च नीतीमत्तेच्या भावना वसत होत्या, हे पाहिले असेल. लोक तेच आहेत, ते निराळे नाहीत. त्यांच्यामध्ये तेच गुण आहेत आणि वैगुण्ये आहेत. एखादे समग्र राष्ट्र अचानक बदलू शकत नाही. पण आपण त्यांना त्यांच्या सद्गुणांविषयी आणि त्यांच्या दौर्बल्याविषयी आणि उणीवांविषयी विचार करायला उद्युक्त करु शकतो.

वृत्तपत्रे प्रचंड प्रमाणात मदत करु शकतात, केवळ उत्तम आणि उच्च दर्जाची सामाजिक जाणीव निर्माण करण्याच्या बाबतीतच नव्हे तर जीवनातील मामुली व्यवहारातील आचार संहिता निर्माण करण्याच्या बाबतीतही वृत्तपत्रे मदत करु शकतात. जीवनातील मामुली गोष्टींबाबत आपण चिंता करण्याचे कारण नाही, कारण आपण जीवनातील महत्वाच्या गोष्टींमध्ये व्यग्र आहोत असा विचार करण्याकडे आपला कल असतो. हा विचार संपूर्णपणे आणि मूळातच चुकीचा आहे. तुम्ही जर सत्याच्या आणि सौंदर्याच्या आदर्शाकडे आकृष्ट झालेले असाल तर तुम्ही जीवनातील मामुली गोष्टींच्या बाबतीत खोटेपणाने वागून ते साध्य करुच शकणार नाही. पौर्वात्य संस्कृती आत्मिक आहे आणि पाश्चिमात्य संस्कृती भौतिक आहे असे आपण अभिमानाने म्हणतो. पण सामाजिक दृष्ट्या अत्यंत अनुचित अशा व्यवहारात आपण गुंतलेले असतो. आपण त्याहून अलिप्त आहोत असे म्हणतो पण वस्तुतः यात आत्मिकतेचा प्रश्न येतो कुठे, हेच आपल्याला स्पष्ट होत नाही. जी व्यक्ति आत्मिकतेचा आव आणून जीवनातील क्षुल्लक बाबींकडे, छोटे सत्य, छोटा शिष्टाचार, छोटा आंनद आणि छोटे औदार्य यांच्याकडे दुर्लक्ष करते ती एखादे महान कार्य मोठ्या प्रमाणात पार पाडू शकेल असा मला विश्वास वाटत नाही.

हा प्रश्न प्रदर्शन करण्याचा अथवा दिखाऊपणाचा नाही, अर्थात दिखाऊपणा हा अशोभनीय वर्तनाचा कळस आहे. पण जाणून बुजून स्वच्छ राहण्यास आणि स्वच्छ वागण्यास नकार देणे म्हणजे 'छे आम्ही जीवनातील सूक्ष्म सौंदर्याची पर्वा करीत नाही' आणि म्हणून आम्ही स्वच्छ राहत नाही. कपडे स्वच्छ ठेवीत नाही आणि गबाळे राहतो हे जाणून बुजून आणि आक्रमक पवित्र्यात म्हणण्यासारखेच आहे.

✦

"इंग्रजी ही आपल्या दृष्टीने शिकायला सर्वांत सोपी अशी परकीय भाषा आहे आणि ती अत्यंत महत्वाची आहे. आपण इतर परकीय भाषाही शिकल्या पाहिजेत."

४८. इंग्रजी भाषेचे स्थान

एक निवेदन ८ सप्टेंबर १९५६

अलीकडेच भरलेल्या शिक्षण मंत्र्यांच्या परिषदेत मी केलेल्या भाषणावरील काही अभिप्राय वाचून मला मोठे आश्चर्य वाटले. मी परिषदेचे उद्घाटन केले. मी कोणत्याही ठरावावर बोललो नाही किंवा मी खरोखरीच कोणताही ठराव पाहिलेला नाही. परिषदेने संमत केलेल्या ठरावाविषयी मी ऐकले आहे पण अद्याप तो ठराव वाचलेला नाही.

मी माझ्या भाषणात आपल्यापैकी बऱ्याच लोकांनी परकीय भाषा आणि विशेषत: इंग्रजी भाषा अवगत करुन घ्यावी यावर भर दिला होता. आपल्या विकासाच्या कार्यक्रमाच्या आणि आपल्या दुसऱ्या आणि त्यानंतरच्या पंचवार्षिक योजनांच्या संदर्भात मी हे बोललो होतो. तंत्रविषयक आणि वैज्ञानिक शिक्षणाचा दर्जा उच्च असल्याखेरीज आपल्याला या योजना पार पाडता येणार नाहीत आणि आजच्या परिस्थितीत किमान एक परकीय भाषा उत्तम प्रकारे अवगत असल्याखेरीज हा दर्जा गांठता येणा नाही असे मी या भाषणात सांगितले होते. वस्तुत: आज कोणत्याही देशातील वैज्ञानिकाला अद्ययावत वैज्ञानिक ज्ञानासाठी अनेक भाषा अवगत असाव्या लागतात.

परकीय भाषा चांगल्या प्रकारे अवगत असावी यावर माझा भर होता. भारतातील परिस्थितीमध्येही फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, रशियन आणि चिनी या परकीय भाषा शिकायला हरकत नाही. आज इंग्रजी ही सर्वाधिक प्रसार असलेली आणि अत्यंत महत्वाची जागतिक भाषा आहे. आज जगातील वैज्ञानिक आणि तंत्रविषयक पुस्तकांपैकी दोन तृतियांश पुस्तके इंग्रजी भाषेत प्रसिध्द होतात.

बहुसंख्य लोकांना औद्योगिकीकरण म्हणजे काय याची कल्पना नाही असे मला आढळून आले आहे. आपण त्याच्या आर्थिक बाजूची चर्चा करतो आणि कारखाने वगैरेच्या वाढीचा ढोबळ मानाने विचार करतो. पण माणसांना प्रशिक्षण देणे हा औद्योगिकीकरणाचा एक महत्वाचा भाग असतो. आपल्याला अनेक प्रकारचे तंत्रज्ञ, वैज्ञानिक आणि अभियंत्याची गरज असते. हे लोक ज्या पाश्वभूमीवर वाढतात ती आपल्याला तयार करावी लागते. प्रशिक्षित मनुष्यबळ ही आजची आमच्यापुढील सर्वात महत्वाची समस्या आहे आणि आम्ही आता ती पध्दतशीर, सर्वांगीण आणि सुसंबध्द पध्दतीने सोडविण्याचा प्रयत्न करीत आहोत. काही महाविद्यालयातून काही

अभियंत्यांना आणि शेतकी तज्ञांना प्रशिक्षण देऊन भागणार नाही. आपल्याला शेंकडो, हजारो आणि नंतर लक्षावधी लोकांना प्रशिक्षण देण्याचा विचार करावा लागतो. अमेरिका, सोविएत संघराज्य आणि चीनमध्येही ते एवढ्या मोठ्या प्रमाणाचा विचार करीत आहेत आणि प्रत्यक्षात एवढ्या मोठ्या संख्येने वैज्ञानिकांना आणि तंत्रज्ञांना प्रशिक्षण देत आहेत.

हे उच्च दर्जाचे प्रशिक्षण आज आणि येत्या काही वर्षांत परकीय भाषेच्या ज्ञानाखेरीज देता येणार नाही हे उघड आहे. प्राथमिक स्वरुपाचे वैज्ञानिक आणि तंत्रविषयक प्रशिक्षण हिंदी अथवा इतर राष्ट्रीय भाषांमध्ये देणे शक्य आहे आणि खरोखरीच इष्टही आहे. आपण काही क्रमिक पुस्तकांचा अनुवाद करुन घेऊ शकतो आणि तसे आपण केलेही आहे. आपण हिंदी भाषेत तंत्रविषयक संज्ञाचा संग्रह केला पाहिजे आणि ते आपण करीतही आहोत. पण या तंत्रप्रधान आणि औद्योगिक युगामागे असलेला विशाल आणि गुंतागुंतीचा विचार काही पुस्तकांचा अनुवाद करुन अथवा संज्ञांची सूची तयार करुन आपण साध्य करु शकत नाही. आज तंत्रज्ञानात एवढे झपाट्याने बदल होत आहेत की आज प्रसिध्द करण्यात आलेली पुस्तके लवकरच कालबाह्य ठरत आहेत. वैज्ञानिकाना विविध भाषांतील अनेक वैज्ञानिक आणि तंत्रविषयक नियतकालिके वाचून अद्ययावत ज्ञान संपादन करावे लागते.

यासाठी आपण दुसरी भाषा म्हणून इंग्रजी भाषा शिकविण्याची पध्दती चालू ठेवली पाहिजे असे मला वाटते. मी इंग्रजी म्हणतो कारण आपल्या दृष्टीने ती शिकायला अत्यंत सोपी असलेली परकीय भाषा आहे. आणि अत्यंत महत्वाची भाषा आहे. आपण इतरही परकीय भाषा शिकाव्यात.

व्यक्तीश: मला असे वाटते की, हिंदी आणि आपल्या इतर भाषांचा विकास करण्याच्या दृष्टिकोनाखेरीज सांस्कृतिक दृष्टीनेही आपण परकीय भाषांशी निकटचे संबंध ठेवणे आणि त्यांचे पुरेसे ज्ञान करुन घेणे आवश्यक आहे. केवळ याच मार्गाने जगाच्या इतर भागांतून विचारांचे प्रवाह आपल्याकडे येऊ शकतात. यामुळे हिंदी भाषा संपन्न होईल आणि ती नव्या विचारांचे वाहन बनेल आणि त्या विचारांचा हिंदी भाषेद्वारा इतर जगात प्रसार होईल.

भारतीय बहुजन समाजाची प्रगती परकीय भाषांद्वारे नव्हे तर आपल्या भाषांद्वारेच होणार आहे असा माझा दृढ विश्वास आहे. भारतात एक नवी जाती प्रथा निर्माण होऊ नये, बहुजन समाजापासून अलग असलेली इंग्रजी भाषा अवगत असलेल्या लोकांची जात निर्माण होऊ नये अशी माझी इच्छा आहे. ते अत्यंत दुदैवी ठरेल. ब्रिटिश राजवटीच्या काळात हेच घडून आले ही वस्तुस्थिती आहे. त्या काळी शिक्षण मर्यादित असल्यामुळे ते घडू शकले. आता शिक्षणाचा विस्तृत प्रसार होत असल्यामुळे हे घडू शकणार नाही.

भविष्य काळात भारतात इंग्रजी भाषा हे शिक्षणाचे प्रमुख माध्यम होऊ शकेल असा विचा आम्ही करु शकत नाही. हिंदी अथवा दुसऱ्या कोणत्याही प्रादेशिक भाषा हेच शिक्षणाचे माध्यम होऊ शकते. असे केले तरच आपण आपल्या बहुजन समाजाशी संबंध ठेवू शकतो. आणि सार्वत्रिक विकासाला साहाय्य करु शकतो.

पण या प्रश्नाला आणखी एक बाजू आहे. वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने इंग्रजी अथवा इतर परकीय भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे हे मी प्रथमच सांगितले आहे. आपण संकुचित वृत्तीचे लोक आहोत आणि आपल्याच कवचात राहण्याची आपली खोड आहे असेही मी आपल्या विषयी आदर बाळगून सांगू इच्छितो. आपण वैचारिक जगापासून सर्वार्थाने अलग पडण्याचा आणि आपल्या भारताच्या छोट्या जगात अल्पसंतुष्ट वृत्तीने राहण्याचा धोकाही आपल्या पुढे आहे. यासाठीही परकीय भाषांशी आपला संबंध असणे आवश्यक आहे.

म्हणून हिंदी भाषेच्या विकासासाठी तिला सर्व प्रकारचे प्रोत्साहन दिले पाहिजे आणि शिक्षणासाठी, राज्यकारभारासाठी तिचा वापर केला पाहिजे. तिची भक्कम पायावर, वरपांगी, पत्रकारितेच्या पध्दतीने वाढ होता कामा नये ही एक अट आहे. दुसरे असे की, हिंदी अथवा कोणती तरी प्रादेशिक भाषा हेच शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे.

तिसरे असे की इंग्रजी ही दुसरी किंवा तिसरी सक्तीची भाषा असली पाहिजे. अर्थात भारतातील सर्वांना इंग्रजी भाषा अवगत होणे शक्यही नाही आणि आवश्यकही नाही. पण मी सांगितलेल्या कारणांसाठी बऱ्याच लोकांना इंग्रजी भाषा अवगत असणे आवश्यक आहे. त्यांना ती दोन प्रकारे शिकता येईल. ती भाषा संपूर्णपणे अवगत असणे हा एक प्रकार आहे तर त्या भाषेत चांगल्या प्रकारे बोलता जरी आले नाही तरी पुस्तके आणि नियतकालिके वाचता येतात हा दुसरा प्रकार आहे. एकूण पाहता इंग्रजी हा आपल्या शाळांतून सक्तीचा विषय असावा आणि हिंदी भाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे असे मला वाटते. शाळांनी इंग्रजी भाषेचे मूलभूत म्हणजे वाचण्या समजण्याजोगे ज्ञान द्यावे ही अपेक्षा आहे. त्यानंतर तौलनिक दृष्ट्या कमी विद्यार्थी या भाषेचे अधिक ज्ञान संपादन करतील. विश्वविद्यालयात इंग्रजी भाषेचे शिक्षण घेता येणार नाही हे उघड आहे कारण विश्वविद्यालयात विशिष्ट विषयांचे शिक्षण देण्यात येईल, प्राथमिक स्वरुपाचे नाही.

✦

''आपला देश गरीब आहे पण त्याच्यापाशी प्रचंड साधन संपत्ती आणि सूप्त सामर्थ्य आहे.''

४९. शासकीय नोकरांना उद्देशून

आकाशवाणीवरील भाषण, ७ डिसेंबर १९४९

आपल्याला उद्देशून भाषण करण्याची संधी मला मिळाली याबद्दल मी आभारी आहे. गेल्या तीन वर्षात मी तुमच्यापैकी अनेकांना, नागरी आणि लष्करी सेवेतील नोकरांना भेटलो आहे. मी तुम्हाला उद्देशून भाषणे केली आहेत, अनेकांशी चर्चा केली आहे आणि तुमच्यापैकी काही जणांबरोबर निकट राहून कामही केले आहे. मला शक्य असते तर मी तुमच्या पैकी अनेकांना भेटलो असतो, अधिक परिचय करुन घेतला असता कारण आपण समान उद्दिष्टांसाठी कार्य करीत आहोत आणि आपल्यामधील सामंजस्यावर बरेच काही अवलंबून आहे.

अनेकांनी तुमची भरपूर स्तुती केली आहे. तर इतर अनेकांनी काही वेळा तुमच्यावर जोरदार टीका केली आहे. आहे या परिस्थितीत ते स्वाभाविकच आहे आणि आपल्यापैकी बहुसंख्य लोकांवर स्तुती सुमने वाहण्यास आणि टीकास्त्र सोडण्यास भरपूर वाव आहे. आपल्यापैकी बहुतेक जणांना परिस्थितीशी मिळते घ्यावे लागते आणि नव्या परिस्थितीत काम करावे लागते. मी तुम्हाला गेली तीन वर्षे ओळखत आहे आणि या काळात तुम्ही देशाचे निष्ठावंत सेवक आहात असे मला दिसून आले आहे हे मी सांगू इच्छितो. आपण नव्या परिस्थितीशी ज्या पध्दतीने जमवून घेतलेत त्याचे मला कौतुक वाटते. आपल्यापैकी अनेकांना पूर्वीपेक्षा अधिक काम करावे लागते कारण परिस्थितीच तशी होती. तुम्ही हे काम सदिच्छेने आणि नुकत्याच स्वतंत्र झालेल्या आपल्या देशाची सेवा करण्याच्या इच्छेने पार पाडले आहे.

आपल्यापैकी जे कोणी सेनादलात काम करीत आहेत त्यांना कसोटीच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागले, हालअपेष्टा सहन कराव्या लगल्या आणि ते अग्नी दिव्यातून यशस्वीपणे पार पडले आहेत. हे करुन तुम्ही तुमच्या देशबांधवांच्या स्तूतीस पात्र ठरला आहात. याहूनही अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे तुमचा आत्मविश्वास वाढला आणि आपल्या उद्दिष्टांवरील निष्ठा वाढली आहे. केवळ सेनादलातील लोकच नव्हे तर विविध क्षेत्रात आणि विविध प्रकारचे काम करणारे सर्वच लोक स्वातंत्र्या नंतरच्या सुरुवातीच्या काळात बिकट परिस्थितीतून पार पडले आहेत.

आधुनिक शासन संस्था चालवावयाची म्हटले तर सुसंघटित, कार्यक्षम, आणि निष्ठावंत नोकर वर्गाची गरज असते हे सर्व सूज्ञ लोकांना ठाऊक आहे. त्यांच्या खेरीज

कोणतेही सरकार प्रभावीपणे कार्य करु शकणार नाही. आपल्या नोकर वर्गापुढे जरी नवी कार्ये आणि नवी उद्दिष्टे उभी ठाकली तरी त्याने निष्ठावंतर राहणे आणि कार्यक्षमतेते काम करणे, लोकशाहीच्या नव्या वातावरणाशी समरस होणे आणि नव्या ढाच्या बरोबर एकरुप होणे महत्वाचे आहे. ज्या लोकांची आपण सेवा करतो त्यांची प्रगती झाली, कल्याण झाले आणि विशेषत: लोकशाहीत आपण त्यांची सदिच्छा संपादन केली तर आपण आपल्या कामात यशस्वी झालो असे मला वाटते. बिकट काळात त्यांची सदिच्छा सहज मिळणार नाही. पण उदात्त उद्दिष्टांसाठी आपण निष्ठेने आणि सचोटीने काम केले तर त्याला कदाचित ताबडतोबीने मान्यता मिळणार नाही पण सरतेशेवटी ते सफल होईल हे निश्चित.

आपण राष्ट्राची विविध प्रकारे आणि विविध स्वरुपात सेवा करीत आहात. काही जणांवर उच्च पदांची जबाबदारी आहे तर काही जण सामान्य श्रेणीत काम करीत आहेत. कोणी सेनादलात सेनापती आहेत तर कोणी सामान्य सैनिक आहेत. शासकीय सेवेत इतर क्षेत्रांप्रमाणेच शिस्त पाळावी लागते आणि अधिक अनुभवाच्या आणि क्षमतेच्या व्यक्तींना खास अधिकारपदांवर नियुक्त करण्यात येते. पण आपण कोणत्याही पदांवर आणि श्रेणीत काम करीत असलो तरी आपण सर्वजण एका उद्देशाने काम करणारे सहकारी आहोत आणि आपण परस्परांना सहकारी म्हणून मान दिला पाहिजे. आपण ज्या समाजात राहतो त्या समसाजाला उच्च आणि नीच, श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील दारुण विषमतेचा वारसा मिळाला आहे. आपण ताबडतोबीने हे बदलू शकत नाही. आपण हे भेद कमी करण्यासाठी आणि सर्वांना प्रगतीची संधी मिळावी असा प्रयत्न करीत आहोत. आपल्या सर्व व्यवहारामध्ये आपण आपल्या उद्दिष्टांची आठवण ठेवली पाहिजे, व्यक्तीच्या प्रतिष्ठेला मान दिला पाहिजे आणि श्रमांचे मूल्य जाणले पाहिजे. जे कोणी समाजाच्या हितासाठी परिश्रम करीत नाहीत आणि उलट इतरांच्या श्रमाची लूट करतात ते समाजाला ओझे बनून राहतात आणि अशा लोकांना प्रोत्साहन देता कामा नये.

आपला देश गरीब आहे पण त्याच्यापाशी प्रचंड साधनसंपत्ती आणि सूप्त सामर्थ्य आहे. आपल्याला साहजिकच या साधनसंपत्तीचा विकास करावयाचा आहे आणि दारिद्रय आणि बेकारीच्या शापापासून मुक्त व्हायचे आहे. या शासन सेवा खूपच श्रीमंत असलेल्या देशांच्या परंपरेत उभारण्यात आल्या आहेत. यामुळे सामान्य माणूस आणि या नोकरवर्गात अडसर निर्माण झाला आहे. आपल्याला हे अडसर दूर करावयाचे आहेत आणि हळूहळू आपल्या देशातील परिस्थितीनुरुप बदल घडवून आणायचे आहेत. देशाच्या नागरी आणि सेनादलातील नोकरवर्गासाठी काम करण्याची सुरक्षिततेची हमी देणारी परिस्थिती असली पाहिजे. श्रमिक श्रमांच्या मोबदल्यास पात्र आहे. शासन सेवेतील नोकरवर्ग जर समाधानी असेल आणि त्याला उद्दिष्ट असेल


तरच तो कार्यक्षम होऊ शकतो. आम्ही सुरक्षिततेची हमी दिली आहे आणि आपण ज्या लोकांची सेवा करतो आणि जे आपल्या भाग्याचे विधाते आहेत त्यांच्या सदिच्छेतूनच आपल्याला हे समाधान मिळू शकते.

आपण आर्थिक अडचणींच्या कालखंडांतून जात आहोत आणि आपले स्थान आणि हुद्दा कोणताही असला तरी आपण या काळातील ओझे आपल्या कुवतीनुसार उचललें पाहिजे. शासन सेवेतील नोकरवर्गाने याला मान्यता दिली आहे आणि अनेक बाबतीत हा बोजा उचलण्याची तयारी दाखविली आहे याबद्दल मला आनंद होतो. त्यांच्या पगारात कपात कण्यात आली आहे आणि बचत योजना सुरु करण्यात आल्या आहेत. त्यांच्यापैकी अनेकांवर विशेषत: तरुण अधिकाऱ्यांवर याचा चांगलाच परिणाम झाला आहे आणि त्यामुळे अनेकांना काटकसर करावी लागली आहे. पण तसे करणे योग्य आहे. आपल्यापैकी प्रत्येकाला हे ओझे उचलण्यात आपण सहभावी व्हावे आणि अलीप्त राहू नये असे वाटते याबद्दल मला खात्री आहे. आपण इतर असंख्य लोकांसमवेत आपले कर्तव्य पार पाडील आहोत या जाणीवेने सामुदायिक भावना निर्माण होते आणि समाधान लाभते. त्यामुळे समान कार्य करणाऱ्या लोकांमध्ये आपुलकीचे संबंध निर्माण होतात आणि ज्या राष्ट्रामध्ये असे सामर्थ्य निर्माण होते त्याच्यापुढे कोणतेही अडथळे टिकाव धरु शकत नाहीत. आपण केवळ आजच्या पुरतेच कार्य करीत नाही तर बहुतांश भविष्यकाळासाठी कार्य करतो. आपण भविष्य काळाची उभारणी करीत आहोत. आपल्या जनतेचा भविष्य काळ अधिक उज्ज्वल होणार असेल तर आज थोड्या हाल अपेष्टा सहन करायला हरकत नाही. आमच्या शासन सेवेने केवळ कार्यक्षम सेवेचा नव्हे तर अत्यंत प्रामाणिकपणा, जातीय, प्रांतिक आणि इतर दुराभिमानापासून संपूर्णपणे मुक्त असण्याचा आदर्श निर्माण केला पाहिजे. आपल्या देशातील अनेक विघटनकारी आणि समाजविरोधी शक्ती आहेत आणि राष्ट्राची नीतीमत्ता खालावली आहे असे अनेक वेळा सांगण्यात येते. संकुचित जातीयवाद आणि संधिसाधूपणाच्या रुपाने दुष्ट प्रवृत्ती थैमान घालीत आहेत. काळाबाजार वगैरेंनी आमचा व्यापार आणि उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात विस्कळीत करुन टाकले आहेत. शासन सेवेने या दुष्ट प्रभावाविरुध्द लढावयाचे आहे आणि या सेवेतील स्त्री पुरुष चारित्र्य संपन्न, प्रामाणिक आणि नि:स्वार्थ असले तरच हे कार्य पार पाडू शकतात. आपल्याला जेथे या प्रवृत्ती आढळतात तेथे आपण त्यांचा सामना केला पाहिजे. आपण त्यांच्या आहारी जाता कामा नये अथवा त्यांच्याबाबतीत निष्क्रिय, उदासीन बघ्याची भूमिका घेता कामा नये.

अनेक वर्षापूर्वी जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या लिखानामधील एका उताऱ्याने मला हेलावून सोडले होते आणि त्याला माझ्या मनात आणि हृदयात प्रतिसाद मिळाला होता. त्यांनी लिहिले आहे, ''आपण ज्याला सर्वश्रेष्ठ उद्दिष्ट म्हणून मान्यता दिली

आहे अशा उद्दिष्टासाठी जीवनाचा वापर करणे ही एक खरोखर आनंदाची बाब आहे. आपण अनंतात विलीन होण्यापूर्वी संपूर्णपणे झिजण्यात आनंद आहे. जीव ही निसर्गाची शक्ती आहे. जग आपल्याला सुखी करण्यासाठी झटत नाही म्हणून तक्रार करणारी तडफडणारी व्याधीग्रस्त क्षुद्र गठडी नाही.''

आपल्यापैकी अनेक जण या उंचीपर्यंत पोचू शकत नाहीत पण काही वेळा समग्र राष्ट्र एखाद्या थोर नेत्याच्या नेतृत्वाखाली अथवा बलवत्तर प्रेरणेने उठून उभे राहते, घटनांना आकार देते आणि आपल्या मर्जीनुसार इतिहास घडविते. महात्मा गांधी जेव्हा भारताच्या वैचारिक क्षितिजावर प्रगट झाले आणि त्यांनी आपल्या व्यक्तीमत्वाच्या आणि शिकवणुकीच्या जादूने येथील जनतेला महत् कार्यासाठी उद्युक्त केले तेव्हा हेच घडले. राष्ट्रपिता आता आपल्यात नाही पण आपल्यापाशी त्यांची शिकवण आणि आपल्या अंतर्यामी त्यांनी चेतविलेले स्फुल्लिंग आहे. त्यांनी सुरु केलेले महान कार्य अर्धवट राहिले आहे. आणि आपल्याला ते कार्य अविश्रांत कार्य करुन पूर्ण करावयाचे आहे. आपण सर्वजण त्या महत्कार्यातील सहकारी आहोत आणि भारताचे सैनिक या नात्याने आपण एकत्र राहून हे कार्य पूर्ण करु या!



''मला काम हवे काम! मला निष्पत्ती हवी! मला योध्द्याच्या जिद्दीने काम करणारी माणसे हवीत. आपल्याला जे योग्य वाटते त्यासाठी लढणारी आणि चुकीच्या गोष्टीपुढे लाचारीने माघार घेणार नाहीत अशी माणसे मला हवी आहेत.''

५०. छत्तीस कोटी समस्या

नदी, खोरे प्रकल्पविषयक मंत्री सुसुत्रीकरण मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी केलेले भाषण, नवी दिल्ली, १३ ऑक्टोंबर १९५४

तुमची सर्वात महत्वाची समस्या कोणती? तुमच्यापुढे किती समस्या आहेत? असा प्रश्न मला एकदा विचारण्यात आला. मी म्हणालो, भारतात आमच्या पुढे छत्तीस कोटी (तेव्हा भारताची लोकसंख्या ३६ कोटी होती आता ती वाढली आहे. – संपादक) समस्या आहेत. माझ्या या उत्तराची अनेक लोकांना गंमत वाटली पण त्यात मूलभूत सत्य आहे. आमच्या सर्व समस्यांकडे ३६ कोटी व्यक्तींच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे, कागदावरील प्रचंड आकडेवारी आणि नकाशे आणि तक्ते यांच्याद्वारे पाहून चालणार नाही. समजावण्याच्या दृष्टीने तक्ते अत्यंत उपयुक्त असतात पण आपण व्यक्तीच्या दृष्टीने, व्यक्तीगत सौख्याच्या आणि दुःखाच्या दृष्टीने समस्यांचा विचार केला पाहिजे.

आम्ही भारतातील ३६ कोटी लोकांसाठी नियोजनाची सुरुवात करीत आहोत. आपण एकत्र बसून सैध्दांतिक विचाराबाबत विचारविनिमय करु शकतो. आपण समाजवादी दृष्टिकोन स्वीकारावा की खाजगी उद्योगधंद्याचा दृष्टिकोन स्वीकारावा अथवा कम्युनिस्ट दृष्टिकोन स्वीकारावा की गांधीवादी दृष्टिकोन स्वीकारावा या बाबतीत आपण चर्चा करु शकतो. आपण अनेकविध दृष्टिकोनांची यादी तयार करु शकतो. आणि विचार विनिमय करणे, आपले मन मोकळे करणे चांगलेच असते कारण त्यामुळे विचारांना चालना मिळते पण दुर्दैवाने एकेकाळी नेमका विशिष्ट अर्थ असलेले हे शब्द हळूहळू भ्रष्ट झाले आहेत आणि अनेक नव्या कल्पना, नवे संघर्ष, नव्या भावनांच्या संपर्कामुळे निरर्थक होऊ पहात आहेत.

शब्द नेहमीच फसवे असतात. अंतिम विश्लेषणान्ती शब्द ही जगातील सर्वात मोठी गोष्ट आहे. आपल्याला जे काही ज्ञान आहे ते शब्दांच्या संग्रहाद्वारे व्यक्त होते अर्थात शब्दाद्वारे व्यक्त होणाऱ्या विचारांचा तो एक संग्रह आहे. टेबल अथवा खुर्ची अशा साध्या शब्दांचा विचार करु या. टेबल अथवा खुर्ची या साध्या संज्ञेपुरतेच हे शब्द वापरले तर प्रश्न तेथेच संपतो पण या शब्दाबरोबरच ज्या संकल्पना आणि भावना निगडित झालेल्या आहेत त्यांचा विचार केला तर ते अतिशय फसवे ठरतात. आपण

जेव्हा अशा शब्दांचा विचार करतो तेव्हा आपण उत्तेजित होतो. आपल्या मनात विशिष्ट भावना निर्माण होतात. भावनेमुळे आपल्या मनात उत्साह निर्माण होईल. मग आपण सरळ विचार करु शकत नाही. आणि एकाच शब्दाने ज्यांच्या मनात विभिन्न भावना निर्माण होतात अशा दोन व्यक्ती एकत्र आल्या तर त्यांच्यामध्ये सूज्ञपणे विचारविनिमय होणे केवळ अशक्य होऊन बसते. आज आंतराष्ट्रीय क्षेत्रात शब्दांमुळे आणि शब्दांच्या ध्वन्यार्थामुळे भावनांचा, वासनांचा आणि रागाचा एवढा कल्लोळ निर्माण झाला आहे कीं तेथे सुसंगत आणि सूज्ञपणे विचार विनिमय करणे अतिशय अवघड झाले आहे. एखाद्या व्यक्तीवर जसा बॉंब फेकावा तसा एकमेकांवर शब्दांचा मारा करण्यात येतो. म्हणून मी म्हणतो ''शब्दांना मोठे महत्व असल्यामुळे त्यांच्यापासून सावध रहा!'' तुम्हाला काय हवे आहे? शब्दांना जरी खूप अर्थ असला तरी केवळ शब्दांनी भागत नाही.


छत्तीस कोटी लोकांना काय हवे आहे? याची यादी करणे बरेच सोपे आहे मग मतभेद होतील पण त्यांना अन्न हवे हे तर उघड आहे. त्यांना वस्त्र हवे, त्यांना घर हवे, त्यांना आरोग्य हवे हे तर उघडच आहे. आमच्या मनात कोणतीही सामाजिक आर्थिक धोरणे असली तरी त्यांना या सर्व गोष्टी हव्या आहेत. आपल्याला केवळ काही लोकांसाठी एका गटासाठी नव्हे तर सर्वच्या सर्व छत्तीस कोटी लोकांसाठी काम करायचे आहे आणि त्यांना समानतेच्या पायावर आणावयाचे आहे हे एकच धोरण आपण स्वीकारावे अशी माझी सूचना आहे.

आता आपण अशा अवस्थेत आहोत की आपण अधिक खात्रीपूर्वक पुढचा प्रवास करु शकतो. आपल्याला आपण मिळविलेल्या अनुभवाचा वापर केला पाहिजे, साधन संपत्ती एकत्र आणली पाहिजे, उधळपट्टी करता कामा नये. आपण आपल्या राष्ट्राच्या साधन संपत्तीची उधळपट्टी होऊ देता कामा नये. लोकशाहीमध्ये अनेक गुण आहेत पण वेळाचा आणि शक्तीचा अपव्यय ही तिची एक अनुषंगित बाब आहे. असे असले तरी आपण अनेक कारणांसाठी शासनाच्या इतर प्रकारांपेक्षा लोकशाही पध्दती पसंत केली आहे. याचा अर्थ आपण उधळपट्टी टाळू शकत नाही असे नाही. आपल्याला उधळपट्टी परवडणार नाही कारण आपल्याला प्रगती करायची आहे. ही मूलभूत बाब आहे. जो माणूस वेगाने चालू शकत नाही त्याचा धिक्कार असो. तो जर सर्वांबरोबर चालू शकला नाही आणि मागे पडला तर त्याला अद्दल घडेल. आम्हाला रेंगाळणारे बाजारबुणगे नको आहेत. आपल्या नोकरीविषयीच्या परिस्थितीबद्दल आणि बदल्यांबद्दल आणि इतर काही कारणांसाठी सतत तक्रार करीत राहणारे आळसट लोक आम्हाला नकोत. पण मला काम हवे काम! मला कामाची फलनिष्पत्ती हवी! मला योध्द्यासारखे काम करणारे लोक हवेत. आपल्याला जे योग्य दिसते त्यासाठी लढणारे आणि चुकीच्या गोष्टींपुढे लाचारीने मान तुकविणार नाहीत असे लोक मला हवे

आहेत. तुम्ही महान कार्य करावे अशी माझी अपेक्षा आहे. तुम्ही भारताची उभारणी करावी अशी मी अपेक्षा करतो. या आपल्या विशाल देशाची उभारणी करण्याहून अधिक मोठे कार्य संभवते काय? याच भावनेने तुम्ही हे कार्य हाती घ्यावे. आणि कमकुवत, मथ्थड आणि आळशी लोकांना खड्यात जाऊ देत! अशा लोकांसाठी दयामाया दाखवू नका.

जयहिंद!

✦



५१. "संपूर्ण स्वातंत्र्य : आमचा जन्मसिध्द हक्क"

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनातील जवाहरलाल नेहरु यांचे अध्यक्षीय भाषणातील उतारा लाहोर, २९ डिसेंबर १९२९

आज आपण आपले भवितव्य धोक्यात असलेल्या काळात एकत्र जमत आहोत. आपल्याला आपल्या सामर्थ्याची आणि त्याच बरोबर दौर्बल्याची जाणीव आहे. आपण आपल्या भविष्य काळाकडे मोठ्या आशेने आणि आशंकेने पाहत आहोत. अशा काळात ज्यांनी आपल्या भावी पिढ्यांना सुख समृध्दी लाभावी म्हणून निरपेक्ष बुध्दीने आपले जीवन वेंचले त्यांचे आपण प्रथम स्मरण करू या. भूतकाळातील अनेक थोर पुरुष आज आपल्यात नाहीत. त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या पायावर आज आपण उभे आहोत. आपण त्यांचे महत्कार्य गौण लेखण्याचाही संभव आहे. ही जगरहाटी आहे. पण आपण त्यांचे अथवा त्यांच्या कार्याचे, भारताच्या स्वातंत्र्याचा पाया रचण्यासाठी त्यांनी केलेल्या महत्कार्याचे विस्मरण होऊ देता कामा नये. ज्या गौरवशाली तरुण तरुणींनी परिणामांची किंचितही पर्वा न करता परकीय जुलूमाविरूध्द प्रतिकार करण्यासाठी आपल्या बहुमोल प्राणांची आहुती दिली आणि अनेकविध हाल अपेष्टा सहन केल्या त्यांचेही आपण कदापी विस्मरण होऊ देता कामा नये. आपल्याला त्यांच्यापैकी अनेकांची नावेही ठाऊक नाहीत. त्यांनी समाजाकडून स्तुती सुमनांची अपेक्षा न करता परिश्रम केले, हाल अपेष्टा सहन केल्या आणि भारतीय स्वातंत्र्याच्या नाजूक अंकुराला आपल्या हृदयीच्या रूधीराचे सिंचन केले. ज्या काळात आपण नरमाई स्वीकारली अथवा तडजोडी केल्या त्या काळात ते ताठ मानेने उभे ठाकले आणि त्यांनी जनतेच्या स्वातंत्र्याच्या हक्काचा उद्घोष केला. भारताची जरी अवनती झाली असली तरी त्यांच्यात चैतन्य आहे हे त्यांनी जगाला दाखवून दिले. भारत जुलूमापुढे आणि दास्यापुढे मान तुकविणार नाही हे त्यांनी जाहिर केले. आपले राष्ट्रीय आंदोलन आपण वीटेवर वीट रचावी अशाप्रकारे उभारले आहे. काही वेळा तर हुतात्म्यांच्या मृत शरीरांवरून भारताने प्रगती केली आहे भूतकाळातील थोर व्यक्ती आपल्यात नाहीत पण त्यांचे धैर्य आपल्यात अद्यापही वसत आहे.

आपण आज आपल्यापुढे असलेल्या मूलभूत राष्ट्रीय समस्यांबाबत विचारविनिमय करणार आहोत आणि आपल्या निर्णयामुळे कदाचित भारताच्या इतिहासाला निराळे वळण लागण्याचीही शक्यता आहे पण केवळ तुमच्याच पुढे समस्या आहेत असे नाही. आज सारे जग हेच मुळी एक मोठे प्रश्नचिन्ह आहे. प्रत्येक देश आणि प्रत्येक समाज आज अनिश्चिततेच्या वातावरणात राहात आहे. श्रध्देचे युग आणि त्या युगातील सौख्य आणि शांती आज भूतकाळात जमा झाली आहे. आज प्रत्येक बाबतीत सर्व बाजूने प्रश्न उपस्थित होत आहेत. आपल्या पूर्वजांना जे चिरंतन

आणि पवित्र वाटत होते त्या सर्व गोष्टींबाबत आज प्रश्न विचारण्यात येत आहेत. आज सगळीकडे आशंका आणि अस्थैर्य निर्माण झाले आहे. शासनाच्या आणि समाजाच्या पायामध्येच आज परिवर्तनाची प्रक्रिया सुरु झाली आहे. स्वातंत्र्य, न्याय, मालमत्ता आणि कुटुंबसंस्था या सर्व कल्पनांवर हल्ला चढविण्यात येत आहे आणि या सर्वांची परिणति आज तरी अनिश्चित आहे. आपण इतिहासाच्या विघटनाच्या काळात राहात आहोत, जगाला प्रसूतीवेदना होत आहेत आणि या हालअपेष्टांतून नवी समाजरचना जन्माला येणार आहे.

भविष्य काळाच्या पोटात काय आहे हे कोणालाही सांगता येणार नाही. पण भावी जगाचे धोरण निश्चित करण्याच्या बाबतीत आशिया, एवढेच नव्हे तर भारत निर्णायक कामगिरी पार पाडणार आहे असे आपण ठामपणे सांगू शकतो. युरोपियन वर्चस्वाची सद्दी आता संपत आली आहे. युरोप हे आता कार्यकर्तृत्वाचे आणि कुतूहलाचे केंन्द्र राहिलेले नाही. भवितव्य अमेरिका आणि आशियाच्या हाती आहे. इतिहासाच्या खोट्या आणि अर्धवट ज्ञानामुळे अनेकांना वाटते की, युरोपने बाकीच्या साऱ्या जगतावर सदैव वर्चस्व गाजविले आहे. आशियाने नेहमीच युरोपच्या विजयी फौजांची घोडदौड सहन केली आणि तो पुन्हा विचारात गढून गेला अशी काहीजणांची धारणा आहे. शेकडो वर्षांपूर्वी आशियाच्या फौजांनी युरोप पादाक्रांत केला होता आणि आधुनिक युरोपातील बहुसंख्य लोक हे या आशियायी आक्रमकांचे वंशज आहेत याचा आपल्याला विसर पडला आहे. भारतानेच अखेर सिकंदरच्या लष्करी सामर्थ्याचे कंबरडे मोडले याचे आपल्याला विस्मरण झाले आहे. विचार हे आशियाचे विशेषत: भारताचे भूषण आहे यात शंकाच नाही पण कार्य कर्तृत्वाच्या क्षेत्रातही आशिया तेवढाच श्रेष्ठ आहे पण आशिया आणि युरोपच्या फौजांनी पंचखंडावर पुन्हा धुमाकूळ घालावा अशी आपल्यापैकी कोणाचीच इच्छा नाही. आपण सर्वांनीच ते खूप भोगले आहे.

भारत आज एका जागतिक आंदोलनाचा भाग आहे. केवळ चीन, तुर्कस्थान, इराण, इजिप्त नव्हे तर रशिया आणि पाश्चिमात्य देशही या आंदोलनात सहभागी झाले आहेत आणि भारत त्यापासून अलग राहू शकत नाही. आपल्यापुढे आपल्या स्वत:च्या समस्या, बिकट आणि गुंतागुंतीच्या समस्या आहेत. जगावर परिणाम करणाऱ्या व्यापक समस्यांचा आश्रय घेऊन आपण आपल्या समस्या टाळू शकत नाही. पण आपण जगाकडे दुर्लक्ष केले तर त्यात आपलेच अहित आहे. आजची जी काही मानवी संस्कृती आहे ती कुणा एका देशाची अथवा समाजाची मक्तेदारी नाही. ती एक संयुक्त, संमिश्र रचना आहे. सर्व देशांनी तिच्या निर्मितीला हातभार लावला आहे व आपल्याला योग्य तेवढा भाग स्वीकारला आहे आणि भारतापाशी जर जगाला देण्याजोगा काही संदेश असेल, मला वाटते तसा तो त्याच्यापाशी आहे, तर त्याने इतर लोकांच्या संदेशापासूनही बरेच काही घेतले पाहिजे, शिकले पाहिजे.

जेव्हा सर्व काही बदलत आहे तेव्हा भारताच्या दीर्घकालीन इतिहासाचे स्मरण करणे श्रेयस्कर ठरेल. भारतातील समाजरचनेने अनेकविध परकीय प्रभावांपुढे आणि हजारो वर्षातील परिवर्तन आणि संघर्ष यांच्यापुढे तग धरला आहे. तिचे आश्चर्यकार स्थैर्य ही एक इतिहासातील विस्मयजनक बाब आहे. ती तशी तग धरुन राहिली कारण तिने सारे आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. कोणतीही संस्कृती नष्ट करणे हे तिचे उद्दिष्ट नव्हते. तर विविध संस्कृतींमध्ये संतुलन साध्य करणे हे तिचे उद्दिष्ट होते. आर्य आणि अनार्य आपापल्या संस्कृतीचा मान राखून, परस्परांच्या संस्कृतींना मान्यता देऊन एकत्र राहिले, पारशी लोकांसारखे जे कोणी येथे आले त्यांचेही येथे स्वागत करण्यात आले. त्यांनाही या समाजरचनेत स्थान देण्यात आले. मुसलमानांच्या आगमनामुळे हा समतोल बिघडला होता. पण भारताने संतुलन साधण्याचा प्रयत्न चालविला होता, त्याला बऱ्याच प्रमाणात यश आले होते.

दुदैवाने आम्ही आपसातले मतभेद मिटवून स्थिरस्थावर होण्यापूर्वीच राजकीय रचना मोडून पडली, ब्रिटिश आले आणि आमचा पराभव झाला. चिरस्थायी स्वरुपाचा समाज निर्माण करण्यात भारताला प्रचंड यश मिळाले पण एका विशिष्ट मूलभूत बाबतीत त्याला अपशय आले आणि या अपयशामुळेच त्याचा पराभव झाला. तो पराभूतच राहिला. त्याने समानतेच्या समस्येचा तोडगा काढला नाही. भारताने जाणून बुजून या गोष्टीकडे दुर्लक्ष केले आणि विषमतेच्या पायावर आपल्या समाजरचनेची उभारणी केली. या धोरणाचा दु:खदायक परिणाम आपण भोगत आहोत.

युरोपात जेव्हा धार्मिक युध्दे चालू होती आणि ख्रिश्चन लोक आपापल्या देवदूतांच्या नावे परस्परांच्या कत्तली करीत होते त्यावेळी भारत सहिष्णू होता. पण आज या सहिष्णूतेचा थोडासा अंशही दिसत नाही. युरोपने काही प्रमाणात धार्मिक स्वातंत्र्य मिळविल्यानंतर तो राजकीय स्वातंत्र्यासाठी आणि राजकीय वैधानिक समानतेसाठी प्रयत्नशील राहिला हे साध्य केल्यानंतर युरोपला असे दिसून आले की, आर्थिक स्वातंत्र्य आणि समानतेखेरीज ही स्वातंत्र्ये आणि समानता निरर्थक आहे. म्हणून आज राजकारणाला विशेष अर्थ राहिलेला नाही. सामाजिक आणि आर्थिक समानता हाच आजचा सर्वात महत्वाचा मुलभूत प्रश्न बनला आहे.

भारतालाही या समस्येचा तोडगा शोधून काढावा लागेल आणि जोपर्यंत ते होत नाही तोपर्यंत त्याच्या राजकीय आणि सामाजिक रचनेला स्थैर्य प्राप्त होणार नाही. हा तोडगा इतर कोणत्या देशाच्या उदाहरणानुसारच असावा असे मुळीच नाही. तो जर टिकावयाचा असेल तर तो भारतीय जनतेच्या मनोभूमिकेवर आधारलेला असावा, त्यांच्या विचारातून आणि संस्कृतीतूनच हा तोडगा निघणे आवश्यक आहे आणि जेव्हा हा तोडगा सापडेल तेव्हा आज आपल्याला तापदायक होऊन बसलेले आणि आपल्याला स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणारे विविध प्रकारचे जातीभेद नष्ट होतील.

खरं तर वास्तव जातीभेद आज बऱ्याच प्रमाणात कमी झाले आहेत. पण परस्परांविषयीची भीती व संशय शिल्लक आहेत आणि त्यामुळे भेदाभेदांची बीजं रुजविण्यात येतात. भेद नाहीसे करणे ही आपल्यापुढील समस्या नाही. त्यांनी सुखनैव नांदावे आणि आपली संस्कृती अधिक समृध्द करावी. परस्परांविषयी भय आणि संशय कसे नष्ट करावेत, ही समस्या आहे आणि ते अदृश्य असल्यामुळे त्यांचा सामना करणे बिकट आहे. गेल्या वर्षी सर्व पक्षीय समितीने हे कार्य करण्याचा तळमळीने प्रयत्न केला होता. आणि हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने बरीच प्रगती केली होती. पण आपल्या या प्रयत्नांना संपूर्ण यश लाभले नाही हे आपण खेदाने मान्य केलेच पाहिजे. आमच्या अनेक मुसलमान आणि शीख मित्रांनी या बाबतीत सुचविण्यात आलेल्या तोडग्याला निकराने विरोध केला आहे. आकडेवारीच्या आणि शेकडेवारीच्या मुद्यांवर भावना चेतविण्यात येत आहेत. भय आणि अविश्वास यांचा सामना करण्याच्या बाबतीत तर्कशास्त्र आणि निर्भेळ बुध्दिवाद कुचकामी ठरतो. केवळ श्रध्दा आणि औदार्यच यावर मात करू शकते. विविध जमातींच्या पुढाऱ्यांपाशी हा विश्वास, औदार्य पुरेशा प्रमाणात आहेत एवढीच आशा मी व्यक्त करू शकतो.

आपण जर गुलाम देशातील गुलामच राहिलो तर आपल्याला अथवा आपल्या जमातींना काय मिळणार आहे? आपण जर आपल्या देशाला जखडणाऱ्या दास्याच्या श्रृंखला तोडून टाकल्या व स्वातंत्र्याच्या खुल्या वातावरणात राहू लागलो तर आपले काय नुकसान आहे? जे लोक आपले नाहीत आणि ज्यांनी आपल्याला दास्यात ठेवले आहे, त्यांनी आपल्याला स्वातंत्र्याच्या हक्कापासून वंचित ठेवावे आणि आपल्या मामुली हक्कांचे, खास अधिकारांचे संरक्षण करावे अशी आपली अपेक्षा काय आहे? कोणतीही बहुसंख्यांक जमात कडव्या अल्पसंख्यांकांना चिरडून टाकू शकणार नाही आणि विधानसभेत काही थोड्या अधिक जागा मिळाल्यामुळे कोणत्याही अल्पसंख्य जमातीचे पुरेसे संरक्षण होणार नाही. आजच्या जगात जवळ जवळ सर्वत्र काही मूठभर अल्पसंख्य लोकांच्या हातात सत्ता आणि संपत्ती एकवटलेली आहे आणि त्यांचेच प्रचंड बहुसंख्यांक समाजावर वर्चस्व आहे हे आपण विसरता कामा नये.

मी धार्मिक बाबतीत अंध श्रध्देचा हेकटपणाचा भोक्ता नाही आणि या प्रवृत्ती कमी होत आहेत याबद्दल मला आनंद वाटतो. मला कोणत्याही प्रकारचा अथवा स्वरूपाचा जातीयवाद आवडत नाही. कोणतेही राजकीय अथवा आर्थिक अधिकार मिळणे अथवा न मिळणे व्यक्तींच्या जाती धर्मावर का अवलंबून असावे हे मला कळत नाही. धार्मिक बाबतीतील स्वातंत्र्य असावे आणि सांस्कृतिक बाबतीत स्वातंत्र्य असावे याची मला संपूर्ण जाणीव आहे आणि विशेषत: ज्या भारतात या अधिकारांना नेहमीच मान्यता देण्यात आली आहे, सर्वांना हे अधिकार देण्यात आले आहेत, तेथे भावी काळातही असेच चालू राहील अशी शाश्वती सर्वांना मिळण्यात काहीच अडचण येऊ

नये. आज आपल्या क्षितिजावर जे अविश्वासाचे आणि भीतीचे सावट पसरले आहे ते समूळ नष्ट करण्याचा मार्ग शोधून काढणे आवश्यक आहे एवढेच. अंकित वंशाचे राजकारण मोठ्या प्रमाणात भीतीवर आणि द्वेषावर आधारलेले असते आणि आपण प्रदीर्घ काळ गुलामगिरीत असल्यामुळे आपली त्यातून सुटका होणे तितकेसे सोपे नाही.

मी हिंदु म्हणून जन्माला आलो पण मी स्वत:ला हिंदु म्हणवून घेण्यास अथवा हिंदूच्या वतीने बोलण्यास कितपत लायक आहे याची मला कल्पना नाही. पण आपल्या देशात अद्यापही जन्म कुठे झाला याला महत्व आहे आणि या जन्माच्या अधिकाराने हिंदूंच्या नेत्यांना औदार्याच्या बाबतीत पुढाकार घेण्याचा तुमचा खास हक्क तुम्ही जरूर बजावावा असे सांगण्याचो धारिष्ट्य मी करीन. औदार्य हे केवळ उत्तम नीतीमत्ता आहे असे नाही तर बऱ्याच प्रमाणात ते उत्तम राजकारण आणि समयसूचकताही ठरते आणि स्वतंत्र भारतात हिंदू कधीकाळी प्रभावहीन होतील अशी कल्पना करणेच मला अगदी अतर्क्य वाटते. माझ्या बाबतीत म्हणाल तर मी माझ्या मुस्लीम आणि शीख बांधवांना आनंदाने सांगेन की तुम्हाला जे काही हवे ते तुम्ही माझ्याकडून घेऊन जा, मी अजिबात विरोध अथवा वादविवाद करणार नाही. ज्या काळात या लेबलांना आणि बिरुदांना काहीच अर्थ राहणार नाही आणि आपला लढा हा आर्थिक पायावरील लढा होईल असा काळ लौकरच येणार आहे हे मला ठाऊक आहे. दरम्यानच्या काळात आपण आपसात काय व्यवस्था करतो याला फारसे महत्त्व नाही. भावी काळातील आपल्या प्रगतीला अडथळा होईल असे अडसर आपण निर्माण करता कामा नयेत एवढीच खबरदारी घेणे आवश्यक आहे.

कलकत्ता ठरावाचाच विचार केला तर आपल्यापुढे एकच ध्येय आहे, स्वातंत्र्य हेच ध्येय आहे. आजच्या जगात स्वातंत्र्य हा शब्द तितकासा आनंदाचा नाही कारण अलगपणा, दुरावा असा त्याचा अर्थ आहे. मानवजातीने संकुचित राष्ट्रवादाचे भरपूर दुष्परिणाम भोगले आहेत आणि आता ती व्यापक सहकार्यासाठी, परस्परावलंबनाकडे जाण्याचा प्रयत्न करीत आहे आणि आम्ही जेव्हा 'स्वातंत्र्य' या शब्दाचा वापर करतो तेव्हा त्या उदात्त उद्दिष्टाला कोणत्याही प्रकारे विरोध करण्याचा आमचा हेतू नसतो. ब्रिटिशांच्या वर्चस्वापासून, ब्रिटिश साम्राज्यशाहीपासून संपूर्ण मुक्तता हा आमच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत जागतिक सहकार्याच्या आणि संघराज्याच्या प्रस्थापनेच्या सर्व प्रयत्नांचे स्वागत करील आणि ज्या विशाल राष्ट्रसंघाचा तो समान सदस्य असेल. त्यासाठी आपल्या स्वातंत्र्याच्या काही अंशाचा त्याग करण्यास तयार होईल याबद्दल मला शंका नाही.

आजचे ब्रिटिश साम्राज्य हा अशा प्रकारचा राष्ट्र संघ नाही आणि जोपर्यंत तो लक्षावधी लोकांवर वर्चस्व गाजवित आहे आणि जगामधील अनेक देशांवर तेथील जनतेच्या मनाविरुध्द प्रभुसत्ता गाजवित आहे तोपर्यंत ते अशा प्रकारचा राष्ट्रसंघ होऊच

शकत नाही. जोपर्यंत साम्राज्यवाद हा त्याचा पाया आहे आणि इतर वंशांच्या लोकांची पिळणूक हेच त्यांच्या अस्तित्वाचे साधन आहे तोपर्यंत ते खऱ्या अर्थाने राष्ट्रकुल होऊ शकत नाही. आज ब्रिटिश साम्राज्य खरोखरीच राजकीय विसर्जनाच्या प्रक्रियेतून चालले आहे ते आज असंतुलीत अस्थिर अवस्थेत आहे. दक्षिण आफ्रिका या कुटुंबात सुखाने नांदत नाही तर आयरिश फ्री स्टेटही स्वखुषीने सामील झालेले नाही. इजिप्त दूर चालला आहे. राष्ट्रकुल जोपर्यंत साम्राज्यवादाचा आणि त्यांच्या सर्व लक्षणांचा त्याग करीत नाही तोपर्यंत भारत या राष्ट्रकुलांचा समान अधिकार असलेला सदस्य होऊ शकत नाही. जोपर्यंत हे होत नाही तोपर्यंत भारत ब्रिटिश साम्राज्यातील एक गुलाम राष्ट्र राहील आणि त्याची पिळणूक चालूच राहील. ब्रिटिश साम्राज्यशाहीची मगरमिठी भयानक आहे. ती प्रेमाने दिलेली आणि घेतलेली जीवनदायी मिठी नाही आणि ती तशी नसेल तर भूतकाळात जशी ती मृत्यूची मिठी होती तशीच ती यापुढेही राहणार आहे.

जागतिक शांततेच्या वाटाघाटी चालू आहेत आणि जगातील अनेक राष्ट्रांनी आपसात करार केले आहेत. पण हे करार केल्यानंतरही शस्त्रास्त्रे वाढत आहेत आणि शांततेच्या देवीला केवळ सुंदर भाषेत श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे. युद्धाची कारणे दूर केली तर शांतता प्रस्थापित होऊ शकते. जोपर्यंत एक देश दुसऱ्या देशावर, जोपर्यंत एक वर्ग दुसऱ्या वर्गाची पिळवणूक करीत आहे तोपर्यंत विद्यमान समाजरचना नष्ट करण्याचे प्रयत्न चालूच राहतील आणि कोणत्याही प्रकारचे स्थायी संतुलन टिकणार नाही. साम्राज्यशाही आणि भांडवलशाहीद्वारे शांतता कदापि प्रस्थापित होऊ शकत नाही आणि ब्रिटिश साम्राज्य हे याचे प्रतिक असल्यामुळे आणि बहुजन समाजाची पिळणूक हाच त्याचा आधार असल्यामुळ आपल्याला त्यात स्वखुषीने स्थान मिळणार नाही.

जोपर्यंत आमच्या बहुजन समाजावरील असह्य भार कमी होत नाही तोपर्यंत आम्हाला मिळणारे कोणतेही अधिकार कुचकामी ठरणार आहेत. प्रचंड साम्राज्याचे वजन असह्य आहे आणि आमची जनता हे ओझे दीर्घ काळापासून सहन करीत आली आहे. त्यांची पाठ वाकली आहे आणि मोडली आहे आणि त्यांचा धीर तर केव्हाच खचून गेला आहे. पिळणुकीचे ओझे जर असेच राहणार असेल तर राष्ट्रकुलातील भागीदारी ते कशी काय स्वीकारतील? आपल्यापुढे ज्या अनेक समस्या आहेत त्यातील बहुसंख्य समस्या ब्रिटिश सरकारनेच निर्माण केलेल्या आणि वाढविलेल्या आहेत. प्रस्थापित हितसंबंधांमुळे निर्माण झालेल्या समस्या आहेत.

भारतातील संस्थानिक, ब्रिटिश अधिकारी आणि ब्रिटिशांचे भांडवल आणि बडे जमिनदार यांचे हितसंबंध आमच्यावर लादण्यात येतात आणि ते त्यांच्या संरक्षणाचा तगादा लावत आहेत. ज्या लक्षावधी पीडित जनतेला संरक्षणाची खरी गरज आहे,

त्यांना जवळ जवळ आवाजच नाही आणि त्यांची बाजू मांडणारे लोक फारच कमी आहेत. जोपर्यंत ब्रिटिश साम्राज्य या ना त्या स्वरुपात भारतात अस्तित्वात आहे तोपर्यंत ते या हितसंबंधांना पुष्टी देईल आणि त्यांची वाढ करण्यात येईल आणि त्यापैकी प्रत्येकजण आमच्या मार्गात नवनवे अडथळे निर्माण करणार आहे. यासाठीच सरकारला दडपशाहीचा आश्रय घ्यावा लागत आहे. गुप्त पोलिसांचे खाते, या खात्यातील तिरस्करणीय चिथावणी देणारे हस्तक, खबऱ्ये आणि माफीचे साक्षीदार ही या साम्राज्यसत्तेची प्रतिके बनली आहेत.



३३६१

जवाहरलाल नेहरु यांची अंतिम इच्छा!

माझे निधन होईल तेव्हा माझ्या देहाला अग्नी देण्यात यावा. माझे निधन जर परदेशात झाले तर तेथेच माझ्या देहाला अग्नी देण्यात यावा आणि रक्षा अलाहाबादला पाठविण्यात यावी. त्यातील मूठभर रक्षा गंगेत सोडण्यात यावी आणि उरलेल्या रक्षेची विल्हेवाट पुढील प्रमाणे लावावी.

माझी मूठभर रक्षा अलाहाबादेतील गंगेत सोडण्यात यावी या माझ्या इच्छेला धार्मिक महत्त्व अजिबात नाही. माझ्या पुरते बोलायचे तर याबाबतीत माझ्या मनात कोणतीच धार्मिक भावना नाही. माझ्या बालपणापासून माझा अलाहाबादेतील गंगा आणि यमुना नदीशी जिव्हाळयाचा संबंध आहे आणि मी जसा मोठा होत गेलो तसा हा जिव्हाळा अधिकच वाढत गेला. माझ्या दृष्टीने गंगा हे एक प्रतिक आहे, भारताच्या भूतकाळातून वर्तमान काळात वाहणारे आणि भविष्य काळाच्या सागराला मिळणारे ते एक प्रतिक आहे, स्मृती आहे.

आणि मी भूतकाळातील बऱ्याच परंपरांचा आणि रुढींचा त्याग केला आहे तरी आणि भारताने त्याला जखडणाऱ्या आणि लोकांमध्ये फूट पाडणाऱ्या, बहुसंख्यांकांना दडपणाऱ्या आणि शरीराच्या आणि आत्म्याच्या मुक्त विकासाला प्रतिबंध करणाऱ्या सर्व शृंखलातून विमुक्त व्हावे अशी माझी मनोमन इच्छा आहे. मला हे जरी सर्व हवे असले तरी मी स्वत:ला भूतकाळापासून संपूर्णपणे तोडून टाकू इच्छित नाही.


मला त्या भूतकाळातील आणि वर्तमान काळातील महान् वारशाचा अभिमान आहे आणि इतर सर्वांप्रमाणेच मी सुध्दा भारताच्या प्रदीर्घ भूतकाळापासून इतिहासाच्या उष:काळापासून चालत आलेल्या प्रदीर्घ मालिकेतील एक दुवा आहे याची मला जाणीव आहे. मी ही मालिका तोडणार नाही कारण ती मला मोलाची वाटते आणि तिच्यापासून मला प्रेरणा मिळते.

आणि माझ्या या इच्छेचे एक चिन्ह आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाला माझा अखेरचा प्राणिपात म्हणून माझ्या रक्षेपैकी मूठभर रक्षा अलाहाबादच्या गंगेत सोडून द्यावी आणि तिने ती भारताच्या किनाऱ्याशी खेळणाऱ्या समुद्राकडे वाहून न्यावी.

पण माझ्या रक्षेपैकी बऱ्याच रक्षेची विल्हेवाट दुसऱ्या प्रकारे लावण्यात यावी. ही रक्षा विमानातून उंच आकाशात न्यावी आणि तेथून ती भारतातील शेतात, जेथे शेतकरी काम करतात त्या शेतांवर पसरुन टाकावी म्हणजे ती भारताच्या मातीत आणि धुळीत मिसळून जाईन आणि भारताचा अविभाज्य भाग बनून जाईन.

– जवाहरलाल नेहरु, २१ जून, १९५४.

✦


REFBK-0026050



ध्येय पूर्तीसाठी
अनेक मैल जायचे!